डेमी अँटिक
पृष्ठें ८००
खंड १-२-३

# उपकारी माणसें

कापडी एकत्र
ग्रंथालय प्रत
मूल्य रु.१२/१२

—: एप्रिल १९५५ पर्यंत सवलत :—

मनीऑर्डरीनें रु. १०/८ पाठवून **एक** किंवा रु. २० पाठवून **दोन** प्रती घरपोंच.

**'मराठी कादंबरी'**

उत्तरार्ध–प्रकरण ८ वें—**'वेगळ्या वाटा'** मध्यें

—: प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे :—

**" रघुवीर सामंत, साने, वेडेकर यांनीं कादंबरी क्षेत्रांत वेगळ्या अशा वाटा पाडल्या...** येथें बुद्धिप्रधानतेला महत्वाचें स्थान नाहीं. भावनेवर अधिक भर असून सहानुभूति अधिक व्यापक आहे... **येथील जीवनविषयक प्रश्नांचा आवांका मोठा आहे. जीवन मूल्यें एकमेकांस बरींचशीं जवळचीं आहेत...माणुसकीची ओढ ही सामंतांच्या लेखनांतील मुख्य शक्ति आहे... दलित व उपेक्षित व्यक्तीचें जीवन जाणून घेण्याची तळमळ व त्यांच्या विषयीं सहानुभूति निर्माण करण्याची शक्ति सामंतांच्या लेखन-शैलीत दिसून येते.**

सामंतांच्या कथा इतर लहानथोर कादंबरीकारांचेपेक्षां कांहीशा पृथगात्मक आहेत. केवळ वाचकांना रिझवण्यासाठीं जसें त्यांनीं लेखन केलें नाहीं, तशा एखाद्या तत्कालिक सामाजिक राजकीय समस्येनेंही त्यांच्या कथा रंजित झालेल्या नाहींत.

उपकारी माणसांत दोन पिढ्यांचा जीवनपट चित्रित झाला आहे. ...एकत्र कुटुंबाचें नेमकें व प्रत्ययकारी चित्रण त्यांत त्यांनीं केलें आहे. कुटुंबांतील परस्पर संबंधांचें फारच मार्मिक वर्णन त्यांत सांपडतें. व्यापक जीवनाच्या अंगोपांगांचें दर्शनहि येथें घडतें. अवलंबिलेलें रचनातंत्रहि नेहमी-पेक्षां वेगळ्या प्रकारचें आहे...**इतकीं सरस पात्रें** दुसऱ्या कोणत्याहि पुत्रात्मक कादंबरींत क्वचितच सांपडतील. **ह्याचें श्रेय सामंतांच्या सहज शैलीला आहे, तसेंच सोज्वल भावपूर्ण वृत्तीला व जीवन विषयक जाणिवेला आहे.**

एकूण या हळुवार प्रदीर्घ कथेंत एक विशाल परंतु भावनोत्कट, संथ, सोज्वळ असा जीवनपट सरस व भावगर्भ शैलीनें चित्रित करण्याचें श्रेय रघुवीर सामंतानीं मिळवलें आहे, एवढें खास ".

**मागवण्याचीं ठिकाणें :—**

१) सौ. स्नेहल सामंत, पी. ए., १४ बी. हरजीवनदास एस्टेट, दादर, मुंबई १४.
२) श्री. पी. एन्. देशपांडे, हिंदमाता एजन्सी, गिरगांव, मुंबई ४.
३) बॉम्बे बुक डेपो, गिरगांव, मुंबई ४.



# आम्हांला जगायचंय!

रघुवीर सामंत




**अमरज्योति वाङ्मय**
पुष्प १६वें
२६ जानेवारी
१९५५
मूल्य रु. ३॥

## आपल्या वाढत्या बाळांच्या हातीं

सोज्वल, कलात्मक

अमर ज्योति वाङ्मय

विश्वासानें अवश्य द्या.

त्यांच्या अभिरुचीला हितावह वळण लागेल.

* पहिल्या ९ पुष्पांची द्वितीयावृत्ति

**केमकर आणि मंडळी, मुंबई ४.**

क्रमानें प्रकाशित करीत आहेत.

• **भावजीवन (१५ आणे), शहरचे भाई (१५ आणे) मायेची किमया (रु. १), माणसाचें शेपूट (१२ आणे), पहिले सात (१५ आणे), दुसरे सात (१५ आणे), आम्ही खेडवळ माणसं (रु. २।).**

ही पुढील अमर ज्योति वाङ्मय पुष्पें बक्षिस द्या.

इतर पारितोषिकार्ह विविध लहानमोठीं पुस्तकें

**—: आमच्याकडे हमखास मिळतात :—**

**के म क र आ णि मं ड ळी**

शिक्षानगर समोर, वि. पटेल रोड, मुंबई ४.



## आम्ही खेडवळ माणसं

" श्री. सामंतांच्या वाङ्मयांत विचारशीलता, त्वरित पण भेदक वर्णनशैली, मनुष्य स्वभावाचें मार्मिक चित्रण आणि कथावस्तूची परिणामकारक मांडणी करण्यावरच सारें केंद्रित झालेलें लक्ष, हे मुख्य गुण आढळतात. 'आम्ही खेडवळ माणसं' मध्यें या गुणांचा आढळ होतो. त्यांत मूठभर पुढारलेले लोक व या पिळवणुकीच्या पकडीतून सुटण्या साठीं–धडपडणारी खेडवळ माणसें यांचा सनातन झगडा भिदारक स्वरूपांत मांडला आहे... कादंबरी विचार प्रक्षोभक आहे... विचारप्रवण व संयमशील वाचकांना ही ' खेडवळ माणसं " आवडण्यासारखी आहेत."



## सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

गिरगांव—मुंबई ४.

**कुटुंबीय बचत योजना**

**आपल्याला सोयीची वाटेल**



कामगार विमायोजनेनुसार औषधें देणारें खात्रीचें केंद्र

**ए म्पा य र फा र्म सी**

देशी विलायती औषधें व गृहपयोगी वस्तूंचे व्यापारी

इराणी बिल्डिंग, लेडी जमशेटजी रोड, कोहिनूर मिल नं. ३

शिवाजी पार्क नजीक, दादर मुंबई २८.



**खात्रीचें निलगिरी तेल म्हणजेच**

**+ आ रों दा +**

**पडसें खोकल्यावर रामबाण : सर्वत्र मिळतें**



**THE BOOK CENTRE LTD.**

[Merwan Building, S. P. M. Rd. Fort. BOMBAY]

*Supplies :–*

**Any Rare Book From Ready Stock**

**College, Library & General**

**At very moderate exchange rates**

**Join Our Link.**



**हमखास कुटुंबीय स्वास्थ्यासाठीं**

**पर्ल काढा** • सर्व वापरतात. सर्वत्र मिळतो.



**चोख दूध, खात्रीचें लोणी, चक्का व खानदेशी, बेळगांवीं तूप**

**द त्ता त्र य आणि कं प नी**

मिरांडा चाळ, ले. जमशेटजी रोड, दादर–मुंबई २८.



**शाळा कॉलेज व परीक्षांचीं—हिंदी, मराठी, गुजराथी, इंग्रजी. संस्कृत इ. सर्व पुस्तकें**

**: बॉम्बे बुक डेपो :**

गिरगांव—मुंबई नं. ४.

**येथें हमखास मिळत असतात.**

डेमी अॅाक्टेव्ह
पृष्ठें ८००
खंड १-२-३

# उपकारी माणसें

कापडी एकत्र
ग्रंथालय प्रत
मूल्य रु. १२/१२

—: एप्रिल १९५५ पर्यंत सवलत :—

मनीऑर्डरीनें रु. १०/८ पाठवून **एक** किंवा रु. २० पाठवून **दोन** प्रती घरपोंच.

**'मराठी कादंबरी'**

उत्तरार्ध–प्रकरण ८ वें—**'वेगळ्या वाटा'** मध्यें

—: प्रा. सौ. **कुसुमावती देशपांडे** :—

" **रघुवीर सामंत, साने, वेडेकर यांनीं कादंबरी क्षेत्रांत वेगळ्या अशा वाटा पाडल्या...** येथें बुद्धिप्रधानतेला महत्वाचें स्थान नाहीं. भावनेवर अधिक भर असून सहानुभूति अधिक व्यापक आहे... **येथील जीवनविषयक प्रश्नांचा आवांका मोठा आहे. जीवन मूल्यें एकमेकांस बरीचशीं जवळचीं आहेत...माणुसकीची ओढ ही सामंतांच्या लेखनातील मुख्य शक्ति आहे... दलित व उपेक्षित व्यक्तीचें जीवन जाणून घेण्याची तळमळ व त्यांच्या विषयीं सहानुभूति निर्माण करण्याची शक्ति सामंतांच्या लेखनशैलीत दिसून येते.**


सामंतांच्या कथा इतर लहानथोर कादंबरीकारांचेपेक्षां कांहींशा पृथगात्मक आहेत. केवळ वाचकांना रिझवण्यासाठीं जसें त्यांनीं लेखन केलें नाहीं, तशा एखाद्या तत्कालिक सामाजिक राजकीय समस्येनेंही त्यांच्या **कथा** रंजित झालेल्या नाहींत.

उपकारी माणसांत दोन पिढ्यांचा जीवनपट चित्रित झाला आहे. ...एकत्र कुटुंबाचें नेमकें व प्रत्ययकारी चित्रण त्यांत त्यांनीं केलें आहे. कुटुंबांतील परस्पर संबंधांचें फारच मार्मिक वर्णन त्यांत सांपडतें. व्यापक जीवनाच्या अंगोपांगांचें दर्शनहि येथें घडतें. अवलंबिलेलें रचनातंत्रहि नेहमीपेक्षां वेगळ्या प्रकारचें आहे...**इतकीं सरस पत्रें** दुसऱ्या कोणत्याहि पत्रात्मक कादंबरींत क्वचितच सापडतील. **ह्याचें श्रेय सामंतांच्या सहज शैलीला आहे, तसेंच सोज्वल भावपूर्ण वृत्तीला व जीवन विषयक जाणिवेला आहे.**

एकूण या हळुवार प्रदीर्घ कथेंत एक विशाल परंतु भावनोत्कट, संथ, सोज्वळ असा जीवनपट सुरस व भावगर्भ शैलीनें चित्रित करण्याचें श्रेय रघुवीर सामंतानीं मिळवलें आहे, एवढें खास ".

**मागवण्याचीं ठिकाणें :—**

१ ) सौ. स्नेहल सामंत, पी. ए., १४ बी. हरजीवनदास एस्टेट, दादर, मुंबई १४.
२ ) श्री. पी. एन्. देशपांडे, हिंदमाता एजन्सी, गिरगांव, मुंबई ४.
३ ) बॉंबे बुक डेपो, गिरगांव, मुंबई ४.



# आम्हांला जगायचंय!

रघुवीर सामंत





अमरज्योति
वाङ्मय
पुष्प १६वें
२६ जानेवारी
१९५५
मूल्य रु. ३॥

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

गिरगांव—मुंबई ४.

कुटुंबीय बचत योजना

आपल्याला सोयीची वाटेल

---

कामगार विमायोजनेनुसार औषधें देणारें खात्रीचें केंद्र

एम्पायर फार्मसी

देशी विलायती औषधें व गृहपयोगी वस्तूंचे व्यापारी

इराणी बिल्डिंग, लेडी जमशेटजी रोड, कोहिनूर मिल नं. ३

शिवाजी पार्क नजीक, दादर मुंबई २८.

---

खात्रीचें निलगिरी तैल म्हणजेच

+ आ रों दा +

पडसें खोकल्यावर रामबाण : सर्वत्र मिळतें

---

THE BOOK CENTRE LTD.

[Merwan Building, S. P. M. Rd. Fort. BOMBAY]

*Supplies :-*

**Any Rare Book From Ready Stock**

**College, Library & General**

**At very moderate exchange rates**

**Join Our Link.**

---

हमखास कुटुंबीय स्वास्थ्यासाठीं

पर्ल काढा ● सर्व वापरतात. सर्वत्र मिळतो.

---

चोख दूध, खात्रीचें लोणी, चक्का व

खानदेशी, बेळगांवी तूप

दत्तात्रय आणि कंपनी

मिरांडा चाळ, ले. जमशेटजी रोड, दादर-मुंबई २८.

---

शाळा कॉलेज व परीक्षांचीं—हिंदी, मराठी,

गुजराथी, इंग्रजी. संस्कृत इ. सर्व पुस्तकें

: बॉम्बे बुक डेपो :

गिरगांव—मुंबई नं. ४.

येथें हमखास मिळत असतात.

[ -१- ]

# पार्श्व-पट

....१

विजेचे दिवे विजतांच,...डोळ्यासमोर काळोख किनाट पसरला. कानांवर उत्सुक निःशब्दता आदळली; हृदयाची धडधड मात्र, त्यामुळेंच...सुस्पष्ट होत गेली.

—'आतां काय होणार ?—' अशी एक न्यारी अपेक्षा मनांत कोंदाटली. अधीरता अवतरली.

तोंच, क्षणार्धांत समोरच्या काळोखांत एक प्रकाशबिंदू-एक तेजो-वर्तुळ झळकलें. त्याचवेळीं, एक सूक्ष्म मंजुळ स्वर हवेंत हळूच उमटला. उत्तरोत्तर मोठा मोठा होत, त्यानें एका भावमधुर स्वर-मालिकेचें—लयबद्ध गतीचें—स्वरूप धारण केलें; तोंवर, समोरचा काळोख प्रखर प्रकाशानें साफ धुवूनहि टाकला होता—

मग कांहीं क्षण गंभीर चढती स्वर-मालिका कानांना स्पर्शून निववीत राहिली; आणि त्यावेळीं डोळ्यासमोर छाया-प्रकाशांचा अद्भूत खेळ होत राहिला.

त्यांतूनच मग एक एक बदलते देखावे दिसूं लागले—त्याबरोबरच विविध मधुर स्वरांची श्रवणसुभग आंदोलनेंहि कानांवर आदळत—गुदगुल्या करीत—गेलीं.

समोर दिसणारे ते सायंसूर्याचे मोहक तिरपे किरण; त्यांना चिकटलेल्या निसर्गरम्य सृष्टीच्या लांब लांब सावल्या;...वर खालीं जागच्याजागीं हेलावणारा दूर दूरपर्यंत पसरलेला अफाट दर्या; त्याच्या मानवी किनाऱ्याला लागणाऱ्या, त्यावर आपटणाऱ्या, उंचावून–फेसाळून–खळखळून फटाफट उड्या टाकणाऱ्या त्या लाटा;... त्यांत साफ बुडालेले व मधून मधून आपलीं डोकीं वर काढणारे ते चित्रविचित्र आकारांचे, लहानमोठे, काळेकभिन्न ओबडधोबड खडक;...अफाट दर्याच्या त्या फेंसाळत्या लाटांत व बुडत्या तेजःपुंज सूर्याच्या तिरप्या सायंकिरणांत चाललेलें त्यांचें ( कालातीत, मन मानेल असें ) अव्याहत स्नान...

त्यावेळचा–' खळ्ळ् ' ' धब्ब ' ' डुबुक् डुबुक् ' असला लाटांचा आवाज; त्या आवाजाबरोबरच, तबल्याचे सुमधुर, बोलके बोल; पंखावर स्वार झालेल्या फिरकतीं; डग्ग्याचे लयबद्ध गुंकारयुक्त ध्वनि नी संमिश्र मुखडे; भावानुसारी बद्द थापा; सभोंवार हवेंत तरंगून कानांवर त्यांचा प्रचंड नाद होत होता !–मनालाहि त्या उल्हसित करीत होत्या.

अतिशयच उत्सुक करीत होतें तें सारें वातावरण !...

....२

समोर दिसणाऱ्या त्या दर्या-किनारच्या भूमीवरहि सूर्याचे ते तिरपे किरण पडले होते. एकच एक अस्पष्ट गजबज कानांवर पडत होती. माणसांच्या–स्त्री-पुरुषांच्या, मुलांच्या–लांब लांब हलत्या सांवल्या पडल्या होत्या.

नी त्यांना चिकटलेल्या त्या प्रत्यक्ष हलत्या पावलांवरून चटकन् पुढील एकएक अंधुक कल्पना मनांत येऊन जात होती.

हा पुरुष–ही स्त्री, हीं मुलें !...ही धुंद यौवना, हा जरठ वृद्ध, हीं निश्चिंत खेळकर मुलें !...हा मदोन्मत्त श्रीमंत, हा अकिंचन



दरिद्रि, हा श्रम ढाळणारा कामकरी, हा खर्डेघाश्या पांढरपेशा मध्यमवर्गीय कारकून !...हा—

हो, तीं फक्त पावलेंच ! विविध दिशेनें, विविध वेगानें हालणारीं तीं नुसतीं पावलें ! आणि त्याबरोबरच केवळ जनसंमर्दातून येणाऱ्या गोंधळी मानवी आवाजाचीच अस्पष्ट, निर्बोध कुजबुज ! ...तेवढ्याचीच,...एकच एक जाणीव होत होती काय ती !...

....३

तोंच...' आऽ–आऽ–आऽ !...आऽलाऽ ' असा एक कांहींसा घोगरा आवाज, आतांपर्यंतच्या निःशब्दतेत व अर्थशून्य गोंधळांत एकदम घुसला—

त्या मागूनच ' पे-प्पेंऽपे-प्पेंऽ ' असा पेपेऱ्याचा सुरेल बेसुर संमिश्र आवाज कानांत शिरला.

फिरून, 'आहाऽआहा हाऽ आहा हाऽ' असा तोच मानवी आवाज आला; त्याबरोबरच समोरच्या हलत्या लांब लांब सावल्यांपैकीं एकच एक लांब सांवली दृष्टीसमोर आली—

तो रुंद खांदा, त्यावर उंच काठी, काठीला फांद्या फुटल्याप्रमाणें गुतवलेल्या आडव्या काटक्या, त्यांनाच सुतानें बांधलेले लहानमोठे फुगवलेले फुगे; त्यांच्याच वरखालीं हेलकावणाऱ्या त्या मोठ्या सांवल्या—

पुन्हां मग, त्यांतूनच वरखालीं होणारे, सुतावर उडणारे, प्रत्यक्ष लहान मोठे फुगेहि दिसले.

खांद्यावरच्या त्या तिरक्या काठीला फुटलेल्या काटक्यांच्या कांहीं फांद्यांवर पेपेरीं लटकवलेलीं; काठीच्या खालच्या टोकाजवळ एक हलता रांकट होत; रुंदावलेल्या पंजाच्या पांची बोटांतून खालीं सुटलेल्या स्प्रिंगांवर लोंबकळणाऱ्या, पंख पसरलेल्या, रंगी-बेरंगी कागदी चिमण्या;...वरखालीं उडत असल्यासारख्या त्या त्यांच्या यांत्रिक हालचाली—

तोंच,... "अहह्...अह्ह्...अह्हाऽ" असला घोगरा आवाज पुन्हा कानांवर पडला—

....४

पुन्हां आडवी काठी नि तिला फुटलेल्या वरल्या कांटक्यांना धरून सुतावर हवेंत हिंदकळणारे लहान मोठे सात आठ फुगे दिसले...

आणि बघतांबघतां...त्यांतल्याच एका मोठ्याशा फुग्यानें मग विराट स्वरूप धारण केलें; तो पुढें पुढें होत, अगदीं दृष्टीसमोर आला! तो क्षणकाळच तसा हिंदकळला असेल नसेल, तोंच...

तो अकस्मात फट्कन् फुटलाहि—

त्याचवेळीं, झांजेच्या घोगऱ्या ठेक्याचाहि 'खळ्ळ्ळ्' असा आवाज कानांवर आदळला—

फुटून अदृश्य झालेल्या त्या फुग्यांतून उजव्या बाजूस काळोख पसरला; उलट, डाव्या बाजूस काळया पार्श्वभूमीवर थरथरतीं पांढरीं मोठीं अक्षरें दिसूं लागलीं—

**आम्हांला**

मग तसाच पुन्हां झांजेसह अकस्मात् दुसरा दीर्घ स्वर निघाला; आणि उजव्या बाजूस पुढलीं थरथरतीं पांढरीं अक्षरें दिसूं लागलीं—

**जगायचंय !**

तोंच, एका नवीनच स्वर-मालिकेचा आधार घेऊन तीं संपूर्ण थरथरतीं अक्षरें एकाच वेळीं समोर दिसूं लागलीं....

**आम्हांला–जगायचंय !**

पुन्हां झांजेच्या झंकारासह एकेका शब्दानें छोटी पुस्ती समोर अवतीर्ण झाली....

[ उगवत्या स्वतंत्र भारताच्या
जीवन-आशा-आकांक्षांचा भावपट ! ]



....५

त्यामागें, तेवढ्यांतच, एक नवा अस्पष्ट छोटा फुगा दिसूं लागला; तो बघतां बघतां मोठा होत असतांना तीं पहिलीं अक्षरें विरत गेलीं; मग तो नवा फुगा क्षणकाळ हिंदकळला. पण झांजेच्या नव्या झंकार-ध्वनीसह तोहि फुटून नवीन अक्षरें दृष्टीसमोर उमटलीं—

## पटकथा—संवाद—पद्यें

* * * * *

## दिग्दर्शन

* * * * *

तेवढ्यांत, मागें मघां दिसलेला तो हाताचा पसरलेला पंजा व त्याला स्प्रिंगनें लोंबकळणाऱ्या–उडत्या, वरखालीं हिंदकळणाऱ्या, पसरलेल्या पंखाच्या चिमण्या दृष्टीसमोर स्पष्ट झाल्या.—

आणि बघतांबघतां, प्रत्येकीच्या खालीं पांढरीं अक्षरें एकापुढे एक अवतीर्ण झालीं—

**प्रकाश— विवेक— मंगल— जीवन— नरेन्द्र**

तीं अदृश्य होऊन तिथें दुसरीं पांढरीं अक्षरें दिसूं लागलीं—

**छाया— नलिनी— हौशी— —गंगा**

पुन्हां, तेंहि सर्व बघबघतां अदृश्य झालें; मग फिरून ती डुलत्या फुग्यांसह दिसणारी आडवी काठी; रांकट हाताच्या त्या पसरलेल्या पंजाच्या बोटावर स्प्रिंगनें लोंबकळणाऱ्या उडत्या चिमण्या;...

एकच्या एक विस्तीर्ण धांवता देखावा दृष्टीसमोर तरळून गेला नि फिरून 'पे प्पेंऽ प्पेंऽ' व 'अह्ऽ अहऽ हाऽ' असा आवाज...

....६

मग तेंहि फिरून विरलें;...आणि पुन्हां–तिरपे सूर्यकिरण, लांब लांब सांवल्या, फेसाळता अफाट समुद्र, किनाऱ्यावरील विविध आकाराचे वर डोकावणारे काळे उघडेबोडके खडक—

त्यांच्याकडेच धावत येऊन फुटूं पाहणारी एक मोठी खळखळती लाट दिसूं लागली—

ती मोठी लाट, जणूं वरून, आकाशांतून, आपल्याच—अगदीं आपल्यांच—अंगावर प्रत्यक्ष पडत आहे, असा अनिमिष नेत्रांना निमिषमात्र भास झाला; आणि मग—

तिच्या त्या प्रंचड अधःपाताबरोबरच, दृष्टीसमोर पुन्हां पूर्ववत्... संपूर्ण काळोखहि कोसळून पडला.

पांच—दहा—वीस—पंचवीस, तीस,... !

छेः, अजूनहि तो काळाकभिन्न काळोख समोरच!—

कमालीची निःशब्दताहि तशीच चौफेर नांदत राहिली—

समोरच्या त्या सर्वांगीण शून्यत्वानें आपला तर अगदीं अंत पाहिल्यासारखेंच वाटावें.—मनांत मनस्वी संतापहि अवतरूं लागावा—

....७

तोंच—तोंच—

त्या पडद्यावरल्या काळोखांतूनच, हळुवार, भावपूर्ण पण कुजबुजता संथ—अस्पष्ट आवाज ऐकूं आला—"सुहृदांनो—तुम्हांला, आम्हाला, आपणा साऱ्यांनाच—होय—तुम्हां—आम्हांला—आम्हांला हो—आ म्हां ला ज गा य चं आ हे!"

फिरून क्षणकाळ निःशब्दता!...मग त्या दाट काळोखातूनच फिरून तो आवाज आला—

"तरीपण थोडा धीर धरला पाहिजे!—हृदयांत प्रथम शांतता, सहिष्णुता, त्याग पुरेपुर असायला हवा! होऽना? जीवन हें 'जगायलाच आहे! आम्हांला जगायचंच आहे!...होय..."—

तो आवाज हळूहळू जरा चढा होत गेला; ते शब्द पुढें पुढें गद्गदहि झाले.



त्या मागें हळू हळू कोमल स्वर—झंकार उठत गेले; आणि त्याच वेळीं अखेर संथपणें उच्चारलेले ते आंदोलित शब्द पुन्हां ऐकूं आले—"आम्हांला जगायचंय्! आम्हांला जगायचंय्!!"

तोंपर्यंत—समोरील काळोखांत मध्यभागीं प्रथम एक सूक्ष्मसा प्रकाश—बिंदु दिसला; तो बघबघतां वर्तुळाकार वाढत गेला.

मग तिथे स्वच्छ, निरभ्र असें आकाश दिसूं लागलें—

नि त्या निरभ्र आकाशाखालीं—जमिनीची कल्पना देणारा—झाडाचा एक अपूर्ण शेंडा वाऱ्यावर डोलतांना दिसूं लागला—

[ -२- ]

# परिचय

....८

त्याच स्फटिकवत् दृश्यामागें, मायक्रोफोन–लाउडस्पीकरवर दुमदुमणारा दूरचा भरदार आवाज, तेवढ्यांत एकदम ऐकूं आला–" साऱ्यांनाच तसं वाटतं !– आणि आम्हींहि तें तसं खरं खुर ठरवलं–' आम्हाला जगायचंय् !' तसं मनापासूनच ठरवलं !–म्हणूनच तर, एवढ्या लहानश्या अवधींत, भोंवतालच्या या ओसाडींत, आमचं हें ' मंगल–ग्राम ' वसलंय् ! तें एक आदर्श ग्राम ठरतंय् ! त्याच्याच कौतुकाचा, आम्हालाहि अनपेक्षित नि गोड असा आजचा हा समारंभ ! नि आपले आवडते मुख्य प्रधान महाशय नरेन्द्र यांच्याच अध्यक्षतेखालीं, आज येथें तो असा पार पडूं शकतोय् ! होय !–मला याक्षणीं साभिमान धन्यताच वाटतेय् याची !–"

त्या शब्दांत हलुवार आंदोलनें होतीं; मर्दानी चढउतारांसह ज्यावेळीं ते कानांवर पडत होते, त्याच वेळीं, दृष्टीसमोर दूरपर्यंत पसरलेला एक अफाट जनता–सागर दिसूं लागला होता.

त्या शब्दांनुसार, तिथल्या चेहऱ्याचेहऱ्यावर होणाऱ्या त्या विविध हालचाली ! समुद्रावर लहान मोठ्या लाटा येत-जात असाव्यात, संथ गंभीरपणें तो हेलावत असावा, असाच त्यांतून भास होत होता—

तिथल्या स्त्री-पुरुष-मुलें साऱ्यांचे डोळे मात्र एकाच बाजूस एकाग्रतेनें लागलेले दिसत होते—

पण मग, सारे असे पहात् तरी कुठे असावेत ?...तो बोलणारा संथ गंभीर मर्दानी आवाज तरी कुणाचा असावा ?

त्याचेंच एक सौम्य कुतूहल, त्याक्षणीं मनांत तरंगू लागणें साहजिकच होतें–



....९

तोच, स्टेजवर उभारलेल्या त्या मायक्रोफोनसमोर उभा असलेला एक पांढरपेशा प्रौढ दिसला—

साधारण सडपातळ अंगकाठीचा होता तो ! लांब पांढरा नेहरू शर्ट व त्यावर घातलेलें फिक्या मंद पट्ट्यापट्ट्यांचें तें जाकीट त्याला शोभून दिसत होतें. त्यानें धोतराचा सोगा खालीं सुटाच लोळत सोडला होता. बोलतां बोलतां, त्याचा उजवा हात आंदोलत वरखालीं होत होता; नी डावा हात अधून मधून मायक्रोफोनच्या उभ्या दांडीला चाळा म्हणून स्पर्शत होता.

छातीवर आलेला त्याचा हात चटकन् वर चढला नि डोक्याजवळ गेला; कोहीशा अस्ताव्यस्त व तेल न लावलेल्या त्याच्या भुरभुऱ्या केसांना त्यानें अभावितपणानें स्पर्श केला; त्याचवेळीं, त्याचें तरतरित नाक व चमकदारपणें हलत असलेले त्याचे डोळे दिसले;–त्याचा संपूर्ण प्रसन्न लंब चेहराच एकदम डोळ्यासमोर आला.

श्मश्रू केलेल्या त्याच्या तुळतुळीत चेहऱ्यावर, वास्तविक प्रौढत्वच विलसत होतें. तरी डोळयांत व हालचालींत मात्र बालिश उत्साह व आशावादच होता.

बोलतां बोलतां, तो किंचित् हसला; तेव्हां, त्याच्या अर्धस्फुट ओष्ठांतून, त्याचे किंचित् कलते रेखीव विरळ दांत दिसले. आणि त्याक्षणीं तर त्याच्या चेहऱ्याची सोज्वळता–सात्विकता अधिकच वाढली—

क्षणकाळ थबकून, तो पुढें बोलतच राहिला–" या आमच्या एवढ्या मोठ्या स्नेहसंमेलन–स्थळीं,–लोकमान्य–गांधीजी–विनोबाजी–जवाहरजी, या साऱ्यांचे फोटो सोडले, तर इतर कोणा देवादिकांना भिंतीवर टांगलेले दिसणार नाहीं ! याचा अर्थ–' इथली ही मंडळी देवादिकांना विसरली असावीत ' असा मोठ्या मार्मिक निरीक्षणाचा कयास, आपल्या प्रधानमहाशयांनीं, मघां केलेल्या आपल्या बहुमोल भाषणाच्या ओघांत, तुमच्यापुढें व्यक्त करून दाखवला !–पण येथें आमच्यावतीनें, त्याबाबत, वेळींच थोडें स्पष्टीकरण करण्याचें आपलें कर्तव्य करावें, असे मला मात्र वाटतें.–"

....१०

त्यानें त्यावेळीं सौम्य स्मित केलें व अगदीं आपल्या जवळच, स्टेजवरील टेबलाजवळ मध्यभागीं बसलेल्या नरेन्द्रांकडे पाहिलें.

खुर्चींत किंचितसें मागें रेलून बसल्याबसल्याच, नामदार नरेन्द्रांनी सस्मित मुखानें त्याच्याकडे वळून पाहिलें; हळूच आपला हात आपल्या टक्कल पडलेल्या डोक्यावरील उरल्यासुरल्या केसांवरून फिरवला. मग, जवळच बसलेल्या नलिनी-कडे–आपल्या पत्नीकडे–अंग झुकवून, ते तिच्याशीं हळूच कांहीतरी कुजबुजलेहि.

तीहि, नरेन्द्रांकडे स्मितपूर्वक पाहून, पुन्हां आपले हात एकांतएक अडकवून, व्याख्यात्याकडे-एकाग्रपणें पाहात सस्मित निश्चल बसली—

त्याचवेळीं, तिच्या व सर्वांच्या कानावर पुढले शब्द पडत होते–"नरेन्द्रांचें निरीक्षण तसें वस्तुस्थितीला धरूनच आहे !-तरी पण त्याला कारण ? तें एकच !-याला कारण–आजचे देव !! हो, आमच्या इथले न्यारे देव !!–पण ते आमचे देव अधांतरीं टांगलेले नाहींत. बरं !-ते समक्ष चौफेर सदेहच फिरताहेत !!– ही आमची सारी भूमी,–आपल्या हस्तस्पर्शानें–पादस्पर्शानें-तेच चौफेर सदैव पावन करताहेत ! त्यांनाच आम्ही प्रथम जाणतों !–म्हणूनच–मानवाच्या जिवंत हृदयांतील अदृश्य देव आम्ही अधिक जवळून व प्रत्यक्ष पाहतों ! त्याला सहज ओळखतों !!–फक्त त्यांनाच आम्ही देव मानतों ! !–"

नरेन्द्र–नलिनी दोघांनाही त्या भावविचाराचा आनंद वाटला. त्यांनी स्वयंस्फूर्तीनें टाळ्या वाजवल्या; स्टेजवर व चारी बाजूस–खालीं जाजमावर–बसलेली अधिकारी व प्रतिष्ठित मंडळीहि खुलली; टाळ्या वाजवूं लागली. त्या पाठोपाठच तोरणें, कमानी, पताका यांनी शृंगारलेल्या त्या चौफेर पसरलेल्या स्थळीं,-हजारों स्त्री–पुरुष–मुलांच्या, इतका वेळ शांत बसलेल्या इकडच्या तिकडच्या थव्याथव्यातून देखील, टाळ्यांचा एकच एक कडकडाट झाला—

कोणाकोणाच्या तोंडून शब्द आले–" भलेऽ प्रकाशभाई ! "

....११

प्रकाशचा सात्विक चेहरा त्यावेळीं सस्मित झाला होता; पण मग, तो



पुन्हां एकदम नव्या विचारप्रणालीनें गंभीर होऊन, पुढें बोलूं लागला–' श्रम करणारे, घाम ढाळणारे, नि स्वार्थाचा प्रत्यक्ष त्याग–हो, शक्य तेथें व शक्य तितका जास्त त्याग–नेहमीं दुसऱ्यांसाठींच करणारे, आमचे हे हाडामांसाचे इथले नवे देव ! ते आमच्यातच वावरताहेत ! आमच्यासाठींच अहर्निश हाडांचीं काडें करताहेत !–प्रतिक्षण आम्हाला प्रत्यक्ष कुबेराची संपत्ति अर्पण करीत आहेत ! –म्हणूनच, वरले देवहि त्यांच्यावर पर्जन्यपुष्पांचा प्रतिवर्षी वर्षाव करीत आहेत!!"

पुन्हां टाळ्यांचा कडकडाट कानांवर आदळूं लागला–

उत्साहाला वाव देण्यासाठी क्षणभर उसंत घेऊन, हात वर करीत, प्रकाश पुन्हां किंचित् आवाज चढवून पुढें म्हणाला–" कवि कहते है–' नर करणी करे तो नर का नारायण हो जाय ! '–मग हें संतवचन खोटं थोडंच ठरेल ?–आम्हाला तर तें इथं...आमच्या गांवांत...जास्तींत जास्त पटतं !-आणि अशा खऱ्याखुऱ्या नारायणांच्या नवनव्या सृष्टींतच आपण सदैव संचरावं; भारताच्या त्या ओल्या.. हिरव्या...दिव्य...नव्या पालवीमधले आपणहि एक चिमुकलं पर्ण–पुष्प व्हावं; तसं त्या नवजीवनांत संपूर्ण रममाण होऊन, त्यांतच अविभाज्यपणें विलीन व्हावं;—असंच आम्हाला वाटतं !–आणि म्हणून–तेंच आम्ही करतों आहों ! होय, तीच–तसलीच–तशीच आमची इथली ही अभिनव देवपूजा अव्याहत चालली आहे !-"

पुन्हां त्याक्षणीं चौफेर एकच एक टाळ्यांचा कडकडाट झाला—

टाळ्या वाजवतांना, नरेन्द्राचा चेहरा देखील बसल्या खुर्चीवर गंभीर पण प्रशांत स्मितस्नान दिसत होता. नलिनीच्या गंभीर डोळ्यांच्या कडा ओलावल्या होत्या—

....१२

तोंच, उजव्या हाताच्या बाहीनें प्रकाशनें आपले नाक–डोळे हळूच पटकन् पुसले; घसा किंचित् खांकरला; कंठांत दाटलेली गद्गद भावना दडपून बाजूस सारली; आणि तो हळूच पुढें म्हणाला–" आमचे येथले देव ?...होय–हे आजचे देव !—ते अक्षरशः तेहत्तीस कोटी आहेत !–त्याहूनहि अधिक आहेत !-जाणत्या पाहाणाऱ्याला ते सगळे दिसतील !–त्यांतले कित्येक तर या–

समारंभाला, या क्षणीं–इथे प्रत्यक्ष हजरहि आहेत !–पण मग मित्रांनों, त्यांची कितीकींची म्हणून मी नांवें घेत बसूं? कितीकांची म्हणून मी तुम्हाला ओळख करून देऊं??–खरं म्हणजे हे देव ज्ञात असूनहि अज्ञातच राहतात !..."

सभोंवार शांत झालेल्या भावगंभीर वातावरणांत प्रकाशहि बोलतां बोलतां अधिकच गद्गद होऊन गप्प झाला. त्यामुळें तर ती चौफेरची शांतता अधिकच सळसळली—

पण तेवढ्यांतच, तो आपल्या मनाला दडपून पुढें म्हणाला-"आमच्या गांवाचें –आपल्या इथल्या विविध कृतींनीं–शतविध मंगल करणारा–नि 'मंगल–ग्राम' असें गांवाला नांव देण्याची आम्हां सर्वांना स्वयंस्फूर्त–प्रेरणा होईल असेंच आमरण वागणारा–आमचा एक देव–मंगल ! ! पण तो आतां मी तुम्हांला कसा बरं दाखवूं?–तो तर मानवाच्या आंधळ्या न्यायदेवतेच्याच दुबळ्या पण क्रूर फांसावर अवेळीं लटकला नि केव्हांच पंचमहाभूतांत विलिनहि झाला !—तरी पण—त्याचें खरें खुरें मांगल्य मात्र...आजहि आमच्या या गांवांत, आमच्या हृदयांत ...कायमची वस्ती करून मागें राहिलें आहे ! तें कायमचेंच राहिल ! !–"

स्टेजला लागूनच बसलेल्या श्रोत्यांच्या जमिनीवरच्या रांगांतील एकीमध्यें एक पंचेचाळीशीकडचा–पांढऱ्या दाभणकांठीं मिशांचा, तांबडें पागोटें बांधलेला–शेतकरी बसलेला दिसला—

त्याचा चेहरा प्रकाशच्या त्या वाक्यांनीं भरभर पालटत गेला;–त्याचे डोळे बघबघतां पाण्यानें डबडबले;–त्याच्या सुरकुतल्या चेहऱ्याची ओढाताण झाली;... नाक सुसमुसूं लागलें;...अखेर, आपल्या आंखूड मळकट धोतराच्या सोग्यानें नाक तोंड पुसून तो स्टेजकडे उत्कंठेनें पाहूं लागला. त्याचे कान प्रकाशचे पुढले शब्द तळमळीनें झेलत होते—

....१३

" इथल्या आमच्या भोळ्या-भाबड्या प्रेमळ स्त्रियांची एक देवीहि होती;...होय ...शालिनी !...सामान्य शिक्षित पण सुसंस्कृत, संसारी, साधी-भोळी !–आमचें आजचें हें पालटलेलें वैभव पाहायला मात्र तीहि आज आमच्यांत नाहीं. !..."

प्रकाश गद्गद होऊन किंचित काळ थांबला—



बायकांच्या घोळक्यांत एक पस्तीसकडली मराठमोळा स्त्री बसली होती; —कसल्या तरी आठवणीने तिनें एकदम डोळ्याला पदर लावला व पुन्हां ती स्टेजकडे उत्कंठेनें पाहूं लागली—

प्रकाश पुढें बोलतच होता–" पण मग–आमच्यामध्येंहि एक–प्रत्यक्ष विठ्ठल–रखमाईचा-गोड-स्वभावाचा जोडाहि आहे ! आतां त्यांचे हात मात्र कटेवर कधींच आढळणार नाहींत तुम्हाला;–ते सदा कामांत गुंतलेले असतात ! आणि त्यांच्या पायावर म्हणाल तर सदाच नक्षत्र पडलेलं–असतं; तेव्हां, एका थाऱ्यावर ...एखाद्या विटेवर त्या दोघांतलं कोणीहि एक, कसं दिसणार बरं तुम्हांला ? हा आमचा विठ्ठल-रखुमाईचा जोडा आहे माहीत ? तो म्हणजे–जीवन–नि–गंगा "–

कपाळावर भलें मोठें कुंकवाचें वर्तुळ असलेली ती मघांची मराठमोळा बाई विठ्ठल–रखुमाईबद्दलचें तें सारें अर्धवट आश्चर्यानें, अर्धवट कुतूहलानें ऐकत होती– तेवढ्यांतच अखेरचे ते हसतहसत प्रकाशनें उच्चारलेले शब्द तिच्या कानांवर पडले.—

त्याबरोबर, तें सारें आपल्याबद्दलच होतें हें ध्यानीं येऊन, ती एकदम लाजली;–तिनें मान खालीं घातली;–पदर विनयानें डोळ्यावर ओढला—

तेवढ्यांत, तिच्या कानांवर प्रकाशचे त्यापुढले शब्द आले—" हो–जीवन म्हणजे आमच्या येथील दैनंदिन जीवनांतच–सदैव प्रेमळपणाचें, कामसूपणाचें, कर्तव्यबुद्धीचें जिवंत जीवन शिंपडणारा चौफेर अव्याहत फिरत राहाणारा,आमच्या आकाशातला एक मेघच आहे—"

आपल्या नवऱ्याची केलेली ती स्तुती तिला अर्धवटच समजली असावी; तरीहि अभिमानानें आनंदून, तिनें पलीकडल्या बाजूस बसलेल्या आपल्या पतीकडे कौतुकानें पाहिलें—

तोहि लाजत लाजत त्याचवेळीं तिच्याकडे लांबून पहात होता.

त्यांची क्षणभर तशी दृष्टिभेट झाली असेल नसेल, इतक्यांत,...प्रकाशाचे पुढले शब्द त्यांच्या कानीं आले—" आणि जीवनची कारभारीण—गंगा?–ती तर आमची साऱ्यांची मावशीच !–प्रत्यक्ष प्रेमाची गंगा ! "

जीवन व गंगा यांनीं हळूच एकमेकांकडे आनंदून लाजून पाहिलें. तोंच प्रकाश पुढें बोलत असलेलें साऱ्यांना ऐकूं आलें—" ही...आपल्या भोंवतीं

पसरलेली आज सोनकळा आलेली एवढी मोठी दोनशें एकरांची जमीन! पण चुटकीसरसा निर्णय घेऊन ती सारीच्या सारी आमच्याच साऱ्यांच्या पदरांत टाकणारा माझा एक मित्र–विलास!...येथून साफ नामा निराळा होऊन, तो आतां आफ्रिकेंत व्यापार नि धंदा करीत बसला आहे! ..पण या बदलत्या जमान्याला अनुसरून, आपल्या जन्मजात मालकी हक्कांचें असलें विसर्जन व उदार भूदान करण्याचा आमच्या विलासच्या उदात्त सद्भावनेचा हा अपूर्व विलास! त्यामुळेंच, आमचा विलासहि आमचा एक पूज्य देवच नाहीं का ठरत?—"

...१४

प्रकाश असें बोलत होता, त्यावेळीं त्याच्याकडे आपल्या चमकत्या प्रशांत दृष्टीनें दोन गंभीर डोळे अधून मधून पहात होते; ते त्यावेळीं अधिकच गंभीर झालेले दिसले...

ती व्यक्ती स्टेजजवळ उभ्या असलेल्या समुदायांतच सामील होती; पण मागील बाजूस एका बाजूच्या कोपऱ्यांत आतांपर्यंत स्थिर होती—

विशाल भाल-प्रदेश, मानेवर रुळणारे–लांब, कुठे कुठे पांढरेपणा डोकावणारे ते केस; तरतरीत नाक; बंद पण बोलकी दिसणारी तोंडाची बंद जिवणी; गालांना, हनुवटीला भरघोंस एकसंधीपणें व्यापणारी लांब दाढी–मिशी! त्यामुळें व चौफेर तरळणाऱ्या त्या प्रशांत डोळ्यामुळें तो चेहरा मोठा धीरगंभीर नि परिणामकारी दिसत होता.

प्रकाशचा प्रत्येक शब्द पहिल्यापासून टिपत, इतका वेळ उभी असलेली ती व्यक्ती, या क्षणीं मात्र, बघतांबघतां, चटकन् पाठमोरी वळली; ती भरभर पावलें टाकीत त्या गर्दीपासून दूर-दूर होऊं लागली—

आणि त्याचवेळीं, प्रकाशनें मायक्रोफोनसमोर उच्चारलेले शब्द जवळच्याच एका लाऊडस्पीकरमधून त्या व्यक्तीच्याहि कानावर आदळूं लागले—" आणि मी शेवटीं आतां नांव घेत आहे, तरी मानानें मात्र पहिलेच आहेत, असे आमचे विवेकदादा? खरंच तुम्ही अजून ते पाहिलेहि नसतील!—पण आमच्या इथल्या पोराबाळांची, आम्हा साऱ्याच आबाल वृद्धांची–अचूक निदान–औषधोपचारानें, अत्यंत हळुवार जागरूक सुश्रूषेनें,–अहोरात्र काळजी घेणारे आहेत ते!—आम्हाला



जोपासणारे–प्रतिपाळणारे व आम्हाला हरघडी धीरोदात्त विचारांचेंहि रामबाण टॉनिक देणारे, आमचे ते एकमेव सुहृद्–बंधू–विवेक!—त्यांना आम्ही अगदीं खऱ्याखुऱ्या अर्थानें 'दादा' अशी हांक मारतो;...कधीं कधीं डॉ. विवेकहि म्हणतो;...पण खरें पाहिलें; तर मी म्हणेन—आमच्या मंगलग्रामाचे ते प्रतिपालक विष्णुदेवच आहेत – साक्षात्!"

ती दाढीवाली व्यक्ती तोंपर्यंत खूप दूरवर पोहोंचली होती–किंचित थबकून तिनें अश्रूंनीं डबडबलेल्या आपल्या डोळ्यांनीं एकदां मागें वळून पाहिलें.

तेव्हां तिच्या कानावर प्रकाशचे दूरचे पुढले शब्द पडले–" पण मग–विवेकदादांची...आमच्या डॉ. विवेकाची अशी शब्दांतच अधिक माहिती देण्यापेक्षां–आतां यापुढलें सभेचें उरलें सुरलें आभार प्रदर्शनाचें काम त्यांनीं समक्षच आपल्यासमोर येऊन करावें, अशी मी त्यांना विनम्र विनंती करतों! विवेकदादाऽ पुढें याऽना—"

हे दूरचे शब्द कानीं पडत असतांनाच झपझप पावलें टाकून, बघबघतां, ती दाढीवाली व्यक्ती—डॉ. विवेक—दूर दूर गेली; नी अदृश्यहि झाली.

....१५

इकडे बोलतां बोलतां प्रकाश स्तब्ध झाला होता; डॉ. विवेक माइकसमोर येण्याची तो वाट पहात होता...मागें जमलेल्या मंडळींची सूक्ष्म चळवळ कुजबुच स्पीकरवर ऐकूं येत होती. साऱ्यांची डोकीं आजूबाजूस शोधक दृष्टीनें वळत होतीं.

ते येत नाहीसें पाहून, प्रकाशहि माइकवरून पुन्हां पुन्हां आदरयुक्त हाका मारीत चौफेर पाहात होता–" विवेकदादा ऽ! डॉ. विवेक? मघां कबूल केलंय तुम्ही! याऽना हो डॉक्टर!—असं काय?"

तेवढ्यांत जीवन जागचा उठला व स्टेजवर चढला—

त्याचें, गुढघ्यापर्यंतचें जरा काळसर धोतर, अंगात चढवलेलें कुडतें डोक्यावर घट्ट दडपून बांधलेलें पागोटें, कांहींसा वयस्क चेहऱ्यावरील सौजन्याचा नैसर्गिक भाव! त्या भाबड्या मूर्तीकडे निरनिराळ्या ठिकाणीं बसलेली–उभी असलेली मंडळी नव्या कुतूहलानें पाहूं लागली.

....१६

स्टेजवर चढलेला जीवन तेवढ्यांत प्रकाशच्या कानाशीं कांहीं तरी हळूच कुजबुजला;-प्रकाशचा चेहरा विचलित व पडल्यासारखा झाला.

तशाच गोंधळत्या चेहऱ्यानें तो माइकपासून दूर होत आहे, इतक्यांत-लाऊडस्पीकरमधून जीवनचे रांगडे शब्द बाहेर पडले "मंडळीऽ ! आमचे विवेकदादा आमचे दाक्तरसायेब बिगी बिगी निक्तेच तीन चार कोसावर बायशिकलीवरून गेले हायेत;-तिथं येका शेतकऱ्याची कारभारीन आडली हाय्...तवां—"

प्रकाशनें स्टेजवर बसतां बसतां आश्चर्य चकित मुद्रेनें चौफेर पाहिलें; तेव्हां सगळीकडे कुजबुज चालली होती—

इतक्यांत, जीवन माइकसमोरून हात जोडून सस्मित पुढें म्हणाला—"पन इवकदादानीं जमलेल्या समद्या पावने मंडळीला माज्या हातीं रामराम पाठवून दिलाय ! आन् मीं म्हनतो...ते या खिनाला आतां हितं न्हाइत त् नसनात् कां ! त्यांना त्यांचीं कामं हाइत ! पर त्यांनीं आमला शिकवलेलं गानंच या सबेआखीरी आपन् समदे उट्टून म्हनूं या, म्हंजी त्येचं असल्या-गत झालं नव्ह का ? चला...आपल्या साऱ्यांच्या तोंडून विवेकदादांचं-या सबेत नसून बी सवतांच सारं काय बोलतील, जनूं ! चला रे—सुभान्याऽ...पांग्याऽ ! व्हा पाव समदे पुडं-बिगीन उटा—"

जीवनच्या खुणेसरशीं निरनिराळ्या दिशेनें कांहीं शेतकरी, बाया, तरुण, मुलें-मुली सारीं स्टेजजवळ सरकलीं-अर्ध-वर्तुळांत उभी राहिलीं; नि मग हवेंत हलुच मधुर स्वर उठूं लागले—

....१७

जीवननेंच हलुवार मंद स्वरांत सुरवात केली होती; नि इतरांचे मध्यतार स्वर त्यांत हळूहळू मिसळूं लागले होते !

मग हळूहळू गतिमान होत, विविध गोड हेलकावे-आंदोलनें घेत, तें विवेकाचें गाणें बघबघतां हवेत दुमदुमलें; नि जमलेल्या मंडळींच्याहि हृदयांतून पाझरूं लागलें—



## [ विवेकचें गाणें ]

सगळे आपण भाऊ-भाऊ ! मंगल जीवन जगीं जगूं
ललकारून बोला-जगायचें ! ...जीवन आम्हां जगायचें ! ध्रु०
कसली भीती कधीं न जाचे। तुम्हां-आम्हां जगायचें !...ध्रु०

देवाजीनें दिली धरा—
पर मनगट् तुमचें ।—ध्यान धरा !...

या-काम करूं !...घाम झरूं !। दाम श्रमाचा स्वीकारूं !
सगळे आपण भाऊ-भाऊ—जीवन मंगल करूं करूं ! ध्रु०

कसले बघतां आकाशीं ?
लक्ष्मी श्रमिकांची दासी !...

भाउ, मान वांकवा पायतळीं !...तुडुंब भरतिल मळीं-खळीं !
सगळे आपण भाऊ-भाऊ—उजळूं अपुलें नांव-कुळीं ! ध्रु०

मोतीं पिकतिल भरघोंस !—
पोरां भाकर खरपूस !...

फुः...दुःख-श्रमांची कां पर्वा ?। जगायचें आपणांसर्वां !
भाइ, भूमाईचे पाइक आपणं—श्रमणाऱ्यांना का पर्वा ? ध्रु०

अन् वाटुन घेतां सुख सगळे—
संकट समयिंहि वाट कळे !...

हें मानव-जीवन मंगल रे । बंधु-भाव तर कधिं न मरे।
भाउ, एकोप्यानें एकच झालें—सागर पोटीं कोटि झरे !-ध्रु०

देव आपुल्या हृदयांत—
देश आपुला जगतांत !

भाउ, मानवतेचे मांत्रिक आपण—शांतीची अपुली ग्वाही !
अर, मानव सारे प्रेमळ भाई—जीवन मंगल ! थोर मही ! ध्रु०
या आपण सगळे भाऊ-भाऊ। प्रेमें न्हाऊं-गुण गाऊं ! ध्रु०
हे ! भीति न कसली-मनास जाचे ! ललकारी द्या 'जगायचें !' ध्रु०

त्या सुस्वर तालबद्ध सांघिक भावनांत हळूहळू सारेच मिसळत गेले; नकळतच, मध्यभागीं उभे असलेले मुख्य प्रधान नरेंद्र, त्यांची पत्नी नलिनी स्टेजवरचा प्रकाश, हेहि हळूहळू प्रथम त्यांच्या बरोबर पुटपुटत पण 'अखेर गाण्याच्या ओळीच मोठ्यानें म्हणूं लागले.

'अखेर जीवन अम्हां जगायचें' हें मंद स्वरांतलें पालुपद हळूहळू अस्पष्ट होत पूर्ण विलीन झालें; नि त्याबरोबरच साऱ्यांचा एकोप्याचा व आत्मीय भावनेच्या संसर्ग-ओलाव्यानें न्हालेलें तें दृश्यहि दृष्टी पुढून अदृश्य झालें—

[ -३- ]

# —कवडसे—

....१८

संध्याकाळची वेळ; हमरस्त्याला लागलेली एक मोटर धांवत होती!

इंजनवर लावलेल्या अशोकचक्राच्या ध्वजाची सांवली, समोरील किरणांमुळें, ड्रायव्हरसमोरील कांचेपर्यंत येऊन पडली होती.

व्हीलवर असलेल्या त्याच्या हाताच्या व खांद्याच्या कक्षेतून मागल्या सीटवरील नरेन्द्र-नलिनी दिसत होतीं—

चारसाडेचार वर्षांचा त्यांचा पाठमोरा मुलगा दोघांच्या मध्यें गुडघे दुमडून, हुडच्या मागल्या कांचेतून मागें मागें धांवत जाणारें रस्त्याचें धावतें चित्र पाहात होता.

त्या कांचेच्या फ्रेममध्यें नलिनी-नरेन्द्रांचीं पाठमोरीं डोकीं;... आणि दोघांच्या मध्येंच, चौफेर टकमकां पाहात असणारा तो आनंदी-उत्साही बालिश चेहरा,...मोठा गोड दिसत होता—

बसल्याजागीं, आपल्या कपाळा-टकल्यावरून उगीचच हात फिरवीत, आपल्याच विचारांत दंग होऊन, नरेन्द्र गप्प बसला होता. त्याच्या अंतर्मुख चेहऱ्यावर एक प्रकारच्या कृतकृत्य संतुष्टतेची छटा पसरली होती.

वीस सालच्या चळवळीपासून-लाठ्या नि तुरुंग; फिरून कारावास, धावपळ, चळवळी, पुन्हां बेड्या, पुन्हां कोठडी; भूमिगत होऊन लपतछपत व्यतीत केलेलें खडतर आयुष्य; ..असल्या चक्रनेमानेंच वर्षामागून वर्षें घालवलेले त्या काळचे ते हजारों-लक्षावधि देशभक्त!-त्यापैकींच तोहि एक!

आजच्या त्या सभेला तर, लोकनियुक्त मुख्य प्रधान म्हणूनच तो हजर होता, पण तसला गोड समारंभ प्रत्यक्ष अनुभवून परततांना-अनपेक्षित, अननुभूत आनंद व एक प्रकारची फलश्रुति, कृतकृत्यता...कां बरें वाटणार नाहीं त्याला?

..१९

तेवढ्यांत, त्याच्या कानांवर शेजारच्या नलिनीचे शब्द पडले-"मघां सभेच्या सुरवातीला तुमचं भाषण चाललं होतं ना? तेव्हां स्टेजजवळूनच, एक

दोनदां, एक प्रशांत चेहऱ्याची, दाढीवाली, धीर गंभीर व्यक्ती इकडून तिकडे गेली! कांहीं वेळ निश्चल उभे राहून, आपल्याकडे टवकारून पाहाणंहि चाललं होतं तिचं–पाहिलंत तुम्हीं?–"

चमकून तिच्याकडे पाहात, भानावर येत, नरेन्द्र एकदम म्हणाला–"कोण?...कधीं? कुठे? मीऽ नाहीं बा पाहिलं—"

नलिनीनें गंभीर चेहऱ्यानें, पण प्रेमार्द डोळ्यांनीं, एकदां नरेन्द्राकडे पाहिलें व मग अधिरतेनें ती पुढें म्हणाली—"पण मी पाहिलं कीं!–मला ते...त्यांचे ते डोळे–अगदीं ओळखी–ओळखीचेच वाटले!–आणि सांगू?...कां, कोण जाणें–कित्येक, अगदीं जुन्या जुन्या...आठवणी, भरभर माझ्या मनांत हिंदकळून गेल्या!–आणखी वाटलं, . पण...पण—"

नरेन्द्र, जरा प्रेमभरानें, घुटमळणाऱ्या नलिनीजवळ कलला व त्यानें आश्चर्यानें नि कुतुहलानें तिला विचारलें—"पण? पण--काय? काय वाटलं? सांग ना–"

जणूं अंतर्मुख झाल्यासारखं व संमिश्र भावनांनीं गोंधळ उडालेल्या चेहऱ्यानें नलिनीनें नरेन्द्राकडे आपले डोळे वळवले व ती गोंधळून घोगऱ्या आवाजांत म्हणाली–"मला वाटलं–'ते अविनाश तर नव्हत?'—"

"चल्! कांहीं तरीच"–नरेन्द्र एकदम दचकला; पण लगेच पुन्हां स्वतःला सांवरीत तो एकदम गप्प झाला, त्याचा चेहरा, बघतां बघतां, पालटत गेला होता.

....२०

खालीं मान घालून, आपल्या बोटांतील पुष्कराची आंगठी फिरवण्याचा चाळा करीत, नलिनीहि गप्प बसली होती.

इतक्यांत, तिच्या कानावर क्षणभरानें नरेन्द्राचे शब्द पडले—"छे छे... नाहीं नाहीं तरी–आतां चांगली दहा वर्षं घडलीं कीं, कलकत्ता मेलच्या त्या अपघाताला!–मग, दोन दिवसांनीं,...सर्वांना साऱ्या खाणाखुणाहि पटल्या–त्याच्या साऱ्या वस्तू, त्यांतील त्याची पुष्कराची आंगठी–सारं सारं प्रेतावरचं, सुरक्षित हातीं आलं!–तुझ्या 'अविनाश महिला मंडळा'च्या कार्याची, त्यानंतर तूं स्थापना केलीस; त्यावेळचे ४०।४५ हजार रुपये तुझ्या हवालीं करणाऱ्या विमा कंपन्यांची देखील,...तो गेला याची, पुरी खात्री पटली! आणि आतां तूंच म्हणतोस—"



क्षणभर दोघेंहि आपापल्या विचारांतच दंग होतीं; अस्वस्थपणें, बसल्याजागीं, आपल्याशींच चाळवाचाळव करीत होतीं—

तोंच, नरेन्द्र हळूंच पुन्हां म्हणाला—"उगीचच आपला भास झाला तुला, नली! अजूनहि, त्या जुन्या जगांत कधीं कधीं अशी रेंगाळतेस तूं, वेड्यासारखी!—खरंच! तो मोठ्या मनाचा होता–थोर होता!—अन्...तो नाहीं म्हणूनच तर आपण—हंऽ!–पण असो–चला! आतां पुन्हां कुठला अविनाश दिसायला, तुला–मला?"—

मागल्या कांचेतून, मागें जाणाऱ्या रस्त्याचे धांवते देखावे बघतां बघतां, त्यांच्या मुलानें मात्र, त्या शब्दांसरशीं एकदम उडी मारली; तोंड फिरवलें; दोघांमध्यें बसकण घेतली; आणि एकदम नलिनीनरेन्द्रांचे हात–आपल्या दोन्ही चिमुकल्या हातांत उचलून घेऊन, तो हसत हसत गोड शब्दांत म्हणाला–"काऽय, बाबा?...इकडे बघा ना? आईऽ-हा बघ!–हा काय ग तुमचा अविनाश!–तुमच्या जवळच बसलोंय् ना मी!"—

त्याच्या त्या अनपेक्षित शब्दांनी, नलिनी व नरेन्द्र दोघेंहि एकदम भयानकपणें दचकलीं–चपापलीं!

दोघांनाहि क्षणकाळ एक अद्भूतच भास झाल्यासारखें झालें!

अविनाश मात्र त्या त्यांच्या हालचालींकडे भांबावल्या नजरेनें पाहात होता.

तिकडे लक्ष जातांच मनावर ताबा मिळवून, दोघांनीहि त्याला दोन्ही बाजूंनीं जवळ ओढलें. त्याच्या दोन्हीं गालावर दोघांनी दोन्हीबाजूंनी आपले गाल लडिवाळपणें घासले–आणि तीं दोघें त्याला प्रेमानें म्हणालीं—"हो होऽ तर!—तूंच अविनाश! तूंऽच बरं आमचा अविनाश!!–आणखी कुठें रे शोधायचा अविनाश वेड्यासारखा?"

नरेन्द्र–अविनाश–नलिनी तिघेंहि कांहीं काळ एकमेकांना तशीं अगदीं बिलगून गादीवर बसलीं होतीं;...नलिनीचे डोळे मात्र पाणावले होते—

मोटरच्या बॉडीच्या अस्पष्ट चौकटींत, त्या तिघांच्या तसल्या प्रेमळ मीलनाचें तें वत्सल क्षणचित्र मोठें खुलून दिसत होतें–

...२१

तोंच क्षणार्धांत झोंपडीच्या अस्पष्ट पार्श्वभूमीवर, आपल्याच विचारांत गर्क असलेला डॉ. विवेकचा गंभीर चेहरा दिसला.

त्याचे ते मानेंवर सोडलेले लांब केंस; नि चेहऱ्याला आच्छादणारी ती प्रशांत दाढी...वाऱ्यावर ती हलुहळू भुरभुरत होती. तो डोळ्यानें समोर पहात होता खरा; पण त्याची दृष्टि अंतर्मुख झाली होती.

दारांच्या चौकटीला रेलून, लांब पाय पसरून व आपल्या मानेमागें दुमडलेले हात आधाराला घेऊन, तो निश्चल बसला होता.

"पावन्यांच्या मोट्रीबिट्री गेल्या कीं समद्या !–सप्ला बी समदा समारंभ !..." विवेकाच्या कानावर, जवळच येऊन उभ्या राहिलेल्या जविनचे शब्द पडले; तसा तो चटकन् भानावर आला व उठून उभा राहिला. त्याच्या चेहेऱ्यावर एक प्रशांत गंभीर स्मित झळकून गेलें –

तेवढ्यांत, बिचकल्या शब्दांत, जविन उभ्याउभ्या पुढें त्याला म्हणाला–"पन् मंग...इवेकदादा !–येकदम् त्या सबतन् तुमी निंगून वो का आलांत ? तसं साऱ्यांना दाटून खोटंच सांगाया मला का सांगलंत ?"

डॉ. विवेकनें, उभ्याउभ्या, हळूच जीवनाच्या खांद्याजवळ प्रेमभरानें एकदां थोपटलें. आणि त्याच्यापासून दूर चालून जातां जातां, दोन पावलांवर मध्येंच थबकून तो मागें वळला नि म्हणाला—"असंच असतं आपलं जीवन ! तुलाहि समजेल सगळं केव्हांतरी–!"

संथ पावलें टाकत दूर जाणारी, ती विवेकची पाठमोरी परिणामकारी मूर्ति, लांबूनहि पाहात असतांना, जीवाला मनांत क्षणभर चमत्कारिक कोडें पडल्यासारखेंच झालें होतें.

'कांहीतरी कुठेंतरी चुकतंय् !' अशा अर्थाची त्यानें हळूच एकदां मान हलवली, आपल्याशींच एक खिन्न दीर्घ निश्वास सोडला; व अखेर तो आपल्या झोंपडीत शिरला—

....२२

मघांचीच संमेलन–सभेची ती जागा समोर पसरली होती;...मात्र आतां ती अगदीं ओकीओका दिसत होती ! तोरणें वाऱ्यावर अजूनहि फडफडत होतीं; तरी चोहोंबाजूस मात्र सारें सामसूम झालें होतें !...

नाहीं म्हणायला,...कांही वस्तू इकडून तिकडे न्यायला, क्वचित् कांही शेतकरी–जोडीजोडीनें, तिघे चौघे, असे येत-जात होते.



लंगडत लंगडत, पोरगेला पांग्या चालला होता; तो मागें वळून म्हणाला–"आज मातर् सबऽला अक्षी लय् मजा आली, बरं का, सुभान्दाऽ !...आन् जीवनदानं त् गानं बोलून लय् भाऽरच उडवली ! . नायरेऽ ?—"

पन्नाशीकडचा सुभान्या त्याच्या बरोबरीनें चालत म्हणाला–"माजे त् अक्षी डोळेच निवले बग !...पन् काय र् पांग्याऽ—बगतां बगतां आपले इवेकदादा कुटं अदृस झाले ? त्ये मला कळना !—अन् सबा सपल्यावर परकासभाईबी दिठी पडल न्हाईत !"—

"चलारे बिगीन्–तीं फलाटावरलीं सतरंजीजाजमं...तिवडीं हापिसांत उचलून न्यायचीं उरलीं हाइत; मंग शोदूं आपन् इवेकदादांना आन् परकाश-भाईंना–" पांग्या असें बोलून स्टेजवर चढणार होता;–इतक्यांत, सुभान्यानें त्याचा हात मागें खसकला. जागच्या जागीं गोंधळून, पांग्या थबकला व त्याच्याकडे प्रश्नार्थकपणें वळून पाहूं लागला...

"अर दोन दीस लई शनि झालाय् त्यांना, काम करून करून; पडल्या पडल्या डोळा लागला असल!–ते बग परकासभाई ! हो मागं...मंग येऊं हिकडे"–सुभान्यानें समोर बोट दाखवलें व पांग्याच्या कानाजवळ तो हळूच कुजबुजला.

....२३

पांग्यानेंहि समोर पाहिलें.

स्टेजवर खुर्च्या–टेबलं जरा अस्ताव्यस्तच पडलीं होतीं. एका बाजूस जाजमांच्या दोन उंच चळती पडल्या होत्या; आणि त्यांतल्या एकीवर पाय उंचावून व दुसरीचं उंच उसं करून, मघांच्याच पोषाखांत, प्रकाश अगदीं ऐसपैस पसरला होता, त्या फळकटांवर—

त्याचा चेहरा श्रांत दिसत होता. केस भुरभुरून अस्ताव्यस्तपणें कपाळावर आले होते. चेहऱ्यावर गांभीर्य होतें;-डोळे मिटलेले होते;–हालचाल तर मुळींच नव्हती—

ते दोघे पाठमोरे होऊन, स्टेजजवळून दूर जाऊं लागले; त्यावेळीं मात्र, प्रकाशाची एकदां सूक्ष्म हालचाल झाली. डोळे किलकिले, करून त्यानें पडल्या पडल्याच, हळूच सावार मान वळवून, सस्मित पाहिलें...

तसेंच पडल्या पडल्या, दूरपर्यंतचें दृश्यहि त्याला दिसत होतें.

....२४

सूर्य मावळत होता; त्याचे तिरपे किरण, अंतरा-अंतरावर उभ्या असलेल्या शंभरसव्वाशें लहानमोठ्या अर्ध्यापक्क्या झोपड्यांच्या छपरांना चाटून, वर आकाशांत उडून जात होते—

झोपड्यांच्या लांब लांब भल्या मोठ्या सांवल्या पडल्या होत्या;...त्यांत ठिकठिकाणीं कांहीं शेतकऱ्यांचीं मुलें हुंदडत-खेळत होतीं; कुठें कुठें मोठीं माणसेंहि गप्पा मारीत बसलीं होतीं; शीण घालवायलाच जमिनीवर ऐसपैस पसरलीं होतीं.

( क्वचित् कुठे झोपड्यांच्या दारांत चारदोन चारदोन मराठमोळा बायका स्वैरपणें हसत-लाजत गप्पागोष्टी करताना दिसत होत्या; झोपड्यांच्या छपरांच्या एका बाजूंतून धुराचे संथ फवारे बाहेर येऊन हवेंत तरंगत होते...व आंतल्या चुलींवरील खरपूस भाकऱ्यांची, तळाला करपलेल्या झुणक्याची किंवा लसणींची फोडणी घातलेल्या डाळीची, स्वादमय कल्पना वाऱ्यावरून आणीत होते. )

कोपऱ्याकडल्या एका झोंपडीच्या अर्धवट आडोशांतूनच, डोंगरदरींत बुडणारें आरक्त सोनेरी जळतें सूर्यबिंब,...तुकड्या तुकड्यांनीं दिसत होतें-अस्मानच्या पिंजारलेल्या कापसावर तर सोन्याचा न्यारा पाऊसच पडला होता!

तिथें पडल्या पडल्याच, प्रकाशच्या दृष्टीचा कॅमेरा-रमत गमत, संथपणें तसा चौफेर फिरत होता—

अखेर त्याच्या तोंडून हलुच शब्द बाहेर पडले—"मंगळ-ग्राम! ."माझं ...आमचं मंगलग्राम!...मी? अंहक्...आम्ही! आम्ही सारे!...मी? आम्हीं? पण आलों कुठून?...चाललों कुठें??"

त्या विचारानें त्याचा चेहरा प्रफुल्ल झाला होता—

मनाच्या पार्श्वपटावर संमिश्र भावना,...व दृश्यें भरधांव धावूं लागलीं—

[ -४- ]

# ❀ जमीन-अस्मान! ❀

...२५

हेलावणारा समुद्र;...खळखळणाऱ्या फेसाळल्या लाटा; डुबक् डुबुक् डुबक्या मारीत समुद्रस्नान करणारे, किनाऱ्यावरील, शेवाळलेले काळे कळकट खडक!—

सायंसूर्याच्या तिरप्या किरणांतील किनाऱ्याजवळच्या भूमीवर पडणारीं स्त्रीपुरुषांचीं विविध हालतीं चालतीं पावलें व त्यांच्या लांबलांब सावल्या—

वाऱ्यावर उडणारे फुगे; ते बांधलेली काठी खांद्यावर टाकून व हातांत स्प्रिंगवर हिंदकळणाऱ्या पंख पसरलेल्या चिमण्या घेऊन, 'आऽआऽ' 'पे प्पें ऽ प्पें' करीत जाणारा तो दाढीवाला फुगेवाला; मध्येंच दृष्टीसमोर तरळून तीं दृश्यें क्षणार्धांत नाहींशी झालीं—

....२६

त्याच रस्त्यांतील मोडकळीस आलेली एक मालगाडीसारखी ऐसपैस पसरलेली इमारत; तिच्या जवळपास आडव्या पट्ट्यांच्या जाडजूड वाहाणांच्या करकरण्याचा आवाज कानीं पडला—

मधल्या चौकांत भाजीपाल्याच्या साली; फाटक्या चिंध्या नि बोळे, वाऱ्याच्या चौफेर उधळत जाणारीं कागदांचीं चिटोरीं साऱ्या घाणीचा नुसता पाऊस पडला होता.

तो तुडवून, अखेर तीं राकट पावलें जिना चढूं लागलीं; तशी, मधून मधून मोडक्या पायऱ्यांची पिचकी-'लौकरच स्थानभ्रष्ट होणार बरं आम्हीं!' अशी कुरकुर व कडकड कानीं आली.

अखेर, तिसऱ्या मजल्यावर मध्येंच खेळत असलेल्या मुलांच्या आंगावरून तीं गेलीं व व्हरांड्यांतून अगदीं कडेच्या खोलीपाशीं जाऊन थबकलीं—

दारावर जोरजोरानें थाप मारल्याचा आवाज आला; अर्धवट उघडलेल्या दारांतून स्त्रीचीं पावलें दिसलीं; बांगड्यांची किणकिण झाली.

गुर्मीच्या शब्दांचा एकदम पुकारा झाला—" अभी बी कलका वायदा? कल्, कल्, कल्!!...' आज ' कभी निकलेगा तुम्हारा?-हेऽ तुलसीदास!-अशि नाय् चालेल वाय्!-छे म्हयना झाला!-म्हेताजी तो हमकु बोंब मारते नाऽ? नाय् तों खाली करके ज्या नी पयलीला-"

त्या तोफखान्यावर फक्त एक निश्वास तेवढा कानीं पडला. मग दार लावल्याचा आवाज झाला; पुन्हा तीं आलीं पावलें परतून कुरकुरत आला मार्ग चोखळूं लागलीं —

....२७

त्या पावलांसारखींच त्याक्षणीं दुसरीं दोन पावलें हलत होतीं. जरा फाटलेल्या पायघोळ धोतराच्या काचांत गुरफटलेलीं तीं दुसरीं पावलेंहि त्याच वातावरणांत हलत होतीं. तोच जिना चढून तीं दबकत-दबकत वर येत होतीं.

इतक्यांत, जवळ येत खालीं उतरणारा वाहणांचा करकर आवाज ऐकूं येतांच, तीं थबकलीं-त्या बरोबरच कानांवर जवळजवळ येत, मोठीं होत असलेली —' इस दुनिया है मुशाफिरखाना!-तुझे आना और फिरजाना!'—अशा अर्थाच्या कबीरी गाण्याच्या सुरांची परिचित शीळहि कानावर आदळली—

वर चढणारीं, पापडासारखें सपाट चपल घातलेलीं तीं पावलें, क्षणभरच घुटमळलीं; पण मग, टुणकन् उडी मारून, दुसऱ्या जिन्याच्या माथ्यावर नळाजवळच्या कोणाच्यातरी रचलेल्या लाकडांच्या राशीमागें लपलीं.

करकरतीं पावलें जिना धडधडवीत त्याला वळसा घालून आपल्याच नादांत खालीं उतरलीं व त्याबरोबरच ती शीळहि वाऱ्यावरून खालीं गेली—

तोंपर्यंत, लांकडांमागें निरुंद अडचणीच्या काळोख्या जागीं ती व्यक्ति अंग चोरून हालचाल न करतां निश्चल बसली होती ती एकदम उठली—

प्रकाश होता तो! तो झपझप् पायऱ्या चढला, माळे चढला आणि त्या कोपऱ्यावरील खोलीच्या दारांत जाऊन उभा राहिला.

खडूनें लिहिलेल्या-'**प्रकाश खोत B.Ag.**' या अक्षरांजवळ त्यानें फळकटांवर तीनचार थापा मारल्या व तो त्या कळकट दाराकडे उत्कंठेनें पाहूं लागला-



....२८

" आतां कोण बाई आणखी?...या म्हणावं! अगदीं सारेच या-होऽ एका पाठोपाठ!!" त्या बंद दारामागून कांहींसा त्रस्त जनानी अस्पष्ट उद्गार ऐकूं आला...

'अग उघड, शालूऽ-मीच आलोंय्!' असें प्रकाश बाहेरून हळूच खिन्नपणें म्हणत आहे, तेवढ्यांत दरवाजा उघडलाहि गेला.

" अय्या! तुम्हीं!-पण...मग...आतांच तो भेटला असेल ना तुम्हाला रस्त्यांत?" आपलें जुनेरें लुगडें नीट करीत व हळूच पदर सांवरीत, शालिनीनें प्रकाशपाठीं आपल्या संसारचें दार लावलें. तिची चिंतायुक्त नजर त्याच्याकडे लागली होती.

अंगावरचा विरलेला कोट खुंटीवर अस्ताव्यस्त टांगून ठेवीत, प्रकाश तोंडातल्या तोंडांत खिन्न स्वरांत म्हणाला "अगऽ, रिकाम्या खिशांचे लोक,नाइलाजानें तोंड लपवायचं कसं, तें हळूहळू चांगलं शिकतात बरं! –"

" पण मग, किती दिवस लप्पंछप्पं चालवायचं हें आतां असं? नि आज तर सारेच मेले कसे अगदीं हातघाईवर आले होते! जीव नकोसा झाला मला!"

खोलींतल्या, एक हात मोडलेल्या एकुलत्या एका जुनाट खुर्चीवर अंग टाकून, प्रकाश हताश-निपचित पडल्यागत बसला; तें दिसतांच मात्र शालिनी चपापली; त्याच्याजवळ जाऊन उभी राहिली; त्याच्या खांद्यावर तिनें हळूच हात ठेवला.

"काय करायचं, म्हणतेस?—दिवसभर तर वणवणलें-कांहीं एक नवीन नाहीं!—मागील अंकावरून आमचं जीवन-नाटक तसंच...पुढें चालूच" एक सुस्कारा टाकून प्रकाश म्हणाला व त्यानें मान खालीं घातली-" पहिल्या अंकांतच संपलं असतं, तर—"

" थोडं दूध आहे...चहा करूं का फक्कडसा अर्धा कप?-" समजावणीच्या स्वरांत शालिनीनें प्रकाशच्या खांद्यावर थोपटलें.

....२९

प्रकाश आपल्याच तंद्रींत होता-तो हळूच मान वर करून धुंद स्वरांत

म्हणाला–" केवढीं मोठमोठीं गोड सुखस्वप्नं केलीं असशील ग तूं सप्तपदीं चालत माझ्यामागाहून " घरांत शिरलीस तेव्हां ?"

" हो–केलीं होतीं–करीत आहें–हक्कच आहे तो माणसाचा !...पण कोण म्हणतं तीं बिरलीं म्हणून ?...मोठमोठीं संकटंच विरतात...आपोआप ! स्वप्नं नव्हेंत, बरं !" शालिनी वरवर शक्य तितकी आनंदी मुद्रा करून म्हणाली—

तेवढ्यांतच, आंतून 'आऽई...' असा बाळाचा अस्पष्ट आवाज येतांच, तिकडे घरांत वळून, गोड हंसत ती म्हणाली–" बघाऽ !...अगदीं वेळेवर पुकारून बाळानेंच कौल दिला हो ऽ "—

क्षणार्धांत प्रकाश आपले खिन्न विचार विसरला; पटकन खुर्चीवरून उठला व तिच्या मागोमाग आंत गेला—

दोन्ही खोल्या चौफेर अगदीं ओक्याओक्याच दिसत होत्या. पण आंतली खोली, शालीनें उचलून हातीं घेतलेल्या हास्यमुख बाळामुळें, त्याला कशी भरगच्च भरल्यासारखी नि प्रकाशमान् भासली.

त्याला घेण्यासाठीं हात पुढें करीत तो त्याच्याशीं खुदकन् हंसला—

" घ्या हंऽ–मी तंवर चहा भरतें–" शालिनी बाळाला प्रकाशच्या हातीं देत गोड हंसली व चुलीकडे वळली.

त्याला हातांत घेतांना, काळया ढगांतील विजेप्रमाणें प्रकाशच्या दाढी वाढलेल्या चेहऱ्यावर क्षणकाळ स्मितरेषा चमकून गेली.

बाळानें प्रकाशच्या गळयाला मिठी मारली; तो त्याला घट्ट बिलगला; तेव्हां प्रकाशचा चेहरा क्षणकाळ अतिशय आनंदित झाला होता–

....३०

खालीं जुनाट घोडा पडला होता; एक बिटलेली बाहुली लोळत जवळच होती; तिथेंच त्याला हळूच सोडून, चुलीपाशीं जमिनीवरच प्रकाशनें थपकल मारिली आणि तो गद्गद शब्दांत म्हणाला..." शालू ऽ बाबांच्या प्रकाशन धंद्याचं उरलेलं वैभव रद्दीवाल्यांच्या घरांत पोचवलं !–नी त्याच्या आतां डाळसाखरेच्या पिशव्या देखील झाल्या ! त्यांचं सर्व पुढें चालवण्याच्या, स्वतःहि लेखक होण्याच्या त्या माझ्या महत्वाकांक्षा ! आतां कापरासारख्या त्याहि उडून गेल्या !... एकदां याच



गाळ्यांत फर्निचर, पुडकीं, ट्रंका साऱ्या सामानामुळें बसायला देखील जागा नव्हती; आतां असं वाटेल तिथं ऐसपैस बसतां येतंय् ! पण बसल्या बसल्या भोवतालच्या या बोडक्या भिंतीच खायाला आल्यासारख्या वाटतात ! चांगला ग्रॅज्युएट आहे ना ग मी ? ...पण काय ? भावना, बुद्धि, हुशारी...या चीजा आज पैसापासरीहि जात नाहींत...विकतां येत नाहींत ! आठ महिने झाले कीं, रोजच्या रोज असं वणवणून मला ! पण कशांत कांय नि आमचा आपला सदाचाच फाटक्यांत पाय ! हं ! मला हजार गोष्टी कराव्यातसं वाटतं; पण एकहि धड पार पडत नाहीं ! ...पण मग... तरी पण...अजूनहि...मला चांगलं जगायचंय ! ...खरंच...कसं समजणार त्या जगाला ? आम्हांला जगायचंय् ! ! आम्हालाहि जगायचंय् ! !"

चहा गाळीत शालिनी मुकाट्यानेंच ऐकत होती. तिनें कान फुटलेला एक भरलेला कप त्याच्यापुढें ठेवला; एक निश्वास टाकीत, प्रकाशहि बोलतां बोलतां गप्प झाला—

कपाच्या आवाजानेंच प्रकाश आपल्या विचारांतून भानावर आला होता; शालिनीकडे पाहून, सौम्य प्रेमळपणें तो हंसला; त्यानें कप आपल्यापुढें ओढला नि तो हळूच तिला म्हणाला–" मला थोडी भूक पण लागलीय् ग, शालूऽ !..."

" अगदीं त्या बाळासारखंच वागतां हं, कधीं कधीं–" उरलेला, गाळलेल्या वाटींत राहिलेला चहा एका घोटांत पिऊन टाकीत, ती हसून म्हणाली " हं थोडे गुळपोहे देतें हं आधीं करून—तेवढ्यांतच आतां जेवणहि होईल ! पण काय करूं जेवण ?–सांगा—"

" जेवण ? अंऽ कर कीं...गरम मसाल्याच्या छानदार दोन भाज्या, पापड-पाण्या तळण, कोशिंबीर, फुगलेल्या पुऱ्या, जाड जाड केशरी बासुंदी—" प्रकाश हें हसत हसतच म्हणत होता; पण त्यांत उपहासाचा, खिन्नत्वाचा अंशच अधिक होता—

त्यांतला स्वतःबद्दलचा धिक्काराचा त्याचा भाव जाणून देखील, शालिनी मुद्दाम त्यावर खेळकरपणेंच म्हणाली—" एवढंऽच ?...कीं आणखी कांहीं ?–"

तेवढ्यांत–दोन खोल्यांमधल्या दाराजवळच्या भिंतीवर घड्याळ टांगलं होतं, त्यांत सहा बदसूर ठोके पडूं लागले—

प्रकाश जागचा उठला व घड्याळाजवळ जाऊन उभा राहिला; कांचेपलिकडला लोलक, परक्या निर्विकार संथपणें, मान डोलावून टकटकत होता—

....३१

तो तसाच खिडकीपाशीं गेला;–खालीं दूरवर रस्त्यांत अगदीं गडबड घाई चालली होती–हसतहसत गप्पा मारणारे घोळके; पाटी खांद्यावर टाकून, भीक मागत फिरल्यासारखा सैरावैरा चालणारा, पांढऱ्या दाढीमिशांच्या जंगलाचा एक अशक्त म्हातारा; पोरांच्या लटांबरासह, दोन महिन्याचें पोर दाखवून हात पसरणारी भिकारीण; तेवढ्यांतच एक दोन चकचकीत मोटारीहि सोनेरी किरणांत चमकून गेल्या—

प्रकाशनें, हळूच मान मागें करून, खिडकीच्या चौकटींत दुमडून ठेवलेल्या हातांची चुळबुळ केली व मग पुन्हां मागल्या भिंतीवरील घड्याळाकडे वळून पाहिलें...

तो लोलक मघांसारखाच संथपणें ' टकटक् ' ' टकटक् ' करीत ' काळाचें गाणें' गात होता– त्याच्याशीं बोलत होता !

बाहेरील व आंतील दोन्ही आवाज एकाच वेळीं प्रकाशच्या कानांवर पडत होते.

उभ्याउभ्या प्रकाश हळूच आपल्याशीं गुणगुणूं लागला–

" गडबड घाई जगांत चाले । ...आळस डुलक्या देतो ! पण-
गंभीरपणें घड्याळ बोले– ' आला क्षण...गेला क्षण' ! "

खिडकींतून येणाऱ्या चोरट्या वाऱ्यानें त्याचे केस भुरभुरले; आपल्याच तंद्रींत, दोन्ही बाजूस पाहात, लोलकाबरोबर मान हलवीत, प्रकाश पुन्हां पुन्हां म्हणत होता–' आला क्ष ऽ ण !-गेला क्ष ऽ ण ! –हो आला क्षण ! गेऽला क्षण !

बाळ मधल्या दाराजवळ खेळत बसला होता. स्वयंपाक करतां करतां, शालिनी तिकडे येऊन पोहोंचली, तों प्रकाश आपल्या नादांत तसेंच गुणगुणतोय् !

हळूच स्वतःशीं हसत, तिनें त्या गाण्यांत आपला स्वर मिसळला; नि तीहि सुरेल गुणगुणूं लागली –' आला क्षण–गेला क्षण–'

....३२

ते तिचे स्वर अनपेक्षितपणें कानावर पडतांच प्रकाश आनंदला, हंसला.



सहजासहजीं एकदम खुषींत येऊन, तो तिच्याकडे प्रेमानें पाहात म्हणाला–
" तूंच म्हण ग, शालूऽ ! नेहमीं म्हणतेस तें कुणाचसं गाणं–म्हण ना ऽ— "

शालिनी एकदां तोंडभर हसली; धिम्या पावलांनीं त्याच्याजवळ आली व प्रथम हळूहळू गुणगुणून, मग ती मोठ्या स्वरांत म्हणूं लागली—

क्षण आला; ...क्षण गेला ! क्षण आला; ...क्षण गेला ! ध्रु०
कुणि न साद दे न हांकेला । जीव अहर्निश हुरहुरला
फडफडलें मम जीव–पाखरूं । कधीं, काय, अन् कसें करूं ?
हृदयीं अमृत झरे झुरुं झुरुं । परि तें जगिं मी कसें भरूं ?
पंख पोळले ! अवनिहि तुरली ! आग पोटिची धगधगली !
घाई घाई...गडबड गोंधळ ! मिळे कुणाला जीवन निर्मळ ?
गरुड भरारी नभो-मंडळीं ! काळा कातळ पाय–तळीं–
उरांत ज्याने स्वर्ग सजविला ! । सुहृद्-जनांना तो मेला !
साद कोठली हांकेला ? क्षण आला रे क्षण गेला !
कुणि न साद दे हांकेला ! पोट जाळुनी नर मेला ।
क्षण आला अन् क्षण गेला !...नर आला अन् नर गेला !

हळूहळू ते भाव मधुर स्वर हवेंत विरत गेले...शून्यांत विलीन झाले—

....३३

घड्याळाची टकटक नि लंबकाची हालचाल तशीच एकजीवपणें अव्याहत चालली होती; इतक्यांत, ठोके पडूं लागले...

खुर्चीवर एकटाच बसलेला प्रकाश भानावर आला; त्यानें वळून पाहिलें... काटा सातावर होता–बदसूर ठोके पडतच होते—

घड्याळाकडे तसें पहातां पाहतां, कसल्यातरी नव्या कल्पनेनें चमकून, प्रकाश उठला; ...त्याक्षणीं, जणूं एकदम कसलें तरी अंगांत वारें संचारल्यासारखें त्याला झालें.

खर्रर्र करून त्यानें खुर्ची ओढली; ती घड्याळाखालींच भिंतीच्या आसऱ्यानें मांडून, तो झटकन तिच्यावर उभा राहिला–हात उंचावून, त्यानें बघबघतां लोलक बंद केला व तें. घड्याळच, अलगदच्या–अलगद भिंतीवरून उचकून काढलें.

खालीं उतरून डाव्या खांकोटीला तें मारतांना त्याला आपल्या वडिलांच्या जुन्या रिस्टवॉचचीहि आठवण झाली; तेंहि मनगटावरून काढून हातीं घेत न पायांत आपल्या फाटक्या चपला पुन्हां चढवीत, तो पुढल्या दाराजवळ पोहोंचला देखील—

"हें काय ? आतां ऐन जेवणाच्या वेळीं कुठें ?" स्वयंपाकघरांतून चटकन् पुढें झालेल्या शालिनीनें चमकून त्याच्याकडे पाहात, त्याला विचारलें—" आणि हें हातांत काय बाई ?"

पण एका निश्चयी वृत्तीनें त्याच धुंदींत दाराबाहेर एकदम झाप टाकून जातांजातां, प्रकाश मागें वळला नि तिला म्हणाला–" अग, अकलेचा बाजार मांडायची खूप वाट पाहिली ! आतां खोट्या प्रतिष्ठेसाठीं असल्या यंत्रांत नाहीं अडकून रहायचं ! यापुढें कांहींकाळ पोटासाठीं कां होईना कालातीत व्हायचं ठरवलंय् मी ! पाहूं त्यानें तरी काय होतं तें ?... निदान आज आ वासून क्षणाक्षणाला भेवडावणारा ' उद्यां ' तरी बरा पार पडेल ! !—हा आलोंच बघ इतक्यांत—

....३४

माणसांनीं गजबजलेल्या, दिव्यांनी लखलखलेल्या रस्त्यानें खाकोटीला तें वॉल-क्लॉक मारून प्रकाश चालला होता.

मधूनच तें हातांतलें छोटें घड्याळ तो कानाला लावून पाही; त्याच्या टिकटिकींतून त्याला स्वर ऐकूं येत होते–" क्षण आला–क्षण गेला !–कुणि न साद दे हांकेला– "

त्याच्या गंभीर भांबावल्या चेहऱ्यावर संमिश्र छटा उमटून गेल्या, नि तो पुटपुटला–"रागावूं नका, बरं का, बाबा !–हीच तुमची माझ्या हातांत उरलेली उरली सुरली आठवण !—तीहि आज कायमची माझ्या हातून चालली ! पण काय करूं ? मी अगतिक झालों आहे !–दुबळा आहें–नबला आहें हो–"

आणि मग त्याला त्या मनःस्थितींतच आठवणींमागून अनेक आठवणी झाल्या, दृश्यांमागून अनेक दृश्येंहि समोर दिसूं लागलीं होतीं—

....३५

बृहन्मुंबईच्या एका लहानशा भागांतील छोटेखानी बंगलीच्या दाराशीं



पुस्तकांनीं खचून भरलेली एक हातगाडी उभी होती. तीनचार जातीच्या नव्या पुस्तकांचे गठ्ठे, दोन हमाल एकामागून एक आंत उचलून नेत होते—

आंत एका मोठ्या खोलींत मोठमोठ्या मांडण्या होत्या; त्यांवर ते गठ्ठे काढून घेत असलेले, एक पन्नाशीकडले सडपातळ गृहस्थ दिसत होते. त्यांचा चेहरा रेखीव होता. त्यांनीं तुळतुळीत हजामत केली होती. मोठा पांढरा घेरा ठेवला होता. उभे राहून, प्रत्येक पुस्तकाचा तपशील ते एका वहींत टिपून घेत होते. विशीबाविशीकडचा नवतरुण प्रकाश त्यांना मदत करीत होता.

"पण बाबा, आतां मात्र पुढलीं दोन पुस्तकं माझींच काढायचीं ! होय ना ?" क्षणभरानें, बैठकीपाशीं मोठ्या डेस्कजवळ, आपल्या पित्याला आंकडेमोड करीत असतांना पाहून, किंचित संकोची मनानें प्रकाश शेजारीं उभा राहिला. नि अखेर थोडें चांचरतच त्यानें तो त्यांना प्रश्न केला—

चमकून पण प्रेमळपणें त्यांनीं वर पाहिलें; त्यांना एकदां खोकल्याची उबळ आली. धोतराच्या सोगानें आपलें तोंड पुसून, मग ते स्नेहपूर्वक त्याला म्हणाले— "वेडाच आहेस हो बेटा, तूं ! अगदीं लहानपणापासून हेंच भोंवतीं आला आहेस ना पहात सारं ! तेव्हां, हें माझं वेड अजून जात नाहीं, तुझ्याहि डोक्यांतून ?

तरीहि, त्याचा हिरमुसला दिसणारा चेहरा पाहून, बाबा अखेर अधिकच कळवळ्यानें त्याला म्हणाले–" ये !... आधीं बैस बरं असा इथं ! प्रकाश–बाळ, सारं जरा सबुरीनें घे !–अरे, माझें ऐक—हा धोंडीबाबा, त्याच्या तरुणपणीं, तसं म्हणशील तर–तुझ्याहिपेक्षां जास्त उत्साही होता ! तरीपण, आतां आज तूंच पाहातो आहेस ना ?–आयुष्यभर अगदीं अविरत झिजलों; उत्साहानें, प्रामाणिकपणें, ...कल्पकतेनें-हा मराठी प्रकाशन व्याप मी केला !...

"पण तरी देखील, तसं म्हटलं तर, मी व्यक्तिशः बरबादीच माझ्या पदरांत पाडलीय् ! धकाधकींतच, मोठ्या चिकाटीनें, हें माझं तारूं, मी अगदीं आजन्म हाकारलं ! नि आतां, तें कसंबसं किनाऱ्याजवळ आणून सोडलंय्, एवढंच !–

"पण त्राण नाहीं रे उरला आतां !–'अधिकउणें शून्य'–हाच हिशेब एकूण ! पोरी लग्न होऊन सासरी गेल्या, हें ठीक झालं; त्या पहिल्या होत्या, म्हणूनच तर मिळवली ! तूं सगळ्यांत लहान; तरी शिकूनसंवरून, तूं आतां कुठं हाता-

तोंडाला येतो आहेस !–मला माहित आहे–तुझ्यामध्यें कसब आहे ! तुला लेखणी हलवतां येते; तूं हुशार आहेस; तुझ्यांत निराळी न्यारीच चमकहि आहे !...तूं एवढ्यांतच नांवहि कमावून आहेस; तरीपण, प्रकाश, बेटा—मी तरी म्हणेन, हे प्रतिष्ठित वाङ्मयाच्या प्रकाशनधंद्याचे भिकेचेच डोहाळे ! यापुढें तुझ्या मात्र नाहीं ते उपयोगी ! ! ”

खोकल्याची एकदम उबळ आली; ती दडपण्यासाठीं क्षणभर धोंडीबाबा थांबले; नि मग पुढें म्हणाले–“ माझं आयुष्य आपलं मला ! म्हणूनच तर–माझी खरी ऐपत नव्हती,–तरीहि तुला–तुझी इच्छा असो नसो, शेतकी कॉलेजांत घातलंय्...नि शिकवतोंय् ! तेव्हां माझं ऐक, बाळ ! जरा थंड डोक्यानें घे ! मूळचे तसे आपण भूमीचेच सेवक – आपली थोडी सुपीक जमीन तुझ्या वाट्याला येईल. थोडा पैसा मागें उरेल ! यांतलं अर्धं वडिलार्जित घर आहे;...हां हां म्हणतां, शेतीबागायतींत, गांवीं जम बसून जाईल तुझा ! अरेऽ ह्या माझ्या वेडानें तुझ्या आईला मात्र मी पिचवून पिचवून मारलं, बघ ! पण आतां तुझा तरी संसार कां होईना–सुखाच्या चार घासांचा व्हावा, हेंच वरदान हवंय् मला ! तेव्हां बघ, दे सोडून हें माझं वेड–”

## ३६....

प्रकाश रस्त्यानें जात असतांना, त्याच्या डोळ्यांतील सांचलेल्या पाण्यांत, त्या पाठोपाठच त्याला दुसरें एक दृश्य तरंगत असतांना दिसूं लागलें —

त्याच्या आजच्याच राहत्या भाडोत्री खोलींत,त्याचें सामान भरलें जात होतें. हालाचालायलाहि कुठें जागा नव्हती–ठिकठिकाणीं टाकलेल्या रॅकवरून पुस्तकांचे गठ्ठेच गठ्ठे, फर्निचर, ट्रंका, पडलेल्या होत्या. नि त्यांतूनच, शालिनी व प्रकाश, अंग चोरून दाटीदाटीनें दोघें फिरत होतीं.

मग तीच जागा–तें सर्व सामान जागेची काटकसर करून व्यवस्थित लावलेली दिसत होती. भिंतींवर रविवर्म्यांची चित्रें, खिडकीच्या दोन बाजूस दोन मोठे बिलोरी आरसे; टेबल, खुर्च्या, दोन मोठीं कपाटें, आरामखुर्ची... सारें फर्निचर चकचकीत होतें. टेबलावर मध्यभागीं मोठा संगमरवरी ताजमहाल होता. एका कोपऱ्यांत ग्रामोफोन, मधल्या दारावर झालरीचा पडदा–आंतल्या खोलींत भिंतीजवळ रॅकरॅकवरून पुस्तकांच्या व्यवस्थित बांधलेल्या गठ्ठयांचा सांठा होता.



## ....३७

टेबलाजवळ, धोंडीबाबांसारखाच दिसणारा एक वृद्ध खुर्चीवर बसला होता. त्याच्यासमोरच, टेबलाच्या टोंकावर टेंकून, ..प्रकाश अदबीनें बसला होता.

शेवटीं तो वृद्ध हसून प्रकाशला म्हणाला, –“ तेव्हां थाटलंस म्हणतोस एकदांचं तुझं नवं बिऱ्हाड !–तुमच्या सगळ्या वस्तू भांडींकुंडीं सारं आलंय् ना बरोबर ? पुस्तकंबिस्तकं कांहीं उरलीं असतील माझ्याकडे, तर पुन्हां बघून घेऊन येहो ! आज एक शिरावरचा बोजा उतरल्यासारखंच मला वाटतंय् बघ ! धोंडीबाबानंतर पांचसहा वर्षं, मी तुझा यथाशक्ति प्रतिपाळ केला; दरम्यान, तुझी पदवी झाली – शिक्षण झालं; होय नाहीं करतां तुझं लग्नहि झालं !...म्हटलं, पागडीशिवाय जागा मिळतेय् तर आतां एकत्र नको ! प्रकाशला निराळं बिऱ्हाड थाटून द्यावं ! ती आपली जबाबदारी ! धोंडिबाबाला आज खरा आनंद झाला असता हो हें पाहून !– आतां, आपल्या घरांतला तुझा अर्धा भाग गेला, हें खरं;–पण त्याला आतां माझा काय इलाज ? अरे, ह्या तुमच्या पुस्तकाच्या प्रतिष्ठित व्यापांना, पैसा थोडा का लागतो ? हजारोंचीं कर्जं जीं असतात, तीं गुप्त असतात ! लोकांना वरून दिसायला सगळं ठीक आपलं ! धोंडीबाबांचीं देणीं भागवलीं, तेव्हां कुठें घराचा तो उरला अर्धा भाग धनकोकडून माझ्या ताब्यांत आला; तरी सगळं घर आपल्या कुटुंबांतच राहिलं-हेंच नशीब ! नाहीं तर, सारं घर बघ, त्या मारवाड्याच्या घश्यांत अगदीं पोरांसोरीं गेलं असतं !–बरं...बाबांच्या विम्याचे पैसे नि थोडी रोकड हातीं आली माझ्या, नाहीं असं नाहीं ! पण त्यातलीच तर तुझ्या शिक्षणांत, लग्नांत, धोंडीबाबाच्या अखेरच्या आजारांत,...झालंचतर, माझ्याकरवीं त्यानें आपल्या हयातींत वेळोवेळीं गपचूप रकमा उचलल्या होत्या त्या; सारं सारं मिटवून टाकण्यांत, ती रोकड तशी निघून गेली ! बरं, माझं तूं पाहातोच आहेस ! आमच्याहि घरांत कमी का खर्च होता ? एकेका पोराचा एवढा शिक्षण खर्च; पोरींचीं एवढीं तीन चार लग्न–कार्यं घरांत झालीं; ...माझाहि नोकरींतला तुटपुंजा पैसा त्यांतच पाण्यासारखा वाहून गेला ! माझ्या हातीं माझं असं तरी काय उरलं आहे ?... चाललंय् ! पण, माणसानं धडपड करीत राहायचं अखेरपर्यंत, एवढं मात्र निश्चित !”

“पण हवेत तरी कशाला हे हिशेब सगळे, काका? बाबांकडून तुमच्या हातीं

कांहीं रकमा आल्या; तसंच, मलासुद्धां त्यांनीं जातांना, तुमच्याच पदरांत विश्वासानें घातलं ! तेव्हां, आतां उरलं सुरलं काय तें तुम्ही देणार–नि मी घेणार ! हा आपला परस्पर–संबंध ! हें आपलं कांहीं सरकारी इन्कमटॅक्स खातं नाहीं की कुठली ऑडिटरची कचेरी नाहीं ! मला हिशेबांतलं तसं कांहीं समजत नाहीं ! पण बाबांनीं, मला दिलंय् जें तें खूप वैभव दिलंय् एवढं मात्र मला समजतं !... आणि काका, तुमच्याकडूनहि मी खूप शिकलोंय्–मिळवलंय् , असंच वाटतंय् मला ! माझ्या वडील मंडळींनी दिलेलं सारं खरं वैभव माझ्या हृदयांत आहे ! " एवढेंच फक्त प्रकाश त्यावर सौजन्यानें बोलला होता—

....३८

त्या दृश्यानंतर प्रकाशला चालतां चालतां तिसरें एक दृश्य दिसलें—

तो व शालिनी त्यांच्या नव्या घरीं पुढल्या खोलींत बसलीं होतीं; व एक उपरणें, लांब डगला, घातलेले मध्यम वयाचे गृहस्थ पुढें बसून, तावातावानें बोलत होते–"शालूऽ प्रकाश !—चुलत्या–पुतण्यांमध्यें भांडण लावायला मी आलोंय्, असें नव्हे !—पण हा आहे माझ्या मुलीच्या भावी सुखाचा प्रश्न ! मी स्पष्ट सांगतों तुम्हांला, प्रकाश–तुमच्या बाळूकाकांनी तुम्हांला चांगलंच फसवलंय् !–तुमच्या वैभवावर डाकादरोडा घातलाय् !–अगदीं खात्रीलायक बातमीवरून, मी हें तुम्हांला सांगतोंय् ! तुम्ही मला सांगा–धोंडीबाबांचें ४।५. हजारांचे विमे, त्यांची अखेरची पेटींतली रोकड, तुमच्या आईचे एवढे दागिने, झालंच तर, बाळूकाकांच्या हातीं, तुमच्या लग्नावेळीं, खर्चवेच जातां उरलेली मी दिली ती रोख पांचशेंची रक्कम,एकत्र घरांतला तुमचा अर्धा हिस्सा—हें तुमच्या जमेकडलं सारं सारं गेलं हो कुठें ? तुमच्या लग्नाचा खर्च म्हणजे माझ्याच मुलीच्या ! तो सारा तर माझ्याच हातून झाला ना ? बरं तुमचं शिक्षण अर्धअधिक तुमच्या बाबांच्याच हयातींत झालं होतं ! मग एवढा हा पैसा गेला कुठें सारा ?–सांगा ? ? सांगा ना ? "

रागारागानें बोलतांबोलतां क्षणभर धुमसत ते पुढें म्हणाले—'त्या तुमच्या साऱ्या वैभवाला तुम्हीं मुकाट्यानें मुकून कसं चालेल ? खडखडांत जाब विचारा-तुमच्या काकांना !—त्यांच्याकडे हिशेब मागा सारा !...मूग गिळून नाहीं चालायचं !—सुधा-सुधी बऱ्याबोलानें ते बधले नाहींत, तर त्यांना खुशाल कोर्टांत



देखील खेंचा ! मग मी पुढलं पाहतों,त्यांचं सारं !! तें माझं काम हवं तर-पण मग हें काय ?–उद्यांच्या वांकड्यावेळेची कल्पना आजच मनांत नको आपण वागवायला ? तसे तुम्ही सुज्ञ आहांत; सज्जन,प्रेमळ आहांत-तरी पण प्रकाश,हा मेंगळेपणा यावेळीं उपयोगी नाहीं !–जगांत सज्जनांनाहि, अति झालं तर, कधीं कधीं, अनिच्छेनें कां होईना, केवळ सत्यासाठीं, वांकड्याबरोबर वांकडं वागावंच लागतं !–माझं ऐका, प्रकाश ! इतकी मोठी किंमत देऊन, असें स्वतंत्र नि सज्ञान होऊ नका !"—

" मामा, तुम्ही म्हणतां तें खरं असेलहि !-तरी पण–आतां झालं तें झालं, एकदां ! मी काकांना स्वप्नांतहि दुखवणार नाहीं ! त्यांचं कर्म त्यांच्याकडे !–" त्यावर प्रकाश एवढेंच हळूच बोलला होता—

आणि शालिनीचे वडील, त्यावर कांहीं न बोलतांच,रागारागानें निघून गेले होते;—शालिनी त्यावेळीं दोघांकडेहि केविलवाणें पाहात होती.

....३९

आणखीहि एक दृश्यमाला त्याला दिसली—

पुस्तकांच्या गठ्ठ्याच्या गराड्यांत बसून,जवळच मदत करीत असलेल्या शालिनीला तो म्हणत होता—"शालूऽ...आत चिणून पडण्याइतके हे अमाप गठ्ठे ! पण चूल वेळच्या वेळीं पेटायला मात्र दुडूं नाहीं ! पैसा पासरी माल जातोय् ! घरांतल्या वस्तूहि पळाताहेत ! पण कर्जाचा डोंगर थोडा थोडा वाढतोय्च प्रतिदिन !–बाबांना देखील खासंच हें असं मी करावंसं वाटत नव्हतं !–तरी पण, त्यांनीं अर्धवट टाकलेलं तें कार्य मी अखेर पुरं करणार म्हणत होतों ! खरंच, पण माझा तरी काय इलाज सांग ? नोकरीपेक्षां या व्यापांत...इकडचं...माझं मन सारखं ओढ घेतं, रमतं !"—

त्यानंतरच्या पुढल्या खोलींतल्या भिंतीवरील चित्रें, आरसे, फर्निचर वगैरे अनेक वस्तू कमी झालेल्या दिसत होत्या; मागल्या खोलीतला पुस्तकांचा साठा कमी झाला होता. एक रद्दीवाला कांहीं जुनी खराब झालेलीं पुस्तकें घेऊन जात होता.

प्रकाश पुस्तकें पिशवींत भरून निरनिराळ्या डेपो–पुस्तकालयांमधून निष्फळ प्रयत्न करीत असलेला दिसत होता—

प्रकाश आजारी होऊन बिछान्यावर पडला होता.—कांहीं पुस्तकांचे गठ्ठे कांहीं मूल्यवान् वस्तू, प्रकाशच्या संमतीनें शालिनी विकत असल्याचें दिसत होतें!– थोडे पैसे त्यावेळीं हातीं आलेले दिसत होते–पण रिकाम्या रिकाम्या दिसणाऱ्या खोल्यामधें, हताशपणें फिरत असणारा, आजारांतून उठलेला, खंगलेला प्रकाश दिसत होता...

नोकरीधंद्यासाठीं चौकशी करत वणवणणारा प्रकाश दिसत होता.

आणि अखेर, आज घड्याळें उचलून रिकाम्या खोलीकडे चौफेर पहाणारा प्रकाश दिसत होता—

असलीं तीं सारीं दृश्यें दिसलीं नि विरलीं–आणि त्यामुळेंच अस्वस्थ, मनस्क झालेला प्रकाश, आज रस्त्यानें मंद पावलें टाकत चालला होता—

....४०

दिव्याच्या झगझगाटानें न्हालेलें एक घड्याळजीचें दुकान समोर दिसलें; चालतां चालतां प्रकाश थबकला; गोंधळल्या चेहऱ्यानेंच तो आंत शिरला—

कळकट चेहऱ्याचा, खप्पड गालांचा एक म्हातारा मारवाडी, पुढें काउंटर–मागें आला—त्याच्यापुढें दोन्हीं घड्याळें कांचेच्या तावदानावर प्रकाशनें ठेवलीं; आणि समोर पाहात तो गपचूप उभा राहिला—

दुकानदारानें एक काडी मोडलेला सोनेरी फ्रेमचा जाड भिंगाचा चष्मा डोळ्याला लावला; चष्म्याची चापाची कळकट पेटी कटकन् बंद केली; मग दोन्हीं घड्याळें, रेंगाळत्या हालचाली करून वरखालीं फिरवीत, न्याहाळलीं...फिरवलीं—रिस्टवॉच कानाला लावून पुन्हां समोर ठेवलें.

मग मारक्या म्हशीप्रमाणें चष्म्यांतून तिरकें पाहिलें; व बेचैन चेहऱ्यानें समोर उभ्या असलेल्या प्रकाशला त्यानें विचारलें—" हं!–मग? तुमचींच आहेत ना हीं? खरं सांगा–"

" नाहीं!–नुकतींच मी चोरून आणलीं, तीं "–एकदम थोड्या धुश्श्यांतच कडवटपणें उत्तर देऊन, प्रकाश पुन्हां गप्प झाला.

"अहो, आहे काय पण मढ्यांमध्यें या? आतां आणलींच आहेत तर—हं, बोला पाहूं; कशीं देणाराहांत तर मग?–" त्याने चिकाटीनें प्रकाशकडे बेरकें पहात फिरून प्रश्न केला—





" तराजूत जोखून, अखेर दोन आणे रतलाच्या भावानें खासच नाहीं!..."

प्रकाश थोडा रागावून म्हणाला–" या क्षणीं मी गरजू आहे, हें तुम्हांला आतां समजलंय्! तर मग, या चांभारचौकशा आणखी कशाला? तुम्ही काय देणार ती दौलत बाहेर काढा पाहूं आधीं!...पटलं मला, तर ठेवून जाईन–किमान शंभराचा तरी आहे ना हा माल?...झालं तर—"

दुकानदारानें मग कोल्ह्याच्या डोळ्यांनीं पुन्हां एकदां प्रकाशकडे टवकारून पाहिलं. तीं घड्याळें झटकन् हातानें आपल्या बाजूस ओढलीं. मग अगदीं मंदगतीनें, हळूच आपली पैशाची पेटी पुन्हां उघडली; आणि तिच्यांतून दहाची एक व पांचाची एक अशा दोन नोटा काढून कांहीं न बोलतांच त्या प्रकाशपुढें ठेवल्या.

प्रकाशनें त्या उचलण्याऐवजीं चपळाईनें घड्याळेंच परत आपल्या बाजूला ओढून घ्यायला हात घातला—

" अहो, थांबा थांबा मिस्टर!–व्यवहारांत हा असला त्रागा करून कसं चालेल?"–घड्याळजी पुन्हां झटपट आपली पेटी उघडत म्हणाला–" आडमाप गुजरं कुळ आहे कीं काय तें पहावं लागतं आधीं आम्हांला!–धोका असतो त्यांत, मिस्टर, खूप! रागावूं नका!–तरी पण...काय हो, चालताहेत, तरी बी, वापरून वापरून खर्दा बी झालाय् कीं–तुमच्या या घड्याळांचा!—पैशांत कसं मोल करायचं?—"

असें म्हणत म्हणत, हातानें त्यानें दोहोंची एक व एक रुपयाची एक अशा आणखी दोन नोटा प्रकाशसमोर टाकल्या; व त्यानें त्याच्या तोंडावरील प्रतिक्रिया अजमावून पाहिली––

प्रकाशला त्याच्या त्या चिकाटीचें व व्यवहार कौशल्याचें त्या मनः स्थितींतहि एकदम हसूंच आलें!

तेव्हां मग, आधीं त्या नोटा उचलून आपल्या हातीं घेत, तो त्या दुकानदाराला म्हणाला—" आमच्या घड्याळांचा खुर्दा झालाच आहे, नाहीं तरी! हो ना? तर मग, आतां थोडक्यासाठीं तुमच्या किफायतशीर व्यवहारचा मात्र खुर्दा होऊं देऊं नका! चला–आधीं पेटींतला तो सगळा खुर्दा बाहेर काढा पाहूं–नाहीं तर, आपल्या या नोटा तरी तुमच्या खुर्द्याजवळ ठेवा परत;...द्या तो आमचा खुर्दा परत इकडे "—

घड्याळजीनें बेरक्या नजरेनें एकदां प्रकाशकडे पाहिलें; आपल्या पेटीचें; झांकण अर्धवट उघडलें व थोड्या अनिच्छेनेच, आणे-पैसे-चवल्यांची एक मूठ भरून, ती प्रकाशच्या पुढ्यांत कांचेंवर टाकली—

प्रकाश एकदम खदखद हसला; त्यानें तो खुळखुळता खुर्दाहि निमूटपणें उचलला. तसाच आपल्या सद्र्याच्या खिशांत तो टाकला; नि दुकानाबाहेर पडण्यासाठीं वळत तो त्या घड्याळजीला म्हणाला—" थँक् यू-कद्रूशेठ! तरीपण—देव तुमचं भलं करो—"

बाहेर पडणाऱ्या प्रकाशकडे, क्षणभर टवकारल्या डोळ्यांनीं चमकुन दुकानदार पहातच राहिला होता—

....४१

आतां रिकाम्या हातानें रस्त्यांतून प्रकाश जात होता.

वरच्या खिशांत त्या नोटा त्यानें मघां तशाच बेफिकीरीनें कोंबल्या होत्या. पुन्हां नीट ठेवण्यासाठीं त्यानें त्या बाहेर काढल्या.

एका रस्त्यावरल्या दिव्याखालीं उभें राहून, निरनिराळ्या खिशांतून त्यानें कागदाच्या कांही चिटोऱ्याहि बाहेर काढल्या.

दूध, वाणी, कापडवाला, लाकूड, कोळसेवाला इ. चीं बिलेंच बिलें होतीं तीं!-त्यावर ७२, ९९, ७८, ६६, ४८ असले एकूण सुमारें दोनतीनशें तरी भरतील एवढे आंकडे होते...

निश्वास टाकीत, सारीं एकत्र करून, एका खिशांत त्यानें तीं कोंबलीं आणि अठरा रुपयांच्या त्या नोटा क्षणभर डोळ्यासमोर धरत, एकदां खिन्न हसून, त्यानें त्या आंतल्या खिशांत पुन्हां व्यवस्थित घातल्या व तो पुढें चालूं लागला.

....४२

समोरच एक मिठाईचें दुकान दिसत होतें. दर्शनीं बाजूलाच, एका शेगडी-वरील भल्या मोठ्या लोखंडी कढईमध्यें, केशरी दूध आंतल्या चारोळ्यांसह वाफा टाकीत रटमटत होतें. मोठ्या लोखंडी झाऱ्यानें नोकर तें सारखें ढवळीत होता. वेलचीचा वास सुटला होता. कांचेच्या कपाटांतून, मेसूर, बरफी, मगज, घारींपुरी, सुतारफेणी, पेढे इ. भरगच्च माल मांडला होता.



तें पाहतां पाहतां, प्रकाशची दृष्टी पुन्हा दुधाच्या कढईवर स्थिर झाली, व त्याचवेळीं, त्याच्या कानांत, संध्याकाळचे त्याचेच शब्द पुन्हां पडले—" दोन चमचमीत भाज्या, लोणचं-कोशिंबीर, फुगलेल्या पुऱ्या, जाडजाड केशरी बासुंदी..."

प्रकाश थबकला; त्यानें अंगरख्याच्या ' मनगटी ' खिशांत हात घातला; घड्याळजीकडचा खुर्दा क्षणभर आंतल्याआंत खुळखुळवला—

आणि मग झटकन् पुढें होऊन, तो साराच्या सारा हलवायासमोरच्या कांचे-वर भरल्या मुठीनेंच टाकला नि त्यानें हुकमी ऑर्डर दिली— " झाडून सगळ्या जातीची मिठाई हवीय्; एवढ्या रकमेंत बसवा नि बांधून द्या—जरा लौकर हं! चला झटपट— "

तें पैसे मोजतां मोजतां, हलवाई आश्चर्यानें त्याच्याकडे मधून मधून टवकारून पाहातच होता—

शेवटीं, एक भला मोठा पुठ्ठ्याचा खोका फितीनें बांधून, त्यानें प्रकाशच्या हातीं दिला; तो घेऊन, तो चटकन् रस्त्यानें पुढें चालूंहि लागला—

...४३

केवळ नसत्या कुतुहलाच्या चाळ्यानेंच, प्रकाशनें फीत हळूच सोडली; पेटी उघडली; त्यांतली थोडी सुतारफेणी ओढली; तोंडांत कोंबली...भरलेला तो तोबरा संपवून, त्यानें स्वतःशींच मिटक्या मारल्या.

त्यावेळीं, त्याचें भोंवतीं कुठेंच लक्ष नव्हतें; तरी पण, त्याच्याकडे मात्र भोंवतालच्या साऱ्यांचें लक्ष होतें!...तोंपर्यंत, त्याच्या आजूबाजूनें चारपांच आशाळभूत भिकारी चालू लागले होते—आणि मधून मधून "शेट-शेऽट ! द्या ना या गरिबाला......" असले अस्पष्ट उद्गार त्याच्या कानीं पडूं लागले होते.

त्यानें तो चमकला; आपल्या भोंवतालच्या त्यांच्या त्या वखवखीकडे त्यानें एक सहानुभूतीचा चौफेर कटाक्ष टाकला.

एक काटकोळा लंगडा; पोराचा हात धरून चालत असलेला डोळ्यांच्या वाती झालेला एक आंधळा; बिनतेलाच्या झिंज्यांच्या गुंता करकरवणारी एक अर्धी नागडी पोर; एक उघडाबंब केसाळ वेडपट; कांहीं भिकारणींचा एक तांडा; एकेक सगळेच आपल्याभोंवतीं त्याला दिसत होते !

तें सारे पाहतां पाहतां, प्रकाशच्या मनांत, चालतां चालतां, एकदम एक नवीनं कल्पना तरळत आली—

तो मिठाईचा खोका त्यानें स्वतः उघडला;–त्यांतले दोन तीन तुकडे व सुतार फेणीचें एक चाक तेवढें, एका पातळ कागदांत गुंडाळलें; मधां खुर्दा ठेवला होता, त्या आपल्या सद्याच्या खिशांत तें सारें कोंबलें—

आणि मग, कांहीं वेळ, त्या उघड्या खोक्यातून, हाताला लागेल त्या त्या मिठाईचा एकएक–अर्धाअर्धा तुकडा, समोर असेल–येईल त्या दीन हातावर, हसत हसत ठेवत, तो पुढें चालत राहिला!—बघतां बघतां, आणखी चार दोन नवे चेहरेहि त्यांत सामील झाले होते—

अखेर त्याच्या स्वतःच्या वाट्याला कांहीं न उरतां, रिकामा खोका तेवढा हातीं राहिला; जवळच दिसणाऱ्या केराच्या टोपलीजवळ, खिन्न हसत, प्रकाशनें तो भिरकावून दिला.

पण त्यावरहि, त्यांतल्या कांहीं भिकाऱ्यांची तत्काळ झडप पडली; आणि—तुपकट पातळ कागदांना चिकटलेले आंतले उरलेसुरले मिठाईचे कण देखील चाटून, अखेर तेहि सारे, बघतां बघतां, चौबाजूनें दूर दूर पांगले—

तो खोका मात्र अजूनहि तिथेंच छिन्नविच्छिन्न होऊन निश्चल पडला होता—

....४४

रस्त्याजवळच्या एका दिव्याच्या खांबाला ओडगून प्रकाश उभा होता—

तेवढ्यांत, त्याच्या कानावर, त्याचेच–त्याला उद्देशूनचे–गंभीर शब्द पडले—"प्रकाश!...तुझीहि आजच्या घटकेची स्थिती या साऱ्यांहून निराळी नाहीं! होय—तूंहि एक वाऱ्यावर पडलेला भणंग भिकारीच आहेस! नाहीं कां? पण त्यांच्या तुझ्यामध्यें एक मात्र मोठा फरक आहे!–तूं एक सुशिक्षित, अब्रूदार असा,...बेकार भिकारी आहेस!...तुझे पाय त्याच जगांत नि डोकें मात्र तुझ्या स्वर्गांत! त्यामुळें, त्यांच्याप्रमाणें उजळ माथ्यानें भीक मागायची देखील तुझ्यांत ताकद नाहीं! छेः...तुला तसं जगांत कधींच जगतां येणार नाहीं!... तुझी प्रतिष्ठाच तुझी वैरीण आहे!—"

तेवढ्यांतच, एक मरतुकडें कुत्रें, कुठूनसें तुरुतुरु धांवत आलें; नि चिंधड्या



होऊन जमिनीवर पडलेल्या त्या केरांतील खोक्याचे तेलकट–तुकडे मोडून मोडून, मिचिक मिचिक आवाज काढीत अधाशाप्रमाणें तें चघळूं लागलें.

तें नवें दृश्य दुरूनच पाहून, प्रकाशचे डोळे पुन्हां एकदम पाणावले "वाः राम! तुम्हीहि झालांत का सामील? आलांत का माझं सत्वहरण करायला?–ठीक! 'दाने दानें पर लिखा है...खानेवालेका नाम!'–घ्या!–तुम्ही तरी संतुष्ट व्हा! हा राखीव माल तुमच्याच हक्काचा दिसतोय्."

प्रकाशचा हात पुन्हां त्याला न कळतच, खिशांत कोंबून ठेवलेल्या मधाच्या पुडीकडे एकदम गेला. त्यानें ती बाहेर काढली, सोडली;...त्यांतला एक लहानसा तुकडा मोडून तोंडांत टाकला; एकादां स्वतःशींच तो खिन्न हंसला;–नि मग, सारी पुडीच्या पुडीच, त्या मरतुकड्या कुत्र्यासमोर पडेल अशी त्यानें समोर भिरकावली.

अचानक पुढ्यांत येऊन पडलेल्या त्या मेजवानीवर तेंहि वखवखून तुटून पडलें; त्याक्षणीं, त्याच्या अंगच्या जिवंतपणाची, चैतन्याची पराकोटीच प्रकट होत असलेली प्रकाशला दिसत होती.

खिन्न हंसून, एक दीर्घ सुस्कारा टाकत तो स्वतःशींच पुटपुटला–"आम्हीं सारेच–या जगाच्या पाठीवरले–सारेच–केवळ वीतभर पोटासाठीं सदा वसवसलेले! काळाच्या समुद्रांत गुदमरणारें दीन दुबळे प्राणी!–आम्हीं जगतों! पण कसलं आमचं जीवन? हें असलं!!–हो...तरी देखील साऱ्यांची ही धडपड; म्हणे–'आम्हाला जगायचंय्!!'...पण मग हें! असं! असलं जीवन??नाहीं... नाहीं! माझं तरी खास नाहीं!"

प्रथम त्यानें निषेधार्थी जोरजोरानें आपली मान हलवली;...आणि मग–एखाद्या वेड्यासारखा तो स्वतःशींच खदखदून हंसलाहि—

दिव्याच्या खांबाला ओडगून, इतका वेळ तो निश्चल उभा होता; त्याच आपल्या तंद्रींत, अभावितपणें त्यानें एकदम रस्त्यांत पाय टाकला; तो झपकन् पुढें चालूं लागला—

....४५

पण त्याचक्षणीं, मोटारीचें एक कर्कश हॉर्न वाजलें...

‘ कर्रर्रर ’ झालें; ‘ चींऽक् ’ असा टायर घसरल्याचा भयानक आवाज त्याच्या कानांवर पडला.

आणि काय होतें आहे हें समजण्यापूर्वींचि, प्रकाश पुन्हां रस्त्याच्या कडेला एकदम दूर उडाला !

त्याला मोटारीचा मुका मार बसला होता; त्याच्या डोळ्यापुढें क्षणभर काजवे चमकल्यासारखें झालें होतें; तरी क्षणभरांत स्वतःला सावरून, तो पडल्या-जागींच पुन्हां उठून बसत होता—

तोंपर्यंत, एकदम थांबलेल्या त्या मोठ्या मोटरमधून उतरलेला, एक सुटा-बुटांतला रुबाबदार तरुण त्याच्याजवळ ओणवा झाला होता—

आणि प्रकाशच्या खांकेला हात घालून उभे करीत, थोड्याशा अपराधी स्वरांत त्याला म्हणत होता—“ सॉरी,व्हेरी सॉरी !-जास्त नाही ना लागलेलं ?— पण असे हो कसे तुम्हीं एकदमच रस्त्यांत शिरलां ? चला उठा;...मोटारमधून आधीं डॉक्टरकडे जाऊं;...मग पुढलं सारं !–चूक माझी का तुमची हा प्रश्न नाहीं;– तुम्हांला लागलं, एवढं सत्य !... ”

त्या आस्थेवाईक शब्दांनीं धीर येऊन, प्रकाश उठला; अडखळत चालूं लागला; पण चालतां चालतां, त्या मोटारवाल्याकडे त्यानें अगदीं सहज पाहिलें; नि त्याक्षणीं, तो केवळ्यानें चपापला !—

तो मोटारवालाहि–त्याक्षणींच, प्रकाशकडे पाहातांपाहतां एकदम दचकला !

आणि मग, भयंकर आश्चर्यानेंच तो उद्गारला–“अरेऽ ? मॉय गॉड् ! कोण ? –प्रकाश खोत ?.. तूं इथें ? तूं ? तूं ?? आणि काय ही तुझी दशा ! अंऽ ?... ओळखलं नाहींस तुझ्या विलासला, दोस्ताऽ ? ”

[ -५- ]

# —ः अनपेक्षित भू-दान ः—

....४६

कोपराजवळ व डोक्याला मागील बाजूस बँडेज बांधलेला प्रकाश, विलास चालवीत असलेल्या त्याच्या मोटारींत, फ्रंटसीटवर बसला होता; दोघे एकमेकांकडे पाहून स्नेहानें हंसत होते–

थोड्या वाढलेल्या, दाढीमुळें, कांहींशा भकास दिसणाऱ्या प्रकाशाच्या चेहऱ्या-कडे पाहात, विलास हातानें व्हील फिरवीत हळूच म्हणाला...“ असं झालं... होय,...मध्यंतरी,एकंदरींत, म्हणतोस ?–फारच खंगलास, बघ!...हं...असं असतं ! पाहा !–गेले ते बेदरकारी–बेफिकीरीचे आपले कॉलेजमधले दिवस !...नाहीं का रे? हें माझंच पाहा ना ?-इच्छा असो नसो...कापडाच्या वडिलार्जित व्यापारानिमित्त, राहातोंच आहे कीं नाहीं, ..गेली पांच सहा वर्षं,...आफ्रिकेंत ?--आतांसुद्धां आलों होतों दोन महिन्यांसाठीं–म्हणजे काय ? ...तांतडीचं पत्र आलं, आमच्या इथल्या दिवाणजींचं !–‘कांहीं जुन्या वसुल्या स्वतः हजर असल्याशिवाय होणारच नाहींत ’ असं त्यांनीं खडसून लिहिलं होतं !--म्हणून ! शिवाय, गांवीं आमची एक मोठी दोनशें एकर जमीन आहे;...उत्पन्नाशिवाय ती ओस पडलीय्–वडि-लांच्या वेळच्या कसल्या आदावतीनें ती तशीच पडली आहे. माझे काका दिवाणजीहि आतां बिछान्याला खिळून पडले आहेत...आल्यासारखं जमिनीचा बंदोबस्त करून जायचं मी पहात होतों;...पण जमेना;...कंटाळलों अगदीं. दिवाणजी म्हणाले,—‘ असली जमीन, असली काय नसली काय, सारखीच ! काय वाटेल तें करा; आग लागून द्या तिला हवी तर ! ’...पुन्हां परवांच्या बोटीनें परत जायचं तर आधींच तिकीटं काढून नक्की ठरवलंय् ! ...गेलंच पाहिजे ना ! ...नाहींतर तिकडे व्यापारांत आणखी माझ्या गैरहजेरींत दहावीस हजारांची ठोकर बसायची—”

“ आतां केव्हां तिकडून परत येणार आहेस तूं ? ” प्रकाशनें सहज कुतूहल दाखवलें—

हळूच विजेरी हॉर्न वाजवून, एक वळण घेत विलास म्हणाला—" ते काय परसांतून जायचं-यायचंय्, वेड्या! –कॉलेजांतून माझी तिकडे बाबांनींच उचलबांगडी केली; त्यानंतर दोन वर्षांनीं बाबांचा एकाएकीं इकडे खून झाला! तेव्हां, सहा वर्षांपूर्वी, त्यावेळीं एकदां आलों होतों, तांतडीनें; ...तो पहिल्यानें! ...त्यानंतर आलों–स्वतःचं लग्न करून घ्यायला –तीन वर्षांपूर्वी! ... आणि त्यावर हा आत्तां आलोंय् तो!...आतां मात्र चारपांच वर्षं तरी पुन्हां येणार नाहीं! मुलंमाणसं सगळीं तिकडेच!—आणि तिथल्या त्या व्यापारांत दिवसामागून दिवस नि वर्षांमागून वर्षं आपलीं जातात–कशीं तें समजतसुद्धां नाहा रे! असा कधीं दोन बाजूला जीव टांगूं लागला ना– म्हणजे मात्र एकेकदां वाटतं –नको ही इकडली असली इस्टेट–जमीन नि नको ही डोक्याला नसती दगदग सदाची!"

" निपुती रडे, एकपुती रडे नि सातपुती रडे ..असं म्हणतात ना? तें खोटें नाहीं तर..." प्रकाश विलासाच्या खांद्यावर हळूच थाप देऊन स्नेहाळ चेष्टेनें म्हणाला—

....४७

" खरंच, पण प्रकाश?... असं करतोस का रे?" क्षणभराच्या शांततेनंतर, विलासचे डोळे हसतांहसतां एकदम नव्या कल्पनेनें चमकले नि तो एकदम ओरडूनच पुढें भरभर म्हणाला—"येस्...इट्स् धी आयडीया! बस्स् माझं तर याक्षणींच पक्कं ठरलं! आतां तुझं ठरलं का पहा! पण ठरवच माझ्यासाठीं तूं तें!— हात जोडून विनंति आहे माझी तुला"—

" अरे, पण हो हो! काय?...आहे काय, तें तर सांगशील ?? तूं बघ, विलास कॉलेजांत होतास त्यावेळींसारखाच खेळकर नि अत्यंत लहरी राहिलाहेस अजून!" प्रकाश विलासकडे पाहून खुदखुदला—

" पण असं बघ, प्रकाश"—एक हात प्रकाशच्या खांद्यावर टाकून, दुसऱ्या हातानें स्टिअरिंग करीत विलास म्हणाला–" तूं एकेकाळचा माझा जिगर दोस्त... अगदीं भावासारखा! तेव्हां मी असंच करावं म्हणतोय्, आतां!—बरा भेटलास! म्हणतात ना–जेनूं काम तेने थाय–बिजा करे तो गोता खाय्? तर मग, मी एक परदेशी व्यापारी!—तेव्हां, व्यापाऱ्यानें व्यापारच करावा!–उलट, तुझ्यासारख्या



शिकलेल्या शेतकऱ्यानें, शेतीचेच नवे नवे बुद्धिमान् प्रयोग करावेत!...म्हणूनच, अगदीं याक्षणीं ठरलं माझं, प्रकाश!...मी बाबांचा एकटा वारस असलों, तरी तुला माझा धाकटा भाऊ समजून, आमच्या भैरवाडीची ती सारी जमीन तुझ्याच ताब्यांत मी द्यायची!...तुलाच कायमची देऊन टाकायची! तिची वाटेल ती पुढली विल्हेवाट–व्यवस्था करायला अगदीं या मिनिटांपासून तुलाच एकट्याला मुखत्यार करणार!... ठरलं माझं! भैरवाडीची माझी शेतजमीन मी या क्षणीं तुला देऊन टाकली, प्रकाश!"—

" अरे-अरे–पण, विलास, हें तूं—" आश्चर्यातिरेकानें दचकून...विलासला थोपवण्यासाठीं, प्रकाशनें मध्येंच तोंड उघडलें.

पण तरी त्याला न जुमानतांच, विलास भराभर पुढें म्हणाला—" मला आतां कांहीं एक सांगूं नकोस!–आमच्यासारख्या उंटावरच्या शाहाण्या गाढवांना जमिनीची रे चवरव काय?– मी कांहीं गव्हाणींतला कुत्रा नव्हे; फुकटचा, निरुपयोगी, कागदी मालकी हक्क माझ्यापाशीं ठेवायला! मला यावेळीं–शहाणपणाचं व सर्वांच्या सुखाचं, असलं हें भूदान करून टाकावंसंच वाटतंय्!...आणि तें मी तुलाच करणार!–पुढलं, तूं काय वाटेल तें करावंस!"

" पण विलास, इतक्या तडकाफडकी नको रे! जरा विचार करूं...धीरानें घे–" हतबल विचलित मनानें, प्रकाश दुबळी रदबदली करीत होता—

" नाहीं! मला वेळ नाहीं–चौवीस तासांत उरकलं पाहिजे सारं—विचार नाहीं, आचार करायचा!– " तूं नुसतं 'हो' म्हण...बस्स!–मी पुढली सर्व व्यवस्था करतों–" प्रकाशच्या गळ्याला स्नेहानें विळखा घालून, विलास आग्रहानें म्हणाला—" आतांच आमच्या काका दिवाणजींना मी एक सविस्तर पत्र देतों! तसंच, तुझ्या नांवाच्या नव्या मालकीची नोंदहि रजिस्ट्रारकडे मागाहून पाठवून देतों–हवी तर, सुरवात करायला, तुला आजच्या आज हजारबारांशेंची रोख मदत करतों...मग तर नाहीं ना कसली अडचण?–म्हण बघूं 'हो,' आधीं!!"

बघतां बघतां प्रकाशचे डोळे कृतज्ञतेच्या पाण्यानें भरून आले होते.

गद्गद स्वरांत, विलासला बिलगत, तो म्हणाला—" मी आज स्वप्नातच वावरतों आहे का रे, विलास? मघांचा तो अकस्मात अपघात;...तुझी ही

अचानक भेट! तुझं असलं देवदूतासारखं बोलणं-वागणं-करणं!!—मला तर-हें सारं खरंच वाटत नाहीं-पुन्हां पुन्हां मनाची समजूत घालून देखील—"

"म्हणूनच, आतां आधीं तुझ्या घरीं चल बघूं! तुला झालेल्या गोड-अपघाता-बद्दल, मला माझ्या नव्या वहिनींची आधीं माफी मागितली पाहिजे! त्यांच्या हातचं मला घरचं जेवण जेवलं पाहिजे. नि तिथंच मग सारं पुढलं—काकाजींना द्यायच्या पत्राचं नि सरकारी कागद पत्राचंहि करून टाकूं!" विलास मोटारचा वेग हळूहळू कमी करीत, ती अखेर थांबवीत म्हणाला—"कुठें?"—

मग प्रकाशच्या हाताच्या खुणेबरहुकूम, त्यानें ती वळवून घेतली व पुन्हा नव्या दिशेला वेगांत सोडली—

त्यावेळीं ते दोघेहि स्नेहगंभीर मुद्रेनें एकमेकांकडे पाहून हसत होते—

[ -६- ]

# —भुताचं शेत—

....४८

प्रकाश जाजमावर बसून समोर पहात होता—

त्याच्या कानावर शब्द पडत होते—"विलास एक वेडा! —नि त्याचं ऐकणारे तुम्ही-अगदीं सात वेडे!! ... अहो, शेतं-कसणं-पिकवणं ही काय अशी थट्टेची पुस्तकांतल्या किड्यांची गोष्ट आहे? ...आणि आमच्या या भैरव-वाडींतलीं हीं शेतं? तीं म्हणजे तर नांवाप्रमाणेंच भुताचीं शेतं! —हजार लटपटी करीत, सारी हयाद घालवली आम्हीं-इथं; पण तरी साऱ्या सातआठ वर्षांत, आमच्या डोळ्यादेखत-देखत ती जमीन ओस पडलीय्! अन् पडलीय् ती कायमची! कोणतं नवंजुनं कूळ हात लावायला तयार नाहीं; कीं तिकडे फिरकायची त्यांची छाती नाहीं! ...इथं करण्यासारखं कांहीं उरलं असतं, तर आम्हीं नसते हातपाय हलवले? ...आणि आतां,...हा उंटावरचा शहाणा विलास! या चिठींत मला म्हणतोय्-म्हणे, "काका दिवाणजी, तीं सारीं शेतं यापुढं मी माझा मित्र प्रकाशला दिलीं आहेत;... त्याच्या नांवेंच तीं केलीं आहेत!' हॅं हॅं! कोणा बापड्याला असं विकतचं श्राद्ध हवं असलं,...दिलेला शोभेचा पांढरा हत्ती पोसण्याची नि त्याची मालकी मिरवायची ताकद असली, ...तर अशावेळीं, एखादा माझ्यासारखा शहाणा मनुष्य हो सांगणार काय? ...नको म्हणून? —काय अडलंय्? सारीं पितरं आठवतील त्याचीं त्यालाच!! मग आणखी मी ही कशाला त्याच्या आड येऊं याबाबत? ...हें पहा— प्रकाश! माझं यांत कांहीएक म्हणणं नाहीं...! नांव बदला...जमीन घ्या...हवं तें करा! हा हेरंब स्वतः बिचारा निपुत्रिक!...भैरवदादा गेल्यावर, भैरववाडींत जें कांहीं आहे-नाहीं, तें एकट्या विलासचं; ..आम्हीं त्याच्या हुकमाचे तेवढे ताबेदार! —मग मी काय आतां उरावर का घेऊन जाणार आहें ही जमीन? घ्या! ...विलास देतोय् तर तुम्ही खुशाल घ्या—"

करड्या डोळ्यांनीं प्रकाशकडे टवकारून पाहातच, काका दिवाणजी हें सारें बोलत होते; ते बोलत होते तडफेनें; मात्र, शरिरानें कृश होऊन, त्याक्षणीं ते बिछान्याला खिळले होते—

तरी देखील, त्यांच्या पाताळयंत्रीपणांत भोंवतालचें परिसर पडल्यापडल्याहि सहज हलवूं शकणाऱ्या मुत्सद्देगिरीची कल्पकता व क्रूर कठोरता असावी, त्यांच्या त्या मुद्रेवर ती जणुं कोरण्यासारखीच आहे, असेंच प्रकाशच्या मनाला, त्यांच्याकडे बघतांबघतां, चाटून गेलें होतें—

....४९

इतक्यांत, त्यांनी आंत पाहून अधिकार वाणीनें हांक मारली—"अरेऽ केसूनानाऽ"—एक स्थूल, बुटके, फेटा बांधलेले व काळें जाकीट घातलेले गृहस्थ पुढें आले; त्यांना काकादिवाणजी म्हणाले–"अरे–हें बघ, आपल्या भुताच्या शेताचे हे नवे मालक-प्रकाश, बरं !–त्यांना आतांच्या आतां लागलीच पश्चिम मळ्यांतल्या बंगलीकडे पोहोंचीव!...जातांना चारआठ दिवसांची शिधासामुग्री बरोबर घेऊन जा! आणि हें बघ—तिथं कोणी चुकूनमाकूनचा कुळवाडी कुठल्या 'नंबरा'चा कब्जा घेऊन बसला असेल–आपल्या हद्दींत राहात असेल तर संध्याकाळपर्यंत, त्याला ताबडतोब भुई सोडून जायला सांग! काय? नि उद्यां सकाळीं, यांना त्यांच्या साऱ्या चतुःसीमा दाखवून, जमीन यांच्या ताब्यांत देऊन टाक! समजलं? विलासनें नोंदणीचे कागद पाठवले आहेत;...तेहि आठवड्याभरांत पुरे करून टाक मग–"

प्रकाशनें उठून काकादिवाणजींना निरोपाचा नमस्कार केला—

तो दाराकडे चालू लागतांच, ते पडल्यापडल्या त्याला म्हणाले—"या, या, बरं!—अहो, शहरचीं माणसं तुम्हीं; त्यांतून पुन्हां तरुण! आणि ही जागा पडली नवखी! तेव्हां, जरा संभाळूनच असा, म्हटलं—इथलीं माणसं म्हणजे काय माणसं आहेत?...भुताटकीच आहे ती जणूं काय!—केव्हां काय करतील याचा नेम नाहीं! म्हणून म्हटलं होऽ—"

जरा भांबावल्या नजरेनेंच त्यांच्याकडे वळून मागें पाहात, तोंडांतल्या तोंडांत 'हो हो' म्हणून, प्रकाश बाहेर गेला—

केसूनाना दोघांकडे आळीपाळीनें पाहात, धोरण संभाळून, जरा मागें रेंगाळत थबकले होते–



तेवढ्यांत, काका दिवाणजी आपल्या जन्मजात बेरक्या स्वरांत, त्याला खुणावून हळूच म्हणाले–"अरे केसू, लेका! हीं अलीकडलीं तरणींताठीं शिकलेलीं पोरं,बरं!...कुठे काय करतील नि काय नाहीं,याचा नेम नाहीं! अरेऽ भुताच्या हातीं कोलीत जायचं एखाद्या वेळीं नि जगाला आग लागायची; तेव्हां जरा लक्ष असूं दे नीट तुझं!—काय?"

"मुळीं चिंताच नको त्याची !–तें काम, काकाजी, माझ्याकडे लागलं"–असें आत्मविश्वासानें म्हणत, केसूनें बेरक्या नजरेनें एकदां दिवाणजींकडे पाहिलें; डोळे मिचकवले व लगबगीनें तोहि बाहेर पडला—

बिछान्यावर पडल्यापडल्या दाराकडे पाहात, दिवाणजींनीहि एक दीर्घ सुस्कारा टाकला व ते पुटपुटले—"हा या मूर्ख पोरांचा नवा जमाना, म्हणे!... बिनडोक! माढव लेकाचे!!–"

....५०

(उपरणें, लांब डगला, धोतराचा सोगा, हातांत जाड काठी, डोक्याला रुमाल व पायांत जाडजूड वहाणा, अशा थाटांत,...केसूनाना पुढें व त्याच्या मागोमाग बरोबर प्रकाश!–नदीचें आटलेलें पात्र ओलांडून, जाड रेती तुडवीत, टेपाडावरून ते वर चढले नि किनाऱ्यावर आले—)

चालतां चालतां, प्रकाशला मागें वळून केसूनाना सांगत होता—"आलो तो नदीच्या पैलतीराचा पट्टा; नि हा त्या ऽ टेंकडीच्या पायथ्यापर्यंतचा इकडच्या किनाऱ्याचा पट्टा–म्हणजेच आमची भैरवाडी!—आमच्या भैरवशेठची ही मालकी गांव–शेतकी!—तुमच्या ताब्यांत, विलासदादांनीं आतां देऊन टाकलंय् म्हणतां, त्या इकडच्या या समोरच्या सगळ्या भागाला 'भुताचं शेत' म्हणतात— "

"काय! भुताचं शेत?" – चालतां चालतां, दचकून, थबकून प्रकाशनें त्याला विचारलें—

"होय–" त्यावर खदखदां हसत, केसूनाना प्रकाशकडे पाहून म्हणाला—"म्हणजे भुताचं नव्हे हो; भुत्याचं;–भुत्या वेताळाचं शेत;–साठ वर्षांपूर्वी नांव गाजवून गेला तो या प्रांतांत!-पण भैरवशेठ मेल्यावरचीं, गेलीं सहासात वर्षें मात्र... तें आतां साफ ओस पडलंय्!—वेताळ सगळे नामशेष झाले; नि भुत्याचं नव्हे

—आतां खरखुरं भुताचंच शेत झालंय् हें ! आणि आतां तर–विलासदादांच्या इच्छेनें, असलं हें भुतांचं शेत, आज असं तुमचं शेत होतंय्—”

....५१

केसूनाना पुन्हां खदखदला; त्यामुळें प्रकाश पुन्हां एकदां दचकला ! तोंवर, ते एका पडक्या बैठ्या बंगलीजवळ येऊन पोहोंचले होते !—

गवत माजलें होतें; दाट कांटेरीं वाढलीं होतीं; तिथल्या काळवंडलेल्या फुटक्या तुटक्या पायऱ्या चढून वर गेल्यावर, मोठें दार लागलें. तिथेंच केसूनाना एकदम थबकला नि प्रकाशला म्हणाला–“ आणि हेंच हो तें मूळचं वेताळ-भुताचं घर !— आतां तुमचं झालं—”

विचलित मनानेंच, त्यांच्या मागूनच पायऱ्या चढून प्रकाश पुढें झाला.

एवढ्यांत, ‘ कर्रर्रर ’ असा दरवाजाच्या गंजलेल्या बिजागरांचा एक भेसूर आवाज त्याच्या कानीं पडला नी तो नखशिखांत शहारला; केवढ्यानें तरी दचकलाहि—

त्यानें वर समोर पाहिलें; त्या सताड उघड्या झालेल्या मोठ्या थोरल्या दारांत, केसूनाना उभा होता व ' फड् फड् फड् ' पंख फडफडवीत, आंतून वाघळें वगैरे पक्षी बाहेर पडत होते—

“हं ! झालं बरं आतां माझं काम—केसूनाना दाराजवळूनच परत फिरला;” नि पायऱ्याखालींच अजून थबकून उभ्या असलेल्या प्रकाशकडे तो पायऱ्या उतरून आला; त्याच्याजवळ तिथेंच थांबून, तो मग अद्‌भुततेच्या आवाजांत त्याला म्हणाला —“ तें दूरपर्यंत पसरलंय् ना — तेंच सारं ओसाडलेलं भुत्याचं शेत — म्हणजे तुमचं नवं शेत ! — नि ही बंगली–जिथं आपण उभें आहों ना या क्षणीं, तीच भुत्यांची बंगली—आतां तुमची नवी बंगली !—”

“ विलासदादांच्या पत्रातल्या हुकमाप्रमाणें नि काकादित्रणजींच्या मला मिळालेल्या ताकिदीप्रमाणें–मी तुम्हाला हा ताबा दिला, बरं का ?... ठीक तर–आतां तुमचं तुम्ही सारं पहा ! मला दुसऱ्या कामगिरीवर अजून चार कोस चालून जायचंय्-अंऽ ? घेतों आतां निरोप !–झालं माझं काम !! —” केसूनाना म्हणाला.



“ अहो पण, थांबाऽ केसूनाना—” पायऱ्या उतरून केसूनाना झपझप दूर जात असलेला पाहून, त्या अनोळखी ठिकाणीं नि चमत्कारिक वातावरणांत, गोंधळून उभा असलेला प्रकाश किंचित् भेदरल्या चेहऱ्यानें ओरडला—

“ अंऽ ! हे पहा–कामाहून परततांना मी येईन कीं फिरून, हंवं तर ! ...पण आतां मात्र मला गेलंच पाहिजे—” केसूनाना उपरणें नीट करीत, काठी कांकोटीला मारून, पाठमोरा होऊन चालू लागला होता; तो थबकला व मागें वळून दुरूनच पुन्हां म्हणाला—“पण मग हें बघा—जरा संभाळूनच, म्हटलं ! —खेडेगांवची राहणी आहे हो ही ! —तुम्हांला नसेल म्हणा अनुभव याचा; कदाचित् आमच्याहि आपल्या उगाच वेड्या खेडवळ समजुती असतील— तरी पण, इथं जरा जपूनच पाय टाका ! —इथलीं माणसं जशीं रानटी, ..तसेच इथले प्राणीहि रानटी ! ...त्यांतच आपण वागणं नि त्यांनाहि वागवणं भाग असतं ! ...अहोऽ कीडकिरडूं जीव–जिवाणूं, म्हणूं नका,–अस्सल साप म्हणूं नका–भूतपिशाच म्हणूं नका–चोर–दरोडेखोर म्हणूं नका–आपण सदा जपलेलं बरं ! –आपलं, माझ्या दृष्टीनें मी सांगतोंय् हो हें ! तसा राग मानूं नका ! —आमचा हो काय संबंध ? ...आम्ही नोकरीचे नि हुकमाचे ताबेदार !... आम्ही कोण ? ...आतां तर ही तुमचीच जमीन...तुमचीच बंगली ! ...तुमचे तुम्ही हवं तसं वागा–सवरायला मुखत्यार ! भुताचं शेत, बंगला तुम्हाला लाभला, तर आनंदच आहे आम्हाला ! ”

....५२

एका बाजूला केसूनाना दूरदूर जात होता; दुसऱ्या बाजूला त्या नवीन वाड्याचा भकास उघडा दरवाजा होता.

तें दुहेरी दृश्य पाहातांना, प्रकाश घाबरला–गोंधळला होता;–तिथेंच पाय खिळून तो घुटमळला होता—

तेवढ्यांत, त्याच्या कानांवर खेळकर उद्गार पडले...“ तेऽ बघ भाई !– आम्हीं आऽलोंऽम्हणावं ऽ— ”

प्रकाशनें चमकून पाहिलें; तों–तिमिरला घेऊन भिंतीला चटकन् वळसा घालीत, पुढच्या पायऱ्या चढत असलेली शालिनी त्याच्या समोरच—

त्याचा भेदरला चेहरा एकदम पालटत गेला; आणि कांहींशा सचिंत मुद्रेनें

त्यानें तिला विचारलें–" थांब म्हणालों होतों ना तुला, काका दिवाणजींकडे, शालू? मग? पण तूं इथं आलीस केव्हां–?–"

" कां? तुमच्या पाठोपाठच––" शालिनी प्रेमानें हसून म्हणाली—" अहो, कसं झालं तरी तें इनामदारांचं घर–आपलं नव्हे!...हेंच ना आतां आपलं नवं घर?–मग तिथं कां थांबायचं मागें?"

" अग हो! पण"...पुढें होऊन तिमिरला हातीं घेत, प्रकाश घुटमळून म्हणाला–" पण इथे अजून कोळिष्टकें आहेत, निशाचर फिरताहेत!–अशी तिमिरला घेऊन तूं..."

"पण आतां इथंच जगायचंय् ना आपल्याला?–मला? तिमिरला?–मग तीं कोळिष्टकं काढलींच पाहिजेत;...धूळधुरळा साफ केला पाहिजे;...निशाचरं असलीं, तर झाडून सारीं उडवून लावलीं पाहिजेत!—" शालिनी प्रकाशजवळ जाऊन उभी राहिली; तिनें त्याचा हात प्रेमानें घट्ट धरला; त्याच्या दंडाला आपली मान टेकली; नि हलुवार शब्दांत ती हसत हसत पुढें म्हणाली—" चला बाई, तिथें मागें गपचूप उभी होतें ना मी? दूर जाणाऱ्या एका मोठ्या निशाचराचा भेसुर फडफडाट मी नुकताच तिथुन कानांनीं ऐकला—त्या एका मोठ्याच्याच पाठोपाठ बाकीचींहि लहानसान निघून जातील!—चला–हात फिरे तिथेंच लक्ष्मी शिरे!—"

आणि तोंडानें तसें बोलतां बोलतां, पायऱ्यांजवळच दिसणारीं दोन सुकलेली रोपटीं उपटून शालिनीनें हातीं घेतलीं; ओचा–पदर पटकन् घट्ट केला; नि त्या रोपट्यांच्या कामचलाऊ झाडूनें, पुढला पडवीचा भाग ती भराभर झाडायला लागत म्हणाली–" तुम्ही आपले बघा जा तुमचं नवं शेतं! मी माझं नवं घर पाहून घेतें!"

तिच्याकडे प्रेमार्द्र डोळ्यांनीं पाहून प्रकाशनें हांक मारली—" शालू ऽ शालू ऽ— "

हळूच आपली हसरी नजर क्षणभर स्नेहानें त्याच्यावर रोखून, तिनें आपलें साफसुफीचें काम तसेंच चालू ठेवलें.

प्रकाशच्या मनांत डोकावून त्याला क्षणभर भेदरवून गेलेल्या भावना-कल्पना, बघतां बघतां साफ ओसरल्या; तो तिमिरला घेऊन नव्या उत्साहानें पायऱ्या उतरून खालीं गेला—

[ –७– ]

# .–: 'आम्हांला जगायचंय्!' :–

....५३

पार्श्वभूमीला दूर दूर ती बंगली दिसत होती. चौफेर, कणखर ढेकळांची-सुकलेल्या गवतांच्या बुडख्यांनीं आच्छादलेली–दूरपर्यंत मोठमोठ्या भेगा गेलेली माळ जमीन दिसत होती–अधून मधून, अंतराअंतरावर अनेक जाळ्या पडलेल्या व अर्धवट बुजलेल्या तीनचार लहान मोठ्या विहिरी दिसत होत्या.

तें सर्व पायाखालीं तुडवीत, छोट्या तिमिरला हातांत घेऊन, प्रकाश इतस्ततः पुढें पुढें चालला होता.

भोंवतालीं चौफेर पसरलेल्या त्या रखरखीत उजाड माळरानांच्या दुसऱ्या टोकाला, थोड्या अंतरावर, एक हिरव्यागार मळ्याचा पट्टा त्याला दिसूं लागला—

तो पाहून, प्रकाश साश्चर्य चमकला; चालतां चालतां, जागच्याजागीं थबकला; आणि नीट निरखून दूरवर पाहूं लागला.

हिरवींगार झाडें; एक साधारण बांधणीची झोपडी; . साफसूफ केलेली काळी जमीन...

तिला लागूनच एक अर्धवट मळलेला गाडीरस्ता नि त्यावर एक उभी बैलगाडी; सामानसुमान, धान्यपोतीं, कणग्याच्या तट्ट्या, यांनीं ती खच्चून उंच भरली होती.

एकदोन म्हैशी, गायी, बैल, दोनतीन रेडकीं, दोन खोंड, एक बकरें-कोंकरूं, अशीं कांहीं जनावरें त्या गाडीच्या चाकांना दोन्हीं बाजूस बांधलेलीं दिसत होतीं. अधून मधून तीं ओरडत होतीं.

त्या गाडीजवळ ६।७ वर्षांपासून १३।१४ वर्षांपर्यंतचीं तीन चार मुलें लुडबुडत होतीं; झोपडीजवळ बाहेरच पेटवलेल्या चुलीजवळ, एक पंचेचाळीशी-कडचा शेतकरी, पागोटें बंडी वगैरे घालून, कुठे तरी जायला निघण्याच्या तयारींत असलेला दिसत होता.—

मोठ्या कुतुहलानें प्रकाश पुढें झाला व त्या गाडीजवळ पोहोंचला.

त्याला पहातांच तो शेतकरी किंचित् चपापला–त्यांचा आधींचाच उदास चेहरा अधिकच पडल्यासारखा झाला.

त्याचे डोळे कांहींसे संमिश्र भांवनांनीं तरळले; तरी पण तो अभानितपणें प्रकाशला पुढें होऊन सामोरा झाला.—

....५४

प्रकाशनें उत्सुक मनानें त्याला विचारलें—"काय भाऊ, कुठच्या गांवचे? नांव काय तुमचं?..."

"याच गांवचे आमी!-जीवन म्हनत्यात समदे मला-"तोहि आदबशीरपणें हसत म्हणाला–

"आणि मग ही गाडी भरून नि मागें गुरें बांधून चाललांत कुठें?"—प्रकाशनें उत्सुकतेनें विचारलें.—

"जगायला! पोरांना–आम्हाला भाकर जितं मिळेल तितं!" जीवनच्या त्या शब्दांत खिन्नता दिसत होती–"हितून निगालों की आतां कुठं बी जावूं–अगदीं मसणांत बी! !—"

"असं वाईट का बोलतां, जीवनदादा?–" प्रकाशनें सहानुभूति दाखवली–"ही जमीन कोणाची? हा हिरवागार भाजी मळा...ही तरारलेलीं झाडं–ही झोपडी.. तें अंगण—कोणाचं हें सारें?–"

"जमीन? ती हाय धेवाची! आन् समदंच ह्ये म्हटलं त् हाय् माझ्या बापजाद्याचं आन् माझं बी" जीवन नैसर्गिक स्वाभिमानी स्वरांत म्हणाला–"पन् मंग, म्हनाल त् मालकी–वयवाट आतां कायद्यान् हाय् इनामदाराची! भैरवशेठच्या ईलासदादाची!—"

"मग आतां चाललां कुठं तुम्ही?" गोड शब्दांत प्रकाश त्याला पुढें म्हणाला– "ती पलीकडली ओस जमीन कोणाची?...तीहि नको का अशीच व्हायला?...ती केव्हां होणार अशी?–"

"दादा, तुमी नवख हात् हितं–" जीवन सुस्कारा सोडून, खिन्न स्वरांत म्हणाला–"विलासदादान् या समद्या भुत्याच्या शेताला एक नवा मालक केलाय्! त्याच्यासाठींच त्याच्या काका दिवानजीच्या केसूनानान् मला रातीच्या केटांत हिथून संसारासकट हुसकलंय्!...म्हनला–'नव्या मालकाला रामपारीच



ताबा दिला पायजे,...जा–तुजं इचवाचं बिऱ्हाड पाटीवर घेऊन, हवं तिंत्–मसनांत! तवा, आतां रामपारीं चाललों, धेवाचं नांव घेऊन—"

"चाललां? अरेरे...हें मात्र फार वाईट..." प्रकाश कळवळून सहानुभूतीनें म्हणाला—

"समदंच भुत्याचं शेत हिरवंगार व्हावंसं मला बी वाटतं, दादा".. जीवन आत्मीयतेनें म्हणाला—"पन दादा, या दोन थकल्या हाताचं काम न्हव त्ये...आजवर जमली तितकी, इक्त्या 'ची म्यां सेवा केली! त्ये समदे नांवाचे धनी–दादा! मीच भुईचा खरा मालक...तिचा चाकर! पर–तरी बी आतां हुकमापरमान सोडून जायला हवं!—तवा...निगालों—"

ऐकतां ऐकतां, प्रकाशचा चेहरा गोरामोरा झाला. त्याचे डोळे पाणावले. आग्रही स्वरांत तो जीवनला चटकन् म्हणाला–"छे छे...छे छे! जीवनदादा, उतरा आधीं ते सारं सामान;...सोडा गाडी; —बांधा तुमची गायवासरं तुमच्या त्या झोपडीजवळच्या गोठ्यांत...! ...अगदीं कोणाचं ऐकूं नका, तुम्ही! जाऊं नका इथून! ...मी सांगतों तुम्हांला—"

त्या अनपेक्षित शब्दांनीं आनंदून, तरी पण गोंधळूनच अधिक, प्रकाशकडे पाहात, जीवन म्हणाला–"म्हंजे? ...असं कसं व्हईल, दादा? ...जमिनीचे नवे मालक काय म्हनतील? आपन कोन...?"

"कांहीं नाहीं म्हणणार ते! ...त्यांचाच मित्र आहे मी!—सारं सामान पुन्हां नीट लावा घरांत, नि या कीं तुम्ही त्या बंगलींत त्यांना भेटायला;...अंऽ? ...मी आहेच तिथें; या हं!" असें स्नेहाळ शब्दांत म्हणून, प्रकाश घराकडे परतला.

....५५

भुत्याची बंगली आतां समोरून अगदीं साफसूफ झालेली दिसत होती; दारांत केराचा ढीग पडून त्याला आग लागली होती; पायऱ्या व त्यालगतचा दर्शनी सोपा, अगदीं स्वच्छ झाला होता.

पण बाहेर शालिनी दिसत नव्हती. मघां प्रथमच उघडतांना, भेसुरपणें करकरलेलें तें दार मात्र, तसेंच आ वासून सताड उघडें होतें ..

जरा कातर मनानें व चमकल्या चेहऱ्यानें दारांतून आंत शिरत, प्रकाशनें–घाबरल्या स्वरांत, धडधडत्या छातीनें हांक मारली .. "शालिनी ऽ! ए शालू ऽ ...कुठें आहेस ग तूं–?"

आंतली पहिली मोठी साफसूफ खोली, त्या मागल्या, उघड्या खिडक्यांतून येणाऱ्या प्रकाश किरणांनीं न्हालेल्या, एकामागून एक लागणाऱ्या, दोनतीन स्वच्छ खोल्या; सारें भरभर मागें टाकीत, तिमिरसह प्रकाश इकडे तिकडे भांबावून पाहात, आंत चालून गेला —

तेवढ्यांत, अगदीं मागल्या बाजूनें शालिनीचा दूरचा आवाज ऐकूं आला— " हो हो–इकडे–पाठीमागें–तुळशीवृंदावनापाशीं आहों आम्ही .."—

....५६

मागील दारीं शालिनी अंगण साफ करीत होती—

पस्तीशी आसपासची, मोठें कुकूं लावलेली एक मराठमोळा बाई, लुगडें आवरून–खोंचून, विहिरींचें पाणी काढून, सगळीकडे शिंपडीत होती—

थोड्या वेळापूर्वीच्या त्या भकास जागेची, बघतां बघतां, सारी अवकळा जाऊन, तिला नवें रूप येऊं लागलें होतें—

आश्चर्यानें दोघांकडे आळीपाळीनें पाहात, प्रकाशनें तिमिरला खालीं सोडलें व तो शालिनीकडे प्रश्नार्थक मुद्रेनें बघूं लागला—

तेवढ्यांतच, हातांतलें मडकें खालीं ठेवून, ती नवखी बाई चटचट पुढें आली; तिनें तिमिरला वर उचलून घेतलें—

त्या परक्या स्त्रीकडे पाहून देखील, सस्मित चेहऱ्यानें,तोहि तिच्याकडे गेला व त्यानें तिच्या खांद्यावर लाडानें मान कलवली...

तोंच, शालिनी हसून म्हणाली — "ही गंगा...बरं !–इथंच कुठें तरी रहाते; मघां हिच्याबरोबरच सामान घेऊन आलें मी इकडे—तिनें मला या साफसुफींत खूप मदत केली, होऽ ! खूप करणारहि आहे !.. इथली नवी मैत्रीण माझी ही !"

" जा–माज्या राजा !–आतां मायेच्या कुशीला तळमळला असशील ! "– असें म्हणत, गंगेनें तिमिरला शालिनीसमोर खालीं सोडलें; त्याच्या कपाळाला स्पर्श केला; आपल्या कानशिलावर आपलीं बोटें कडकड मोडलीं; नि लुगडें नीट करून चालूं लागत, शालिनीला ती म्हणाली–"ह्यी येत्येंच हं मी, बाय्–शेण–माती घेऊन !–आन् माज्या तांबींचं दूध बी घेऊन येतें, माज्या राजासाटीं—"



....५७

इतक्यांत, ती जात होती त्याच बाजूनें, जीवन आपल्या लहानग्या मुलाबरोबर दुधाची भरलेली चरवी घेऊन आला —

पण गंगाला तशी समोर पाहून, तो आश्चर्यानें उद्गारला–" आंऽ गंगेऽ ? तूं ग कशी हितं ?–"

ती लाजली, हसली; जीवनच्या हातची दुधाची चरवी घेऊन, घरच्या-सारखी शालिनीच्या घरांत शिरतांना, अखेर चेष्टेनें त्याला ती म्हणाली–" आन् तुमी कुनाला आनलं ह्ये दूध, जनुं ?–तुमी कसं हित, धनी ? "

" वा वा...कुनाला म्हजी ?–या शेतांच्या नव्या मालकाला ! त्यांचे दोस्त निवतेच आपल्या मळ्याकडे आले व्हते, न्हवं का ? "

तो असें म्हणत होता, इतक्यांत, त्याचें लक्ष मागल्या दारांत उभ्या असलेल्या प्रकाशकडे गेलें.

चपापून तो त्याला साश्चर्य म्हणाला–" अरेऽ ! दादा ? तुमी हितच उभं हां की ! आन् आपल शेताच ते नव मालक ?–ते कुट ?—"

प्रकाश मनसोक्त हसला; जवळ गेला; त्याच्यासमोर उभा राहिला व मग म्हणाला– " हे काय ? शेताचे नवे मालक ना ? ते समोरासमोरच इथं उभे आहेत कीं—जीवन ! "—

" म्हनजे ?...तसं न्हवंऽ, दादा !–तुमचे ते दोसदार कुट हाइत–? " जीवननें जरा गोंधळूनच पुन्हां विचारलें– " नव्या मालकांना एकदां बगून-भेटून जावं, म्हनलं !–"

" तेंच कीं ! ...तेंच करतो आहेस, याक्षणीं, तूं !–" प्रकाश हसत हसतच त्याला पुढें म्हणाला–" तुझ्याशिवाय मला इथं दुसरा दोस्त कोणीच नाहीं !— तुलाच यापुढेंहि इथं शेताचा मालक म्हणून राहण्याबाबत विचारायचं, घरीं आलास ..कीं, असंच मी ठरवलं होतं,मघां ! जीवन,...ही सारी जमीन, आतां या क्षणापासून तुझी-माझी...साऱ्याच कसणाऱ्यांची झालीय् ! –आपणच सारे तिचे नवे मालक ! "

" काय म्हनलांत, दादा ? " तो आश्चर्यानें दचकला; पण अतिशय आनंदानें त्याचे डोळे एकदम भरूनहि आले. गंगेला मोठ्यानें हांक मारून तो उत्साहाने म्हणाला–" ऐकलंस, कारभारनी ? ... मालक काय म्हनत्यात ? "

"ए ऽ" मालकबिलक नाहीं हं आतां चालायचं !" थोड्या लटक्या रागानें भाई जीवनला दटावून म्हणाला, "मी आपला नुसता प्रकाश"

दारांतून डोकावणारी गंगी व शालिनी, दोघी प्रशांत समाधानानें, एकमेकांकडे व त्या दोघांकडे पाहात होत्या–त्यांचे चेहरे आनंदानें फुलले होते.

....५८

प्रकाश व जीवन-देखील दोघे प्रसन्न चेहऱ्यानें समोर पाहात होते—

...त्यांच्यासमोर मुख्य मोटार रस्त्याच्या वांकणाजवळ लटकवून ठेवलेली एक मोठी पाटी दिसत होती—

त्यावर, उरली सुरली हाताची आकृती भाई कोळशानें पुरी करीत होता—

'भैरवाडी' अशा मूळच्या छोट्याशा पाटीखालींच खिळ्यांनीं ती पाटी ठोकली होती.






ते दोघे एकमेकांकडे स्नेहानें पाहून हसले. मग, प्रकाशनें जीवनचा हात हातांत धरला व या पाटीच्या उजव्या बाजूला ते दोघे चालूं लागले.

चालतां चालतां, त्यांनीं एकदां मागें वळून पाहिलें; तेव्हां त्या पाटीवर 'भैरवाडी' च्या शेजारीं एक चिमुकला पक्षी उडत उडत येऊन बाणाजवळच बसला होता.

...५९

एक–दोन–तीन–चार—

बघतां बघतां, कितीतरी पक्षी, इकडून तिकडून उडत येऊन त्या पाटीवर रांकेनें बसलेले दिसत होते—

त्या पाटीच्या तळाशीं रस्त्यावरहि थोडी वर्दळ दिसत होती—

कोणी उभे राहून तें पहात होते;–बोंचकीं–मडकीं–भांडीं खांद्यावर घेऊन, कांहीं भैरवाडीच्या रस्त्याला लागलेले दिसत होते;...एखाद्या गाढवावर, घोड्यावर, बैलावर, रेड्यावर, संसार चढवलेला;...व तीं ओझीं घेऊन, ते सारे प्राणी, त्या एकाच दिशेने जात असलेले,...दिसत होते—

लहान लहान मुलें, बायका, पुरुष, कोंबड्यांचें पिंजरे; 'बेंऽबें' करणाऱ्या बकऱ्या व कोकरें; वासरांच्या अंगाला-अंग घासून जात असलेल्या गायी; कांहीं रेडकीं नि म्हैशी, बैलांच्या जोड्या;–खांद्यावर नांगर, पिकाव फावडी पहा, इत्यादि साधनें टाकून जाणारे स्त्री-पुरुष...

अशी सगळीं गजबज नि भैरवाडीच्या बाजूस झुकलेली वर्दळ,...तिथें आतां दिसत होती.

प्रत्येक स्त्री-पुरुषांचा चेहरा फुललेला होता. तिथें अज्ञान, अगम्य आशा-अपेक्षा, नवा जोम–उत्साह चौफेर पसरलेला दिसत होता—

...६०

आणि मग, भुत्याच्या शेतानें हां हां म्हणतां आपलें स्वरूप पालटलेलें दिसलें. त्याची पूर्वीची ओसाड अवकळा निघून गेली होती. तिथें सारी नवी गजबज दिसत होती. ठिकठिकाणाहून आलेल्या स्त्री-पुरुषांच्या संसारांना, तिथें मोकळा-थारा मिळाला होता —

भुत्याचा बंगला आतां साफसूफ झालेला, त्याची डागडुगी झालेली नि लावलेल्या नव्या रंगानें पांढरा व सुशोभित बनलेला दिसत होता—

त्याची पुढली मोठी माजघराची खोली म्हणजे साऱ्यांच्या सकाळ—संध्याकाळच्या प्रार्थनेचा हॉल झाला होता—

एका बाजूच्या दोनतीन खोल्यांत-शेतकीचीं अवजारें, पेंड-भुसा वगैरे गुरांच्या अन्नाचीं पोतीं,...इत्यादि सांठा ठेवण्याची जागा; दुसऱ्या बाजूस दोन खोल्यात सर्वांच्या धान्याचा सांठा; पुढल्या खोलींत प्रकाशची लिहिण्या-बसण्याची-म्हणजेच कचेरीची जागा ! ठिकठिकाणीं 'प्रार्थना-हॉल,' 'गुरांचा सांठा,' 'आपलें अन्न,' 'कचेरी' अशा पाट्या झळकत होत्या.

बंगल्याजवळच प्रकाशची नवी झोंपडी उभी झाली होती. दुसऱ्या टोंकाला जीवनची झोंपडी...ती होती तिथेंच होती. त्या दोन टोंकांच्या दरम्यान, अंतरा-अंतरावर, निरनिराळ्या लहानमोठ्या आकाराच्या झोंपड्या उभ्या राहिल्या होत्या. त्यांत, तिथें आलेल्या सर्वांचे नवे संसार थाटलेले दिसत होते.

त्या नव्या झोंपड्यांमागें-कोणाचं बकरें-कोंकरूं, कोणाचं गाय-वासरूं, कोणाच्या एक-दोन म्हैशी-पारड्या, कोणाची बैलांची तर कोणाची टोणग्याची जोडी, अशीं जनावरें बांधलेलीं दिसत होतीं. अधूनमधून, कोंबड्या व त्यांच्या मागून चिवचिवणाऱ्या पिल्लांची फौज, सैरावैरा फिरत कांहींतरी वाखरून-टिपून, खात जातांना दिसत होतीं. तिथेंच उघडीं नागडी पोरेंहि खेळेंत असलेलीं दिसत होतीं.

मधल्या लांबच लांब शेतजमिनींत-कुठें नांगरणी, कुठे डिखळें फोडणें, साफसुफी करणें, बांध घालणें इत्यादि कामांत बायका-पुरुष-मुलें गुंतलेलीं दिसत होतीं. प्रकाशहि त्यांच्या कामांत सामील होऊन भाग घेत होता. त्यांना विविध सूचना देत होता.

मध्यें मध्यें, अंतरावर असलेल्या त्या चार विहीरी, आतां उपसून टाकून, साफसूफ करून, वापरांत आल्या होत्या; त्यांचे ढांसळलेले वर्तुळ बांध बांधून काढले गेले होते; कांहींच्या बांधांचें काम गवंडी पुरें करीत होते व त्यांना कांहीं जण मदत करीत होते.

तो साराच देखावा अतिशय विस्तीर्ण व नयनाल्हादक दिसत होता !



....६१

रात्रीच्या वेळीं, चांदण्यांत, मधल्या शेतांतल्या मोकळ्या जागीं, सर्वांची,... शेकोटीभोंवतीं एक सभा भरलेली दिसत होती.

भुईवर थपकल मारून सारे वर्तुळाकार बसले होते व त्यांच्यांतच, मध्यें उभा राहून, प्रकाश बोलत होता—"अशी आपण सुरवात तर चांगली केली आहे ! इथं कोणी कोठून का आलेला असेना—कसलें कीं काम करणारा असेना-प्रत्येकाची प्रत्येकाला मदतच होणार आहे !-पडेल तें काम, अगदीं अंग मोडून करायचं नि आपल्यासकट साऱ्यांना भाकर नि सुख मिळवून द्यायचं, असं आपलं इथलं तत्त्व ठरलंय् !-दोस्तांनों, आपण सारेच या जागेचे सारखे मालक आहों !-इथल्या सर्वांचीं भूक, सर्वांचं सुख,...सर्वांच्याच मनगटावर अवलंबून !-आपल्याकडे आहे तें आपलं सर्वांचं;...देवाच्या कृपेनें,...पुढें पदरांत पडेल,... तेंहि आपलं सर्वांचं! आपापलं मागलं वाईट, आपण विसरूं या !...आम्हाला प्रेम हवंय्-कसला सूड नकोय् !-कोणाशींच कसला हेवादावा नाहीं आपला—मात्र आम्हांला हवंय् तें आम्हां सर्वांना !-सर्वांसकट आम्हाला जगायचंय् !-खरं ना ?-"

जमलेल्या साऱ्यांनीं उत्साहानें हुंकार दिला;-त्यावेळीं, मधल्या शेकोटीच्या लहानग्या ज्वाळा फुरफुरल्या—वाऱ्यावर धूर वाकडा तिकडा उडत वर गेला—

प्रकाश पुढें हळुवार शब्दांत बोलूं लागला—"या भुत्याच्या शेताचा एक मूळचा वारस-हा जीवन !-आपल्याला इथें योगायोगानें तो सोबती म्हणून लाभला आहे. तो मला त्या दिवशीं म्हणला—'ही जमीन देवाची !'—ही सारी जमीन देवाची, हें खरं !...पण—जीवनच्या वाडवडिलांचे हात हिला लागले आहेत;-त्यांचा घाम इथें गळला आहे; शेवटीं...त्यांचं रक्तहि इथें सांडलं आहे !-आयुष्यभर जीवनचेहि हात इथेंच फिरत आले आहेत !-तर मग,..आपणहि आतां, आपल्या या भूमातेला आपलें श्रमदान मनापासून करूं ! आणि तिचें, बघबघतां, नंदनवन करून टाकूं—आम्हीं आमच्या मनगटाच्या जोरावर, आमचा घाम ढाळून उभारलेल्या स्वर्गांतच आम्हाला जगायचंय् !—"

सर्वांच्या चेहऱ्यावर, मधल्या शेकोटीचा धगधगता प्रकाश पडला होता व त्यांचे चेहरे प्रफुल्ल, उत्साही, समाधानी दिसत होते;...त्यांवर, नव्या आशा प्रतिबिंबित होत असलेल्या दिसत होत्या—

[ -८- ]

# ❀ मंगल-अमंगल ❀

....६२

"या भूमींत आपण नवीनच कांहीं तरी करतों आहे,...जीवन!—आपला कोणाशीं कसला हेवादावा नाहीं; कोणाचं आपल्याला नुकसान नाहीं करायचं-कीं, कोणाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष उपद्रव द्यायचा नाहीं!--पण मग--काका दिवाणजींनीं पाठवलेल्या त्या निरोपाचं काय कारायचं?-काय रे कळवूं या त्यांना आपण?-"

जीवन-प्रकाश दोघे कचेरीजवळ बसले होते;...दूर अंतरावर, इतर सारे कामांत गर्क होते;-कुठे कुठे विहिरींवर मोटा चालल्या होत्या;-त्याभोंवतालचे भाग, भाजीपाल्यानें हिरवे झाले होते—

प्रार्थना हॉलमध्यें मुलें खेळत होतीं. त्यांतच छोटा तिमिर बागडत होता-अन्नाच्या सांठ्याच्या खोलींत, चारदोन बायका व आठदहा मुली बसल्या होत्या. कापडी फळ्यावर अक्षरें काढून, शालिनी त्यांना शिकवीत होती.

तिकडे चौफेर पाहात, जीवन क्षणभरानें संथपणें म्हणाला—'भाई, ही भुताच्या शेतांत-देवांची दुनिया आज दिसतेय्; तीच पाहावत नाहीं आहे, त्या केसूनानाला!-म्हणून, तोच कुरापती काढतोय् नि कलागति लावतोय्!-तुमी सदा उपदेश करतां-'शांत-व्हा'-; आम्हीं-व्हातों!-म्हणूनच, आमचे लोक केसूनानाच्या कुत्र्यांच्या हातचा इंनकारनी मार खात्यात, गुमान!-पण त्याला म्हनावं 'आमी भुत्या बाबाजी-साबाजी येताळाचे वंशज हाव्!-मस्तक फिरलं त् फिरून बी रगातान् भैरवाडी शिपडूं,-येखाद् दीस!'—

"अरे ऽ अरे ऽ- जीवन! हेंच शिकलास का तूं आतांपर्यंत? देवाचीं प्रार्थना हेंच सांगते का तुला करायला?" जीवनच्या खांद्यावर हात ठेऊन प्रकाश गंभीर शब्दांत त्याला शांत करीत होता —

"माफी करा, भाई!" जीवन पटकन् थोडें दरमला; पण मग संथ शांत शब्दांत तो प्रकाशला पुढें म्हणाला-"मागली समदी याद आली कीं खिनबर



बगा, तळपायाची माजी तिडीक मस्तकाला भिनत्ये!-तुमांला काय म्हाइत या इनामदारांची काळी क्रित्यं?...आमा येताळांच्या घरान्याला यांनीं अशी धुळीला मिळवलं, जिमनींत् गाडलं...आन् सवता गब्बर झाले;...आमच्या येताळगावची भैरवाडी क्येली यांनी; आन्,...आन् ती बी मंग ओस पाडली-"

....६३

"भुत्या वेताळाचे बावजी-साबजी म्हणून दोघे मुलगे! जीवन, भुत्याचाच नातू ना रे तूं?" साबज्याचा लेक...प्रकाश कुतूहलानें म्हणाला.

"व्हय्जी-माजा बाबज्याकाका त् गडगंज व्हता-पर सत्रा यसनांत बुडला! -अफाटच खर्च त्याचा; तवा गरजीसाठीं, त्याचे आंगठे भरभर भैरव इनामदाराच्या कागदपत्रांत गुतत ग्येले!-आन् इनामदाराच्या रकमा,...बाबकाकाला बाटलींत घालून सफा बुडवायला-भाईर पडल्या!...इनामदाराचं चक्करवाड व्याज म्हंजी बकासूरच! तवा मंग...बगबगता त्या रकमांच बेडूक फुगुन फुगुनश्यान आखीर बैल झाले! त्यांनींच आखीर बाबकाकाच्या उरांत, छातींत शिंग खुपसलीं!...तो भुईला मिळला! ...त्याच्या आंगठ्यांच्या ठश्यांत भुत्याचं शेतबी तुकड्यातुकड्यांनीं असं गाडून गेलं, बगा! ...आखीर...बाबकाका एक दिस झिंगला, न् कड्यावरून पडला! त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या! तवा बघा, मी भैरवशेटचीच नोकरी करीत व्हतो-माज्या लगीन-कर्जाची फेड करीत व्हतो!"

"अरेरे! दारूचं हें व्यसन असंच सत्यानाश करतं, माणसाचा!" प्रकाश सहानुभूतीनें म्हणाला-"पण भैरव इनामदारांच्या घश्यांत भुत्याचं शेत बाबज्यामुळें एकदां उतरलं म्हणतोस, तरी पण, तें अखेर, मध्यें इतकीं वर्षं, असं ओस का पडावं,...मला समजत नाहीं?"

एक दीर्घ निश्वास टाकून, जीवन क्षणभरानें म्हणाला—"लक्षुमीचा खेळच ल्हई वंगाळ, परकाशभाई!—बाबकाकामागं त्याचा येकुलतायेक ल्येक व्हता! बाप गेला तवां, तो लगीन झालेला,...तरणाबांड!—तसं यसनबिसन काय नाय् बगा, त्याला!—पर बडा कुस्तीभादुर व्हता तो!—कसरतीच्या म्हेनतींत, कबुतराच्या नरावानी 'गुट्टुरगुम्' घुमत सांजसकाळ काडायची, आन् मस्त खायचं-प्यायचं! इक्तंच त्याचं येक यसन!...तवा बेरक्या पाताळयंत्री भैरव-

शेटान्...त्या सिध्या जवानाला बावलीपरमान हातात धरून नाचवलं! आन् आखीर, त्याच्या संसाराला बी आग लावली!—"

....६४

"म्हणजे? .." गोंधळून प्रकाशच्या तोंडून प्रश्नोद्गार आले—

"म्हंजे बीज काय-परकाशभाई?—त्याच्या संगतीन् तो पोर निसता खंक झाला! इक्तंच नाय—मानसातन्...जगातन्च साप उटला! .." जीवनचे, बोलतां बोलतां, डोळे पाण्यानें भरून आले; ओठ थरथरूं लागले;...प्रकाश त्याच्याकडे टकमकां पाहातच राहिला.

"रात्रीच्या पोटांत पैशाच्या राशी उब्या करायचा एक नवा धंदा आमच्या भैरवशेटन् काडला व्हता"—जीवननें सुस्कारा सोडला

जीवन क्षणभरानें म्हणाला—"त्यांत बाबकाकाच्या त्या तडफदार पोराला त्यांनं आपला भागिदार क्येला;...आपल्या हाताखालच्या टोळीचं नायक केलं;... त्यायेळा त्याला भैरव शेट म्हनला 'काम हाय थोडं धोकेबाज, उलट्या काळजाचं, जोखमीचं! पर बग मिळेल त्यातला तिसरा हिस्सा तुजा!.. तुज्या बापाच्या कर्जापोटीं तो जमा करीन,–आन् वर्साभरांत, तुजं समदं भुताचं शेत, बगतां बगतां, तुज्या नांवावर चडून जाईल!- तूंच त्याचा फिरून सवतंतर मालक व्हशील!' –आन् तो जवान पोर, त्याच्या थापांना भुलला! ...आन् मग काय? झाला त्याच्या धंद्यांत सामील, न् काय?"

"पण–कसला रे हा त्यांचा श्रीमंत होण्याचा असला धंदा, ...जीवन?" तें सारेच अगदीं चमत्कारिक वाटून, प्रकाशनें कुतूहलानें विचारलें—

"धंदा?? .. हॅ हॅ..." कुत्सित खिन्न हास्य करून, प्रकाशकडे भकासपणें पाहात, जीवन एकदम थांबला–

त्याच्या डोळ्यापुढून, ते सारे प्रसंग, पुन्हां प्रत्यक्ष घडत असल्यासारखेच येऊन जात असावेत; त्याचा त्यावेळचा चेहरा तसाच दिसत होता—

जणूं, त्याच्या त्या अंधुक चेहऱ्याच्या पडद्यातूरच, तो सांगत असलेले ते प्रसंग, चितारल्यासारखे प्रकाशला दिसूं लागले—

....६५

काळोखी रात्र; दोन अक्राळविक्राळ डोंगराळ दरडी; मोठमोठ्यानें शिटी



वाजवीत, एक मालगाडी त्यांच्यामधून जात होती. शेवटीं, सिग्नल उभा पाहून ती साफ थांबली.

त्याचवेळीं–मध्यभागच्या एकदोन डब्यांचीं दारें हळूच उघडलीं गेलीं. दोन्हीं बाजूच्या उघड्या–दारांतून, मोठमोठ्या–कापडाच्या अस्तव्यात गसड्या,... आंतून लोटल्या गेल्या. दोन्हीं बाजूच्या उतरंडीवरून, त्या गडगडत, खालीं झाडाझुडांमध्यें पडत होत्या;...एका डब्यांतून ३०।४० पोतीं खालीं पडत होतीं.

तेवढ्यांत, पुढला उभा सिग्नल खालीं पडला; गाडीची शिटी झाली व ती वेग घेत पुन्हां चालू झाली.

चालत्या गाडीच्या त्या उघड्या डब्यांचीं दारें एकदम बंद झालीं; दोघे तिघे, नुसते लंगोटी, रुमाल, बंडी व नाकातोंडावर काळीं फडकीं बांधलेले लोक उड्या मारून उतरले; लपून झुडपांत जाऊन बसले.

गाडीचा दूरचा झुक् झुक् आवाज येतच होता—

एक धिप्पाड शरिराचा दणकट तरुण दिसत होता. बाकीच्यांना झटपट कामें करायला तो खुणावीत होता. खांद्यावरून पोतीं लगबगीनें नेलीं जात होतीं. दोघे-दोघे कपिडाच्या गसड्या ढकलीत नेत होते—

रस्त्यावर तीनचार टांगे-पोत्या गसड्यांनीं भरलेले–सज्ज दिसत होते!-दोन-तीन बैलगाड्यांत व एका मोठ्या ट्रकमध्येंहि तसाच माल खचून भरलेला दिसत होता—

शेवटीं,... ते टांगे, गाड्या, ती ट्रक सारीं निरनिराळया दिशांना चालू लागलीं. तो मघाचा धिप्पाड जवान, ..त्यांना अखेरच्या सूचना देत, एका कांटेरी झुडपांत शिरला.

....६६

तोच दणकट जवान, इनामदारांच्या बंगल्यातल्या बैठकीजवळ बसला होता. आशावंत चेहऱ्यानें, उत्साहानें, त्यांना म्हणत होता—"भैरवशेट, आजची दोन इसा नि नववी खेप- आदी आतां मला समदा हिसाब द्या!- किती जमा झालं माजे?...बाबाच्या करजातली किती रक्कम उरली आतां?... फिटली ना पुरी? —कबूल क्येलं हाइत आदी!–तवा, द्या पाव् आतां माजं समदं स्येत माज्या ताब्यांत—'

सोन्याची कंठी गळयांत घातलेला, स्थूल देहाचा भैरवशेट, गादीवर तक्याला ओडगून बसलेला दिसत होता.

रुबाबदार दिसणाऱ्या आपल्या चेहऱ्यावरून व दाभणकाटी मिशांवरून तलम धोतराचा सोगा फिरवीत, बेरक्या नजरेनें त्याच्याकडे त्यानें एकदां पाहिलें; मग विकट हास्य करून तो म्हणाला—" जितका धाडशी तितकाच मोठा हुशार नि हिशेबी आहेस, बेट्या तूं !...म्हणालों होतों खरं मी-तुझ्या बाबाला वीसपंचवीस हजारांचं कर्ज होतं, म्हणून;-पण सगळा हिशेब आतां काढलाय् !-अजून एखाद दोन तरी खेपा हव्यात व्हायला अशाच—"

बोलतां बोलतां, भैरवशेठ पिकदाणींत विड्याची पिंक टाकीत होते—

त्यांच्याकडे जरा अर्धवट रागानें पाहात, आवाज चढवून, तो जवान म्हणाला–" आतां त्ये काय बी जानत नाय मी, भैरवशेट !-हिसाब तुमचा तुमीच करतां; ..पैसा तुमचा तुमींच घ्येतां !...असा केसान् गळा कापून कसं चालल ? आमाला जीव हातांत घेऊन रानावनांत फिरावं लागतं !-बोम्ब उठलीय् चारी बाजून्; पयले दीस नाय् आतां उरले;-पोलीस भरलेल्या बंदुका घेऊन फिरतात आमच्या मागं ! ...धावत्या गाडीला हात घालाया लागतो; उड्या टाकाव्या लागतात;-तुमाला काय गादीवर आरामशीर बसून ? बस्स झाली ही यातायात !! आतां जागचा तसू हालणार नाय् मी आजपून—ठरलं हाय त्ये माजं श्येत तिवढं टाका गुमन पदरांत—माझ्या—! माझ्याशीं गांठ हाय्... ध्यान धरा !-"

" असा एकदम अटीतटीला रे काय येतोस, वेड्या ?"-मनांत कचरल्या-सारखं होत असूनहि, लाडीगुडीच्या शब्दांत नवा डाव टाकावा म्हणून, भैरवशेटनी आपुलकीचे उद्गार काढले—" आजची ही एवढी एक शेवटची रात्र गाजव;... बस्स–उद्यां तुझ्या हिशेबाचा फैसला करूं !...झालं समाधान ?-आजचे दोन भाग तुझे ! मग तर झालं ? . उरलेल्यामध्येंच सत्राजणांची सत्रा तोंडं मी बंद करीन आपलीं कशीं बशीं !—काय ?...झाला ना आतां जीव थंड ?"—

" तुमी आतां गळ घालतांच, तवां—" मधला आवेश थोडा कमी होऊन, तो जुळत्यामिळत्या शब्दांत म्हणाला–" ह्ये खरं माजं कामच नाय, भैरव-



शेठ ! . भुत्याचं समदं श्येत सयसलामत मला परत मिळलं म्हनलांत...आन् त्या येका आशेन् म्हनूनच, असल्या वाकड्या बंगाल कामाला हात घातलाय् मी—"

" अरेऽउद्यां !...सकाळीं !...झालाच समज तुझा फैसला !!—" भैरवशेठ एकदम त्याच्या खांद्यावर थाप मारून म्हणाला—"आजची ही रात्र मात्र गाजली पाहिजे ! ...अरे...मला तरी हें आवडतंय् का, वेड्या ? उद्यांपासून ह्या भानगडीच कायमच्या बंद ! —तूं तुझ्या मार्गाला लाग-मीहि व्यापाऱ्याला आफ्रीकेला जाईन, म्हणतोय् ! ...मग कशाला घेतयं-करतंय् कोण या जोखमी पुन्हां ? ...समजलं ? ...जा, आतां रात्रीच्या तयारीला लाग–ऊठ !"

" त्ये काम माजं ! पर् उद्याची याद मातर् राखा !" किंचित् अधिकार-वाणीनें बोलून व क्षणभर घुटमळून उभे राहून, अखेर तो पाठमोरा वळला व यांत्रिकपणें निमूट चालूं लागला.–

त्याच्याकडे पाहत भैरवशेठ आपल्याशींच हसला—

....६७

तो दूर गेल्यावर तर, तो खदखदां हंसला व एकदम त्यानें हांक मारली– " अरे हेरंब ! —एऽ कांका दिवाणजी !...इकडे ये पाहूं— "

हेरंबकाका पुढं आला–बैठकीजवळ आदबीनें उभा राहून म्हणाला,— " काय, भैरवदादा ? —"

त्याच्याकडे बेरक्या नजरेनं पाहात, हसत हसत भैरवशेठ कुजबुजला– " त्या सुपरिंटेन्ड नि फौजदारसाहेबांना आजच्या रात्रींचाच निरोप दे ! —म्हणावं...आम्हीं जाळं टाकलंय् ! सगळी मदत करतों ! ...सकाळीं पोलिस पार्टीसह आपल्याकडे व रात्रीं चौफाळ्यावर हजर असायला हवं, म्हणावं ! ...वर्तमानपत्रं गाजताहेत; स्पेशल पोलिस गस्त घालत फिरताहेत; आपण वेळींच सावध झालेलं बरं ! काय ? स्वतःवर शेकणार नाहीं असं शाहजोगपणें वेळींच अंग बाहेर काढलं पाहिजे आपल्याला !"

....६८

शब्द ऐकूं यायचे थांबल्यामुळें, प्रकाशला जीवनचा चेहरा तेवढा दिसला–त्यावर नखशिखांत राग ओसंडत होता.

अत्यंत त्वेषानें जळफळत जीवन म्हणाला—"पर् अशी दगेबाजी करून, बी भैरवशेटनें बाबूकाकाच्या पोराचा दुसऱ्या दिवशीं निराळाच फैसला क्येला! मुद्देमालानिशीं आपली ती समदी टोळीच्या टोळी फौजदाराच्या ताब्यांत दिली—! येताळाचा कांटा कायमचाच काढून टाकलान्! —अन् आपन आपरिकेला व्यापार कराया निंगून ग्येला— "

तें ऐकून, प्रकाशच्या चेहऱ्यावर, मनांतल्या भावनांचा एकच एक हाःहाःकार उडालेला दिसला;—तो मंत्रमुग्धासारखा जीवनकडे निःशब्दपणें पाहातच राहिला.

तेवढ्यांत, पुढलं आठवून जीवन एकदम म्हणाला —" अखीर आठ वर्सां खडी फोडाया ग्येला बिचारा! जातांना त्याचा संताप संताप झाला—मुसक्या बांदून त्याला शिपायांनीं न्येला; तवां तो वरडला— मी दरवडेखोर...त् मंग, तू रे कोन, भैऱ्या? पन येव भैरा नाय्!–आंदला नाय–त्यानें पायलय समदं–मोठ्या इस्वासानं मान टाकली व्हती तुज्या खांद्यावर!–बरंऽ–पर–आताच मेलों नाय मी! क्येलं तसं भरावं लागल तुला! क्येलं तसं मीबी भरतोय आतां! पन् येक ध्यानांत घ्ये–सुटन तवा ह्यीं मनगटं तुला जाब इचारतील–घ्येतील! आन् आमच्या येताळांचं-भुत्यांचं-ह्ये शेत,..इनामदारांच्या पापी आवलादीला कदी बी लाभनार नाय, बग! हा माज्या तळतळत्या आत्म्याचा जळता शाप हाय तुमाला!...तुमचं कुळ व्हवून भुत्याचं ग्येत कसणारा आन् तुमच्या घरांत आमची लखमी भरनारा जो कोन किसान असल, तो बी धुळीलाच मिळल! त्याच्या छाताडावर आमचा येताळच येऊन बसल!–याद राखा समदे–हा बी श्याप हाय माजा!—"

....६९

" असं सारं झालं होतं, पूर्वी?..." प्रकाश खिन्नमनस्कतेनें उद्गारला–"तरीच विलासनें इतक्या तडकाफडकीं तशी व्यवस्था केलीन् जातांना—आणि आपल्याकडेहि आतां सगळे,. फिरून इतक्या वर्षांनीं,..मोठ्या उत्सुकतेनें येताहेत,.. मालक म्हणून जमीन कसायला...तें देखील असल्या विचारांनींच तर?..."

"हां! आन् तेंच त् काका दिवाणजीच्या आन् केसूनानाच्या डोल्यात खुपतंय्!



...माजा बी काटा वाटतोय् त्यांना—" जीवन खिन्न स्मित करून म्हणाला—" तुला नाय, माला नाय, घाल कुत्तरड्याला "—

" तें कांहीं असो; तरी पण जीवन, आपल्याला शांतताच हवीय! मात्र त्यांची कोणाची असली बळजबरी नाहीं चालू द्यायची आपल्यातल्या कोणावर—" प्रकाश सात्विक संतापानें म्हणाला–"करूं! त्याचाहि आपण योग्य बंदोबस्त करूं–"

मोठ्या विश्वासानें प्रकाशकडे स्नेहानें पाहून, जीवन म्हणाला—" तुमच्या शब्दाभाईर कोन जानार, भाई?–तुमी आमाला दावल तीच वाट आमची—तुमीच आमचं देव–मायबाप, समद्यांचे!"

" पर मग, खंडाच्या बाक्यांबाबत निरोप पाठवलेयत् केसूनानान्, भैरवाडीच्या कुळांना, समद्यांना, काल! त्यांचं काय? दीड म्हयन्यांची मुदत दिलीय् म्हन् त्यांना; पर माजा त बगा जीव कसा खालवर होतोय्, भाई! ट् आननार कुठून रकमा? त्यांच्यामदल्याच चारदोन कुळांनी, त्ये दिसा मार खाल्ल्यापून तीं मानसं लय हवालदील झालीं हाइत! —त्ये मला इच्यारतात बी अदूनमदून—पर...त्यांची समज कशी घालायची, त्ये मलाच समजत नाय्–" जीवन क्षणभरानें प्रकाशला म्हणाला—

" अरेऽ वेळेवर सगळं जमून येईल, बघ!...चिंता नको तुला त्याची– " जीवनला बरें वाटावें म्हणून प्रकाश त्यावर तसें बोलला खरें;...पण त्यालाहि आंतून त्या चिंतेनेंच कुरतडल्यासारखें होत असल्याचें दिसत होतें, चेहऱ्यावर—

इतक्यांत, एकदां दोनदां, हळूच स्त्रीच्या दडपल्या किंकाळ्या दोघांच्या कानांवर पडल्या; दोघेहि एकदम चमकले!

क्षणभर कानोसा घेत प्रकाश म्हणाला– " अरेऽ ही तर शालिनी!... तिचाच हा आवाज! ...काय रे झालं? –"

पण त्याचे ते शब्द पुरे होण्यापूर्वीच, जीवन त्या बाजूस धांवतहि सुटला होता

....७०

जवळच्या तीनचार झोपड्यांतले कामकरी, त्यांच्या बायकासुद्धां त्या आरोळीनें दचकून उठल्या होत्या; प्रकाशच्या झोपडीजवळ धांवत जाऊन सारीं जमलेलीं दिसत होतीं—

जीवन झोपडीच्या दारांत शिरून तिथेंच थबकला होता–शालिनी त्याच्या शेजारीं तिमिरला छातीशीं घट्ट धरून, घाबरल्या चेहऱ्यानें उभी होती–

झपझप पावलें टाकीत त्यांच्यामागोमाग प्रकाश तिथें पोंचला होता; तेव्हां त्याला समोर एक अनपेक्षितच दृश्य दिसलें होतें—

मागला कुडाचा दरवाजा सताड उघडा होता. आंतल्या चुलीजवळ, जमीनीवरच थपकल मारून, एक धिप्पाड धटिंगण बसला होता.

त्याच्यासमोर झांकलेल्या भोंड्यां–टोपल्यामधून बाहेर काढलेल्या काकड्या, शेंगा, कांदे, मिरच्या, दोनतीन भाकऱ्या,...वगैरे खाण्याच्या वस्तू अस्ताव्यस्त पडल्या होत्या;...नि त्यांतलें एकएक अधूनमधून उचलून-तोडून-मोडून, तो अध्याशासारखं खात होता.

कंदील हातांत घेवून आलेले एक दोघे पुढें झाले होते, त्याला जरा दटावून विचारीत होते–" कोणरे तूं?-काय हवं तुला इथं?–"

पण कांहीं एक न बोलतां, समोरच्या खाद्यवस्तूंचा तो समाचार घेऊन सारखे बोकणे भरत होता.

" मागल्या बाजूला दारावर थाप बसली म्हणून 'मी जाऊन ते उघडलं; तर हा आपला एकदम समोर उभा–" शालिनी सांगत होती–" दचकून मी हळूच ओरडलें. पाठी झालें—तेवढ्यांत ती आंत आला नि म्हणाला ' खायला द्या, बाय–' ' कोण तूं?' म्हणून मी त्याला विचारतेंय्...तों त्यानें मला बाजूला सारलं; नि चुलीजवळ थपकल मारून, हा असा बसलाय! मला फारच भीति वाटली एकदम; नि ओरडलें मी–"

....७१

जीवन प्रथम दोन पावलें पुढें गेला; पण मग जागच्या जागीं थबकला–तेवढ्यांत, प्रकाशहि दिवा घेऊन, त्याच्या अगदीं जवळ गेला—

त्या नवख्याचा चेहरा श्रांत दिसत होता–त्याचे डोळे ओलावल्यासारखे झाले होते–डाव्या गालाला दोन बोटें रुंद असा, लांबच लांब (ओठापर्यंतची जखम शिवून झालेला ) वण दिसत होता. ओठावर खूप मोठ्या झुबकेदार मिशा दोन्हीं बाजूला कानांपर्यंत पसरल्या होत्या–भरलेल्या मोठ्या जबड्यांत, एक काकडी



मोडून टाकून,...'करांव करांव करीत, तो सभोंवार व प्रकाशकडे संथपणें पाहात होता.

प्रकाशभाईनें पुढें होऊन, त्याच्या खांद्यावर स्नेहाळ हात टाकला; नि त्याला हळुवार शब्दांत विचारलें–" कुठून आलास, दोस्ता, तूं?"

उजव्या हातानें, बंद मूठ व बोट दाखवल्याची खूण करून, 'रस्त्याकडून, –त्या भैरवाडीच्या पाटीजवळून,' असें त्यानें दर्शवलें व तो नवीन घांस तोंडांत भरून, आपल्याच तंद्रीत वखवखून पुन्हां खाऊं लागला—

" कायरे हवंय् तुला इथं...माझ्या घरांत?–" कुतूहलानें, सस्मितपणें, प्रकाशनें त्याला विचारलें—

' भूक ..भूक... ! " भरल्या तोबऱ्यानें अस्पष्ट शब्दांत तो बोलला व समोरचें उरलें सुरलें तोंडांत भरून तो तेंहि करांवकरांव चावूं लागला.

...७२

समोरच्या भांड्यांतून,...भाकऱ्या, चटणी, दहीं, भाजी...सारें कांहीं, आपल्या हातानें आणखी त्याच्या ताटांत वाढत, त्याच्याकडे स्नेहानें हसून पाहात, भाईनें पुन्हां म्हटलें—" हें बघ! –हें भुत्याचं शेत म्हणतात ना, तें आतां आपलं सर्वांचं आहे! आमच्यांत राहाशील रे तूं?"

त्यानें तोंड थांबवून, दचकून एकदां प्रकाशकडे पाहिलें व मग खातां खातां, ' होय ' अशी हळूच मान हलवली.

जीवननें पुढें होऊन, एक पाण्याचा लोटा भरून त्याच्या पुढें ठेवला. तो उचलून तोंडाला लावून, घटघटां पाणी पितां पितां, त्यानें हळूच जीवनकडे पाहिलें. तो किंचित दचकलाहि; जीवनहि त्याच्याकडे पाहतां पाहतां, हळूच चपापला

पण मग जसें कांहीं, कांहींच झालें नाहीं असा चेहरा करून तो गप्प राहिला, बाजूला राहिला.

" कसलं काम करशील रे तूं?" –तेवढ्यांत, प्रकाशनें त्याला हळूच सस्मित चेहऱ्यानें विचारलें.

आपले जाडजूड खांदे रुंदावून व हलवून आणि उजव्या हाताचें जोरदार

मनगट नि दंड पुढें करून, तो पुन्हां तोबरा भरत म्हणाला–" कसलंऽबी काम ! सांगाल त्यें— "

" वाः छान ! ...नांव रे काय तुझं, दोस्ता ? " ...प्रकाशनें उत्सुकतेनें विचारलें—

क्षणभरच त्यानें चौंफेर पाहिलें. जीवनकडेहि टवकारून पाहिलें व मग तो हळूच पुटपुटल्यासारखें म्हणाला,–" मंगलबाबा ! —"

त्याक्षणीं, जीवनचा चेहरा थोडा गोरामोरा झाला होता. पण तिकडे भाईचें लक्ष नव्हतें.

मंगलच्या खांद्यावर थोपटत, तिथें जमलेल्या साऱ्यांना उद्देशून प्रकाश म्हणाला —"हा आपल्याला एक नवा दोस्त आज लाभतोय्, मित्रांनो ! बरं का ? तो आतां आपल्यांतच राहाणार आहे ! हें त्याचंहि घर, तुमच्या–माझ्यासारखंच, बरं ! –चला–जा–आतां घरीं;–सकाळीं लवकर उठायचंय्– "

जमलेल्या सगळ्यांची पांगापांग झाली.

खाणं संपवून, ताट उचलून मंगल उठला–पाणी घेऊन, त्यानें ताट धुतलें; उपडीं घालून ठेवलें—

अधून मधून, जीवनची त्याची दृष्टिभेट होत होती. दोघेहि, कांहीं तरी बोलावंसं वाटत असल्याचा चेहरा करीत होते. पण अखेर, मंगलनेंच जीवनला 'चूप–तोंड बंद !' असें खुणेनें निक्षून बजावलें.

....७३

आपल्या घरांतली एक हत्री घेऊन, बंगलींतल्या कचेरीजवळच्या ओसरी-कडे जात, प्रकाशनें हाक मारली–" मंगल, ए मंगलभाऊ, ये ! झोंप इथं निश्चिंतपणें!...तुझंच घर हें !"—

मंगलनें त्याच्याकडे एकदां कृतज्ञतेनें, पण कांहीं न बोलतांच, पाहिलें व ती हत्री अंथरली; कोपरापासून तुटलेला डावा थोटा हात उशाला घेऊन, त्यानें आपला लांब रुंद धिप्पाड देह धरणीवर ऐसपैस पसरला.

आपल्या झोपडीकडे निघून जातां जातां, दुरूनच, त्या बंगलीच्या ओसरीवर पसरलेल्या मंगलकडे जीवन विचलित चेहऱ्यानें पाहात होता. एकदां पुढें व्हावेंसेंहि त्याला वाटलें; पण मन आवरून तो मागें फिरला.



पडल्या पडल्या, जवळ कोणी नाहींसें पाहून, मंगल हळूच चौफेर पाहात होता. त्याच्या डोळ्यांत पाणी सांचत होतें. तें हळूहळू घळघळून गालावर ओघळूं लागलें होतें.

किती वेळ गेला, कोण जाणें;...त्याला कोणाच्या तरी पावलाची चाहूल लागली. एकदम त्यानें डोळे मिटून घेतले व तो निश्चल पडून राहिला.

प्रकाशभाईच पायऱ्या चढून वर आला होता. मंगलला निश्चल झोंपलेला पाहून, व वारा भरभरत असलेला पाहून, आपल्या अंगावरची फाटकी ठिगळें लावलेली शाल, भाईनें हळूच त्याच्या अंगावर पसरली व तो चोर पावलांनीं माघारीं फिरला—

किलकिल्या डोळ्यांनीं मंगलनें तें सारें पाहिलें, त्याचे डोळे पाण्यानें फिरून भरभरून आले. प्रकाशचे मघाचे शब्द त्याच्या कानांत पुन्हां दुमदुमले –" भुत्याचं शेत...आपलं साऱ्यांचं शेत ! हें घर तुझंच आहे बरं "–

यत असलेला एक लहानसा हुंदका, मंगलनें आंतल्या आंत प्रयासानें दडपला व त्याच्या तोंडून हळूच पुटपुटले शब्द बाहेर पडले–" माजं घर–माज्या भुत्याचं श्येत ! या डोळ्यांनीं पायलं फिरून; याच जल्मीं पायलं !!" —

....७४

मंगल तिथें अनपेक्षितपणें आल्यानंतरचे ते दीडदोन महिने; बघतां बघतां निघून गेले होते—

त्याच काळांत वायुवेगानें घडलेले ते प्रसंग नि त्या घटना—

त्यांतलीं कित्येक दृश्यें तर मोठीं संस्मरणीय होतीं—

काळोखांत बुडालेलें तें चौफेर विस्तारलेलें शेत ! प्रकाशानें न्हाऊं लागलेल्या दिशांबरोबरच, स्पष्ट दिसूं लागलें होतें;–पूर्वेकडील आकाशांतील ढगांमागून, सूर्यकिरणांचा सर्चलाईट अनंताकाशाच्या पोटांतलें कांहीं तरी अगम्य शोधीत होता—

शेतांत चौफेर मंडळी कामें करीत होतीं. अधलीमधलीं कांहीं मोठीं झाडें तोडलीं जात होतीं—सुतार करवतीनें त्याचे तुकडे पाडत होते;—गाडीचे सांगाडे, चाकें, धुराडे, शिवळजोतीं तयार होत होतीं—

भट्टीजवळ बसून, लोहार तापलेले लोखंडाचे तुकडे काढत होते-घणावर ठेऊन, त्यांवर घाव घालीत होते-चाकाच्या धांवा; नांगराची टोकें, पहारी कोयत्या-कुऱ्हाडीचीं पातीं तयार होतीं-

ठिकाठिकाणीं, नांगर जमिनींत रुतून पुढें पुढें सरकत होते- ढेंकळें वर उडत होतीं-सोम्या आपली रेड्याची जोडी,...तर जीवन बैलांची जोडी, हांकीत होता.—

मंगल तर स्वतःच एका नांगराचें जूं मानेवर घेऊन ओढत होता —

दोन विहिरींवर मोटा चालल्या होत्या;- जवळपासच्या भागांत, पाणी पाटानें खेळत होतें; भाजीपाल्याची आळीं वाढलेलीं, हिरवींगार दिसत होतीं;- भाजीपाला, वांगीं, मिरच्या, कोथिंबिरी, कांदा, दुधी इ. च्या बायका राशी करीत होत्या-पाट्या भरून उचलून नेत होत्या.

....७५

दुपारच्या वेळीं, ललकाऱ्यामारून जीवन व प्रकाशभाई, इकडे तिकडे पांगलेल्या साऱ्यांना, न्याहारीची वेळ झाली अशी आठवण देत होते; एके ठिकाणीं बसून गप्पागोष्टी करीत, एकमेकांकडून एकमेकांच्या खाण्याचे नमुने घेत, हसत-खेळत, सगळे न्याहारी करीत होते;.. झाडांच्या सावल्यांच्या आसऱ्यानें, न्याहारीनंतर थोडा वेळ मंडळी विश्रांतीसाठीं पसरलेली दिसत होती—

दुपारच्या वेळीं, दहापंधरा मुलें-मुली घेऊन, शालिनी त्यांना लिहावयाला शिकवीत असल्याचें दिसत होतें;...संध्याकाळीं, प्रार्थना हॉलमध्यें, प्रकाशभाई कोणाकोणा प्रौढांना गोष्टी सांगत आहे, शिकवीत आहे, असें दिसत होतें;— बायकांना शालिनी शिवण शिकवीत आहे, त्याहि एकत्र बसून काम करीत आहेत असें दिसत होतें—

जीवनच्या झोंपडींच्या बाजूला सूर्य मावळत होता. बघतां बघतां सभोंवार काळोख पसरत जात होता—

विहिरीवरच्या मोटा सुटून निश्चल पडल्या होत्या; कुठल्या झोपडींत सुताराचीं हत्यारें, कुठल्या झोंपडींत लोहाराचा भाता, नांगर, कुदळी खोरीं; कुठल्या झोंपडींत थाप्या, ओळंबे... असें सामान अस्ताव्यस्त व स्वस्थ पडलेलें दिसत होतें-



झोंपड्यामागल्या कामचलाऊ गोठ्यामध्यें-बैल, रेडे, गाई, म्हैशी वगैरे प्राणी, संथपणें, डोळे मिटून, रवंथ करीत बसलेले दिसत होते; सारीं माणसेंहि आपआपल्या झोपड्यांत झोंपलीं होतीं—

जीवनचा शांत निद्रित चेहरा; मंगलचीं ओसरीवर लोळत असतांनाची झोंपेतली चुळबूळ; भाईची आपल्या झोंपडींतली अस्वस्थ हालचाल—

....७६

सर्व बाजूनीं, तें शेत आतां असं साफसूफ झालं होतं—तिथं थाटलेल्या त्या छोट्या छोट्या संसारांना पोटांत घेऊन, त्यांच्यावर, त्या किरकोळ झोंपड्याच कां होईनात, मायेच्या सांवल्या करीत होत्या. ...पण त्या धूसर चंद्रप्रकाशांत, भुत्याच्या शेताला तीन बाजूंनीं कौंस करणाऱ्या त्या झोपड्या, स्वतःच जणूं, उभ्याउभ्या झोंपा घेत आहेत, असा अखेर भास होत होता !—

त्या परिसरांत, त्याक्षणीं, मंगल अमंगल दोन्हीं होतीं—पण असलेलें थोडें थोडेंसें अमंगल देखील,...साऱ्यांच्या एकोप्याच्या सद्भावनेनें, मंगल अमंगल झालें होतें—

[ -९- ]

# वांटेतले काटेकुटे

...७७

" तूं करतोस काय रे मग, केसूनाना ? –झोपा काढतोस ? " संतापानें नि तावातावानें, काका दिवाणजी, पडल्यापडल्या मोठ्या आवाजांत ओरडत होते–मनस्वी रागामुळें, अधूनमधून, तें शब्दागणिक अडखळत होते–" म्हणजे भैरवाडींतली नदीच्या पैलतीराची ती ओसाडी, ती अवकळा...आतां बघतां बघतां, ऐलतीराला येणार ! ...आणि ती तूं टकमकां पाहात बसणार ! ...हत् गाढवाच्या लेका ऽ —"

दारापाशीं, अंग चोरून निश्चल उभे राहण्याचा, केसूनाना निष्फळ प्रयत्न करीत होता. तरी शेवटीं, न राहवून, चिडक्या, तरी पण आदबशीर स्वरांतच तो म्हणाला–" हा सारा विलासदादांनींच उडवलाय् गोंधळ ! नि त्यांत भर घातलीय्–त्या प्रकाशनें ! पांच पांच एकर जमीन, तीन वर्षा अखेर, कसणाऱ्या कुटुंबाच्या मालकीचीच करून टाकायची म्हणे–घोषणा केलीय् त्यानें–मग, तिकडेच रीघ नाहीं लागणार, .. तर काय होईल ? तिथें जाणाऱ्या कुळांतली निवड करतोय्, तो बदमाश–जीवन ! त्याच्या लाग्याबांध्याच्या भाऊबंदाची;–साऱ्या वेताळांची–अशी भुतावळच उठतेय् फिरून, आतां त्या भुत्याच्या शेतांत !–भैरवशेठजींच्या घरच्या खाल्ल्या अन्नाचें असें उट्टें फेडतोय् , तो बेटा ! भैरवशेटजींच्या खुनानंतर, तिथल्या जमिनी सोडून–घाबरून-पळून आलेलीं आपलीं सारीं कुळें, आतां सामानसुमान-संसार–जनावरांसह, रात्रीच्या पोटांत प्रकाशकडे गेलीं आहेत ! कधीं भेटले, तर उलट म्हणतात–आतां आमाला हौशेचं भूत झोंबनार नाय् ; येताळाचा श्याप नडनार नाय ! आतां तुम्हींच सांगा,...काय करूं मी अशा परिस्थितींत ?–"

" थोड्या बांगड्या भर हातांत !...काय करूं म्हणे ? अरे ऽ त्यांतल्या चार चौघांना चांगलं लंबे कर ! " काकाजी अर्धेअधिक उठलेहि त्या जोसांत–पण पुन्हां खालीं पडले.



मग, क्षणकाळच्या उसंतीनंतर, पुन्हां उसळून ते म्हणाले–" तो जीवन त्याचवेळीं तोंड काळं करून गेला असता–भैरवाडींतून, तर इतकं कशाला पुढलं सारं होतं ? ..त्या बाबज्याच्या कुळाचीच ना अवलाद ती ! ...सापाच्या पोराकडे दुर्लक्ष झालं आपलं–त्याला नकळत दूध पाजलं गेलं ! "

" तो तर आतां त्या प्रकाशचा उजवाच हात झालाय् !" केसूनाना एकदम रागारागानें ओरडला–" प्रकाशलाहि घाबरवून, सुरवातीलाच शेत सोडून पळवून लावायचा माझा डाव ! ...पण तो हुकवलान् त्याच बदमाशानें ! ...तोहि स्वतः रुजला–नि त्या प्रकाशला रुजवलंन् ! ...नि आतां आणखी, आमच्या काबूत राहाणारीं आमच्या ताटाखालच्या मांजरांसारखीं भेदरट कुळंहि पळवून लावतोय्; ...त्यांना भुत्याच्या शेतांत रुजवतोय् ! —अगदींच निडर झालाय् आतां तो ! –परवा मला वाटेंत भेटला–तेव्हां, प्रकाशचा म्हणून, स्वतःच तंबीचा निरोप दिलान् मला–म्हणाला–" परकाशभाई म्हनत्यात–कुनी कुनाच्या वाटला जायचं नाय् ;–जो तो आतां सवताचा सवतंतर झाला हाय् ! ...जिथं ज्याला गोड लागल तितं खपल तो !...पन मंग, कोनी आमची पयली आगळीक क्येली, तू मातर्,...भुत्याच्या शेतांतली समदी भुतावळ बसल त्याच्या मानगुटीला ! ',

" काय ? ...असं म्हणाला काय, साला, तो ! " ...काका दिवाणजीं रागारागानें दांतओंठ खात म्हणाले– " त्याचा, आधीं बंदोबस्त कर, केसूनाना ! ...काय वाटेल तें कर ! ...आणि प्रकाशला माझा निरोप सांग–म्हणावं–'भटाला दिली ओसरी, तो हातपाय पसरी,...असं होतंय् हें !–आमचीं कुळं, जमीन टाकून तुमच्याकडे पळालीं आहेत; तीं आधीं परत पाठवा ! ...नाहींतर म्हणावं–त्यांची तीनतीन वर्षांच्या खंडाची बाकी नि कर्ज...महिन्याभरांत भागवायची जबाबदारी तुमची राहील ! " तें झालं नाहीं तर तुमचे आमचे संबंध वाईट होतील ? –याद राखा– "

....७८

" धान्याचा सांठा दिवसेदिवस संपत चाललाय् बरं, जीवन !—जेमतेम दीडदोन महिनेच पुरणारं हें अन्न !–आतांपासूनच निम्मे खायला सुरवात केली तरच कसंबसं अखेरपर्यंत पुरणार !...पांचपन्नास रुपये आहेत, ते अडीअडचणी

साठीं राखले पाहिजेत !–पुरवठ्यासाठीं, आतां कठोर मनानें, शिधा कमी कमी, करत जा ! त्यांत जरा कुचराई करशील, तुझं हृदय द्रवेल–तर मग पोरंबाळं एक दिवस उपाशी तडफडतील हो !"...प्रकाश धान्य-साठ्याच्या खोलींत होता. पोत्यांची थप्पी नीट लावून ठेवीत असलेल्या जीवनला, तो गंभीरपणें सूचना देत होता—

"त्ये हाय माज्या ध्यानीं–" जीवन सचिंतपणें म्हणाला—"धरणी-माता तरी, बारमास तेरा काळ, दूध कुटलं पाजणार आपल्या लेकरांना ?...समदे गडी, बाया–आपल्या फावल्या येळांत काय बनवतील; त्याचे बी चार पैसे कराया पायजेत आतां !"

"होय जीवन...आतां एकेक येता दिवस आपल्या डोळ्यांत पाणी आणणार आहे–" प्रकाश गंभीरपणें म्हणाला—"काम–काम–काम;...अहोरात्र कामच हवंय आतां !–सर्वांना पटवलं पाहिजे, कीं येईल ती हुन्नर–कारागिरी करून, आपल्या या एकत्र गाड्याला हातभार लावला, पाहिजे ! सूतकताई, वेतकामंच हत्र्या, बांबूकाम...मनांत आणलं तर साऱ्यानांच करतां येईल. सुतारांनीं बनवलेलीं खेळणीं;-लोहाराचे कोयते, उलथन्या, विळ्या, खुरपणीं;–कुंभारांच्या कुंड्या, गाडगींमडकीं...होईल तें सारं सारं तयार झालं पाहिजे. आणि गाडींत भरून दर बाजाराला नेऊन, त्याचा येईल तो पैसा केला पाहिजे !–तें काम तुझं, बरं जीवन !—"

"व्हय जी ! असल्या पैक्यातूनच आपल्याचा बीं–बियाण्याचा साटा तयार करायचाय् ! तसं मी समद्या गड्या–बायांना सांगितलं बी हाय आतां–त्यांचे हात त्या चुरशीत् तरी भरभर हलतील–त् बगायचं !–" जीवन म्हणाला.

"हो, आतां असे डोळ्यांत तेल घालूनच जगायचे दिवस आले आहेत, जीवन !–" प्रकाश गंभीर मुद्रेनें सभोंवार पाहात म्हणाला.

....७९

लहान लहान लाकडी गाड्या, खुर्च्या, पाट, पांगुळगाडे इत्यादि वस्तूंची, सुभानं सुतारानें व त्याच्या घरांतल्या मंडळींनीं रास केली होती.

बुडकुल्या चुली, इ. खेळ व मडकीं–गाडगीं वगैरे मोठीं भांडीं सोम्या कुंभाराच्या दाराशीं पडलीं होतीं.



पेटलेल्या भट्टीसमोरच्या घणावर, तापलेल्या लोखंडावर ठोके मारून उलथनी, कोयते. इ. सामजी तयार करीत होता व कांहीं तयार वस्तू त्याच्या समोर पडल्या होत्या.

कांहीं मुलं पानांच्या पत्रावळी द्रोण करीत होतीं; कोणी बाया सूत काढीत–होत्या...

मंगलच्या समोर वेत–बांबूंचे भारे पडले होते. त्याच्या शिपट्या काढून, तो भरभर टोपल्या–खुर्च्या वगैरे विणीत होता. त्याच्यासमोर, निरनिराळ्या तयार वस्तूंचा हा भला मोठा ढीग पडला होता—

...८०

जीवन जोडलेली गाडी घेऊन सर्वांच्या झोपड्याजवळून जात असलेला दिसत होता. प्रत्येक जण आपापल्या वस्तू हसत हसत त्यांत भरत होता व गाडी पुढें जात होती...

भरलेली गाडी, शेवटीं कचेरीजवळ आली; त्यांत मंगलनें स्वतः बनवलेल्या लहानमोठ्या कितीतरी वेताच्या–बांबूच्या वस्तू भरल्या.

गाडी खच्चून भरली होती; तिच्यामागें, भाजीपाल्याची वगैरे दुसरी एक गाडी होती.

जीवन गाडी हाकलूं लागला; तेंवढ्यांत कचेरीच्या खोलींतून प्रकाश पुढें आला. त्याच्याकडे पाहून, हसत हसत गाडीवर उभें राहून जीवन म्हणाला, "चाललों–भाई, तुळसगांव बाजाराला–आमची समद्यांची कारागिरी घेऊन !..."

प्रकाशनें त्याच्याकडे पाहून हात वर केला व तो प्रसन्न हसला.

....८१

जीवनची तीच गाडी,...आतां बंगलीजवळ सोडली होती. तिच्यांत व तिच्या मागच्या गाडींत २५।३० धान्याचीं पोतीं होतीं.

एकेक पोतें खांद्यावर मारून, तीन चार गडी साठ्याच्या खोलीकडे जात येत होते. त्यांतच मंगलहि होता.

स्वतः एक पोतें घेऊन, आंत जातां जातां, ओसरीवर उभ्या असलेल्या प्रकाशला जीवन कौतुकानें म्हणाला, "आजचा दीस, भाई मंगलदादाचा !...त्याच्या

सामानावर, बाजारांत, बगबगतां खूप खुर्दा उबा केला!...समर्थांच्या सामानाचे तीस चाळीस रुपये जमले! ...ही बियाणाचीं पोतीं आंनलीं सरकार दुकानातन्; विक्रीचा खुर्दा हातीं आला, तवांच नेलेल्या रकमेंत भागलं समदं!...साऱ्यांचा हात त्ति जगन्नाथ!"

एक मोठें पोतें एकाट्यानें पेलत, आंत शिरणाऱ्या मंगलकडे प्रकाश कौतुकानें पाहूं लागला.

ओझें घेऊन जातांना, त्याचाहि चेहरा प्रफुल्ल झालेला दिसत होता—

....८२

घण–घण,...घण–घण...घंटा, वाजली–भांडीं–फडकीं घेऊन, सारे रांगेनें उभे राहूं लागले—

"दोन दोन दिवसांचा शिधा घेऊन चला"–जीवन करड्या शब्दांत म्हणाला.

तांदूळ, डाळ, जोंधळा, मीठ-मिरची, कांदा, भुईमूग–असले पदार्थ, जीवन प्रत्येकाला मोजून देत होता. घेणाऱ्यांचे चेहरे कांहींसे रंजीस दिसत होते—

परत जाणारी मंडळी आपसांत पुटपुटत कुरबुरत होती... 'काम करकर करून बी ह्ये असं'..."पर दीस जायचे कसे अर्धपोटीं–" 'अर पन्,...जीवनदादा नि भाई तरी काय करतील?—'

सुभानच्या झोपडीत तो जेवत होता;...समोरची थाळी रिकामी होती–तीं एकदां चाटून, घटघटां पाणी पीत, तो बायकोला म्हणाला..."झालं ज्येवान!... आतां सांजपावतों नांव नको काडाया–"

"पर समर्थांच्या घरांत ह्येच हाय् कीं;–तुमीच काय आभाळांतून नाय् ना पडला?" त्याची बायको पुटपुटली—

पांग्या जेवायला बसला होता–ताटांत थोडे थोडे जिन्नस पाहून, तो रागावला—"मरमर मरतोय् आमी–आन् जेवायच्या वख्ताला मातर् ह्ये!...त्ये काग् नाय–काय तरी क्येलं पायजे आतां!"

त्याच वेळीं, मंगल हळूच आंत शिरला-पांग्याच्या ताटांत आपल्या हातांतल्या दोन भाकऱ्या त्यानें टाकल्या.



पांगा दचकला—मंगल कांहीं न बोलतांच, आला तसा निघून गेला.

प्रकाश–शालिनीहि जेवायला बसलीं होतीं–समोर असलेल्या थोड्याशाच अन्नातलां एक घांस घेत प्रकाश म्हणाला—"दिल्या शिध्यावर सगळेच नाराज आहेत!...जीवनवर–माझ्यावर रागावलाहेत!...पण मग आम्ही काय करणार? –आल्या परिस्थितीशि तोंड देऊन, आम्हाला अखेरी गाठायची आहे. आजपर्यंत तरी असे शीरसलामत पार पडलोंय्, हेंच नशीब!"–

"जातील! हेहि दिवस जातील!–" शालिनी सहानुभूतीनें म्हणाली—

प्रकाशनें उत्तेजित होऊन तिच्याकडे प्रेमभरानें पाहिलें.

....८३

कचेरीजवळच्या ओसरीवर मंगल बसला होता.

सगळीकडे अगदीं शांत होतें. दूर दूरचें कुत्र्याचें भुंकणें तेवढें कानावर पडत होतें–भुताच्या शेतांत चोहोंबाजूस निजानीज झाली होती–

मंगल मात्र अजून जागा होता. एक कंदील पेटत होता व त्यांच्यासमोर वेताच्या बांबूच्या लांब लांब शिपट्या पडल्या होत्या–त्याचा हात भरभर चालत होता. तो विणत होता

एक छानदार परडी तयार होतांच, त्यानें तिच्यावर हिरव्यातांबडे रंगाचे पट्टे ओढले व ती उचलून हातांत धरली. कौतुकानें तिच्याकडे क्षणभर पाहून, मग ती त्यानें भिंतीजवळच्या इतर तयार मालांत टाकली. त्यानें दिवा विजवला व तो आपल्या कांबळीवर आडवा झाला.

पडल्या पडल्या, काळोखांतच, तो त्या तयार मालाच्या ढिगाकडे पाहात होता. त्याला तिथे एक गोड चित्र दिसूं लागलें—

भरलेल्या बाजारांत तो माल पडला आहे; लोक पहात आहेत; पैसे देत आहेत; तो खुर्दा घेऊन, जीवन धान्य कडधान्य विकत घेत आहे;–सगळे नाराज झालेले कामकरी, त्यांची पोरें, एकत्र बसून, गच्च भरलेल्या ताटांतील अन्न भरभर मनसोक्त खात आहेत; ढेकर देत आहेत—

पण त्याची ती स्वप्नाळू चित्र–शृंखला एकदम तुटली—

कसली तरी खसखस त्याला ऐकूं आली-कोणाचीं तरी,...बंगलीच्या

मागल्याबाजूला,...पावलें वाजलीं—मग तिथल्या खिडकीच्या दाराची फळी उघडल्याचा परिचीत आवाजहि त्याच्या कानावर पडला...

....८४

मंगल एकदम उठून बसला-झटकन् उभा राहून, तो सावधगिरीनें पायऱ्या उतरला.

दबकत दबकत, बंगलीला वळसा घालून, तो तुळशीवृंदावनापाशीं आला; केवढ्यानें चमकला तो ! ...त्याला एक चमत्कारिकच दृश्य समोर दिसलें—

धान्य-साठ्याच्या खोलीची मागली खिडकी कुणीतरी उघडली होती. भिंतीच्या धक्क्यावर उभे राहून, एक पाय आंत टाकून, एक व्यक्ती आंत शिरण्यासाठीं ओणवली होती—

भरभर तीन चार ढेंगा टाकून मंगल एकदम तिच्यामागें गेला-आपला जाडजूड, रांकट, लांब उजवा हात त्यानें एकदम त्याच्या मानेवर टाकला; बळकट पंजानें त्याची बंडी चटकन् पकडली; नि निमिषार्धांत त्याला त्याने खसकन् मागें ओढलें-

त्यावेळीं, त्या व्यक्तीच्या तोंडून एक भयभीत सूक्ष्म चीत्कार बाहेर पडला. पण ' चूप '...असें हळूच बोलून, मंगलनें त्याला गप्प बसण्याची खूण केली.

आपला थोटा हात त्याच्या खांद्यावर टाकून, आपल्या उजव्या हातानें त्याचा हात बळकट पकडून, मंगल त्याला आपल्याबरोबर चालवीत आणत होता.

-चार दोन पावलें चालल्यावर मंगल त्याला दटावत कुजबुजला—" काय चाललं व्हतं, पांग्या ? ...कां ग्येला व्हतास कोठाराकडे ? कशी उघडलीस ती बारी ? -"

पांग्याचा चेहरा साफ पडला होता. तो रडकुंडीस आला होता-अडखळत अडखळत तो म्हणाला- सांजेच्या येळीं कडी आदीच उघडून ठिवली व्हती. "

" कशापाय् ? " रागानें मंगलनें विचारलें-

" धान्य नेनार व्हतों... " अपराधी स्वरांत पांग्यानें हळूच कबुलीजबाब दिला-" काय करूं, मंगलदादा ? मर मर काम करतोय्...आन् शिधा मिळतो बचक भर; घरांत आमी अर्दपोटीं ऱ्हातोय् ! ...भूक— भूक— "



" धंदा!...त्येवढ्यासाटीं चोरी ?...बियान्याच्या पोत्यांमदली चोरी ?" मंगल संतापून, पण हलक्याच आवाजांत म्हणाला—" त्यापक्षीं खड आन् माती का नाय् भरलीस पोटामंदी ? ..भाई, जीवनदादा, काय आपले वैरी हाइत ?.. अरं मरायचं त समदे मरूं...जगायचं तरी बी समदे जगूं !..."

" चूक झाली माजी, दादा-" पांग्या अजीजीनें म्हणाला " पोट रिकामं ! भुकेनं व्याकुळलों—"

त्याच्या वरची पकड मंगलनें हळूच सोडली-आणि-आपली रुंद छाती नि मोठें पोट उघडें करीत तो म्हणाला-" तुजं त्ये टिचभर पोट रिकामं ? आन् मंग ह्ये बघ...माजं ?-त्या जीवनदादाचं ? परकासभाईचं ?-मूर्ख हाईस बेट्या !- चल जा-गुमान घरां जा; नि झोंप गपचीप "—

खालीं मान घालून, पांगा अंधारांत केव्हांच दिसेनासा झाला होता—

....८५

पांगा गेल्यावर, कोठाराच्या त्या उघड्या खिडकीकडे मंगल परतला;-त्यानें आंत डोकावून पाहिलें...तिथें काळोखांत पडलेल्या बियाण्याच्या पोत्यांची ती उंच थप्पी त्याला दिसली—

एक दीर्घ निश्वास टाकून, पांगानें उघडलेली ती अर्धी उघडी खिडकी त्यानें हळूच बंद केली;...तेव्हां तिचा ' कर्रर ' असा पुन्हां एकदां सूक्ष्म आवाज झाला.

आणि तो आतां परत पाठमोरा फिरणार, इतक्यांत, त्याच्याच पाठीवर एक हात पडला...

त्यानें दचकून मागें पाहिलें—

तो जीवनचाच हात होता-मंगल त्याच्याकडे भांबावल्या नजरेनें पाहून एकदम म्हणाला-" मी चोर हाय् ! मी चोर हाय्, जीवन !-ने मला आदी परकासभाईकडे !—"

हळू बोलण्याची खूण करून, जीवन त्याच्याकडे स्नेहानें, सौम्य हसला नि मंग तो हळूच म्हणाला-" माजा रोज अदूनमदूनचा पहारा चालू असतो, मंगलदादा ! आजबी केवापूनचा उबा हाय् मी त्या झाडाखालीं-पायली बरं मी तुमची समदी चोरी ! "

" काय? पायलंस तूं समदं त्ये?" मंगल भेदरलेल्या डोळ्यानें म्हणाला-" नको र् जीवन ! .. त्या पांग्याला चोर नको ठरवूंस ! —तो येक गाडव पार हाय् ! ...भुकेसाटीं केलंन् त्यानें त्यें;...त्याच्याबदली मला— "

" हळू बोला, मंगलदादा, जाग येईल लोकांना .. " जीवन प्रेमानें त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला—" ह्ये बगा, पांग्या चोर नाय्; आन् तुमी बी नाय्!...मला का कळत नाय्? ह्यी समदी परसथितीचीं करनी हाय्"...

मंगल मंत्रमुग्धासारखा जागच्याजागीं उभा होता; त्याला आपल्याबरोबर ओढून नेत जीवन म्हणाला—" चला मंगलदादा-आपल्या भुत्याच्या शेताचीं हजार कामं उभीं ऱ्हातील फाट्चीं !...झोपूं या आतां ... जाऊन्—'

मंगलचा चेहरा दिलखुलास हसत होता—पण क्षणांतच, तो पालटत पालटत उदास झाला नि त्याच्या तोंडून उद्गार बाहेर पडले..." जीवनदा, किती दीसरे ह्ये असं चालल? . किती दीस आनखी मी या श्येतांत फिरन्, काय करीन्-देव जाने !— लटकती तरवारच हाय् माज्या शिरावर—"

त्याच्या पाठीवर स्नेहानें थोपटून जीवन हळूच म्हणाला – " तीन म्हयने त् गल्ये घटकेवानी !— आतां भुत्याच्या शेताची आवनी–मळनीबी तुमच्या हातानच व्हईल, मंगलदादा—तुमी का चिंता करतां?—"

त्यावर मंगल संमिश्र भावनांनी तोंडभर हसला—

....८६

दुसऱ्या दिवशींच्या संक्रांतीच्या दिवशीं सारे अगदीं आनंदांत होते. शालिनीच्या झोपडींत साऱ्या बायकांचें हळदींकुंकू चाललें होतं.

पुरुष मंडळीहि बरे पोषाख करून, एकमेकांना ' गोड बोला ' ' गोड बोला ' म्हणत, स्नेहानें हसून खेळून जात होते–

संध्याकाळीं प्रार्थना हॉलमध्यें जमलेल्या सर्वांसमोर प्रकाश भाई सांगत होता–" मित्रांनों, संक्रातीचा आजचा आनंदाचा दिवस पार पडला–रोजच्या सारख्या कामानंतर, आजची ही विश्रांति आवश्यकच होती. पण आपल्या मनगटातला नि आपल्या एकोप्याचा जोर बघा–भोंवतीं दृष्टी टाका–केवळ दोन तीन महिन्यांतच नवं जग उभारलंय् आपण इथं ! ...प्रत्येकाला घर आहे; प्रत्येकाला अर्धमुर्ध कां होईना, रोज खायला मिळतंय्; आपलीं मशागत केलेलीं



शेतं आपल्या भोंवतींच पसरलीं आहेत; –आपल्या बियाण्याचा आपण बंदोबस्त केलाय्; –आणखी कांहीं दिवसांना पुरण्याइतका अन्नसांठाहि आपण केला आहे ! वरुणराज. येतील तेव्हां आपण आपली उद्यांची भाकर या काळींमधें पिकवूं ! ...पण तोंपर्यंत मध्यें मात्र आपण आपली कंबर आवळली पाहिजे; असेल ते साऱ्यांना पुरवत नेलं पाहिजे ! –आपल्याकडचा पैसा जवळजवळ संपत आला आहे–तरी आपला छातीतला धीर नी मनांतली आशा...अजून गडगंज आहे ! ! –हीच वेळ जरा सावध होण्याची–सावध राहाण्याची आहे ! म्हणून आज गोड बोलून झाल्यावर आतां मी तुम्हाला सांगतोय् तें ध्यानीं घ्या–' हुश्शार ! ... भाइ, हुश्शार ! '

जमलेल्यातले एकदोन, हसत हसत तेच शब्द उचलून, खेळकरपणें म्हणाले, " हुश्शार ! भाइ हुश्शार ! "

त्यांना आणखी कांहींनीं त्याच शब्दांची साथ दिली–

त्याची गंमत वाटून प्रकाश भाईनें पुन्हां ललकारी मारली–

" हुश्शार ! भाई हुश्शार ! ...
तुम्ही नवे वीर दमदार–
आल्या सावध घटका चार !

मंगल घोगऱ्या आवाजांत म्हणाला–" हुश्शार ! –भाई हुश्शार !

आणि त्यांतूनच, बघतां बघतां, तें गाणें उभें राहिलें–हवेंत भावपूर्ण स्वर उसळून दुमदुमूं लागले—

हुश्शार ! भाइ हुश्शार ! .. नवे वीर दमदार !
भूमि तुम्हाला प्यार ! आल्या सावध घटका चार.
जा जा साऱ्यांना हाकार...अपुला जगणें हाच विचार
चला रे कामा व्हा तय्यार ! ...आल्या सावध घटका चार
अम्हाला अर्धी भाकर प्यार ! ...वरती नको तुपाची धार
धीर धरून जगणार — आम्हांला भूमीचा आधार !
परस्पर प्रेमानें न्हाणार – उद्यांची आस मनीं धरणार !
कुणाचा द्वेष कधिं न करणार – कुणाची भीडहि ना धरणार !

गाणें रंगत रंगत, चढत चढत गेलें; सर्वांनींच स्वयंस्फूर्तीनें मनापासून म्हटलें...त्याचे प्रतिध्वनि उमटत असतांनाच सारे ठिकठिकाणीं पांगले !

[ -१०- ]

# —: वासुकी सर्प :—

....८७

जीवन भैरवाडीच्या बाजूस नदी ओलांडून जात होता—

समोरून उपरणें फडफडवीत केसूनाना येत होता—संक्रांतीचा सारा दिवस आनंदांत गेलेला होता.–संध्याकाळीं सभा झालेली होती–

आंतून झालेल्या अगदीं स्वयंस्फूर्तीनें जीवन हसून म्हणाला–" रामराम केसूनाना,..गोड बोला—गोड–बोला ! संक्रांत हाय आज–"

कपाळाला आंठ्या पाडून केसूनाना म्हणाला—" कशाला नुसतं तोंडापुरतं गोड बोलायचं ?—आजच रे कसली संक्रांत आली ?—तो प्रकाश या भैरवाडींत आल्यापासून नि तुझ्यासारख्या आग्यावेताळाला त्यानें पुन्हां इथंच पुजल्यापासूनच, आमच्यावर नि साऱ्या भैरवाडीवर कसली तरी संक्रांत येऊन बसलीय् !—खाल्ल्या घराचे वासे छान् मोजताय् दोघे !—विलासदादाचे कुळवाडी पळवून नेतांहां ! त्यांना त्यांच्या पूर्वीच्या कर्जबाक्या नि खंडबाक्या बुडवायचा कान मंत्र देतांहां ! तो पुरला नाही वाटतं,...आणखी गोड बोलायला सांगतो आहेस तें ?—"

" तोंड हाय का तोबरा ?—जीब हाय का सापाच्या जबड्यांतल्या दुर्वा ?' जीवन एकदम संतापून ओरडला–" कशाला शुभघडीला असं वंगळ बोलतां, केसूनाना ?... त्यांना भावलं म्हणूनच–आपल्या पायान् तुमची कुळं इकडे चालून आलीं—तुमच्या खंडबाक्या आन् करज रकमा त्ये काय नाय् म्हणतात ?—समद्यांचे हायत त्ये कितीसं–पांच-साडेपांचशें–!–देऊन टाकूं मळनीच्या येळीं– "

" अहाहाहा रे कुबेर – " केसूनाना डिंवचून म्हणाला– " स्वर्गातल्या पेढीवरूच सदा हुंडी तुमची ! पुढल्या जल्मींच देऊन टाकूं–म्हण कीं ! ...अशी छाती पुढें करून चालायला...आधीं लोकांना भागवायसाठीं...घरांतलं सारं बाहेर काढा म्हणावं ! ...तितकीच वेळ पडली तर घरांतलीं माणसं "..



" हं ! गप्प, केसूनाना ! "जीवन रागानें थरथरून म्हणाला-"...भाईंची मागनी हाय् म्हनूनच हात आवरतों ! ...आतां बऱ्या बोलान् चालू लागा–तुमाला काय करायचं त्यें करून घ्या–आमचं आम्हीं करूं—

" अस्सं काय ? बघालंच तर—" केसूनाना बेरकेपणें त्याच्याकडे पाहात ओरडला–" आन् काय रे, जीवन्या !–कडेकोट बंदोबस्त केलात् ! कोंबडें ढाकून ठेवलंत्–तरी काकाजींच्या दरबारांत उजाडायचं राहील म्हणतोस होय ?–हल्लीं तुमच्या शेतांत एक थोटा फिरत असतो तो कोण ? बातमी काढतोय् आम्ही सगळी..."

ऐकतां ऐकतां जीवन चपापला–दचकला–पण पुन्हां मनावर ताबा मिळवून दमांत म्हणाला–" सांगलं ना तुमाला जें काय करायचं त्ये करून घ्या ! जा !...मचमच नको उगीच ! तोंडाची वाफ आग नाय कदी लावत ! ! "–

केसूनाना कुत्सित हसत आपल्या रस्त्याला लागून म्हणाला–" अस्सं काय ? हं पहाल, पहाल पहाल बरंऽ प्रत्यक्षच पहाल–वेळ आली कीं —"

....८८

आज रामनवमी होती, म्हणून सर्व मंडळी भजन करीत बसलीं होतीं. प्रकाश, जीवन, मंगल मध्यें बसले होते.

एक दोन भजनें झाल्यावर त्यांनीं ' रघुपति राघव राजाराम; पतीत पावन सीताराम ' हें भजन घुमवलें.

तें थांबल्यावर प्रकाश उठून म्हणाला–" मित्रांनो, आज रामाचा जन्म ! खरं म्हणजे रामाच्या राजगृहीं जन्मापेक्षां त्याच्या वनवासालाच फार महत्व दिलें पाहिजे. राम फार सद्गुणी होता म्हणतात. तसे कमी जास्त सद्गुण प्रत्येकाच्या अंगीं असतातच. पण मग ते परिस्थितीच्या अनुकूल–प्रतिकूल माऱ्यांत टिकवून धरण्याची माणसाच्या अंगची शक्ती–तोच सर्वांत मोठा सद्गुण ! ...आणि तोच रामाच्या अंगीं होता.

त्याच्याकडे मंगल एकाग्र दृष्टीनें पाहात होता; कान लावून ऐकत होता–

तेवढ्यांत प्रकाश पुढें म्हणाला– " कारण पहा -एके दिवशीं, राम राजा होणार म्हणून साऱ्या अयोध्येनें गुढीतोरणें उभारलीं होतीं–त्यांच्या उत्साहाचा

प्रचंड लोंढा घराघराच्या सांदीफटीत शिरून त्यांना सचैल स्नान घालीत होता. राम दुसऱ्या दिवशीं वैभवाच्या परमोच्च शिखरावर चढणार होता…

" पण मग, एका क्षणांत, यक्षिणीची कांडी फिरल्यासारखें झालें! असं झालं तरी काय ? यःकश्चित मंथरा! एक दासी! पण त्या अष्टवक्रेच्या मनांत प्रथम हळूच मत्सर शिरतो तो काय ? .. तिच्या क्षुद्र बोलाच्या फुत्काराचा दंश कैकयीच्याहि मनाला क्षणार्धांत होतो तो काय ? .. नेहमींची ती धीरगंभीर बाई,…कधीं नाहीं असा हट्ट धरून बसते काय ?—मग दशरथाला त्याच्याच एका जुनाट वचनाच्या कात्रींत ती पकडते काय ? —आणि दशरथ अखेर—तसल्या प्रचंड राहत्त्वाच्या बाबतींतहि तिच्यापुढें दुबळा होऊन नमतो काय ? …सारेंच अगदीं शक्य ! …पण सारेंच अगदीं विपरीत हृदय विदारक—

" आणि त्याचा परिणाम ?…क्षणापूर्वी, आनंद, वैभव, यशाच्या परमोच्च शिखरावर विहार करणारें रामाचें मन अपमान व दुःखाच्या खोल दरींत धाडकन् पडलें ! नि त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या ! ही अज्ञात नियति !…हा अतर्क्य योगायोग !…हृदयविदारक नि अगम्य प्राप्त परिस्थिति ! !—

" त्याच्या मनाच्या ठिकऱ्या उडाल्या, असें आपण म्हणतों;—पण मित्रानों राम म्हणाला का तसें ? नाहीं !—तो तत्काळ राज्य टाकून उठला ! सुखाच्या पायघड्या लाथाडून निघाला वनवासाला ! एक नव्हे, दोन नव्हे चौदा वर्षें वनवासाला ! त्यावेळीं कौसल्यामातेला त्यानें मिठी मारलीन् ; कैकयीला आदरयुक्त नमस्कार केलान्;—प्रत्यक्ष पित्याचीच उलट समजूत घातलीन्;… निस्पृह लक्ष्मणाचा नि उत्सुक अर्धांगीचा तेवढा त्या वनवासांत आधार घेतलान्—

" म्हणून म्हणतों मी…रामजन्माच्या दिवशीं देखील त्याच्या वनवासाचीच अधिक आठवण ठेवली पाहिजे !-आपण प्रेमळ दशरथापेक्षा रामाच्या वांट्याला आलेल्या अष्टवक्रा मंथरेची, तिच्या फुत्काराची, मत्सर सर्प दंशाचीच आठवण ठेवली,-तरच आपण रामाकडून व रामाच्या आयुष्यातून कांहीं तरी खरेंखुरें शिकूं—जन्म साऱ्यांचेच असतात—पण संस्मरणीय वनवास एकट्या रामाचा !…त्यावेळी, हजारों वर्षांनंतरच्या सुसंस्कृत मानवाचें मन, रामाच्या छातींत अवतरलें होतें !



मंगलने पूर्वी रामवनवास ऐकला होता. पण भाईनें आज सांगितलें, तें ऐकत असतांना, हृदयाचा ठाव घेणाऱ्या त्या शब्दांनीं तन्मय होऊन, त्याची मान सारखी हालत होती व डोळे आर्द्र झाले होत—

…८९

जीवनचाहि कंठ सारखा गद्गदित होत होता. भाईचें बोलणें थांबलें, तसा तो रुद्ध आवाजांतच म्हणाला—" मोटं भाहारीचं आइकलं आमी आज !- पर त्या मंथरेच्या मत्सर-सर्पावरून मला यकनाथाचा वासुकी साप आटवतोय् !- मोटं मार्मिक वर्नन क्येलंय्, मानसाच्या मनच्या खेळाचं बगा, यकोबारायांनीं…"

प्रकाश, मंगल नि इतरहि साऱ्यांनीच एकदम त्याला आग्रह केला-तेव्हां जीवन हसला. क्षणभर आठवूं लागला. आणि मग—

एकदम ताड्कन् जागचा उठून तो ओरडला-" अबबब,बबबब…"

मग पायाच्या आंगठ्याला धरून, तिथं कांहीं तरी चावल्याचें नाटक करीत तो म्हणाला-" अबबबबब…साप चावला ! साप लावला ! ! –'

सारे प्रथम दचकले, पण मग सारेच त्या नाटकाच्या संसर्गानें हंसत तसेंच म्हणू लागले.

तेवढ्यांत, जीवननें भारुडाला सुरवात केली-" वासुकी सर्प मोठा…दारुण ! …क्रोधें बैसला बिळीं जाऊनं ! सहज मग तेथें गमन;-तमोगुण घातलें सारवण ! तेथें नष्ट आला धावुन—[त्यानें] मजवरी झडप घातली जाण-

आगागागागागा-अबाबाबाबाबा-आताताताताता-अरेरेरेरेरे ॥ सापचावला
जात याची मोठी कठिण !-अरेऽ माया भुली पडली येडन !
गर गर गिरकी आली दारुण !-माझें जडावले रे मन-सापचावला
या गिरकीचें नाहीं भय; मी केले सहस्र अन्याय !—
(तोच) तडफडत हातहि पाय !…(आता)कोण वांचवील ठव ? साप॰
देवावर माझा हवाला;-प्राण जावोनि माघारा आला !
एका जनार्दनीं म्हणे भला-आजिचा दिवस गोड झाला !-सापचावला
अरे रे रे रे-साप चावला !- आगा आई-आई, साप चावला !-
आता ताता ताता-साप चावला ! आबा बाबा-बाबा-साप चावला !-

हावभावांसह, अगदीं स्वैरपणें, जीवन साप चावल्यासारखा चेहरा शरीर करून, तसा तालांतच नाचत होता; साऱ्या सवंगड्यांचे चेहेरे खुललेले दिसत होते; मृदुंग; लय वाढत गेली-तेव्हां तर त्याच्या नाचाबरोबरच सारे डोलत होते—व मधून मधून. कोणी त्याच्याबरोबर “ आग आई—” “ अबाबाबा —” असले करुण स्वर काढीत, त्या स्वरांत व जीवनच्या गाण्यांत तल्लीन झाले होते.

टाळ–मृंदुगाच्या साथीवरच म्हटलें जात असलेलें तें एकनाथ महाराजांचें पद अखेर जीवननें संपवलें–तेव्हां सारी मंडळी हसतहि होती व त्या एकनाथी जुन्या काव्यांतील अगदीं अद्ययावत् नावीन्याच्या चमकीनें स्तंभितहि झालीं होतीं.

....९०

पण दोनच दिवसानंतरची गोष्ट. आपल्या झोपडींत आपल्या कांबळीवर पडलेल्या जीवनच्या कानांवर झोपेंत एकदम शब्द पडले– “ साप चावला– ”

तो चमकून एका कुशीवरून दुसऱ्या बाजूस होत आहे, तोंच–पुन्हां तेच शब्द पडले. तो गडबडून उठला व झोपडीचें दार उघडून बाहेर पडला.

लोक बंगलीच्या बाजूला लगबगीनें जात असलेले दिसत होते–तोंच कोणीतरी म्हणालें–“ शालिनीबायना साप चावला !–“ जरा भाईर पडल्या तो पाय पडला–तो गेला ! ”

जीवन धांवतच तिथें पोहोंचला–व प्रकाशच्या उघड्या झोपडींत शिरला.

....९१

तिथें मध्यें शालिनी निश्चल पडली होती–भोंवतीं मंगल, सुभान्धा, पांग्य होते–कित्येक बायका होत्या. रानटी औषधोपचार चालले होते–मंत्रहि चालले होते.

प्रकाशला सारखे धीर देत होते. पण तो हताश होऊन बसला होता–शेजारीं तिमिर गाढ झोपला होता–

शालिनी क्षणोक्षणीं खालावत चालली होती. मंत्र औषधांचा कांहीं परिणाम होत नव्हता–

जीवनला प्रकाश म्हणाला– “ डॉक्टरांना— ”

प्रकाशला जीवन म्हणाला– “ तीन कोसावर वैद्य हाइत–गाडी जोडूं ? ”



पण तेवढ्यांत, शालिनी साफ निश्चल, निश्चेष्ट पडली होती.

“ मला ममतेचा पयला गोड घांस चारनारी माझी माय-मावली ग्येली !’ आवेगानें बोलतां बोलतां मंगलचे डोळे पाण्यानें डबडबले.

झोपलेल्या तिमिरला गंगानें उचलून नेलें. तेव्हां आलेला आपला हुंदका तिनें प्रयासानें आवरला.

प्रकाशलाहि मोठ्यानें हुंदका आला–त्याच्या खांद्यावर हात ठेवून, जीवन जवळच उभा होता. त्याच्याहि डोळ्यांतून अश्रू वाहत होते.

भोंवतालचा तो देखावा सर्वांनाच अकल्पितपणें पालटला होता. भयंकर कठोरच प्रहार होता तो !

प्रकाश अर्धवट स्वतःशीं व अर्धवट जवळ उभ्या असलेल्या साऱ्यांना उद्देशून म्हणाला– “ परवांच मी रामवनवासाबद्दल बोललों ! ...ती नियति तसला योगायोग.. प्रत्यक्ष माझ्याच अनुभवाला असा एकाएकीं इतक्या लौकर यावा हाहि एक योगायोगच !...होय माझ्यावाटची ही कठोर नियतिच !! ”

...९२

“ आग...आग !...धावा...जीवनदादाच्या झोपडीला आग लागली !” आरडा ओरडा ऐकून प्रकाश दचकून जागा झाला–लगबगीनें दार उघडून बाहेर पडला—

त्याच्याच अंगावरून, मोठमोठ्या ढेंगा टाकून, मंगल वेगानें त्याच दिशेला पुढें धांवत गेला—इतरहि कांहीं सैरावैरा पळत होते–प्रकाशनें हातात बालदी घेतली नि पळतां पळतां तो ओरडला– “ पाणी...पाणी .. ! ...आपापल्या घरांतलं पाणी आणा; विहिरींवर चला कांहीं; मोट सुरू करा; पाण्याचा मारा द्याव्...अरे, गवताच्या त्या गंज्यावर आधीं पाणी मारा ! –गुरं सोडून द्या पहिलीं सगळीं !...नाहींतर झळीनें तडफडतील बापडीं— ”

जीवनच्या झोपडीचा अर्धाअधिक भाग भयानक ज्वाळांनीं व्यापला होता. त्या आकाशांत उफाळत होत्या–किटाळें सैरावैरा वरवर उडत होतीं...बायका-पुरुषांची पाणी मारण्याची शिकस्त चालली होती.

....९३

जीवन-गंगा-त्यांचीं पोरं, सगळीं झोपडीपासून दूर उभीं होतीं-त्यांच्याजवळ त्यांचें घरगुती सामान, कपडे, सर्व अस्ताव्यस्त झुगारून पडलेले दिसत होतें-गंगा दुःखानें ओरडत होती-" माझा नामदेव-माझा नामदेव ! "

मंगल जवळ दिसत नव्हता-त्यानें केव्हांच आगींत सुरकांडी मारली होती... धडधडत्या छातीनें, समोरच्या उफाळणाऱ्या ज्वाळांकडे सारे मंत्रमुग्धपणें पाहात होते-

इतक्यांत, दुसऱ्या बाजूनें, पांचसहा वर्षांच्या निपचित पडलेल्या नामदेवला खांद्यावर टाकून, मंगल धांपा टाकत धडपडत बाहेर आला. त्यानें एका कांबळीवर त्याला झोपवीत म्हटलें-" थोडासा भाजलाय् ! पन् धाबरूनच गेलाय् बेटा-लई- "

त्याच्याभोंवतीं बायका लगबगीनें जमल्या नि नाना उपचार करूं लागल्या-

तोंपर्यंत, इतरांबरोबर भरभर बादल्या भरून घेऊन, मंगल जोरजोरानें ज्वालांवर पाणी मारूं लागला होता—

शेवटीं आग विझत गेली; धुमसत राहिली-पण तिच्यांत जीवनची झोंपडी अर्धीपाऊण पिचून मोडून पडली होती—

....९४

मंगल आणखी एक बादली घेऊन तसाच त्या बाजूस जात होता; तेवढ्यांत त्याला मध्येंच थांबवून, प्रकाश सहानुभूती-आस्थेनें म्हणाला-" मंगलदादा-बघूं रे बघूं ! चल् पुरे झालं हं तें ! ...करताहेत दुसरे-तुझ्या तोंडाला आगीच्या झळा बऱ्याच चाटून गेल्याहेत ! .. आणि हें काय ? बापरे ऽ .. तुझा उजवा पाय-हात किती पोळले आहेत ? चल चल बघूं... आधीं औषध लावलं पाहिजे सगळीकडे ! —स्वस्थ पडून विसावा घे पाहूं तूं-गपचूप— "

" मला काय धाड भरलीय्, भाई? ...त्या पोराचीच घ्या आदीं काळजी: त्याला लय् भाजलंय् ! " ...मंगल गंभीरपणें म्हणाला; तरी पण त्याचें कोणी ऐकलें नाहीं. त्याला सर्वांनीं एका झाडाखालीं कांबळीवर बळेंच झोपायला लावलें.

एका आवेशाच्या भरांत, मघांपासून मंगल निकरानें काम करत होता



खरा; पण आतां आडवा झाल्याबरोबर, झाल्या श्रमांनीं तो ग्लानी येऊन एकदम निपचित पडला—

त्याचें तोंड काळवंडलें होतें; त्याच्या अंगावरची उजव्या बाजूची बंडी ठिकठिकाणीं जळली होती; उजवा पाय चांगलाच होरपळून निघाला होता. अंगावरचे कपडे फाडून काढून सारे सुचतील ते थंड औषधोपचार त्याला सगळे जण करीत होते—

" ही समदी केसूनानाची-त्याच्याच येखाद्या भाडोत्री कुत्तरड्याची कारवाई ! " " कवापूनच त्याचा जीवनदादावर डोळा हाय्- " " होळीला बोलला, आन् आज आवशेच्या दिशीं चांगलीच होळी पेटवलीन्. त्यानें— "

एकेकाच्या तोंडून एकेक उद्गार बाहेर पडत होता—

" काय ? ? " औषध लावून नवीन कपडे मंगलच्या अंगावर चढवल्यावर, उठून बाजूला होतां होतां प्रकाशच्या तोंडून आश्चर्य बाहेर पडलें—

त्या साऱ्यांची अशी एकच गडबड चालली होती; जो तो कसल्या ना कसल्या कामांत गुंतला होता—सगळीकडे गजबज ऐकूं येत होती—

——→

[ -११- ]

# -: विकार आणि विवेक :-

....९५

इतक्यांत—

लांब्या हाताचा लांब कफनीवजा झब्बा, त्यावर जाकीट, एका हातांत चामड्याची जुनाट फुगीर बॅग, दुसऱ्या हातांत उचलून धरलेला धोतराचा सोगा, असा पोषाख नि मोठी दाढी असलेला, गंभीर चेहऱ्याचा पंचेचाळीशीकडला एक भव्य गंभीर मनुष्य, मंदमंद पावलें टाकीत तिथें आला; जणूं काळोखांतून अवतीर्ण होऊनच मंगलजवळ येऊन तो उभा राहिला.

साऱ्यांनीं चमकून त्याच्याकडे पाहिलें–

सभोंवार संथ दृष्टिक्षेप टाकून, त्यानेंहि हळूच स्मित केलें; तेव्हां, त्याच्या रुंद कपाळाखालचे डोळे चमकल्यासारखे वाटले —

वाढलेले केस मानेवर रुळत होते. दाढी वाऱ्यावर भुरभुरत होती. तेवढ्यांत, त्यानें हळूंच विचारलें—" इथंच ती मघां आग पेटली होती का? ...वाटलंच मला–नदीवरून दिसलं मला नि तसाच लगबगीनें धावलों! ...कोणी भाजलंय्, जखमी झालंय्?— "

" कोण आपण?" –आदरानें त्याच्याजवळ जाऊन उभें राहात, प्रकाशनें आस्थेनें विचारलें—

" मी? मी विवेक– " तो गंभीर पण सस्मित चेहऱ्यानें म्हणाला– " या बॅगेंत औषधं आहेत माझ्याकडे; ...कोणाला दुखलं–खुपलं असेल तर मलमपट्टी करून, बँडेज बांधून टाकूं! या झटपट–चला– "

साऱ्यांचे चेहरे एकदम प्रफुल्ल झाले–

....९६

नामदेवाच्या, हातापायाला, तोंडाला मलमपट्टी करून विवेकानें, बँडेज बांधलें होतें.



उकळत्या पाण्यांतून चिमट्यानें सुई उचलून, त्यानें सिरिंजला लावली व तो उलटी धरून हळूच दाबत, आंतली हवा काढून टाकली-मग दंडांत इंजक्शन देऊन, तिथें बोळ्यानें दाबत त्या बालकाला हळुवारपणें एकदां थोपटून उठत, तो सस्मित चेहऱ्यानें म्हणाला– ' आतां पांच मिनिटांत तो हसूं बोलूं लागेल;–फार नाहींत जखमा झालेल्या; भ्यालाय्च अधिक!...मुळींच चिंता नको त्याची—"

जीवन व गंगा त्याच्याकडे आदरयुक्त उत्कंठित नजरेनें गपचूप बघत होतीं.

तेवढ्यांत विवेक म्हणाला—" हं...तो दुसरा-तुम्हीं म्हणतां तो याचा रक्षणकर्ता?–तो कुठें झोपलाय्?–त्याच्याकडे चला आधीं मला घेऊन—"

....९७

मघाच्याच झाडाखालीं, मंगल अजून ग्लानीनें निपचित पडलेला दिसत होता–तिथें जाऊन, आतांपर्यंत, त्याच्याहि पायाला, हाताला, कुशीला, उजव्या गालाला, विवेकनें बँडेजें बांधलीं होतीं.

तोंच, विवेक म्हणाला—" आगीच्या प्रत्यक्ष लोळातूनच धांवला ना तो! खूपच भाजलाय्!—पण आतां तसा धोका नाहीं;–निजूं द्या मात्र स्वस्थ त्याला —"

" डॉक्टर विवेक–" प्रकाश गद्गद स्वरांत कृतज्ञतेनें म्हणाला–

" छे छे—डॉक्टर नाहीं!...नुसता एक माणूस—विवेक–" विवेक स्मित करून त्याला पटकन् उलटून म्हणाला.

" किती उपकार हे तुमचे आमच्यावर!—अगदीं देवदूतासारखे वेळेवर आपणहूनच धांवत आलांत!–" प्रकाश पुन्हां स्निग्धपणें म्हणाला.

" तेंच तर माझं काम—" विवेक हसला—" त्या इच्छेनेंच जगतोंय्–"

" आलांत कुठून, असे?—" प्रकाशनें कुतूहलानें विचारलें.

" जगाच्या पाठीवरून—" विवेक गंभीरपणें म्हणाला –

विवेकचें तें कोडें प्रकाशला सुटत नव्हतें.

तेवढ्यांत, विवेक उठला व बॅग वगैरे पूर्वीप्रमाणें उचलून, जाण्याची तयारी करूं लागला—

" आतांच,...,एवढ्या रात्रीं जाणार ?...कुठें जाणार ??  " प्रकाशनें जरा बेचैन होऊन विचारलें.

" पुन्हां जगाच्याच पाठीवर– " विवेक स्नेहाळ चेहऱ्यानें पण निर्विकार रुक्ष शब्दांतच म्हणाला–

....९८

त्यावर काय बोलावें तें न समजून, विचलित मनानें, अडखळत अडखळतच, क्षणभरानें प्रकाश त्याला म्हणाला–' पण मग–तुमची फी..."

" हो–मिळाली कीं मला !–" विवेक हसला–

" मिळाली ? कुणी दिली ?...कधीं ?"–अधिकच भांबावून प्रकाशनें एकामागून एक प्रश्न केले—

"तर हो ?...तुम्हींच दिली ! इथल्या साऱ्यांनींच !...अगदीं तुमच्या या जगाच्या आंत शिरलों,...तेव्हांपासूनच ! तुमचा सहवास–तुमचं प्रेम...हींच माझ्यासारख्या एकाकी माणसाची फी ! !–" विवेक संथपणें एक एक शब्द बोलत होता–

" अस्सं ऽ ? "–प्रकाशचे डोळे आनंदानें एकदम चमकले·–तो सस्मित चेहऱ्यानें पुढें म्हणाला–"तर मग–आमच्याकडून आणखीहि कां घेत नाहीं ती ?–रोजच्या रोज ?...इथंच राहून ?–अं ऽ "

" इथंच राहूं ?–" त्या अनपेक्षित शब्दांनीं विवेक क्षणभर भांबवला; गोंधळलेल्या पण सात्विक गंभीर चेहऱ्यानें, सभोंवार जमलेल्या मंडळीकडे डोळे फिरवीत, तो क्षणभर स्तब्धच राहिला.

जीवन, गंगा, शालिनी, सुभान, पांगा, सोमा, सामर्जी, कांहीं इतर बायका –सारी मंडळी,...त्याच्याकडे अपेक्षापूर्ण आग्रही दृष्टीनें पहात असलेली दिसत होतीं.

तेव्हां, स्वतःशींच क्षणमात्र विचार केल्यासारखें करून, विवेक घुटमळला व प्रकाशकडे स्नेहपूर्वक पाहून म्हणाला " हो,... मला आनंद वाटेल–"

" आणि आम्हालाहि साऱ्यांना—" प्रकाश मनापासून म्हणाला व हसत हसत, त्यानें विवेकच्या हातांतील बॅग आपल्या हातीं घेऊन त्याला खूण केली—" चला–गरीबाच्या झोपडीकडे ! "—



...९९

प्रकाश व विवेक, दुसऱ्या दिवशीं, सकाळीं, साऱ्या शेताशेतांतून, विहिरीवरून, भाजी मळ्यांतून, चौफेर फिरत होते.

एका विहिरीवर, मोटेतून खळखळून खालीं पडणाऱ्या पाण्यांतील एक ओंजळ-भर पाणी विवेक प्याला;–मग डोळ्याला, डोक्याला, साऱ्या तोंडावर, तें शिंपडून ' हुश्श् ' –असा त्यानें सुस्कारा टाकला नि प्रकाशकडे स्मितयुक्त चेहऱ्यानें पाहून तो म्हणाला– " किती शांत रम्य वाटतंय् मला, इथं आल्यापासून !..."

" पण हीच भूमी आठ वर्षं ओस पडली होती, असं कुणी कुणाला सांगितलं, तर खरं वाटेल ? तरी पण–केवळ चारपांच महिन्यांपूर्वींचंच कटु सत्यं होतं तें— " प्रकाश मागच्या घटना आठवत म्हणाला– " माणसांच्या एकोप्यामध्यें नि मनगटांमध्यें केवढा प्रचंड कर्तुमकर्तुम् जोर असतो बघा, विवेक ! ...त्याची आपल्याला जाणीव मात्र नसते मुळींच ! ..."

विहिरीजवळच्या एका शिळेवर विवेक बसला होता; त्याच्याच जवळ प्रकाशहि जाऊन बसला.

" खरं आहे तुमचं, प्रकाश ! " –क्षणभरानें विवेक म्हणाला– " तरी पण, मानवाच्या भोंवतालच्या वस्तू...माणसं, नि परिस्थिती,...या गोष्टीच कधींकधीं त्याला अधिकाधिक दुबळा करीत जातात ! ...आपला संबंध नसतां, ...आपली इच्छा नसतां, दुःखानें भरलेलीं ताटं, ...आपल्यासमोर अकल्पित वाढून येतात् ! –ती दूर सारूं म्हटलं–तरी होऊं शकत नाहींत ! ...आणि मग–आपलं हक्काचं असेल,...तें जीवन जगायलाहि आपल्याला जागा उरत नाहीं !—अशावेळीं, आपल्या मनगटांतला, ज्ञानाचा, कौशल्याचा, उत्साहाचा जोर ' किस झाडका पाला ' ठरतो !

" जगांत तो निराळा कसला प्रभाव दाखवणार ?—दुसऱ्याचं सोडाच, पण स्वतःचं एकाकी आयुष्यहि आपल्याला सुखानें भरतां येत नाहीं ! आपल्याला खऱ्या अर्थानें जगतांच येत नाहीं ! —आपली समाजाला शोभा म्हणावी तर शोभा नाहीं ! खरा उपयोग म्हणावा तर तोहि नाहीं. ...आपलें जीवन म्हणजे एक अजागलस्तनच ! ...केवळ अजागलस्तन– "

विवेकच्या त्या शब्दांनीं प्रकाश एकदम चपापला; त्याला स्वतःचीं दुःखें आठवलीं–जाणवलीं; त्याने विवेककडे एकदां स्वकीय नजरेनें निरखून पाहिलें; –पण त्याचा प्रशात गंभीर चेहरा, आपल्याच मनांत डोकावण्यांत गुंग दिसला.

त्याची ती तंद्री मोडणें प्रकाशच्या जिवावर येऊन, तो गप्पच राहिला. त्याक्षणीं, त्यालाहि शैलिनीचा अकस्मात वियोग आठवत होता.

....१००

पण मग, क्षणभरानें विवेकच एकदम भानावर आला नि किंचित् वरमून, स्वतःला चटकन् सावरींत म्हणाला— "तरी पण, कांहीं तरी काम करीत राहण्यावाचून, दुसरा तरणोपाय नसतो–प्रकाश !–दुसऱ्याचं बिंदु-मात्र देखील सुख निर्माण केल्याचं समाधान—तें सुख कांहीं अवर्णनीयच असतं ! आपल्या अंतापर्यंत–आपल्या आपल्याला, सुखाला विसरून,...दुसऱ्याच्या अकल्पित आनंदाची तळमळ सदैव जागृत ठेवून असणं, यालाच ना आपण खरंखुरं माणुसकीचं जीवन म्हणतो ? मग त्यांत व्यक्तिगत सुखाच्या पायघड्या कशा सांपडणार चालतांना ?...ती अपेक्षा उरांत बाळगणंच मुळीं चुकीचं—"

"रसरशित हृदयाच्या प्रत्यक्ष अनुभवावांचून, असले सखोल विचार बाहेर नाहींत पडणार तोंडून ! . त्यामागें घळघळतें रक्त नि भगभगत्या जखमा खासच असणार तुमच्याहि ." एवढें अर्धवट बोलून प्रकाश सापेक्षपणें विवेककडे पाहूं लागला.

पण त्याच्याकडे नुसतां एक मुग्ध ओझरता दृष्टिक्षेपच टाकून, विवेक उत्तरला—"होय !...पण मग, माझ्या,तुमच्या...सर्वांच्याच सुखासाठीं, त्यावर आज आहे तसाच पडदा राहायला हवा—त्यानेच मला तुम्हां सर्वांशीं अधिक एकरूप होऊन राहतां येईल !"

दोघ एकमेकांजवळ तसेंच निःशब्द बसले होते—

मग एकदम भानावर आल्याप्रमाणें विवेक म्हणाला—"अरे–असें बसलोंय् काय आपण ?–माझे पेशंट कशी प्रगति करताहेत, तें पाहिलं पाहिजे—मला !—तो मंगल—तो चिमुकला नामदेव—"

....१०१

जीवनच्या जळलेल्या झोपडीजवळच दुसरी एक नवी झोपडी बांधलेली



दिसत होती तिच्या दारांत, अजून एखादी पट्टी बँडेज बांधलेली होती. तरी आपल्या इतर भावंडांबरोबर नामदेव खुशाल खेळत होता.

झोपडीचें दार उघडें होतें...आंतून हांक कानांवर आली. "नाम्या,... पानी घे ये र तांब्यातून, पियाला— "

नाम्या धांवतच आंत गेला; -लोटी भरून त्यानें पाणी घेतलें; नि तो कोपऱ्यांत टाकलेल्या पथारीशेजारीं गेला–

पथारीवर मंगल पडलेला होता; तो हळूहळू उठून बसला. त्याच्या हाता-पायाचें बँडेज अजूनहि होतें. पण तोंडाचें सोडलेलें होतें...डाव्या गालावर, शिवलेल्याचा पूर्वीचा तो लांब वण नि उजव्या गालावर, भाजल्याचा चरत गेलेला हा आतांचा नवीन ओलसर पांढरट पट्टा–यामुळें त्याचा चेहरा आंता तर अधिकच भेसूर दिसत होता.

घटघटां पाणी प्याल्यावर, तो नामदेवकडे पाहून हसला व म्हणाला "गंगीवयनी आन् तुजा बाप दोगं शेतावर गेल्यात् व्हय् र ?– "

हसून त्याच्याजवळ बसत, नामदेव म्हणाला– "व्हय्–बोलवूं माज्या आयला ?—"

"नको नको–" त्याच्या पाठीवर थोटा डावा हात थोपटीत, मंगल पटकन् म्हणाला–"हेरीच इच्यारलं आपलं म्यां"–

मंगलाच्या सर्वांगाकडे, बसल्याबसल्या, नामदेव हळू हळू न्याहाळून पाहत होता—तें पाहून, त्याच्या चेहऱ्यावर, अधूनमधून दुःखाच्या छटा चमकून जात होत्या—

शेवटीं, तो हळहळून मंगलला म्हणाला–"मंगलकाका, माज्यासाटीं लई-लईच लागलं तुमाला, बगा—"

"चल्,...येडा हाइस–" मंगल गद्गद कंठानें म्हणाला...व त्याला थोट्या हातानें जवळ ओढीत म्हणाला, "अरऽ तूं वाचलास ह्येच खूप ! ...मी मेलों काय आन् जगलों काय ?"

....१०२

—चमत्कारिक कोडें पडल्यासारखा चेहरा करून, नामदेव क्षणभरानें

त्याला म्हणाला—" कुनी लावली वो आपल्या घराला आग ?... लोक म्हनत्यात —केसूनानान् ! ...पन् काय केलं वो आमीं त्याचं, काका— ? "

" अरे बावळ्या–साप र का चावतो ?...इंचू र् का डसतो ?...इंस्तू र का भाजतो ? ...पर तुला पोराला नाय् समजायचं त्ये ! ...तूं आपला येक गानं म्हन बघूं ! मी आइकतों– " मंगल त्याची समजूत करीत म्हणाला— " आराम वाटल बग, मला— "

" कोनचं म्हनूं, काका ? काल प्रार्थनेच्या येळीं भाईकाका म्हनाले, तें म्हनूं का ?... छान् हाय–बगा–" नामदेव उत्सुक, प्रफुल्ल चेहरा करून, विचारत होता–

....१०३

" हां...हां ..बोल ..कीं— "मागें टेकत शांत पडून, मंगल म्हणाला .. नामदेवहि आपल्या बालिश गोड आवाजांत उत्साहानें बोलूं लागला—

" आम्हीं काय कुणाचें खातो रे ? ...तो राम आम्हांला देतो ! ...
तो राम आम्हांला देतो ! ...

आणि पडल्या पडल्या, एकदम स्फूर्ती होऊन, मंगलहि घोगऱ्या आवाजांत नामदेवबरोबरच बोलूं लागला–" तो राम आम्हांला देतो ! "

मंगलकाकाहि आपल्याबरोबर बोलतो आहे, यामुळें उत्तेजन वाटून, खड्या गोड स्वरांत रामदासांचें तें गाणें नामदेव उत्साहानें पुढें पुढें म्हणत गेला—

" बांधिले घुमट, किल्ल्याचे तट; तयाला फुटती पिंपळवट !
तिथें कोण लावितो मोट ? ...बुडाला पाणि कोण घालतो ? रे
तो राम अम्हाला देतो ! ...
खडक फोडतां,...सजिव, रोडकी, सर्वांनीं पाहिली बेडकी !...
सिंधू नसतां, तियेचें मुखीं–पाणि कोण घालतो ? ...रे–
तो राम अम्हाला देतो ! ...
नसतां पाण्याचे बुडबुडे–सदा सर्वदा गगन कोरडे,...
दास म्हणे जीवन चहुंकडे–पाडुनी सडे, पीक उगवतो !...रे–
तो राम अम्हाला देतो... ! "



नामदेवचा बालिश गोड तार स्वर व मंगलचा घोगरा स्वर एकांत एक मिसळून, कितीतरी वेळ, ' तो राम अम्हाला देतो...तो राम अम्हाला देतो ! तो राम आम्हाला देतो ! ' ही ओळ शेवटीं भजनाप्रमाणें ठेक्यांत हवेंत दुमदुमत राहिली होती—

अखेर ते दोघेही आनंदून हसले, एकमेकाला बिलगले...

....१०४

तेवढ्यांत, मनांत नवीन कल्पना येऊन नामदेव म्हणला—" मंगलकाका, आतां तुम्ही म्हना ना येक गानं..."

" मी ! हॅं ! मला कुटचं र येड्या गानं येनार ? "...मंगल थोडा संकोचून प्रथम त्याला म्हणाला—

पण मग, एकदम स्फुरण आल्यासारखें, तो पुढें म्हणाला—" पन्...येक गोस्ट सांगतो मातर तुला—ऐक हां... ! "

" गोस्ट ? सांगा...सांगा– " आनंदून त्याच्यासमोर उत्सुकतेनें बसत, नामदेव म्हणाला– " देवाची सांगा येखादी— "

मंगल हसून हळुवार घोगऱ्या शब्दांत सांगूं लागला—" हं ऐक—

" फार फार वर्सं झालीं, बग—येका रानांत, येक कोळी र्‍हात व्हता; ' वाल्या ' त्याचं नांव ! उंच, धिप्पाड, दमदार, लय् भक्कम गडी व्हता तो, त्याच्या मनगटांत खूप ज्वोर व्हता;–धाडशी बी लय् तो—सदा त्याच्या हातांत कुऱ्हाड,...कमरला कोयता ! —आंन् कुटं बी भुतावानी फिरायचा तो कर्दनकाळ, येकटाच—

" त्याची व्हती दोस्तांची येक टोळी; ...त्यांना घेऊन बी तो रानावनांतून भटके;... काट्याकुट्यांत, जाळीमाळीत, गुहा–दरीत त्ये लपून बसायचे;— आन् कोन् वाटचं वाटसरू जातांना दिसले–कीं दबा धरून, येकदम त्याच्यासंवूर उभे र्‍हाईत... आनि मंग, वाल्या दरडावून त्यांना म्हने–' काडा रे समदे दागिने —पैसे—धान्य !... नाय तर बगा, हकनाक् जीवानिशीं मराल ! '

" ते बापडे घाबरून समदं देत !–कोणी उलट हात उगारला र उगारला, –कीं पडलाच त्याचा मुडदा, समजावं !—त्याची ती चकचकती कुऱ्हाड... टोकदार, धारदार कोयता—रगतान् न्हाऊन निगे,...अशा येळीं !

" पर मग, त्याला थोडं वाईट बी वाटे ! पन् खिनभर ! तो मनांत म्हन–' घरांत इक्तीं मानसं; त्याना पोसाया आपण त येकलेच;…यांत पाप व्हंत असल, त् घरच्या बायका-पोरान्‌साटीं, आपल्या जोडीदारान्‌साटींच ! ते–समदेच त्यांत भागीदार हाइत आपले—

" असं म्हनून, तो रोज मडक्यांत येकेका पापागनीक येकयेक खडा टाकी;…आन् असेच दिस चालले व्हते !— त्याचं पापाचं मडकं बी भरत व्हतं— "

नामदेव एकाग्रतेनें सारे ऐकत होता. मंगल आपल्याच नादांत गुंगून, सारं सांगत होता जुळवून जुळवून—

….१०५

" पण येक दीस काय झालं ?–त्यांचे ते भागीदार समदे, त्यांनीं तंवर गोळा क्येलेली दौलत… घेऊन, …त्याला सोडून पळाले ! …तो बिचारा येकलाच ऱ्हायला;…त्याला फार वाईट वाटलं— !

" पर तरी बी तो मनांत म्हनला, ' आपल्या पोराबाळांसाटी ! —ते तर हाइत कीं, आपल्या पापांत वांटेकरी, उबं हाईत कीं आपल्यापाटीं—

" आन् मंग, वाल्या बसला फिरून दबा धरून…वाटसरूंच्या वाटेवर—

" येकदां सर्गांतून नारदमुनी त्याच्यासमोर उतरले;…पर त्याना बी धरून नि कोयता उपसून वाल्या म्हनला,— ' हं, काडा, भटजी, समदं ! …नाय् तर फुकाट मराल जिवानिशीं —'

" पर नारद हसले;…घाबरले न्हाइत !…त्यांनीं त्याला इच्यारलं उलट– " वाल्या ! अरे कुनासाटीं रे येड्या हीं इक्तीं पापं करतो हाइस . ? —'

" वाल्या जोरानें बोलला- ' माज्या बायकोसाटीं ! … पोरांसाटीं …समद्यांत त्ये माजे वांटेकरी हाइत '—

" तवा नारद पुन्हां हसले आन् म्हनले , ' भरम हाय् बग तुजा… अरेऽ पापात तूं येकलाच ऱ्हानार ! जा इच्यारून ये आदी त्यांना !… मी थांबतों हितंच;—मंग मार हवं त् मला ' — "

तें सांगतांना, मंगलचे डोळे डबडबले होते….बोलतां बोलतां, त्याचा गळाहि दाटून आला होता…तो अखेर नाइलाजानें थांबला एकदम—



गोंधळल्या नजरेनें नामदेवनें त्याच्याकडे पाहून विचारलें- " रडतां व्हो का, मंगलकाका ?–काय झालं पुडं-?-"

….१०६

मंगल चपापला–भानावर आला—मन आवरून तो पुढें सांगूं लागला—

" वाल्या मंग तसाच घरीं आला --

" झकपक पोषाख करून, नटून–थटून, त्याची बायको हसत खेळत बसली होती; त्या बावळ्याकडे तिनें ढुंकून बी पायलं नाय;–त्यानें मोठ्या आशेन् इच्यारलं तिला, ' तूं माज्या पापांत भागीदार हाइस ना ? माज्या दुकात माज्या बरोबर हाईस ना ? '

" पर् ती खदखदां हंसून म्हनली… ' हुड्त्…! …का म्हनून ? …मला तुझी दौलत हवी; सुक हवं ! त्यं तेवडं आन् ! तिकडं तुजं तूं काय बी पाप कर; —मी पैशाची धनीन ! —मला सुख तेवढं हवं; त्ये नसल, त् तूं जा का मसनात्–नाय् तर नरकात ! –मला काय करायचं ? '

" वाल्या एकदम भडाकला–त्याला वाटल… ' ही हसतेय् ! हिचे दांतच पाडावे ! ती बोलतीय् , तिची जीभच उपटावी !…तिचं नरडंच असं एका मुठींत पकडून दाबावं नि तिला त्याच ठायीं ठार करावी !!' "

….१०७

तसें बोलतां बोलतां, मंगलचे डोळे त्वेषानें लाल झाले होते… त्यांतून पाणीहि गळत होतें—भयानक हातवारे होत होते;… त्यामुळें तर वाल्याच्या त्या गोष्टीत, नामदेव अधिकच रंगला होता—

पण बोलतां बोलतां मंगल अखेर एकदम थांबला…

त्या अजाण पोराची–कथा–शृंखला तुटून, त्यानें विचारलें…" मग ? पुढें "

" पुढें कांही नाहीं, बाळ ! घरदार,–बायकापोरं, सारं टाकून, वाल्या नारदाकडे परत गेला; त्यानें मुनींचा गुरुमंत्र घेतला; मग घोर तपश्चर्या केली त्यानें; नि तो मोठा वाल्मीकी ऋषी झाला ! समजलं ? —जा आतां बाहेर खेळायला…" दारांतून ते अनपेक्षितपणें आलेले शब्द कानांत पडतांच, नामदेव व मंगल दोघेहि एकदम दचकले; भानावर आले.

मंगल तिकडे वळून म्हणाला—" कोन ?... विवेकदादा ? ...तुमी कवा आला ? –"

नामदेव बाहेर गेल्यावर, प्रसन्न हसून, मंगलजवळ बसतां बसतां, विवेक म्हणाला—" अरेऽ केव्हांचा इथेंच दारांत उभा आहे मी ! –रामदासांची खडकांतली बेडकी पाहात होतों ! ...वाल्याच्या लूटमारीतहि सांपडलों होतों— "

मंगल चपापला, वरमला;-त्यानें मान फिरवली; आणि हळूच आपले पाणावलेले डोळे पुसले–

## ...१०८

"त्या दिवशींच जळून मेलों असतों, इवेकदादा, तर ब्येस नसतं कां झालं ?" क्षणभरातें भानावर येऊन, मंगलनें विवेककडे मान फिरवली व तो पडल्या पडल्या, गद्गद कंठानें त्याला म्हणाला—

" छे छे, . तुझ्यासारख्या दुसऱ्यांसाठीं स्वतःचा जीव धोक्यांत घालणाऱ्या त्यागी माणसांनीं रे मरून कसं चालेल ? " विवेक त्याच्या खांद्यावर हात ठेवून सहानुभूतीनें म्हणाला –

" नाय् नाय् ! ...असं वंगाळ खोटं नाटं बोलूं नका, 'दादा ! ...मी बदमाश–हैवान् ,...पापी हाय् !–मी म्हा पापी हाय्!...आतां मला उजळ माथ्यान् कदीबी जगांत जगतां येनार नाय् ! " बोलतां बोलतां, मंगलला एकदम एक हुंदका आला–" पन् मंग् कसं...कसं... सांगूं मी, तुमाला त्यें ? ...त्ये ऐकून बी तुमच कान इटाळतील— "

" ऐक...ऐक...मंगल ! ...शांत हो—नि मग सांग, ...असेलच कांहीं मला सांगायचं तर— " विवेकनें हळुवारपणें त्याची समजूत घातली...

क्षणभरानें आपले डोळे पुसत, मागल्या गोष्टी आठवत, मंगल विवेकला सांगूं लागला— " या श्येतावर लय् जीव हाय् माजा ! ह्ये भुत्याचं शेत फिरून हातात येईल, या आशेनंच म्या मागं येकदां वंगाळ वाट धरली होती, विवेकदादा ! ...कुस्त्यांचं येड आन् सळसळत तरनं रगात आंगात !...दंडात मस्ती,...तवा मीं भैऱ्याच्या दरोडखोरीत भागीदार झालों !–तो ऱ्हायला नामानिराळा; ...मीच रोजच्या रोज दरोडे घातले ! आखीर पैसं भैऱ्याला...तो श्याजोग ! ...आन् मला सात वर्सांची खर्डाफोड !— इक्तंच नाय्–आमा समद्या टोळीवाल्यांना



मुद्देमालासकट पकडून दिल्याचं त्याला बक्शीस बी भेटलं !... तो बडा 'रावभादुर भैरव' झाला! नी म्या तुरुंगाची वाट धरली ! तवां घरीं मागें, माजी हौशी आन् एक पोर व्हतं... "

बोलतां बोलतां, त्याच्या डोळ्यापुढें, त्या पुढलीं तीं मागलीं दृश्यं उभीं होत होतीं—

ऐकतां ऐकतां, विवेकच्याहि समोरून प्रत्यक्ष घडल्यासारखं–तें सारं सरकून जात होतें—

## ....१०९

कैद्याच्या वेशांमध्यें, तरणाबांड, रुबाबदार, पिळदार दंडाचा मंगल, गराद्यांमागें बसला होता–त्याचा चेहरा सचिंत व उतरलेला होता;—दाढी वाढली होती—

" जीवन आलाय् तुला भेटायला "—एका शिपायाने येऊन सांगितलें–मंगलचा चेहरा, बघबघतां, भरभर फुलून आला—

तेवढ्यांत, तरुणपणींचा जीवन दाराजवळ आला व उभा राहिला—

" भैरवशेट आफरिकेंत कापडधंदा करायला ग्येले;–इलासदादा हितच शिकतो हाय् ;...छोटी कुंदाबाय सदा आजारीच असते; तिला बरोबर नेलीय— आन् तुजी हौशी,...तिची बाळगी म्हनून गेली हाय! तुजं पोर मेलं..." जीवन त्याला बातमी सांगत होता.

'पोर मेलं ! हौशी गेली,... " भकास कठोर चेहरा करून मंगल जीवनकडे पाहातच राहिला.

तेवढ्यांत, वेळ झाली म्हणून, जीवनला शिपायांनीं जाण्याची खूण केली—

## ....११०

मंगल तुरुंगांत खिन्नपणें बसला होता. तेवढ्यांत, कुलुप उघडून शिपायानें बाहेर येण्याची त्याला खूण केली... " मंगलदादा, जरा लौकरच सुटतो आहेस, बरं का तूं ! ...रामराम ! ...ओळख ठेव ! — "

तो आश्चर्यानें त्यांच्याकडे पाहातच राहिला—त्याच्या तोंडून उद्गार आले– " आज ? ...वर्सभर आदीं ? ... "

मग तो जेलरसमोर उभा दिसला; तेव्हां, तोहि त्याला हसून म्हणाला–"माझी शिफारस मान्य झाली–तूं चांगला वागलास; खूप हुन्नर शिकून घेतलीस. आज्ञाधारकपणें इथलीं सारीं कामं केलींस—तुझी आज एक वर्ष आधीं सुटका करण्याचा हा हुकुम असा बजावतांना, मला फार फार आनंद होतोय् बरं, मंगळ्या बाबाजी ! ...हं–हे तुझे इथल्या कामाचे सांठलेले पैसे; –हे तुला तिकिटाला पैसे ! जा–आतां तुझे कपडे घाल; आणि खुशाल बाहेर जा ! तूं फिरून मोकळा झालास, मंगळ्या ! देव तुझं भलं करो !..."

मंगलनें खालीं वांकून, जेलरचे एकदम पाय धरले;...तेव्हां, त्याचे डोळे पाणावले होते. त्याला कृतज्ञतेचा हुंदका येत होता—

....१११

आपलें धोतर, आपली बंडी, आपल्या वहाणा, आपली लोकरीची गोंडेदार टोपी;...पुन्हा सारं चढवून, जेलच्या मोठ्या भिंतीशीं, फाटकापासून दूर येऊन, मंगल उभा राहिला होता—

सात वर्षांनीं, पुन्हां एकदां, त्याचा चेहरा नव्या आशांनीं प्रफुल्लित झालेला दिसत होता.

क्षणभर विचार करून, मग तो समोरच्या रस्त्याला लागला व भरभर चालूं लागला—

तो जेव्हां भैरवाडीला पोहोंचला, तेव्हां त्याचे पाय प्रथम आपल्या भुत्याच्या शेताकडेच वळले.

पण एवढ्या मोठ्या शेतांत, आतां एकदोनच खोपटीं दिसत होतीं. सारी जमीन चौफेर उजाड पडली होती.

तो जीवनच्या झोपडीपाशीं आला–तेव्हां जीवन व गंगा दोघें, साश्चर्यच पण सस्मित, त्याला सामोरीं झालीं—

....११२

तो व जीवन खोपटांत जेवायला बसले होते—

मंगलनें हळूच विचारलें..."भैन्याची काय हालहवाल? आफ्रिकेतच हाय्!"

"नाय्...निक्तच पंधरवड्यापूर्वी आले हायेत्...त्यांची आजारी पोर तिकडेच मेली–" जीवन काबऱ्याबावऱ्या चेहेऱ्यानें मंगलकडे पाहून म्हणाला—



"आन् . मंग...काय रे, जीवन?—तिची बाळगी?...माजी हौशी?" जरा घुटमळून, चमकत्या डोळ्यांनी व कुतूहलानें मंगलनें त्यांला विचारलें...

"ती आलीय् कीं तिच्या शेटबरोबर परत!" इतकेंच जीवन बोलून घुटमळला व पुढें निमूट जेवूं लागला —

"बरी झाली हाय् का र् ती, जीवन?..." मंगलनें खुलून विचारलें.

"लईच बरी !...लईच नवी नवाय होऊन आलीय ती, मंगलदादा !" जीवनला घुटमळलेला पाहून, गंगा म्हणाली–"तुम्ही तिला वळखनार बी नाय् आतां ! आन् ती बि तुमाला नाय वळखणार !..."

"म्हन्जी?–" हातांतला घांस मंगलच्या हातांतच राहिला; त्यानें भेदरल्या नजरेनें गंगावहिनीकडे पाहिलें.

बेचैनपणें चुळबुळत जीवन गपचूप जेवत होता.

तेवढ्यांत, नवी भाकरी तव्यावर टाकीत, गंगा हळूच म्हणाली—"अवोऽ सा वर्सं इस्तू आन् लोनी येका ठाया नांदली त् लोनी इतळल्याबिगर कसं ऱ्हाइल, मंगादा?...तवा आतां नटीवानी नटते...हसते...खिदळते; हातांत हात घालते —मोटारींतून हिंडते ! ...तिचं पोर म्येलं; तवांच इनामदाराची बाइल म्येली ! ...म्हैन्याभरान् म्हन जानार दोगं फिरून आपरिकेला—आपलीं काळीं तोंडं घ्येऊन ! त्यांना म्हाइत न्हवतं तुमी असं लौकर सुटून याल त्ये—"

....११३

खिळल्या हातानें नि बसल्या दांतखिळीनें, मंगल तसाच पानासमोर–ऐकतां ऐकतां निश्चल झाला. त्याच्या डोळ्यांतून, त्याला नकळत गळणारीं आसवं, समोरच्या ताटांत टपटप पडत होतीं.

'जाव् द्या ती अवदसा ! ...आतां नवं घर करा, मंगूदाजी ! !"—गंगा पीठ मळत सहानुभूतीनें त्याला पुढें म्हणाली.

पण मंगळचा चेहरा, बघतां बघतां पालटत गेला–बंडीच्या बाहीनें डोळे पुसून, प्रथम तो हळूच म्हणाला–"मी म्हनत व्हतो, गंगावैनी, ग्येलं तें गंगेला मिळलं ! ...उजून आपल्या हौशेसंग हौशीनं आपन सव्सार उबारूं ! ...गरिबीची मीठभाकर खावूं !—घटकेआदीं कीं हो ह्येच इचार व्हते माजे–"

पण मग, एकदम रागानें उसळून, तो झटकन् उठला व आवाज चढवीत ओरडला—“ पर आतां नाय् !...त्या भैऱ्यान् चारी बाजून् माजा केसान् गळा कापलान्-माजं वाटोळं क्येलन् ! ...माजं श्येत ग्येलं...घर ग्येलं, पोर ग्येलं... बाइल नासवली... ! ...न्हाई न्हाई,.. वैनी ! आतां न्हाई गप्प ऱ्हानार मी ! आदी जाऊन त्याला पुरता जाब इचारनार ! ! ...हा चाललों बग अस्साच— ”

“ मंगळयादा ”— “ मंगळ्यादा—” एकदम खरकाट्या हातानेंच बाहेर धांवत सुटलेल्या मंगलमागून, जीवन, गंगा दोघें झोपडीच्या दारापर्यंत धांवलीं.

पण बघतां बघतां, तीरासारखा धावत लांब जाऊन, तो दिसेनासाहि झाला होता.

....११४

नदी ओलांडून भैरवाडीच्या तीराला धांवत धांवतच मंगल पोंचला-तोंच, त्याला रस्त्यांत काका दिवाणजी दिसला.

मंगलला एकदम समोर पाहातांच, प्रथम तो दचकला; जागच्या जागीं थबकला—

मंगलनें गपचूपच टवकारून त्याच्याकडे एकदां पाहिलें.

थोड्या धडधडत्या छातीनें, पण तरी धीर करूनच, काका दिवाणजी म्हणाला-“ कशाला आलास फिरून या गांवांत, ‘मंगळ्या ?...भल्या रीतीनें, आलास तसाच चालता हो फिरून !-जा...परत फिर ”-

“ अरं ज , घुबडा ”-त्याच्याकडे तुच्छतेनें एक दृष्टिक्षेप टाकून, मंगल तसाच संथपणें इनामदारांच्या बंगल्याच्या रस्त्याला लागला—

क्वचित् ओळखीचे चेहरे त्याच्याकडे चमकून पहात होते. पण तो मात्र आपल्याच तंद्रीत पुढें चालला होता-

पूर्वी हजारदां रात्रंदिवस बावरलेल्या त्या इनामदारांच्या बंगलीपाठीं तो शिरला-

मागल्या बाजूच्या पायऱ्याहि तो झरझर चढून गेला; आणि इनामदाराच्या नेहमींच्या बसा-निजायच्या खोलीशेजारीं, उघड्या दिसणाऱ्या खिडकीजवळ, एका झाडाच्या आडोशाला तो उभा राहिला-

तेथून त्याला आंतलें सगळें दृश्य दिसत होतें-



....११५

तलम मलमल सदरा नि सोन्याची कंठी घातलेला भैरव, मखमली कोचांवर ऐसपैस बसला होता. त्याच्याशेजारीं, पाठीवर नखरेल वेण्या सोडलेली, नट्टापट्टा केलेली, सुंदर जरीचें लुगडें नेसलेली, स्वरूप पार पालटून अगदीं पांढरपेशी झालेली,..त्याची हौशी होती. भैरवला खेटून ती लडिवाळपणें बसली होती व विडा तयार करून त्याच्याहातीं देत होती—

तिच्या खांद्यांवर हात टाकून, पान चघळीत, भैरव मोठ्यानें हसत म्हणाला ...“ आत्तांच काका दिवाणजींचा निरोप आलाय्—बरं कां, हौशे !...तुझ्या मंगळ्याचं तुला नांदायला बोलावणं आलाय्—”

“ इश्श्ऽ...काय तरीच !...मरेना मेला ! ! ” हौशी, भैरवाच्या खांद्यावर लाडीकपणें आपली मान झुकवून, नखरेल शब्दांत म्हणाली—“ एक वरीस आहे ना अजून त्याला सुटायला ? तवर परत दिखील जाऊं आपण ! मला दाटून सांगतां होय ? ”

“ अग , खोटं नाहीं;-आज सकाळींच तो बदमाश सुटलाय् ! येईल आतां शनीचा फेरा याच बाजूला दोन दिवसांत !” भैरव रागारागानें सांगत होता—“ त्याच्या सारखे महारोग ! आतां आमच्या या गांवाजवळपास देखील नकोत मला !...प्लेगचे उंदीरच ते साले !...खऱ्या कशाला ? उंदराच्याच गोळ्या घालून, ठार करून टाकलं पाहिजे त्यांना ! ...तरच आमच्या सारख्यांना सरळ जगतां येईल ! ”

घाबरून हौशी भैरवाला बिलगली;-तेव्हां हसून, तिला अधिकच जवळ ओढीत, विलासी लडिवाळपणें भैरव म्हणाला, “ घाबरू नको, हौशे-त्याची ग काय छाती आहे काळं तोंड घेऊन इतक्या लौकर इकडे आपल्या समोर यायला ? पण तसं कशाला ? आपण आपलं उद्यांच मुंबईला जाऊं इथनं ! लौकरच बोटीनें परतूं !—मग तर झालं ? आतां हांस पाहूं-झालं समाधान ?—”

“ होऽ.. तुम्ही जवळ असल्यावर—” हौशी लाडीक हसून त्याला बिलगली...

....११६

झाडाआड उभ्या असलेल्या मंगलच्या कानांत ते सारे शब्द तापल्या शिश्यासारखे शिरत होते.

'समोरचे खिडकीतून दिसणारें तें दृश्य, त्याच्या डोळ्यांत, लाख टांचण्यां-प्रमाणें प्रतिक्षण अधिकाधिक खुपत होतें.

'ज्याच्या शब्दावर भोळा विश्वास टाकून, आपण जणूं शीर हातांत घेऊन वावरलों, त्याचा हा सर्वांगीण विश्वासघात !-'

'जिच्यावर, ऐन तारुण्यांत जीव हातीं धरून, निस्सीम प्रेम केलें-तिची ही बेइमानी !—'

आपल्याच हलकट स्वार्थी क्षणिक सुखांत गुंग होऊन, तीं दोघेंहि दाखवीत असलेली त्याच्याबद्दलची ती अस्थानीं तुच्छता ! त्याच्या अंगांतील सारें रक्त त्याक्षणीं सळसळलें-उकळलें होतें;-त्याला...उभ्या जागीं आगीच्या डोंबांत उभे राहून, आपण जिवंतच जळत आहों, असें वाटूं लागलें होतें !-

आणि त्यांतून स्वतःला सोडवण्यासाठींच जणूं-तो क्षणार्धांत धांवत सुटला-

त्या बंद खोलीच्या दारांत आल्यावर, क्षणभरच तो घुटमळला-अडखळला; पण अखेर, त्यानें जीवाच्या अगदीं आकांतानें, त्या फळकटांवर धाडकन् एकच एक प्रचंड लाथ मारली —

आणि आंतली नबळी कडी त्या आघातानें-तुटून, तें एकदम सताड उघडें पडलें...

अगदीं त्याचवेळीं भैरवाला बिलगून हौशी लडवाळपणें बोलत असलेले शब्द त्याच्या कानीं पडले... "होऽ तुम्ही जवळच असल्यावर—"

एकदम दार उघडें पडल्यामुळें गेलेला तोल कसाबसा सांवरून, कोचा-समोरच आपले पाय स्थिरावून थांबत, मंगल ओरडला—"आणि मी जवळ असल्यावर ?"

...११७

"अगाईऽऽ" हौशीच्या तोंडून एक भेसूर किंकाळी बाहेर पडली-

आपल्या अस्ताव्यस्त झालेल्या पदरासह ती झटकन बाजूस सरकली खरी;



पण त्यानंतर मग, तिची दांतखिळीच एकदम बसली. स्वतः तीहि जागच्या जागीं जमिनीवरच बसली.

आपल्यावर रोखलेले ते खदिरांगाराप्रमाणें लकाकते चकाकते जळते डोळे ! रागानें लालबुंद झालेला तो भेसूर चेहरा ! मंगल तसा अकल्पितपणें त्यांच्या समोरच एका हातावर उभा होता !

भैरवाच्या पापी विश्वासघातकी मनाच्या वाचेची तर नांगीच मुळांत मोडली होती !

मंत्रमुग्ध झाल्याप्रमाणें जागच्या जागींच तो उभा राहिला; अत्यंत भयभीत भकास—भेसूर चेहऱ्याचा जणुं निश्चल पुतळाच झाला त्याचा !

"ऊठ...जागचा ऊठ! असा बघतोस काय, भैऱ्या ? एक वर्स आदी आन् अगदीं आजच्या आज आलों हाय्!... मी तुज्या संबूर-" मंगल जागचा न हलतांच, कर्दनकाळाप्रमाणें ओरडला- "घाल कुटली ती गोळी ...आतां या मंगळ्याला रावभाद्रा ! !"-

"माफ कर ..माफ कर, मंगळ्या!..." जागच्या जागीं कसाबसा थरथरत, कोचापासून दूर होत, मागें मागें सरकून भैरव अजीजीनें म्हणाला- "सोड मला-मी चुकलों—तुझं भुत्याचं शेत परत देतों—तुझ्या वाड्याचे सारे पैसे देतों ! काय मागशील-ती भरपाई देतों— "

पिसाट खदखद टकरीत मंगल बेभानपणें म्हणाला-"आतां ? आन् असं ? अरे थू: तुझ्या त्या दौलतीवर-त्या शेताच्या दानावर ! आन् आमा वेताळांना नागवनाऱ्या तुझ्या त्या इनामदाराच्या पिडीजात इश्वासघातकी कुळीवर !...आतां जानारच तूं! पर जाशील तो काय घेऊन जातोस त्ये सांग ?- बोल ?... तुजी दौलत? भुत्याचं श्येत ?- माज्या कुळाची अब्रू? ह्यी ह्यी... हौशीची बेस्वा ?"

....११८

भैरव मागें मागें पाहात, हळूच मधल्या दाराकडे सरकतांच, मंगलनें धोरण ओळखलें—

कोपऱ्यातली बंदूक झटकन् उचलून, तो त्याच्याजवळ गेला नि ओरडला- "बेइमान-बदमाश ! -अजून बी ओटांत येक आन् पोटांत येक ? ...मरतांना बी तुजं बंदुकीवर ध्यान ? — "

बोलतां बोलतां, मंगलनें उजव्या हातांत बंदुक वर उचललेली पाहून मात्र, भैरवाचें उरलेंसुरलें अवसानहि गेलें. तो कंबर मोडल्यागतच मंगलच्या पायाजवळ वांकला. अगदीं अजीजीनें भेदरल्या अडखळल्या भयभीत स्वरांत तो ओरडला—

" न–को—मंगळ्या ऽ !... नको ऽ रे ऽ मला गोळी घालूंस ! –जीवदान दे ऽ मला— तुझ्या पाया पडतों मी– "

" चल हो दूर " आपल्या पायाजवळ वांकलेल्या भैरवाच्या डोक्यांत ताडकन् एक लाथ मारून मंगल ओरडला–" तूं कसलं रे कदी कुनाला उभ्या हयादींत दान क्येलं हाइस ?. त् तुला मी दान करूं ?...पर मंग, यातली तुजी गोळी तरी कशाला फुकट दवडूं ? ...हा तिचा एक दस्ताच पुरे हाय तुला ! —जा ! नरकांत जा..."

" मंगळ्या, सैतानाऽ नको ऽ रे ऽ " आपल्यावर वरून उलटी बंदूक वेगानें येत असलेली पाहून–भैरवानें अखेरचीच भयाण किंकाळी मारली.

—आणि, दुसऱ्याच क्षणीं, डोकें फुटून तो धरणीवर कोसळला.

....११९

तें दृश्य समोर पाहून, इतका वेळ कोचाजवळ अंग चोरून गलितगात्रपणें बसलेल्या हौशीनेंहि...एक किंकाळी मारली; नि हातांत बंदूक घेतलेल्या मंगलची दृष्टी तिच्याकडे वळणार,...त्याआधींच, त्यानें लाथ मारून मघां सताड उघड्या पडलेल्या...दारांतून जीवासाठीं तिनें धांव ठोकली.

भैरवाजवळ घळघळणाऱ्या थारोळयानें, मंगल क्षणभरच स्तंभित झाला होता ! तिला पळतांना पाहातांच मात्र, हातांत तशीच बंदूक घेऊन, तो तिच्यामागें दबदबा धांवत सुटला.

" खून...खून !... भैरवशेटचा खून ! " वाड्यांतून चौबाजूंनीं आरोळ्या प्रतिध्वनित होत होत्या–आणि त्यांतूनच, हातातल्या बंदुकीसह, हौशीपाठोपाठ, संतापानें बेभान होऊन, मंगल धावत होता. तो तोंडानें पुन्हां पुन्हां ओरडत होता—" आतां ग जाशील कुठें...बाजारबसवे ? "

' त्याच्या हातांतील ती बंदूक व त्याचा त्यावेळचा तो भयाण अवतार पाहून, सारे घाबरून वाटेंतून बाजूलाच सरत होते. कोणाहि एकाची पुढें होऊन त्याला थोपवण्याची छाती होत नव्हती—



भैरवाच्या मृत्यूच्या त्या भयाण दृश्यानें भेदरलेली हौशी ..' आतां आली आपली पाळी ' या जाणीवेनें, वाट फुटेल तशी, फुटेल तिकडे सैरावैरा धावत होती ...आपल्या अस्ताव्यस्त कपड्यांकडे तिचें लक्षहि नव्हतें—

....१२०

आणि कसें कोण जाणें–तिच्या पायांनीं तिला भुत्याच्या शेताच्या रस्त्यालाच लावलें होतें...ती नदी तुडवून भुत्याच्या बंगलीपाशीं आली.

तिथेंच ती पूर्वी मंगलबरोबर आनंदांत रहात होती—तिथेंच तिचा नि त्याचा पोरगा,, मंगल तुरुंगांत गेल्यावर गमावला होता

तेवढ्यांत, लांब लांब टांगा टाकीत, रेती तुडवीत, दबदबा धावत, मंगल आपल्या पाठोपाठच वेगानें धांवत येतांना तिला दिसला.

अधिकच भयभीत होऊन, ती आपल्या त्या पूर्वीच्या घरामागें धांवली–

आंत शिरून कडी घालण्याचा तिचा विचार असावा; पण अतिशय दमल्यामुळें पायरीला अडखळूनच ती खालीं पडली.

तरी ती फिरून उठली, इतक्यांत, मंगलचीं धावतीं पावलें तिच्या कानांवर पडली. व त्यां पाठोपाठच तोहि तिच्यासमोर साक्षात् येऊन उभा राहिला—

तिला वाटलें–' आतां हा बंदूकीची गोळी आपल्याला घालणार—'

केवळ एका हाताच्या अंतरावरून, त्याला आपल्याकडे तसें भयानक टवकारून पाहात उभा असलेलें पाहतांच, तिच्या गळयातून किंकाळीहि बाहेर पडे ना—

अतिशय घाबरून, तिनें तोंडातल्या-तोंडांत एकदां ओरडण्याचा प्रयत्न केला; नि ती भयभीत घोगऱ्या स्वरांत म्हणाली ' नका धनी, नका !... मला मारूं नका ! चुकल्यें मी...चुकल्यें मी—"

....१२१

हातांतली बंदूक मंगलनें धाडकन बाजूला झुगारून दिली; व तिच्या अगदीं जवळ जात, त्यानें दातओठ खाऊन, तिच्या झिज्या डाव्या हातांत धरल्या–

मग खसकन् मान ओढीत तो तिच्याजवळ आपला भयाण चेहरा, व जळते डोळे नेत म्हणाला—" चुकलीस ? आतां समजतंय ?? वारेऽ भुत्या येताळाची नातसून ! "

तीं थरथर कांपतच होती. हताशपणें, भकास डोळ्यांनीं मंगलकडे पाहात, ती पुटपुटली "कसाब-व्हता तो!...येकली बाइल मानूस !—काय करनार मी ?... गुरफटल्ये—"

"पर तवांच मेलीस का न्हाइस ? . " मंगल रागानें गरजला-"जीव का नाय दिलास ?"

'चुकल्यें-चुकल्यें... " ती अगदीं भेदरून गलितगात्र होऊन ओरडली—

"चुकलीस ? चुकलीस ? त्याच तोंडान् बोलती हाइस व्हय् ! ? -गुलगुल-भवानें ऽ ! ...जा मग-मर तर—" भयंकर रागाच्या बेहोषीनें, तिच्या केसांच्या झिंज्या एकदां हिसकून, मंगलनें तिला फेकल्यासारखें एकदम मागें ढकलून दिलें.

हौशी जी जोरानें धाडकन् मागें पडली, ती तुळशीवृंदावनाच्या पुढल्या दगडी धक्क्यावरच ! ...तिथें तिचें डोकें आपटलें-

"आयाईऽ " एक सूक्ष्म अस्पष्ट विव्हळणें बाहेर पडलें-नि तिच्या डोक्यांतून, तोंडातून रक्त घळघळूं लागलें; ती साफ निपचित पडली—

....१२२

तुळशीवृंदावनाशेजारीं, तशा निश्चल पडलेल्या हौशीला पाहून मात्र, मंगलचा इतका वेळचा संताप, बघतां बघतां ओसरत् गेला-

तिच्याकडे तसं उभे राहून पाहातां पाहातां, क्षणापूर्वींचा बेहोष, आक्रसलेला, त्याचा चेहरा हळूहळू सैल पडला;...तिथेंच मार्दव आलें; डोळ्यांतून घळघळां आसवें गळूं लागलीं; डोक्यांत जुन्या गोड आठवणी तरळल्या—

चटकन् खालीं वांकून, त्यानें हळुवार हातानें हौशीला उचलून, क्षणभरच आपल्या बाहूत घेतलें. तिच्या रक्त घळघळणाऱ्या कपाळा-तोंडावरून, केंसावरून, एकदां हात फिरवला आणि तिच्याकडे पाहात तो अत्यंत आर्ततेनें ओरडला—"हौशी...माझी हौशी ! -हौशे ऽ ...ओ म्हन— "

पण मग लागलीच त्याचा चेहरा पुन्हां एकदां पालटला.

—आणि तिच्याकडे तसें पाहातां पाहातां, तो फिरून ओरडला- "नाय्-नाय्-ही नाय् माजी हौशी ! ...माजी हौशी कवांच मेली ! ! -माजं पोर मेलं... ! माझ्या पोराची आई बी मेली ! ! ... "



आणि त्या दुसऱ्या विचारानें, मंगलनें तिला पुन्हां जमिनीवर तिरस्कारानें खालीं टाकलं—

तिच्या व भैरवाच्या रक्तानें माखलेले आपले दोन्ही हात जवळ धरून, त्यांच्याकडे पाहात तो उठून उभा राहिला—

तेवढ्यातच सोटे-काठ्या घेऊन कांहीं मंडळी भोंवतीं जमलीं; त्याच्या घराच्या दोन्ही तिन्ही बाजूनीं तीं त्याच्याचजवळ येतांना त्याला दिसलीं.

मंगल त्यांच्याकडे पाहून खिन्न हंसला; जागच्या जागीं उभा राहिला; आणि मग हळूच म्हणाला-"कशाला रे काठ्या नि सोटे हे ?...मी मानूसच हाय् एक ! ...चला-मला आतां पोलीस ठान्यावर न्या ! ...मी गुनेगार हाय्-गुमान येतो तुमच्यासंग ! -"

....१२३

हें सारें सांगतां सांगतां, मंगलला ओक्साबोक्सी रडूं येत होतें.

स्नेहाळ हातानें थोपटत, विवेक त्याला समजवीत, शेवटीं हळूच म्हणाला "ऐक...ऐक्-मंगल ! झालं-गेलं ! तें होऊन गेलं...!!"

मग मंगलहि डोळे एकदां पुसून नि मन घट्ट करून, पुन्हां पुढें म्हणाला —"पोलिस पुरावा पुरा नवता; म्हनूनच का काय कोन जान-फांसाऐवजीं, जन्मठेव आली नशिबाला !—दादा, सावर्स चोख काडली फिरून तुरुंगांत-पर मंग रोज वाटे— नाय-या कालोक्या दगडी भिंताडामागें चिणून असाच मरनार नाय मी !—मी कवा ना कवा भाइर जानार ;... जगामंदि जगनार !...मला जगायचं हाय—'

"आन् मंग एक दिस आला; आणि कोन कोन निवडक कैदी म्हैनाभर येका रस्त्याच्या कामासाठीं रोज भाईर येत व्हतों; तवा दोगा सोबत्यांच्या मदतीन् मी एकदां मोका सादला;-आन् पळालों;-मंग-पायाच्या साकळ्या तोडल्या; तसाच लपत छपत मुंबईला पोचलों—

"कुठं कुठं इमारतींची कामं चाललीं व्हतीं- त्यात खपावं; कुटंबी आन् काय बी खावं येखाद्या फुटपाथाला निजावं; ग्येला दीस आपला—असं चाललं व्हतं मांज !

“आट धा म्हैन तर अशे निभले;...वाटलं...‘आतां नाय् आपन् गावत कोनाच्या हातामंदी आतां जन्माचीव मुंबय् आपली...’

“आन मंग, येका सा मजली इमारतीवर म्होरक्याच्या हाताखालीं काम बि मिळालं मला !...पण-”

“पण रे काय ?—” मंगल क्षणभर थांबला; तेव्हां त्याच्याशीं अधिकच समरस होऊन विवेक म्हणाला—“काय रेऽ झालं मग, मंगल ?-”

“त्येच आतां सांगतोय्, विवेकदादा—” तेवढ्यांत मंगल फिरून जरा फुलल्या चेहऱ्यानें म्हणाला-“येक दीस आसं झालं, दादा-चौथ्या मजल्यावर दगड चडवत व्हतो आम्ही; आम्ही पुलीवर दगड चडवायचं काम करतांना, रोज गानं म्हनायचों; आमचा म्होरक्या एक पोरगा व्हता; लय गोड आवाजाचा !— त्यादिशीं त्यान नवंच गानं लावलं व्हतं-म्हनला-येका दगाचं गानं म्हनू या”

....१२४

त्या नव्या इमारतीच्या सहाव्या मजल्यावर बसवण्यासाठीं, एक अजस्त्र दगड पुलीवरून वळसे घेत चालला होता; खालीं गेलेल्या जाडजूड दगडांच्या साहाय्यानें तो वर चढवला जात असलेला दिसत होता.

तीसचाळीस मजूर अगदीं तळाशीं, कांहीं मधल्या व तिसऱ्या मजल्यावर केलेल्या फळ्यांच्या फलाटावर नि एकदम वर कांहीं, असे विभागून उभे होते ते !

तो पोरगेला, काटकोळा म्होरक्या व त्याच्याजवळचे सात आठ मजूर तिसऱ्या मजल्यावरील मधल्या फलाटावर उभे होते दोरखंडाला हात लावून, तो अजस्त्र दगड ओढण्याच्या पवित्र्यात व आवेशांत ते उभे होते.

त्यांतच,...त्या काटकोळ्या म्होरक्याजवळ मंगल होता.

प्रथम, सगळे अगदी एकाग्रपणें, म्होरक्याची गाण्याच्या ललकारीची ओळ ऐकत; विसांवा घेत. त्यामागून एकदम वरचे ‘खेऽचा’ असें तार स्वरांत म्हणत, त्यापाठीं मधले म्होरक्याच्या टोळीतले ‘खेऽचा’ असें मध्यस्वरांत म्हणत व मग खालच्या जमिनीवरच्या टोळीतल्या मजुरांबरोबरच तिन्ही टोळ्यातले सारे मजूर तारमध्यमन्द स्वरांत एकदम ‘खेऽएऽचा –’ असा संमिश्र आवाज काढीत व त्याबरोबरच वर-मध्यें-खालीं असा ठेक्यांत नेट



लावून, सारे एक फूट दोरखंड खालीं ओढीत तो अजस्त्र दगड असा एक एक फूट उंच चढतांना, पुन्हां म्होरक्याच्या पुढल्या ओळीच्या ललकारीसाठीं व पुन्हां साऱ्यांच्या ‘खेऽचा’ च्या एकसांथ पुकाराची वाट पाहात, ते विसांवा घेत-

मंगलहि त्या कामांत अगदीं गुंग झालेला दिसत होता. जवळच उभ्या असलेल्या आपल्या काटकोळ्या म्होरक्याच्या गाण्याची सुरेल ओळ न् ओळ, तिची दिलखेंचक ललकारी, त्याच्या कानांत दुमदुमून जात होती. हृदयांत सहस्त्र भावना उसळवून, डोळ्यापुढें असंख्य चित्रें उमटवून जात होती.

....१२५

फुटाफुटानें दगड वर चढला, कीं, म्होरक्या तें गाणें पुढें म्हणत होता— अगदीं तन्मय होऊन म्हणत होता-

त्याचें तें सगळेंच गाणें मंगलच्या हृदयावर ओळीओळीनें कोरलें जात होतें-हृदयांत सहस्त्र हळुवार भावना उचंबळून येत असल्याचें, त्याच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित हात होतें.

“हं खेच्चार बिगी, बिगारी-खेच्चार बिगी बिगी !...ध्रु०
या दगडी भिंती बि गानं गाती-‘इमारती मर्दांच्या हातीं !’-
भाऊ, दुनियेमंदी चालच न्यारी-मर्द रोजच्या रोज भिकारी !
व्हय्, दुनियेमंदी दानत् खोटी...मर्दांच्या हातांत नरोटी !...
पर ; करा करा मर्दांनो छाती-इमारती मर्दांच्या हातीं !
ह्यो, चडले भुईवर मजल सात-धोंडा बी चालला अस्मानांत !...
हं, हळु र् गड्यानों ! कराल घात !...चाल्ला चढला अस्मानात !
हा धोंडा बि व्हता त्या रानांत !...तितंच हाय त्याचं गनगोत !...
तो व्हता राजा त्या दुनियेत !...राज न् रानी !-समदी जात !
अर् चैन् करी झुल्झुल् पान्यांत ! हिरव्या पाचूच्या बंडीत.
तो व्हता बेटा लय् ऐटीत—कपाल पर फिरलं निमशांत
धड् ! धड्ड्ड् !-दारू करते घात !-ऊर फाटल !-पडे खडीत !...
मंग, घन् सोस राजाचं माथं ! दोरखंडाचि र गल्यांत तात !
तो गुलाम राजा !...बगा वरात !...फुटा फुटानें चढ परात !

तो मेला र मेला या शेहेरांत !...न्हाय् रानी न्हाय नातं-गोतं !
हा चालला र आतां आस्मानांत ! थितं चुना-रेतीचं गोत् !
पर ज्वोर बगा तुमच्या दंडांत...धोंडा चढला मजलं सात !...
ही खरी खरी मर्दाची छाती !...इमारती मर्दाच्या हातीं !
या दगडी भिंति बि गानं गाति-'इमारती मर्दाच्या हातीं !'

....१२६

मंगल त्यांच्यांत मिसळूनच तें म्हणत होता; तो दोरखंड ओढत होता खरा ! -पण म्होरक्याच्या तोंडच्या त्या धोंड्याच्या कथेबरोबरच, मनानें तो दूर दूर रानावनांत भटकूं लागला होता; स्वतःचें देहभान हळूहळू विसरत गेला होता.

त्यांच्या डोळ्यांतील पाण्याच्या भुरकट पडद्यावर, हजारों पूर्वदृश्यांचा व मेल्या महत्वाकांक्षांचा एक प्रचंड धुमाकूळ चालू झाला होता—

त्याचा तसा समरस विचार चालला होता, तोंच, म्होरक्याचे शब्द त्याच्या कानीं पडले- ' तो व्हता राजा त्या दुनियेंत...कपाळ पर फिरलं निमशांत ! '

मंगलच्या डोक्यावर घणाचे घाव पडल्यासारखें झालें. गळ्यांत दोरखंडाची तांत आवळून घट्ट बसली आहे, असेंच त्याला वाटलें ! ...हजारों लोक आपल्याला हवें तसें हवें तिथें फरफटत ओढत नेत आहेत, असा त्याला भास झाला.

जवळच्याच म्होरक्याच्या तोंडच्या त्या पुढल्या तार स्वरांतील ललकाऱ्या,.. अखेर त्याच्या कानांत ओरडल्या- ' हा मेला र मेला या शेहेरांत ! ...चालला चालला अस्मानांत ! !... "

त्यावेळीं तर, मंगलला एकाएकीं भोंवळ आल्यासारखंच झालं.

आणि ' खे ऽ चा ' म्हणतांच, साऱ्यांच्या बरोबर नेटानें दोरखंड खालीं ओढण्याऐवजीं त्यानें बळकट धरलेले त्याचे हातच तेवढे, स्वरांच्या जोराबरोबर एकदम खालीं गेले. त्याला नकळत-बघतां बघतां, तो उभ्या उभ्याच खालीं ओढला गेला-

क्षणार्धांत, त्याचा तोल फलाटावरून पुढें गेला नि उलटें सुलटें, कोणीतरी प्रचंड शक्तीनें फेकून द्यावें त्याप्रमाणें-परातीच्या उभ्या वाश्यांवर आडवें तिडवें आपटत आपटत, तीन मजले खालीं घरंगळून, तो धरणीवर धाडकन् कोसळला.



तिथल्या मजुरांत एकच एक हाःहाकार उडाला-

क्षणभर दुर्लक्ष होऊन, त्यांच्या हातची दोरखंडाची पकड सैल पडली; त्यामुळें, पुलीवरून ' कर्रर्रर्र ' आवाज करीत, तो प्रचंड धोंडा चारपांच फूट खालींहि सरकला-

" अरे ऽ अरे ऽ सबूर " तो म्होरक्या ओरडला; तेव्हां कुठें, तें प्रचंड धूड, अखेर अस्मानांत मध्यंतरी उभें राहिलें व पुढला अनर्थ ओढवायचें टळलें-

त्या गोंधळांत, त्यांचें तें चालू गाणें विरलें होतें. तोंडावर व डाव्या हातावर उपडा पडून रक्तबंबाळ झालेल्या मंगलला उचलून नेलें जात होतें —

....१२७

हॉस्पिस्टल वॉर्ड मधून लंगडत लंगडत बाहेर पडून, मंगल मागें वळून पहात होता-

कोपराच्या जरा पुढें कापल्यामुळें त्याचा डावा हात आतां थोटा झाला होता. डावा गाल-हनुवटीपासून नाकापर्यंत व डोळ्याखालून भिवयी. -कानशिलापर्यंत-सत्रा ठिकाणीं शिवून टाकल्याचे लांबलचक वण दिसत होते. त्यामुळें त्याचा चेहरा चमत्कारिक झाला होता;—पडतांना, डाव्या पायाला बसलेल्या प्रचंड माराचाहि थोडा अवशेष उरल्यामुळेंच, तो तसा लंगडत लंगडत चालतांना दिसत होता.

त्याच्या खिशांत त्यावेळीं भरपाईचे मिळालेले दोनतीनशें रुपये होते... ते बाहेर काढून पुन्हां खिशांत कोंबत, तो खिन्नपणें रस्ता चालत जात होता...

चालतां चालतां, त्याच्या कानावर, म्होरक्याच्या अखेरच्या गाण्यातले ते शब्द, पुन्हां पुन्हां उमटून जात होते—'तिथंच हाय त्याचं गन्गोत-थितंच हाय त्याचं गन्गोत ! '—

मंगल पुढें पुढें चालत होता; व त्याचे पाय यंत्राप्रमाणें आपोआप वळत होते—

त्याच्या तोंडून, पावलापावलाला, पुटपुटते शब्द बाहेर पडत होते— " भैरवाडी ! भैरवाडी ! ! माजं भुत्याचं श्येत;- भुत्याचं शेत ! !...हां... भैरवाडी ! "—

'भैरवाडी' अशा अक्षरांची ती पाटी समोर दिसूं लागली;-त्याखालींच, जीवन-प्रकाश यांनीं लावलेली ती मोठी पाटीहि दिसूं लागली—

त्यावरची झोपडी; भाकर कांदा वाढलेलें ताट-लोटा; पिकाव-फावडं; उभें शेत व बसला मनुष्य; उडवीची पाटी हातांत धरलेल्या शेतकऱ्यासमोरची धान्याची रास...

एक एक त्याला दिसत होतें;...आणि त्याखालींच, मंगलच्या रोजच्या पायाखालच्या परिचित रस्त्याचीच दिशा दाखवणारें तें हाताचें पहिलें बोटहि दिसत होतें...

श्रांत, गलितगात्र झालेला मंगल, समोरच एका दगडावर बसून, तें पाहात होता; त्याच्या भेसूर भकास दिसणाऱ्या चेहऱ्यावर हास्य, उत्सुकता, उत्कंठा चमकत गेली होती...

अखेर तो जागचा उठला व त्या दिशेनें चालूं लागला !—

....१२८

आपली दाढी हळूहळू गोंजारण्याचा चाळा करांत, विवेक प्रेमळ डोळयांनीं समोर पाहात होता-त्याच्या सोज्वळ चेहऱ्यावर सहानुभूति व गांभीर्य दोन्हीं प्रतिबिंबित झालीं होती.

आतां बोलणें थांबवून, मंगल स्वस्थ निःशब्द पडून राहिला होता; तो विवेककडे टक लावून निमूट पाहात होता.

"मी अजून बी मेलों नाय्; मला अजून कोन् पकडत बी नाय् !-" क्षणभरानें, मंगलच विवेकला आर्त स्वरांत म्हणाला... "मला जगायचं हाय्, इवेकदादा ! ..पर् मी मरत बी नाय्; ...आन् आतां उजळ माथ्यान् कुटं जगूं बी शकत नाय् !...काय करूं तरी काय मी, दादा—?"

पण विवेक गंभीरपणें हसला; मंगलच्या खांद्यावर थोपटीत तो म्हणाला— "पण तूं रे कोण, ...काय करणारा, मंगल ? तूं रे कोण जगणारा ? ...तूं रे कोण मरणारा, वेड्या ? अरे ऽ व्हायचं तें तुझ्या हातून आजवर होत आलंय् ! ...व्हायचं तेंच तुझ्या हातून यापुढेंहि अजून होत जाणार आहे ! ...जगायचं तितकंच तूं जगणार आहेस; ...आणि मरायचं तेव्हांच तूं मरणार आहेस !



...पण मग, जगांत आहेस,-बाहेर आहेस असा;..तंवर, आतां प्रत्येक क्षणाला असं कांहीं कर, कीं तुझ्या हातनं इतरांचं कांहीं तरी चांगलं होईल ! तेवढं करत राहाण्याचं तेवढं मात्र तुझ्या हातीं नक्की आहे ! होय ना ? ...पटलं का तुला ? ...सोड हे वेडे खिन्न विचार !—"

आपल्या उजव्या व डाव्या थोट्या हातांत, मंगलनें भावनावेगानें विवेकचा हात घट्ट धरला. त्याचवेळीं, त्याच्या विद्रुप पण धीरगंभीर, प्रशांत चेहऱ्यावर, संमिश्र प्रसन्नतेचीं चकचकींत उन्हें पडलीं होतीं. तो अगदीं श्रावणातल्या सूर्यप्रकाशासारखा उजळला होता.

मग, हळूच त्यानें बघतां बघतां, आपल्या उशाला हात घातला. शंभराच्या चार नोटा काढून, चटकन् त्या स्तिमित विवेककडे दिल्या; व स्वाभिमानी डोळ्यांनीं त्याच्याकडे पाहात तो म्हणाला—"घ्या विवेकदादा,-चोरीमारीचे न्हाईत ह्ये-बरं ऽ !... माज्या घामाश्रमाचे, भरपाईचे मिळालेले हे पैसे ! ...आपल्या साऱ्या गड्यांच्या पडत्याकाळीं कामाला येतील-तुमच्याकडेच ठेवा.."

विवेकनें ते प्रसन्न मनाने हसून आपल्या खिशांत ते घातले; त्याच्या खांद्यावर हळुवारपणें थोपटलें; व तो उठला.

[ -१२- ]

# मंगल-ग्राम

....१२९

" भैरववाडीकडल्या कुळांच्या हितल्या संसारावर जप्ती आणून, गुराढोरांचं नि भांड्याकुंड्यांचं लिलांव करनार म्हनतोय्, केसूनाना! आन् गांवचा कुलकर्णी म्हनतोय्—' तुंबलेला सारा चारशेंऐशीं व्हतोय्; तो नव्या मालकान् पाऊसकाला आदी भरलाच पायजे! '...समद्यांच्या पाणकळेच्या शिद्याची बेगमी बि कराया हवी;..गुरांना गवात-पेंडा भरला पायजे हाय्;...चारी बाजून् बगा—खर्चाची अशी एकदम आग पेटाया बघतेय्!—परकासभाई येकले!.. किती म्हनून; आन् कुटं कुटं..नि कस कसं पुर पडनार? त्ये काय इनामदाराचे बेटे न्हाईत! आपल्यातलेच येक—" अगदीं चिंताग्रस्त खिन्न चेहरा करून, दुपारच्या विसाव्याच्या वेळीं, झाडाखालीं बसल्या-बसल्या जीवन बोलत होता. " बियानं साटवलं...बेगमींचं पैस हैत्..पर मंग—"

त्याच्या शेजारीं, जमिनीवर ऐसपैस पसरून, मंगल सगळें कांहीं एकाग्रचित्तानें ऐकत होता. जीवनच्या एकेका बातमीनें त्याचा चेहरा, ढगाळलेल्या आकाशासारखा, भरभर पालटत जात होता...

" मरतपडल्या काका दिवानजीचीच कार्‌वाय हाय् ह्यी संमदी, मंगलदा!–" जीवन पुन्हां रागारागानेंच पुढें म्हणाला–" तो केसूनाना त्याचा बगलबच्चा!... त्याच्याच हातान् तो उटवतोय्, ह्यी जप्तीची आन् कुलकर्न्याची भुतं भुत्याच्या शेतावर!...हसत हसत दांत पाडनारे बदमाश हायेत ते साले!!–त्यांना परकासभाईला हितुन् बेडापार करायचं हाय्;...फिरून भुत्याचं श्येत ओस पाडायचं हाय्—"

तटकन् उठून बसत, मंगल म्हणाला–" आपलं-भुत्याचं शेत?...आन् फिरून ओस?...नांव नको काढूं!...त्यें नाय् व्हनार पुना, जीवनभाऊ!—तूं-मी... परकासभाई-इवेकदादा, हितं जिवंत हाओत तंवर..."



"आनी बी येक भूत उटवतोय,..तो केसूनाना! हितल्या पोरीबाळींना आन् नवक्या बाया-बापड्यांना तो रोजचा सांगत फिरतो—म्हनं,...रांतची..येक झिंज्या सोडलेली, रक्तान न्हालेली बाई, पदर वाऱ्यामंदी फडफडवीत, भुत्याच्या शेताच्यां बाजूस दवदबा धावत सुटत्ये...आन् ' सोडा धनी...सोडा!...नका मारूं!—' म्हनत, नदीतून वाऱ्यावानी येऊन, भैरवाडींत शिरत्ये..!" जीवन सचिंतपणें म्हणत होता—" साऱ्यांनी घाबरून धास्ती घेतली हाय्–बाया मानसंच तीं!"

ऐकतां ऐकतां, मंगलनें एकदम डोळे घट्ट मिटून घेतले व आपल्या थोट्या हातानें चेहरा-डोळे झाकून, तो पुटपुटला..." नको रेऽ जीवन...नकोत त्या जुन्या आटवनी!—" आग लागतीया उराला...

" पर् मी रातीबेराती,...पहाऱ्याला धाय दिशा फिरतो;–यातलं काय् बी खरं नाय्, मंगादा!" मंगलच्या खांद्यावर स्नेहानें हात ठेवून जीवन म्हणाला–" ही समदी त्या केसूनानाच्या मनचींच भुतावळ! त्याचा डावच हाय्, तो बी येक! ...त्याचं वो काय घेऊन बसलाव् तुमी, मंगलदाऽ?..."

" पर आतां या येकदम इक्त्या पैशाच्या नडीचं रे काय करायचं, जीवन?..." पुन्हां भानावर येत, मंगल सचिंतपणें म्हणाला—

" हां! त्याचाच त् घोर लागतोय्, रातदिसा...माज्याबी जीवाला!" ...जीवन दुःखी चेहऱ्यानें म्हणाला—" परकासभाई बी कपाळावर हात घेऊन इचार करत बसतात! ..."

....१३०

दोघेहि कांहींवेळ बोलत नव्हते;...शांतता नांदत होती.

इतक्यांत, जीवनला एकदम गदागदां हलवून, मंगल चमचमत्या डोळ्यांनें व उतावीळपणें म्हणाला—" ऐक जीवन,...आतां मी सांगतों, ऐक;...आन् तें गपचीप कर, ...आतांच्या आतां – "

असें म्हणत आपल्या बंडीच्या आंतल्या खिशांतून जपून ठेवलेली एक दुमडलेली कागदाची घडी मंगलनें काढली. जीवन चपापून भांबावून, त्याच्याकडे पाहातच राहिला.

जीवनच्या ती हातीं देत तो म्हणाला, " घे...ह्ये बग...ह्ये कर— "

जीवननें ती घडी थरथरत्या हातानें उघडली व आपल्या समोर धरली–

त्या लांबट चतकोर कागदाच्या डाव्या बाजूस, मंगलचा तरुणपणचा रुबाबदार फोटो छापला होता. दोन्ही हात छातीवर गुंतवून, ऐटबाजपणें हसत तो उभा होता.

आतिशय दचकून, जीवननें मंगलकडे तिरक्या नजरेनें पाहिलें व नवीनच शिकलेल्या ' र–ट–फ ' पद्धतीनें, उजव्या बाजूची कागदावरील मोठ्या टायपातलीं छापील अक्षरें तो वाचूं लागला—

**हा मंगळ्या बाबज्या !—**

**एक खुनी, अट्टल, बदमाश दरोडेखोर !**

**तुरुंगातून नुकताच पळाला आहे !**

**जिता किंवा मेलेला पकडून द्या !**

जीवनची छाती धडधडत होती; तरी त्याने, एकदम तळाशीं छापलेली,... जाड टायपातलीं उरलेलीं अक्षरें वाचलीं–' **इनाम रु. १००१** '

...१३१

" नाहीं...नाहीं...मंगलदादा—हें माझ्या बाच्यान् नाय् व्हायचं कंदी !–" हातांतला कागद मंगलकडे उलटा भिरकावून, जीवन भयभीत आवाजांत एकदम चित्कारला—

" ऐक-जीवन...ऐक—" मंगलनें तो कागद पुन्हां खिशांत घातला व जीवनला म्हटलें..." तुज्या–माज्या, वेताळाच्या,.. या भुत्याच्या श्येतासाठीं ह्यें तुला केलंच पायजे !...साऱ्यांसाठीं, परकाशभाई—इवेकदादांसाठीं, ह्यें कर... नाय् तरी बी, जीवन, मी गुनेगार! माज्या शिरावर,..सदाचीच ऱ्हानार ही लटकती तलवार!..तवा चल, आन् तिचा दाम आपल्या पदरांत घ्ये–ऊठ ..आतांच चल -'

मंगलचा हात रोषानें बाजूस ढकलून, जीवन जागचा उठला व एका निश्चयानें म्हणाला—" न्हाई...न्हाई...मंगलदादा !...माज्या कच्याबच्यांचा जीव बचावायला बी न्हाइ करनार मी ह्ये वंगाळ काम–! मानसाचा व्हत् नाय कदीबी दाम ! !"



आणि बघतां बघतां तो एकदम तिथून दूर निघूनहि गेला—

निश्चल आर्द्र दृष्टीनें, जीवनच्या जात्या पाठमोऱ्या आकृतीकडे,...मंगल पाहातच राहिला होता—

....१३२

अजूनहि, मंगल तसाच तिथे झाडाखालीं पाय पसरून बसला होता.

इतक्यांत, पांगानें जवळून जातांना त्याला हसून हांक मारली—" काय दादा;-बसलांव् ?–जीवाला बरां हाय् ना ?..."

भानावर येऊन, मंगल समोर पाहातो, तों पांगा त्याच्या जवळच उभा ! त्याच्याशीं सहजस्फूर्त स्मित करतां करतां, मंगलच्या डोक्यांत एक नवाच विचार चमकला.

तो त्याला हळूच म्हणाला–" ये ऽ पांगा !–बस—"

आणि मग, जवळ येऊन बसणाऱ्या पांगाला मंगलनें विचारलें—" पांग्याऽ–तूं तरी माजा खरा दोस्त हायेस का रे ?–"

कृतज्ञ डोळ्यांनीं मंगलकडे पाहात, पांगा पटकन् म्हणाला—" त्ये मी काय सांगूं, मंगळदा ? ...ती कोठाराची त्ये दीसची रात हाय माज्या ध्यानीं ! कोनी बी दुसऱ्यान् माज्या तोंडाला काळोखीच फासली आसती ! ...पर तुमी सारं गुपित राकलं ! धरलेल्या चोराला बी गपचीप सोडलं ! ...मग तुमच्यासाटीं मी काय करनार नाय् ? "

" येकल्या तुज्या भुकेसाटीं तूं चोरी करीत व्हतास !...तर हितल्या आपल्या समद्यांच्या भुकांसाटीं–सुकांसाटीं रे तूं काय करशील, पांग्या ? " मंगल त्याच्या डोळ्यांकडे निरखून पाहात, त्याच्या मनावर बिंबविण्यासाठीं, अधिकारवाणीनें म्हणाला.

" काय करनार नाय् मी मंगलदा ? काय करूं ? ?...तुमी सांगाल त्ये करीन, हुकमबरहुकम !...काय सांगतां कामगिरी मला, दादा ? बोला–"

" पर आदीं वचन दे, पांग्या ! ...आखीरपावेतों या कानाचं त्या कानाला करनार न्हाईस म्हणून ! " ...मंगल त्याच्याकडे आपले करडे डोळे रोखून म्हणाला,

"द्या कीं वचन, मंगलदा ! .. देवसाक्ष वचन घेतों !" पांगा मंगलच्या पायाजवळ वांकून, तिथें स्पर्श करीत म्हणाला—

त्याला प्रेमानें पटकन् वर उठवून, आपल्या उजव्या बाहूत आवळून, मंगल गंभीर हसत म्हणाला—"अगदीं आज रात्रींच दूरदूर जायचं हाय् आपल्याला,.. पांगा ! ...मी सांगेन तवांच परत यायचं बरं तूं—"

....१३३

"मंगल नि पांगा एकाएकीं नाहींसे झाल्याला आतां आठदहा दिवस होत आले...सगळी शोधाशोध झाली—अजून कांहींच धागा लागत नाहीं—" प्रकाश विवेकला सांगत होता. "पण तेव्हांपासून एकेक आश्चर्य मात्र होताहेत. भुताच्या शेतांत—"

"म्हणजे ? .." विवेकनें कुतूहलानें विचारलें.

"तो केसूनाना गेल्या आठवड्यांत माझ्याकडे आला नि आपणहूनच म्हणाला, 'जप्ती आणत नाहीं तुमच्या कुळांवर ! -महिना दोन महिन्यांत निम्मी बाकी चुकती झाली त्यांची, तरी चालेल. काकाजींना !' त्या कुळकर्ण्यानें तर सरकारसाऱ्यापैकीं दोनशें रुपयांची पावतीच आणून दिलीन् एकाएकीं माझ्याकडे; नि वर म्हणाला—'उरलेली बाकी,..खुशाल दसऱ्यानंतर, नव्या धान्यांतून जमेल तितकी भागवा—' जवळजवळ दीडशें रुपयांच्या गवत-पेंड्याच्या राशी येऊन पडल्या आहेत. त्या गाडीवाल्यांना मी भाव-रक्कम विचारली, तर ते म्हणाले, 'आमच्या रकमा आधींच चुकत्या झाल्या आहेत. कोणीसं येऊन,.. देऊन गेलं !'—हें सारं आहे तरी काय ? होतंय काय ? समजतच नाहीं मला !—"

"अरेऽ आपल्याला चटकन् समजून न येणाऱ्या गोष्टीहि कधीं कधीं अतिशय अर्थपूर्ण असतात, प्रकाश !" गंभीर स्मित करीत,-विवेक त्याच्याकडे पाहून म्हणाला—"पण तुझ्याकडे शहाजोगपणें बोलणारा तो केसूनानाच मला म्हणत होता, कीं-त्याला म्हणे भुताच्या दरोडखोर नातवाचं भूत दिसलं; नि तेंच त्याला म्हणालं ...'कर्ज फेडीला गपचूप मुदत दे ! ..नायतर याद राख ! ! छाताडावर बसेन !...मुडदा पाडेन तुझा—"



"काय ?"...प्रकाश साश्चर्य म्हणाला—

"हो, आणि कुलकर्ण्याच्या पावतीचं नि गवत पेंड्याचं म्हणत असशील, तर ते पैसे मात्र मीच चुकवले, बरं"–विवेक हसून म्हणाला—

"तुम्ही ?..." प्रकाश गोंधळून त्याच्याकडे पाहात म्हणाला—

"होय ! पण म्हणजे माझे नव्हेत ते ! माझ्या हातीं आलेल्या एका रकमेतले...तसल्या आपल्या कामासाठींच कोणा एकानें माझ्याकडे ठेव ठेवलेल्या एका रकमेतले..." एवढें बोलून विवेक पुढें गप्प झाला.

—इतक्यांत, बाहेर कसली गजबज ऐकूं येऊं लागली . म्हणून दोघे उठले—

शेतांतले लोक, आपापलीं कामें टाकून, कचेरीकडे धावत येत होते...

निरनिराळे शब्द ऐकूं येत होते..."पांगा आला...!" "एकटाच ?" 'काय रे, पांगा ? बोल ना ! ...कुठे गेला होतास ?—" "मंगलदादा कुठे ?"

"कोण ? पांगा आला ? ..." असें म्हणत प्रकाश व विवेक दोघेहि दचकून बाहेर पडले. पायऱ्या उतरले.

....१३४

शेतातल्या कामकरी स्त्रीपुरुषांच्या घोळक्यामधून, खिन्न म्लान चेहऱ्याचा पांगा चालत होता. कोणी कांहीं ना कांहीं त्याला विचारत होते; तरी त्यांना उत्तर न देतांच, पायाखालीं पाहून, तो गपचूप पावलें टाकत होता—

पायऱ्या उतरुन, प्रकाश व विवेक पुढें झाले; तेव्हां, पांगाचें लक्ष त्यांच्याकडे गेलें...

त्यांना पाहातांच मात्र, त्याचा चेहरा भरभर पालटत गेला; बघतां बघतां, तो रडवा झाला;...त्याच्या डोळ्यांतून घळघळां अश्रू ओघळूं लागले.

क्षणभरच, जागच्या जागीं, तो निश्चल थबकला नि मग, एकदम विवेक-प्रकाशांकडे दबदबा धावत येत, तो ओरडला—"भाईऽ, भाई ! इवेकदादाऽ —आपले मंगलदादा गेले !...आपल्याला कायमचे सोडून गेले ! !-"

दोघांच्या समोर येऊन, पांगा उभा राहिला होता व ओक्साबोक्सी रडूं लागला होता-त्याच्या तोंडून, त्यानंतर प्रथम थोडा वेळ, कसलाच शब्द बाहेर फुटला नव्हता.

त्याला वर उठवून जवळ ओढीत, संथ गंभीर शब्दांत, विवेक त्याला शांत करून म्हणाला-"शांत हो, पांगा, शांत हो !-तूं आलास हें फार बरं झालं !...पण मग आपला मंगलदादा कुठे ?...नीट सांग---कुठून आलास ?"

मनातलें दुःख न आवरून, एकदम हुंदका देत, पांगा म्हणाला-" मंगलदा ग्येले;...आपल्याला कायमचे सोडून पुन्हां तुरुंगांत गेले ?...मीच मीच...त्यांना ह्या - हातांनीं तुरंगात ढकललं !...पोलिसच्या हातामंदी देऊन आलों "—

" काय ?...म्हणजे ??"... प्रकाश संमिश्र विचारविकारांनीं गोंधळून उद्गारला, " मंगल ?...तुरुंगांत ?? म्हणजे ??"—

" व्हय्, भाई...मंगलदा माजा भावच !...बाबज्या भुत्या वेताळाचा पोर तो.॰." आपले डोळे पुसत, जवळ उभ्या असलेल्या जीवननें प्रकाशला अड खळल्या शब्दांत सांगितलें " तुरगांतूनच पळून आला व्हता तो हितं "—

" काय ? भैरवशेठ नि हौशींचे खून करणारा नि गाड्यांवर दरोडे घालणारा ' मंगळ्या बाबज्या ' तोच आपला प्रेमळ कामसू मंगळदादा ?...' प्रकाशला आश्चर्याचा धक्का बसून तो ओरडला...

" होय प्रकाश, तोच !-अट्टल वाटणारे गुन्हेगार, अमानुष वाटणारे खुनी नि साधी संसारी, प्रेमळ, त्यागी गोड माणसं-यांत केवळ बोटभरच अंतर असतं पण हें आपल्या कधीं लक्षात मात्र येत नाहीं !!—" विवेक गंभीर चेहऱ्यानें तसे उद्गारला; त्यावळीं दाढीनें विभूषित असलेला त्याचा चेहरामोहरा व त्याचे ते सात्विक डोळे अधिकच फुळले — चमकलें.

....१३५

क्षणभरानें मन आवरून, पांगानें साऱ्यांना हळूहळू सांगितलें—" मंगलदादांना वचन देऊन, त्यांच्या बरोबर मी निगालों; पन तवां, मला आंदेशा बी न्हवता—करायच्या कोनत्या त्या कामगिरीचा !...तीन दीस आमी रातदीस चाललो-तवा मंग कुटं मंगलदान् मला समदं सांगितलं...मी आदीं घाबरलों;- नाय म्हनूं लागलों; पण, त्यांनीं मला फिरून शपथ घातली. तवा मग,...आम्हीं त्या जेलरकड गेलों...तो मंगलदाला म्हन—' मंगळ्या बाबज्या तो हा नव्हच ! फुकाट-कोन कुनाला तुरगांत घ्येईल ? '...तवां मंगलदानीच...जुन्या जुन्या



गोस्टी त्याला आठवून दिल्या;—मदली हात तुटल्याची हकीगत बी सांगितली ...तवा कुटं त्याला ओळक पटली-' काय ह्यी तुजी थिती, मंगळ्या ?' तो सायेब बी बिचयारा हळहळून बोलला...आन् मंगलदाच्या हातांत मंग कड्या पडल्या-"

बोलतां बोलतां पांगा थांबला; त्यानें कमरेला बांधलेला आपला कसा सोडला; त्यातून दहा दहाच्या शंभर नोटांचा जुडगा काढून विवेकदादाच्या हातीं दिला; नि तो खिन्न मनानें म्हाणाला-" ह्ये तुमच्याकडे आन् भाइकड् द्यायला मंगलदांनीं मला सांगलंय-ते म्हनले—' भुत्याच्या खुनी दरोडखोर नातवाची ही आपल्या समद्या संवगड्यांना जातां जातांची भेट ! ...विवेकदादांनीं आगींत पडलेला माजा देह वाचवला म्हनूनच त्याची ही तरी किंमत झाली ! ' ...आन मंग ते म्हनाले- ' भाईंना इवेकदांना बोलावं—पांग्याआन्ताय् तो हा पैका,...पापान् माखलेला नाय् ! ...अगदीं निर्मल हाय् ! ...त्याची किंमत येकल्या मंगळ्यानें अपखुषीनं दिली हाय् ! ...तवा तो पैसा...समद्यांच्या सुकाच्या कारनीच लागल !...कारनी लावाच ! ...हयगय करूं नका ! —' आनी विवेकदादा, मंगलदांनीं आखीर तुमला हात जोडून सांगायला सांगलंय मला !—ते म्हनले-" तुमी माजे खरे गुरु !...मी मरन तवा मरन...पन जगांत हाय् तंवर दुसऱ्यांचं कल्यान करायचं माज्या हातचं मी केलं ! ...तुमचा उपदेश पुरा पटला मला ! ...आतां झाली त् पुडल्या जल्मी आपली समद्यांची फिरून भेट !...राम राम-"

....१३६

प्रकाश, विवेक, जीवन, गंगा, साऱ्यांचेच डोळे, ऐकतां ऐकतां, आसवांनीं डबडबून आले होते.

जमलेल्या मंडळींत अधूनमधून एखाददुसरा दडपलेला हुंदका किंवा आर्तस्वरांत अस्पष्ट उच्चारलेली-' मंगलदा !—' ' मंगलदा '-अशी हांक ऐकूं येत होती.

" मित्रांनो, होऊं नयेसं सर्वांनाच वाटत होतं; तरी पण, झालं तें योग्यच झालं ! "—तोंच, विवेक एकदम गंभीरपणें चौफेर पाहून, गद्गद स्वरांत म्हणाला—" माझ्यामतें म्हणाल...तर हा प्रसंग दुःख करण्याचा मुळींच नाहीं ! सुखसमाधानाचाच आहे ! तुरुंगांतून येऊन, आपल्या गोड सहवासाची चुणुक दाखवून, आतां परत तुरुंगांत गेलेल्या नि फांसावर लटकलेल्या मंगलदाची

पण तीच इच्छा होती. गुन्हेगारी हें त्याच्या आयुष्यातलं एक स्वप्न होतं!... पण भुत्यावेताळाच्या वंशाचं नांव अखेर त्यानें उजळलंच !...त्याचा उद्धारच केला ! —तेव्हां, या आठवणीसाठींच, या भुत्याच्या शेताला आजपासून आपण म्हणूं लागूं या— 'मंगलग्राम '

'मंगल-ग्राम !' 'मंगल-ग्राम !' साऱ्यांच्या तोंडून सहज स्फूर्तीनें अनेक प्रतिध्वनि उठले—

साऱ्यांचे चेहेरे, मधलें खिन्नत्व झुगारून, पुन्हां नवनव्या एकदम आशांनीं फुलून आले...

## ....१३७

आणि त्या संमिश्र आनंदी वृत्तींतच विवेकच्या तोंडच्या पहिल्या सहज-स्फूर्त उद्गारांतून, त्या एकत्र जमलेल्या साऱ्या समुदायाच्या रसरशित भावनांचें एक छोटेंसें गाणें, हवेंत पंख पसरल्याप्रमाणें भरारलें—

मंगल-ग्राम !—मंगल-ग्राम !—
जीवन हा मंगल-संग्राम !...ध्रु.
प्रेम त्याग-अमृतांत न्हालें...
भरलें, सजलें, अमुचें धाम ! ध्रु. ॥ १ ॥
जें जें अमुचें तें सर्वांचें-
नव नव देईल आम्हां राम ! ध्रु. ॥ २ ॥
पितरांची थोरवी कशाला ?-
निशिदिन ढाळूं अमुचा घाम ! ध्रु. ॥ ३ ॥
दुबळ्यांची ना उरली दुनिया—
हृदयीं ठेवूं श्रद्धा ठाम ! ध्रु. ॥ ४ ॥
सुख सर्वांचें तेंच आमुचें—
तिथेंच अमुचा पूर्ण विराम ! ध्रु. ॥ ५ ॥

जीवनला आपल्या बाळपणापासूनचे हजारों सुखदुःखाचे प्रसंग आठवले; मंगलची अखेरची आग्रही भेट स्मरली; नि त्याक्षणीं, अखेर त्याच आपल्या पिढिजाद भुत्याच्या शेतांत, मंगळग्रामाचें तें नवें गाणें गातांना अपूर्व समाधान वाटून, भावनांचें न्यारेंच भरतें त्याच्या मनांत भरलें—



पांगा साराखा मुसमुसत होता—मंगलचा तोच अखेरपर्यंतचा सोबती झाला होता. पांगाला तोच आपला खराखुरा गुरु नि हितकर्ता वाटत होता.

गंगा आपल्या नामदेवाला पोटाशीं धरून, डोळे पुसत गाणें म्हणत होती. मंगलमुळेंच त्याला जीवदान लाभलें होतें.

त्या अकल्पित घटना परंपरेनें प्रकाश गोंधळला होता, तरी तिथल्या साऱ्याच्या आयुष्यांत, त्यावेळच्या तरी निश्चित व सापेक्ष सुखाचा पाऊस त्याक्षणीं सुरू झाल्याच्या सामाधानांत तो होता. पण मंगलच्या अकस्मात अकालीं गमन-वियोगानें व त्याच्या नव्यानेंच झालेल्या खऱ्या ओळखीनें त्याला मनांत सारखी हुरहुरहि वाटत होती.

आणि त्या सर्वांकडेच, व्यापक गंभीर मुद्रेनें चौफेर कटाक्ष टाकतांना, विवेक मधूनच आपल्या गूढगूढ अंतरांतहि नकळत डोकावत होता.

तरीपण, तत्काळ भानावर येऊन, साऱ्यांबरोबरच त्या मंगलग्रामाच्या मंगल भावनांच्या जयघोषांत तो समरस होत होता—

## म ध्यं त र

[ -१३- ]

# — दयेच्या अस्मानी धारा —

...१३८

सभोंवार एकच एक गडबड उडाली होती.

मंगलग्रामाच्या साऱ्या विस्तारांत, ...शेतांशेतांतून उरलींसुरलीं पावसा-पूर्वीची कामें चाललीं होतीं—

बांधाची साफसुफी करण्यांत, जमिनीतली डिखळं फोडण्यांत, वईचा बंदोबस्त करण्यांत पुरुष गुंतले होते.

हळद-मसाले कुटण्यांत, पापड-सांडगे एकत्र बसून तयार करण्यांत, कडधान्यांचीं वाळवणं घालण्यांत व जमा करण्यांत, ...आपल्या झोंपड्यांची लिंपणं मातीशेणाचा नवा काला करून पुन्हां लिंपण्यांत,... जवळपासच्या रानांतून लांकूड-फांट्याचे भारे डोक्यावरून आणून माचावर भरण्यांत, . शेण गोळा करत फिरून त्यांच्या शेण्या थापण्यांत, .. सुकल्यावर त्या जमा करून टोपल्या भरभरून घरांत नेऊन सांठवण्यांत, .. शेणखई उपसून तिच्या टोपल्या मशागत केलेल्या शेतांत सारख्या पसरण्यांत, पाचोळा गोळा करण्यांत, साऱ्या बायका-पोरी गुंतल्या होत्या.

लहानमोठीं मुलें रानांतलीं करवंदं, तोरणं, जांभळं, आंब्याच्या कैऱ्या पिशव्यात भरून आणण्यांत, व तें सारें मिठासह किंवा तसेंच करकरवून खाण्यांत, हवतसं हुंदडण्यांत व हुंदडतां हुंदडतां—उठल्या सुटल्या, गटगटां पाणी पिण्यांत गुंगून गेलीं होतीं.

जीवननें गवताच्या सांठ्यावर झावळ्यांचें छप्पर शाकारून घेतलें होतें. झडी बांधल्या होत्या.

एका खोलींत गुरांसाठीं दाणा वैरण,...दुसऱ्या खोलींत साऱ्यांना पुरेल असा धान्यसांठा, तिसरींत नांगर, खुरपीं, विळे, कुळव इत्यादि आवश्यक अव-जारें,...कचेरीच्या खोलींत घोंगड्या-कानटोप्यांचे ढीग, इरल्यांचे सांगाडे इ. गोळा केलेल्या वस्तू...असा सारा पावसाळी बंदोबस्त पुरा करत आणला होता—



विवेकनें कांहीं नेहमीं लागणारीं मामुली औषधें, इन्जक्शनें व अतिशय महत्वाचीं कांहीं औषधेंहि कचेरीतील एका घरगुती तयार केलेल्या कपाटांत भरून ठेवलीं होतीं—

हातीं असलेल्या रकमेची, प्रकाश-विवेकांनीं अशी अगदीं कांटकसरीनें या साऱ्या खरेदींत विभागणी केली होती. आणि आपल्या त्या साऱ्या खटपटी-बंदोबस्तानें भावी यशाची त्यांना खूप आशा वाटत होती; उत्तेजित वाटत होतें—

वर्षाकाळच्या ऐन तोंडाला,-मंगल ग्रामांत आपल्या आत्मत्यागानें मंगलनें अशी सर्व दृष्टीची मंगलकळा आणली होती !—

....१३९

आणि मग, एके दिवशीं, बघतां बघतां, वारा वाहूं लागली-सळसळूं लागला;...झाडें प्रथम हळूहळू डोलूं लागलीं-पिकल्या-सुकल्या पानांचा खालीं खच पडूं लागला—

मग वारा भरारूं लागला—कचरा धूळ, पानें, गरगरत वर उडूं लागलीं-चालतां चालतां, डोळे बंद करून घ्यावे लागूं लागले...झाडें अधिकच गद्गदूं लागलीं...निसर्गाची धुळवड सुरूं झाली—

आकाशांतील पांढऱ्या ढगांनीं, आपलें तोंड बघतां बघतां काळें केलें. मग एखाददुसरा तुरळक दिसणारा काळा ढग !...करतां करतां, एकाचा हात धरून दुसरा...तिसरा—करीत, चारी बाजूंनी,...त्यांच्या काळ्याकभिन्न फौजा उभ्या ठाकल्या...

एकमेकांच्या समोरांसमोर येऊन, परस्परांना त्या खाऊं कीं गिळूं लागल्या;.. त्या एकमेकांच्या उद्धट धडकी इतक्या प्रचंड असत, कीं त्यांचे भयानक आवाज कोसाकोसावर येऊं लागले. तें सर्व पाहून; सूर्य कोठल्या कुठें घाबरून पळून गेला.

तो कडकडाट जसजसा वाढला, तसतसा विजांचा सोनसळी नाच सुरूं झाला; नागमोडी वळणें घेत, त्या चपलतेनें लवलवूं लागल्या नि जगाचे डोळे रात्रीं बेरात्रीं दिपवून टाकूं लागल्या.

दूरून घोंघावत धावणारा भरभरणारा वारा अंगाला झोंबत होता; दम-सरपणा आणीत होता. तरीपण, आधीच्याच घामेजलेल्या अंगावर, तो डबडब-

लेल्या घामाच्या नवीन धाराच सोडीत होता–हेंहि नाहीं, तेंहि नाहीं,...अशा चमत्कारिक मनस्थितीनें, जीव मात्र कोंडल्यासारखा, कोंदाटल्यासारखा झाला होता–

इतक्यांत,–प्रथम चार दोन बिंदुंनी आपल्या अस्तित्वाची सलामी दिली; करतां करतां, सहस्र थेंबांची सरसर व त्यातूनच आकाशाच्या ओलाव्याची पहिली सर आली...

तिच्या स्पर्शानें पोरें आनंदानें नाचूं लागलीं. तीं अंगें उघडीं करूं लागलीं. कलकलाट करूं लागलीं.

काम संपल्यामुळें व उष्म्याच्या अतिरेकानें कंटाळल्यामुळें, इकडे तिकडे थपकली मारून इतस्ततः बसलेली मोठीं मंडळी लगबगीनें जागचीं उठलीं–

तापल्या ओलसर भूमींतून उठणाऱ्या उबदार वाफेचा अद्भुत आनंद देणारा तो न्यारा मादक वास नाकानें फिरफिरून जोरजोरानें हुंगूं लागलीं...

....१४०

भाई देखिल असाच एका झाडांखालीं ऐसपैस पसरला होता, तो पटकन् उठला.

कांहींजण जवळच्याच झाडांखालीं आडोशाला उभे होते. त्यांना उद्देशून तो हसत हसत उत्कंठित मनानें व उत्साही स्वरांत म्हणाला—" हं...आला' आला !—बघा रे— वारा घोंघांवत आला— "

पलीकडले हसून त्याला उत्तर देत म्हणाले–" हंऽ सूं ऽ सूं ऽ –घोंघावत आला ! "

तिसऱ्या बाजूचे चौफेर पाहात म्हणाले–" ढगांची छाया धरणीला–"

करतां करतां, सारेच आपल्या त्या न्याऱ्या आनंद-उत्कंठतेंत, मोठ्यानें गुणगुणूं लागले. त्यांच्याबरोबर भाईहि बोलूं लागला—

आणि तें गाणें त्या घोंघावत्या वाऱ्यावर व सरसरत्या सरींच्या ठेक्यावर बघतां बघतां चौफेर पसरलें—

" हं–आला ! ...आला ! ...घोंघावत आला !
सूं ऽ ! सूं ऽ ! ...घोंघावत आला !
ढगांची छाया धरणीला । वारा घोंघावत आला ! ध्रु०



हो ऽ हा ऽ दूत पुढें आला !
हो ऽ घेउन मोत्यांच्या माळा !
चला रे ! सोहाळा आला ! ...वाराऽदूत पुढें झाला ! ध्रु०

देहुली, शिणलेली, श्रांत–
धरणी झुरुन अंतरांत—
आजपर जळली विरहांत—
' भेटूं दे मज माझा कांत ! '
आधीर मन होई दिन–रात–
' येति कधि वरुन, वरुणनाथ ? '
हं ऽ आतां, दूत पुढें आला । –वारा घोंघावत आला । ध्रु० १

भोंवतीं भरभरूनी वारा–
उसळला पाचोळा–चारा !–
दयेच्या अस्मानी धारा !
भूमिवर प्रेमाचा मारा !–
घम् घम् सुटला बघ वास;
धुंदी चढली र डोईस !
हंऽ हुंऽ घोंघावत आला ! आला–दूत पुढें आला ! ध्रु. २

लव लव डोळ्यांची झाली–
अंतरीं आशा अवतरली !–
डोइवर डफ डुमडुमला !–
नाचते बघ, 'चपला–बाला !–
रुखावलि माना डोलविती;...
ओढे पैंजण वाजविती !–
होऽ आला ! दूत पुढें आला ! वारा घोंघावत आला ! ध्रु. ३

गालिचे मखमलिचे केले !
चकवे गवई बोलाविले !

मरुत्गण सनई आळविती !
समेवर संबळ वाजविती !–
अरे हा सोहाळा आला !
प्रियकर भेटे धरणीला !
हंऽ हंऽ दूत पुढें आला ! वारा घोंघावत आला ? ध्रु॰ ४
झुगारून झणिं जडता अपुली,...
धरणी आनंदें न्हाली;
चेतना नवनव अवतरली !
हिरवळ हृदयीं फुरफुरली !
रोपटीं सुखांत सळसळलीं;
नभांतुन मोतीं खळखळलीं !
हंऽ हाऽ सोहाळा सजला । वारा दूत पुढें आला. ध्रु॰ ५
चला तर धरणीचे दास,
मनीं ध्या एक दिव्य ध्यास !
पुरवुं या आईचे सोस !
उभवुं या मोत्यांची रास—.
करूं या धन्य तिची कूस !
बालकां गोड गोड घास ! !
हं ऽ वारा घोंघावत आला ! —फुटूं दे पान्हा माईला ! ध्रु॰ ६

## ....१४१

त्याचें गाणें चालूं असतानांच, सुंदर सुंदर दृश्यें चौफेर दिसत होतीं. —आणि खरोखर, मंगलग्रामाच्या धरणीचेंहि स्वरूप तसेंच पालटत गेलें होतें.

पावसाच्या सरीवर सरी पडल्या होत्या. डबकीं, ओघळ, ओहोळ अशा वाटेनें चौबाजूनें आलेल्या धांवत्या पाण्यानें, भैरवाडी व मंगलग्राम यांच्या मधल्या नदीला पूर आला होता. दोन पुरुष वर चढून, तो दुथडी वाहात होता. भैरवाडी नि मंगलग्राम या दोन गांवांचा जणूं संबंधच तुटला होता.



इतके दिवस साऱ्यांनीं मशागत केलेलीं भुत्याचीं शेतं पाण्यांत चांगली न्हाऊन निघालीं होतीं. संभाळून ठेवलेलीं बियाण्याचीं पोतीं जीवनच्या हातानें बाहेर पडलीं होतीं; शेतांच्या कुशींत शिरलीं होतीं, डोळे उघडून, नव्या जगाकडे पाहूं लागलीं होतीं.

श्रमाचे चार दिवस जाऊन, विश्रांति व मार्ग-प्रतीक्षेचा काळ आला होता.

चौफेर हिरवेंगार झालें होतें. सृष्टीचा शालू वाऱ्यावर फडफडूं लागला होता. हळूहळू रोप कंबरेपर्यंत आलें होतें. तण-साफसुफी निंदणी सुरूं झाली होती—

आणि प्रकाशसह सर्वांचीं स्वप्नें साकार होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं.

[ -१४- ]

# तगमग

....१४२

पण सुरवातीस...आपल्या अमाप कृपेचा अपार पाऊस मंगलग्रामावर वर्षणारा तो कृपाळू निसर्ग,...अखेर पुरा लहरीच असावासें दिसलें.

ऐन आषाढ–श्रावणांत देखील, वरुणानें सूर्याला आपली गादी दिली होती. अनपेक्षितपणें लाभलेली सत्ता तो अधिकच कडक मनानें चालवूं लागला होता. सकाळपासून संध्याकाळपर्यंत, अतिशय कठोर नयनांनीं, जगाकडे व प्राणिमात्रांकडे, तो वटारुन वटारुन पाहात होता;–आणि त्यांच्या तोंडचें पाणीच पळाल्यासारखें झालें होतें.

त्या आगीनलोळांत सांपडून मंगलग्राम हळूहळू करपूं लागलें होतें. सारीं माणसें हवालदील झालीं होतीं. तीं सभोंवारचीं भयद दृश्यें त्यांना उघड्या डोळ्यांनीं पाहावतच नव्हतीं !–

सहस्राक्ष सूर्यच तो ! आपल्या डोळ्यांतून तो आग पाखडत होता. एखाद-दुसरा पांढरा ढग, त्याचा प्रतिकार करण्यासाठींच इकडून तिकडे पंख पसरत जाई खरा ! पण कापसानें अग्नीशीं सामना करायला धजण्यासारखेंच तें ठरत होतें—त्याचीं शकलें शकलें होऊन, अखेर, निळ्या निरभ्र नभांत, बघतां बघतां, कापरासारखा तो विरूनहि जाई...त्यामुळें तर, शेतकऱ्यांच्या मनाची अधिकच भगभग होई.

उभीं पिकें कोमेजलीं होतीं–लवलीं होतीं;...अखेर, त्या कठोर आगीनेंच, त्यांच्या अंगाची लाही लाही होऊन, तीं श्रांत झालीं होतीं;—ग्लानी येऊन, धरणी मातेच्या अंगावर तीं लोळूं लागलीं होतीं; आंत कुठें तरी सांदीफटींत एखादा जलबिंदू सांपडला, तर तो तरी टिपावा व आपली क्षणाक्षणाची अपार तृष्णा शमवतां आली तर पहावी, अशा हेतूनेंच जणूं, तीं कवळीं रोपटीं धरणी मातेच्या पोटांत न्याहाळून न्याहाळून पाहात होतीं.



पण–दिवसांमागून दिवस गेले; आठवडे, पंधरवडे, दीड महिना, दोन महिने होत आले;–तरी असला कठोर चक्रनेमिक्रमच त्यांच्या वाट्याला येत राहिला होता. अखेर तीं अगदीं आसन्नमरण झालीं होतीं—

....१४३

हीं सर्व अनपेक्षित,...भयंकर,.. करुण दृश्यें पाहून, प्रकाशभाईचा जीवहि खालीं-वर व्हावा, तो हवालदील होऊन, एकटाच, त्या एवढ्या मोठ्या शेताच्या कोनाकोपऱ्यांतून दृष्टी फिरवीत, भिरभिरी फिरत राहावा, यांत आश्चर्य तें कसलें ?

त्या कोमेजलेल्या जमीनदोस्त रोपट्यांबरोबरच, मंगलग्रामांत आल्यावर रुजलेले वाढलेले त्याच्या मनांतील आशा–उत्साहाचे नवनवे अंकुरहि, आंतल्या-आंत, जळत्या मनोभूमीवर लोळूं लागले होते.

शालिनीच्या अकस्मात अंतानें, पुनः पुन्हां असंभाव्य वाटणाऱ्या त्या घटनेने, त्याच्या मनाला भैरी आली होती. त्याच्या साध्यासुध्या गोड संसाराची धूळधाण उडाली होती—बेचैन, निराधार, पोरक्या झालेल्या आपल्या तिमिरइतकेंच, त्याला स्वतःलाहि अगदीं एकाकीं वाटूं लागलें होतें. मनांतला आजवरचा त्याचा सापेक्ष उत्साह–आनंद ओसरला होता;...भोंवतालच्या नैसर्गिक वातावरणासारखेंच, एक प्रकारचें अज्ञात वैफल्य तिथें दाटूं लागलें होतें.

समाज–परंपरेला धरून, इतर चौघांसारखाच झालेला त्याचा तो विवाह; त्यातूनच उभारला गेलेला त्याचा तो गत संसार !...

शालिनी तशी फार शिकलेली, महत्वाकांक्षी, अद्यतन आचारविचारांची, फटाकडी, सौंदर्यखनी नव्हती, हें खरें; तरी पण, लग्नानंतर, बघतां बघतां, ती त्याच्याशीं एकरूप झाली होती. त्याला संसाराचें साधेंसुधें, सोज्वल सुख देऊं शकली होती. त्याच्या सुखदुःखांत... खरं म्हणजे, त्याच्या आयुष्यांतील दुःखा-अडचणीतच...तिनें त्याच्याबरोबर धीरानें वाटचाल केली होती–एवढंच नव्हे, तर कठोर प्रसंगीं, तिनें त्यालाहि धीर दिला होता.

पण तसल्या संथपणें उभारलेल्या त्यांच्या साध्या संसारांतील तिच्या अस्तित्वाचा तो एकमेव मध्यबिंदू एकदम तसा निखळतांच, सुकाणूं मोडलेल्या

नावेप्रमाणें त्याच्या मनाचें तारूं भडकलें होतें! ...तें आपल्या भूतभविष्यकाळच्या प्रसंगपरंपरेच्या आठवणी–स्वप्नांच्या अगम्य, प्रचंड लाटांच्या तडाख्यात सांपडलें होतें. क्षणोक्षण, तें अजस्र, असह्य थपडा खाऊं लागलें होतें—

मनावर पडणाऱ्या तसल्या भयाण ताणामुळें, अस्वस्थ झोपेंत, तो वारंवार दचकून उठत होता.

## ....१४४

त्याच्या मनची ती प्रमाथी रस्सीखेंच, कित्येकदां तर झोपेंत आश्चर्यकारकच रूपें घेई;...धावतीं अर्धवट स्वप्नें त्याच्यासमोर प्रत्यक्षासारखीं उभीं राहात—

त्या दिवशीं–आपल्या भोंवतालच्या त्या पर्जन्यहीन भकासदुःखद वातावरणाचा व मनांतल्या एकाकी रखरखत्या वाळवंटाचा खिन्न विचार करीत प्रकाशभाई आपल्या झोपडींत एकटाच पडलेला दिसत होता—

आणि त्याच्या डोळ्यापुढें विविध दृश्यांचा गोंधळ उडाला होता—

कॉलेजच्या खेळकर वातावरणांतील गजबज चालली होती–प्रकाश एकटाच एका झाडाखालीं बसून कागदांवर कांहीं लिहीत होता—तेवढ्यांत, एका चमकदार तरुणीनें, हळूच मागून येऊन, त्याला हांक मारली होती—" प्रकाश...दोन वर्षं विचारतेंय् सारखी! अजून उत्तर नाहीं दिलंत—सांगा ना?...होय्?... 'हो' ना??—"

प्रकाश दचकून तिच्याकडे वळून पाहूं लागला; त्यापूर्वींच ती त्याच्या निकट येऊन बसली होती–त्यानें मंद स्मित केलें; तरीपण त्याचा चेहरा मात्र पालटला–

अखेर, तो तिला म्हणाला—" नको विचारूंस, पुनः पुन्हां, छाया! ...सारं विसरून जाण्यासाठींच तें स्वप्न पडलं होतं, तुला–मला...आतां आणखी बाबाही गेले!...हालअपेष्टा सोसून...तुझ्या आईनें तुला फुलासारखं वाढवलं ...शिकवलंय्! तें अखेर, माझ्यासारख्या वैभवहीन माणसाशीं जीवन कंठायला, जाणूनबुजून दुःखात पडायला नव्हे!—त्याहून हजारपट सुखी होऊं शकेल तुझं जीवन!–छे छे! ...तूं आपली... आपण कधीं कुठं भेटलोंच नव्हतों असं समज—"

त्या तरुणीच्या डोळ्यांत अश्रू सांचून आले होते...ती उठून, खालच्या मानेनेंच दूर दूर गेली होती...तितक्यांतच, शालिनी तिच्याजवळ आली होती;



तिनें तिच्या गळ्यांत हात टाकला होता;...तिचे डोळे पुसले होते; ती तरुणी खुदकन् हसली होती—

आणि मग, त्या दोघीहि हातांत-हात घालून प्रकाशसमोर येऊन सस्मित चेहऱ्यानें उभ्या राहिल्या होत्या—

मग पाहतां पाहतां, शालिनी नाहींशी होऊन, एकटी ती तरुणीच त्याच्यासमोर उभी राहिली होती—

प्रकाश गोंधळला होता—तो ओरडून म्हणत होता—" तूं कशाला आलीस? जा, छाया जा!"—

## ....१४५

आणि त्यानंतर, प्रकाश भयंकर तापानें फणफणला होता...आजारी झाला होता. झोपेंत बडबडत होता–उतारच पडत नव्हता—सारेच गोंधळले होते –विवेकसारखी शुश्रूषा करीत होता—

" बरं वाटतंय् का आतां?–" बिछान्यावर पडलेल्या प्रकाशला, शेजारी बसलेला विवेक विचारीत होता–

प्रकाशच्या डोक्यावर पाण्याची घडी होती...गळ्यापर्यंत पांघरूण होतें.

एक हात हळूच बाहेर काढून विवेकचा हात आपल्या हातीं धरीत, तो हळूच स्मित करीत म्हणाला–" मला तसं काय झालंय? आतां बरा होईन मी!–"

विवेकहि हसला नी त्याला कपाळावर थोपटीत म्हणाला–" खरंच आहे मुळीं तें, प्रकाश!–तुला कांहीं एक झालेलं नाहीं;–ताप आहे हल्लीं, ...तो सारा तुझ्या मनाचा!"—

प्रकाशनें एकदम मान बाजूला वळवली—

पण विवेकने त्याला हळुवार शब्दांत विचारलें–" शालिनीवहिनी गेल्यापासून तूं फारच विमनस्क झाला आहेस; पण या गोष्टी आपल्या हातच्या का असतात, प्रकाश? अरे, मन कठोर केलं पाहिजे;...आयुष्यांतली प्रकरणंच्या प्रकरणं, मनाचा वारू आवरून, विसरून गेलीं पाहिजेत–आपण भूतकाळ साफ पुसला, तरच वर्तमानकाळ जगतां येणार,...नि भविष्यकाळ घडवतां येणार, अवतरणार, उजळणार!"

प्रकाशनें मान फिरवली; विवेककडे डोळे भरून स्नेहानें पाहिलें व त्याचा हात दाबून, तो हळूच म्हणाला—" माझ्या दुबळ्या मनाचा मला कधीं कधीं खूप राग येतो ! ..पण मग "

प्रकाशकडे पाहून, विवेक नुसता स्निग्धपणें हसला; पण मग, त्याचाहि चेहरा पटकन् पालटला; बघतां बघतां तोहि अंतर्मुख झाल्यासारखा दिसला.

" तुमचं आपलं बरं,...विवेक- " प्रकाश पडल्या पडल्या डोळे मिटूनच पुढें म्हणत होता —" ना कसले पाश–ना पायबंद—"

विवेक एकदम दचकला. त्याने तीं चलबिचल लपवण्याचा प्रथम थोडा प्रयत्नहि केला !

तरी पण, त्याच्या हातांत असलेल्या प्रकाशच्या हातालाच ती जाणीव झाली ! ...त्यानें डोळे उघडले व चमकून विवेककडे पहात त्याला एकदम विचारलें–" केवढ्यानें आतां दचकलांत, विवेक ?... कां ?... कां ? मला सांगा ना"

[ –१५– ]

# —अपघात ?.. कीं आत्महत्त्या ? ?—

...१४६

विवेक प्रथम घुटमळला. पण प्रकाशच्या डोळ्यांतील स्नेह व आर्जवी आग्रह पाहून, तो क्षणभरानें हळूच म्हणाला—" तुला वाटतं तितका मी निर्विकार नाहीं, प्रकाश !...म्हणूनच तर–माझ्या गाडलेल्या भूतकाळानें, या क्षणीं, मला दगा दिला,... दचकवलं ! मनाच्या खोल खोल कप्प्यात रुजलेल्या भावनाहि मोठ्या प्रमाथी असतात; —त्यांच्या क्षुल्लक आघातांनीहि, कधीं कधीं, ...असे मोठ्या प्रयासानें लावलेले आपले वरले मुखवटे कोसळून पडतात ! ..."

ऐकतां ऐकतां, प्रकाश एकदम अधीर उत्सुकतेनें उठून बसला. दाढीनें झांकळलेल्या विवेकच्या धीरगंभीर चेहऱ्याकडे, तो एकाग्रतेनें पाहात राहिला; नी त्याच्या तोंडून, नकळतच शब्द आले,—" म्हणजे ? ? "

अखेर, नाइलाज होऊन व स्वतःलाहि न राहवून, विवेक त्याच्याकडे पहात म्हणाला—" कुणाला कधीं मी सांगितलं नव्हतं–असं कांहीं आज तुला सांगतों ! चार चौघांसारखाच, मीहि एकदां संसारी होतों, प्रकाश –...पण माझ्या सुखाला, संसाराच्या ऐन सुरवातीलाचं, बघतां बघता–सहस्र भेगा पडल्या ! ...मला तें उघड्या डोळ्यांनीं पाहवेना... सारं ! –तें जीवन तसेंच आणखी क्षणभरहि जगूं शकलों नसतों मी ! तेव्हां–मोका यतांच, मीच माझ्या हातानें सारे पाश तटातट तोडून टाकले–स्वहस्तानेंच ! माझ्या त्या जीवनाला मी पूर्ण विराम दिला !...तीन निष्पाप जिवांची आत्महत्या होऊं नये, म्हणून,...निदान त्यांतले...दोघे तरी सुखी होण्याची मला शक्यता वाटली, ...म्हणून—मीच मेलों ! ...मी हेतुपुरस्सर आत्महत्या केली, प्रकाश ! —"

" काय ? ...तुम्ही? आत्महत्या ? ? – " प्रकाश दचकून ओरडला—" म्हणजे ? कसं शक्य झालं तें ? ? —"

" होय, —आत्महत्याच, भाई ! " विवेक गंभीरपणें म्हणाला—" पण मी एकदां तसा मेलों आहे ..म्हणूनच, आज असा जगूं तरी शकत आहे;–तसाच

जगलों असतों,..तर मात्र केव्हांच मेलों असतों ! -ज्याक्षणीं, माझ्यांतला विवेक जागा झाला, ...त्याचक्षणीं, मूळचा अविनाश विनाश पावला—"

"अविनाश ? ...म्हणजे काय, विवेक ?" –प्रकाश गोंधळल्या, भेदरल्या नजरेनें विवेककडे पहात होता.

"होय, प्रकाश ! ...तुझा आजचा हा विवेक मूळचा अविनाशच आहे ! डॉ. अविनाश ! स्मृतीला थोडा ताण दे-" –विवेक मंद स्मित करून म्हणाला— "दहा वर्षांपूर्वीचा भूतकाळ जेव्हां वर्तमानकाळ होता, तेव्हांच्या वर्तमानपत्रांत, एके दिवशीं सकाळीं —"

"आठवतंय्" —प्रकाश दचकून एकदम मोठ्यानें ओरडला–" डॉ. अविनाश?...म्हणजे तुम्हीच ते, विवेक ??"

"होय — तोच ! ..." विवेकनें धीरगंभीर स्मित केलं ..

...१४७

"मला तें सारं सारं आठवतंय्, विवेक ! -" प्रकाश अंतर्मुख होऊन कुठे तरी पहात म्हणाला.

आणि त्याक्षणीं, क्षणार्धांतच, त्याच्याहि डोळ्यासमोर तें पूर्वस्मृतीतलें वर्तमानपत्राचें पहिलें पान दिसूं लागलें होतें—

धडधत्या छातीनें, त्यानें वाचलेला तिथला तो शब्दन् शब्द त्याला याक्षणीं आठवत होता. डोळ्यासमोरच दिसत होता—

## — मृत्यूचा सांधा! मृत्यूची चाहूल!! —

* **कलकत्ता मेल व एक मालगाडी यांची भीषण टक्कर !**
* **एकूण १७० ठार; ३५० जखमी; ८० बेपत्ता—**
* **एक अनुरूप नवविवाहित सुशिक्षित जोडपें.**
* **त्यांच्या गोड संसाराचा हृदयविदारक शेवट.**
* **आपल्या अंताचीं चोरपावलं मानवी मनाला ऐकूं येतात ?**
* **मृतांमध्यें बडोद्याचे सुप्रसिद्ध तरुण फिजिशियन, डॉ. अविनाश !**



* "निघतांना आज मन सारखं हुरहुरतंय्–परत येईनसं वाटत नाहीं ! पुन्हां भेट झाली नाहीं,...तर,..माझ्या मनाची या क्षणींची तीव्र इच्छा मात्र लक्षांत ठेव;...हृदयांत ती सदैव बाळग–तुझं आयुष्य नैसर्गिक सुख-समाधानानें सदैव तुडुंब भरलेलं असावं, हीच माझ्या रसरसत्या मनाची धगधगती आशा–आकांक्षा आहे !—या सुकाणूंला धरूनच तुझी जीवन–नौका तूं हाकार;–देव तुला व मला यशच देईल."

  –डॉ. अविनाश.
* **छिन्नविच्छिन्न प्रेतें; पण कित्येकांच्या देहावरील स्मृति-वस्तू, पोषाख, खाणाखुणा इ. निर्विवाद पुरावे सांपडले**
* **पंचनाम्यानंतर, अपघाताच्या ठिकाणींच, सडलेल्या देहांचे अंत्यविधि झाले.**
* **डॉ. अविनाशांची अंगठी, फुटलेलें सेंटर-सेकंड घड्याळ, डायरी, बॅग इ. सर्व सांपडलें.**
* **केवळ एक सांधा वेळेवर बदलला गेला नाहीं, म्हणून सारें घडलें ! तो मृत्यूचाच सांधा ठरला !–**

...१४८

"जें घडलें तें सारं बऱ्याकरतांच घडलं-" विवेक गंभीरपणें म्हणाला— "याक्षणीं तरी मला तसंच वाटतंय् !"—

"पण तो तर एक अपघात होता—तिथें तुम्ही म्हणतां ती आत्महत्त्या कुठली ?..." प्रकाशनें गोंधळलेल्या चेहऱ्यानें विवेककडे पाहिलें व अधीरतेनें विचारलें—" आणि...आणि .. अपघात म्हणालां, तरी पण मग–तुम्ही—'

विवेकच्या गंभीर चेहऱ्यावर क्षणभर प्रशांत स्मित झळकून गेलें; प्रकाशकडे पाहून तो म्हणाला—" आत्महत्त्या पुढल्याक्षणीं व्हायची होती ! पण काय तो दारुण योगायोग ? तत्पूर्वींच, अकस्मात्, तो अपघात घडला ! तथापि, मला मात्र घडला नाहीं !...म्हणूनच, क्षणार्धांत, ..मी सर्वांगीण विवेक केला; नि ठरवलं ' संसाराचा अर्धा-मुर्धा मोह टाळायचा !...याक्षणापासून...यापुढें...तटस्थ होऊन, विवेकानेंच सारं आयुष्य एकाकीपणें जगायचं !'—"

" कां ?..!!कां बरं असं, अविनाश ?" प्रकाशच्या त्या स्वरांत खिन्नता होती; पिळवटलेल्या भावना होत्या; धडधडत्या छातीची उत्सुकता होती.

" कारण? कारण—माझ्या सुखी, यशस्वी, स्वयंकेंद्रित, गजबजत्या एकाकी जीवनांत–सहजासहजीं घडून आलेला माझा तो विवाह! तोच प्रथम एक भयंकर अपघात घडला होता! तिची, त्याची किंवा माझी,...कोणाचीच इच्छा-अपेक्षा नसतांना,...आमचीं तिघांचींहि मनं क्षणार्धांत मेलीं होतीं! . ऐन तारुण्यांत ..संसाराच्या प्रवेशद्वारींच स्वतःला तसं मनानें मेलेलं मी पाहिलं नि माझ्यातला यशस्वी शास्त्रज्ञ जागा झाला! त्याच मनाच्या भावनावेगांत, स्वतःला इन्जक्शनं घेऊन, प्रवासांतच, माझं शरीरहि मी गपचूप मारणार होतों!–पण...पण,...ऐनवेळीं, झालं तें सारं विपरीतच!...योगायोग न्याराच होता–" विवेक बोलतां बोलतां थांबला; तेव्हां त्याचा चेहरा उदास-भकास झाला होता—

सहानुभूतिपूर्ण टक लावून, प्रकाश त्याच्याकडे निश्चलपणे पहातच राहिला होता—

विवेकच्या नेहमीच्या प्रशांत गंभीर चेहेऱ्यावर, त्याक्षणीं, विविध भावभावना चमकून तरळून जात होत्या...पुढलें बोलण्यासाठीं त्यानें आपली जिवणी उघडली; त्याची दाढी हलली...

आणि,...त्याच्या धीरगंभीर कथनानुसार, प्रकाशाला तीं सारीं दृश्यें, समोर प्रत्यक्षच दिसूं लागलीं—

....१४९

जोरजोरानें शिटी वाजवत, कलकत्ता मेल वेगानें जात होती.

फर्स्ट क्लासच्या डब्यांत, खिडकीजवळच्या खुंटीला, एक चामड्याची सुंदर इंग्लिश बॅग लोंबकळून झोके घेत होती.

Dr. AVINASH
M. D., M. R. C. P., F. R. C. S.
(BARODA)

अशीं पांढरीं रेखीव अक्षरेंहि त्या बॅगबरोबरच हिंदकळत होतीं.

गादीच्या रुंद बर्थवर काळ्या सुटाबुटांतला अविनाश ऐसपैस पसरला



होता— ओठांना आच्छादून पसरलेल्या त्याच्या त्या रेखीव करांगुली मिशा; केस मागें चोपचापून वळवलेले; चेहरा आकर्षक, प्रशांत, पण भांबावलेला—

पडल्या पडल्या, त्याच्या अस्वस्थ हालचाली चालल्या होत्या—

मग तो उठून बसला. त्यानें खिश्यातलें सेंटर-सेकंड घड्याळ काढून पाहिलें. साडेसहा वाजून गेले होते. त्यानें खिडकीबाहेर डोकावून पाहिलें...

गाडीखालची जमीन वेगानें मागें मागें धांवत होती. समोर सूर्यहि क्षितिजाला टेकला होता.

चटकन् जागचें उठून, त्यानें ती बॅग खालीं घेतली. ती उतावीळपणें उघडली. तिच्यातून एक सिरिंज बॉक्स बाहेर काढली. पण क्षणभर अस्वस्थ हालचाल करून, विचार बदलून, ती त्यानें पुन्हां आंत ठेवली.

तिच्या शेजारींच एक काळी वही होती. तीच मग चटकन् हातीं घेऊन तो गादीवर बसला; नी उत्सुकतेनें आंतलीं पानें तो चाळूं लागला—

....१५०

समोर उघडलेल्या पानावर लिहिलं होतं—

" मला यशांमागून यशं आलीं आहेत;...हुशारी नि चिकाटी याचं अमाप मोल झालंय्;—दिवाणसाहेबांचा हा अविनाश आतां एम्. डी., एम्. आर्. सी. पी., एफ् आर्. सी. एस्. होऊन, मोठं नांव कमावून विलायतेहून परतलाय्—

किती वायुवेगानें झालंय् हें सारं ?...माझंच का हें आयुष्य ?–

पण सर्वांत मोठं असं एक आश्चर्य आहे. आजपर्यंत स्त्रियांना अगदीं कटाक्षानें दोन हात दूर ठेऊन, सदैव टाळत आलेला हा गडी, आतां संसारांत पाऊल टाकतोय्. आजच मामासाहेबांच्या पदवीधर मुलीशीं माझं लग्न झालं;–बाबांच्या शब्दाला मी मान वांकवली—

बाबांनी मोठा हुंडा मागितला पण मामासाहेबांनीं तर बसल्या बैठकींत होकार देऊन, तें सारं ठरवूनहि टाकलं होतं;...एकुलती एक मुलगीच त्यांची ती!–मी कशांतच पडलों नव्हंतों!

दोघांनीं मला सहज विचारलं–तेव्हां मी म्हणालों–" तुम्हीं दोघे ठरवाल तें आमच्या-माझ्या बऱ्यासाठीं;.. मी कुठंहि सुख निर्माण करीन!...तिची मात्र संमति पहा—लग्न माझं आहे, तसंच तिचंहि आहे ! !–"

" या नवीन आयुष्यानें आज मात्र आतां उत्साह वाटतोय—

ननीला अजूनहि मला एकांतांत भेटायचंच आहे. खूप खूप बोलायचं आहे;...आमचा परिचय वाढायचा आहे !–दिसते मात्र मोठी गोड ! चेहरा थोडा गंभीर आहे, एवढंच !—

तें पान त्यानें अखेर वहीतून टरकावलें–चार तुकडे केले–व एक एक कपटा खिडकीतून वाऱ्यावर सोडला—

## ....१५१

पुढील चार दोन पानें उलटून तो थबकला; त्या पानावरहि पुढें लिहिलं होतं– त्या मजकुरांतलीं दृश्यें त्याला त्या पार्श्वभूमीवर दिसत होतीं—

" कधीं नव्हती ती खाजगी...गृहजीवनाची नवखी ओढ मला लागली होती आज;...भरभर दवाखान्यांतलं काम संपवलं; मी वेगानें मोटारींतून घरीं पोचलों—

आज ननीची-माझी पहिली एकांत–भेट होणार होती...

पण...पण...मी तिच्या खोलींत गेलों, तेव्हां—

ती बसली होती; त्या आरामशीर कोचाची पाठ दाराकडे होती. पावलें न वाजवतां, हळूच तिच्याजवळ गेलों. मान खाली केली; दोन्ही हात पुढें केले; तिच्या केशकलापावरून हात फिरवला; नी कुजबुजत्या शब्दांत तिला मी आर्ततेनें म्हणालों—" ननीऽ-मी आलोयऽ ऽ—"

मला वाटलं होतं, ती आपल्या करांची उबदार माळ मोठ्या उत्कंठतेने माझ्या कंठांत अडकवील! तशीच, पडल्या पडल्या वर पाहात, गोड हसून मला ती म्हणेल—" तुमच्याच वाटेकडे—"

पण ती उलट दचकून जागची उठली—तिनें पदर सावरला;



—चेहऱ्यावर हास्य आणून, ती शेजारच्या खुर्चीवर बसत म्हणाली, ..." या ना-ऽ"

त्या तिच्या अनैसर्गिक हालचालींनी मात्र मी अतिशय दचकलों; मनातल्या मनांत अगदीं थिजलों; आणि कसाबसा जवळच्या खुर्चीवर मीहि बसकण घेत म्हणालों–" हें काय ?—हें असं कां ? तूं माझी ना?..."

क्षणभर गोंधळून, तिनें बळेंच हसल्यासारखें केलें; नी माझ्या जवळ येत ती म्हणाली " हा प्रश्न कशाला ?...लग्न झालंय ना आपलं ? ..सप्तपदीं चाललेय मी आपल्याबरोबर !...खरंच ! तुम्हीं फार फार चांगले आहांत, अविनाश—"

त्या शब्दांत स्नेह होता; पण प्रेम नव्हतं; राम नव्हता !

त्यावेळीं, माझा हात तिनें आपल्या हातीं घेतला; पण तो गार गार होता...थोडासा थरथरत होता.

पतीचा हात धरणाऱ्या नवोढा तरुण पत्नीचा तो हात खात्रीनें नव्हता ! प्रियकराला एकांतांत भेटणाऱ्या युवतीचा–प्रेयसीचा— आतुर प्रफुल चेहरा तो नक्कीच नव्हता !—

मी स्मित करण्याचा प्रयत्न केला; पण मला तें जमेना !...मी तत्काळ जागचा उठलों. 'आलों हं...' म्हणालों.

पण मग, तसाच उठून माझ्या खोलींत गेलों. कडी लावली ..पुन्हां परतलोंच नाहीं— "

## ....१५२

तीं पानेंहि फाडून, त्यांच्या चिंधऱ्या खिडकींतून वाऱ्यावर उधळत, त्यानें पुढलीं कांहीं पानें चाळलीं व मध्येंच थबकून वाचावयास सुरवात केली—

" माझा तारुण्य सुलभ नवखा उत्साह, त्यानंतर,..दिवसेंदिवस आंतल्या आंत गोठतच गेलाय्; मी ननीजवळ मनानें,..शरिरानें,..अजूनहि जाऊंच शकलेलों नाहीं; ...माझ्या धोपटमार्गी मनाच्या, ...लग्नाबद्दलच्या, ...स्त्री-पुरुष-संबंधाबद्दलच्या, ...साऱ्या उत्साही

कल्पना विरघळत जात आहेत. ...मनांतल्या नैसर्गिक उत्साहानें काळं केलं आहे. उलट, उदास खिन्नता तिथें आकंठ दाटली आहे–

"असं कां?" ...हें कोडं मला तर सुटत नाहींच; पण ननीला विचारण्याचं धाडसहि उरांत नाहीं...

घुसमटवून सोडणाऱ्या असल्याच लपंडावांत, गेला पंधरवडा गेला आहे. पण दरम्यान ननी एकाएकीं आजारी झालीय्.

डॉक्टर मी! तरी तिच्या रोगाचं नीट निदान होत नाहीं, म्हणून मी घाबरलोंय्; बाबाहि घाबरले आहेत.

तारेसरशीं धांवून येऊन तिच्या उश्याशीं बसलेले मामासाहेब! ...शुश्रूषा करतां करतां, तेहि दीर्घ निश्वास टाकत आहेत.

ननी मात्र अगदीं निश्चल पडून असते. अबोलपणें सर्वांकडे भिरभिर पहात असते.

माझ्या अद्ययावत् उपचार-शास्त्रानें व निदान-कौशल्यानें, त्या दृश्यांपुढें व अनुभवांपुढें तर हातच टेकले आहेत;...हृदयाच्या गाभ्यांत उभं राहिलेलं माझं कोडं तर अधिकच दाटत जात आहे; —मन अधिकच भकास-उदास झालं आहे — "

## ....१५३

तींहि पानें फाडून, अविनाशनें तशींच वाऱ्यावर सोडलीं; त्यनें एक प्रदीर्घ निश्वास टाकला व पुन्हां तो त्या वहीत डोकावला —

पुढल्या पानांवर लिहिलें होतें—

"काय करावं या पोरीच्या आजाराला?... तिच्या सुखी लग्नासाठीं मी एवढं केलं! आतां तिला बरं वाटावं, म्हणूनहि मी वाटेल तें करीन—" मामासाहेब निश्वास टाकीत, माझ्या बाबांना त्या दिवशीं म्हणाले...

"अवीच्या लग्नाआधीं मी तुमच्याशीं केवळ व्यवहार बोललों;., हजारांचा हिशेब केला;...माफ करा!...पण आतां तुमची मुलगी ती माझी सूनच झालीय् ना? मी सुद्धां काय कमी करीन का?...



तिचा नवराच एवढा प्रसिद्ध, नव्या दमाचा हुशार डॉक्टर!...तोहि जिवाचं रान करतोय!...आमची उपचारांची हद्द झालीय्... तुम्ही पाहातांच आहां-" त्यावर बाबा खिन्नपणें मामासाहेबांना कळवळून म्हणाले—

खरंच तें!—माझ्या कांहीं प्रसिद्ध डॉ. मित्रांनाहि त्या रोगाचं निदान होऊं शकलेलं नाहीं;...आमच्या शास्त्रांनीं तर हातच टेकले आहेत;...अतर्क्य नी अद्भुतच सारं!— "

## ....१५४

"पण ननी पांच सहा दिवसांपूर्वीं आपल्या वडिलांकडे कांहींसं पुटपुटली;—नि तत्काळ तार करून, मामासाहेबांनीं आपल्या भाच्याला बोलावून घेतलं.

त्यावेळीं बाबांना ते म्हणाले—"लहानपणापासून तीं दोघं वाढलीं-खेळलेलीं; आमचा नरुभय्या आहे एक देशभक्त फकीर!... नुकताच तुरुंगांतून सुटलाय्;...तरी पण-निरोप मिळतांच, इकडे धांवत येईल, बघा-"

खरंच-नरुभय्या, चौवीस तासांत, धांवतच आलाय्! ननीच्या उशाशीं सदा बसलेला असतो—.

आणि काय आश्चर्य? त्याला पाहून, या घरांत आल्यापासून; ननी प्रथमच खरीखुरी हसली. जास्त कांहीं बोलली नाहीं; पण आतां तिचा ताप साफ उतरलाय्; परवां ती उठून बसली; गेल्या दोन दिवसांत, सर्वांशींच ती हसूनखेळून बोलूं लागलीय्; खोलींत हिंडू फिरूं लागलीय्...

काय आश्चर्य हें? माझ्या विस्मयाला पारावारच नाहीं?

काल मामासाहेब घाईघाईनें गेले; तेव्हां त्यांचा चेहरा पालटला होता. नि आजच नरुभय्या जायला निघाला. तेव्हां-ननी सस्मित सोज्वळ चेहऱ्यानें त्याच्याशीं बोलत होती. पण आंत, मनांत कसली तरी रस्सीखेंच दिसत होती—

त्यानें तिच्या हातीं घडी देत म्हटलें–" या घे तुझ्या वस्तू–"

मी त्या प्रसंगाकडे स्तिमित नजरेनें पाहातच राहिलों. त्या साऱ्या प्रसंगपरंपरेनें मी खूपच गोंधळलोंय्–

....१५५

" मामा, नरुभय्या, दोघेहि निघून गेल्यावर, ननीच्या वृत्ती आतां वरवर साफ पालटल्या आहेत. ती माझ्याशीं कल्पनातीत स्नेहानें, आपुलकीनें वागूं लागली आहे–स्वतःच ती माझ्या खाण्यापिण्याची व्यवस्था करीते–जवळ येऊन बसते; बोलते...

पण मग, माझ्या मनांतील वणव्यानेंच माझी दांतखिळी बसवली आहे...' हे सारे मी अनुभवत आहे ते प्रसंग! ते माझ्याच आयुष्यांतले किं एखाद्या कादंबरींतले–सिनेमातले?' असा माझा अनेकदां भयंकर गोंधळ उडतो –

असं गेले दहाबारा दिवस चाललंय्—

आज मला बरं वाटेना; मी माझ्या 'कन्सल्टिंग रूम' कडे नेहमींप्रमाणें संध्याकाळीं गेलों; पण, तसाच मोटर फिरवून घरीं परतलों. 'ननीला घेऊन फिरायला जाऊं',...हा विचार मनांत डोकावला; चटकन्, मोटर बाहेर रस्त्यातच उभी केली व मी बंगल्यांत आलों—

ननी तिच्या खोलींत नव्हती. आमच्या लायब्ररीत बसला होती. दार लोटलेलं होतं. मी तें हळूच उघडलं; तिथेंच उभा राहिलों.

शेल्फवरचीं पुस्तकं टेबलावर अस्ताव्यस्त पडली होती. जवळच्या खुर्चीवर ती बसली होती–तिच्या हातांत कसले तरी कागद होते. एकीकडे ते वाचतां वाचतां, मुसमुसून ती रडत होती.

हातांतले कागद एकदां फाडण्याचाहि तिनें प्रयत्न केला; पण पुन्हां तिचा विचार बदलला; त्यांची घडी केलीन्, व तिनें ते तसेच हातांत धरले.

आणि मग, टेबलावर दोन्हीं तळव्यांत डोकं उपडं ठेवून, ती हळूहळू ओक्साबोक्सी रडूं लागली.



तसंच पुढें पाऊल टाकण्याची मात्र माझी छाती होईना!

मग उघडलेलं दार मी पुन्हा होतं तसं ओढून घेतलं. बाहेर क्षणभर उभा राहिलों–क्षणभरानें टकटक करून तिला हांक मारली —" ननी ऽ ...ननी ऽ ...इथं आहेस कां ग तूं?"

"अय्या ऽ'! लौकरसे आलांत आज!–" क्षणभराच्या विलंबानंतर, आंतून तिचा आवाज आला. त्यांत हास्याचा भास होत होता; पण रडकेपणाचीच झांक अधिक होती.

"या ना आंत! बाहेर कां? ...वाचत बसलेंय् आपली..."

ननीचे ते शब्द ऐकून, मी दार लोटून आंत गेलों. त्यावेळीं माझीच छाती उलट धडधडत होती—

....१५६

मी जवळ गेलों, तेव्हां ननीने स्वतःला नीट सावरलं होतं–त्या मघांच्याच खुर्चीवर, एक पुस्तक उघडं ठेवून, ती वाचत बसल्याचं नाटक करीत होती—

तिच्या चेहऱ्यावर हास्य होतं...पण डोळ्यांत मघाचं दडपलेलं रडं नि दुःख रेंगाळत होतं—

तिनें आपला चेहरा पुसला असला, तरी डोळ्यांत लालसर आर्त छटाच दिसत होती—

"एकटं एकटं कंटाळा आला बाई अगदीं! म्हणून आपली वाचत बसलें होतें इथं–" तिनं पुन्हां हसून म्हटलं. त्यावेळचं तिचं नाटक बरंच बेमालुम झालं होतं—

टेबलावरचीं पुस्तकें मघांसारखींच पडलीं होतीं...पण ते हातांतले मघांचे कागद मात्र कुठं दिसत नव्हते—

मी कांहीं न बोलतांच जवळच्या खुर्चीवर बसलों –

तेवढ्यांत, ननी आपणहूनच म्हणाली—" चला. उठा!— आपण फिरायला जाऊं या कां?...नाहीतर सिनेमाला?..."

मी तिच्याकडे आश्चर्यानें पाहातच राहिलों...तिथून दोघांनीं

तसंच्या तसंच उठावं, ही तिची इच्छा होती—त्यांत एक भयंकर लपंडाव दडलेला होता— ”

....१५७

“ एकदां वाटलं–तिला स्पष्ट सांगावं–“ पाहिलं मी मर्घा सारं, ननी ! काय तें सारं सांगून टाक पाहूं?..पुरे झालं हें लप्पंछप्पं ”,.

पण तशी छाती मात्र होईना–ती नुकतीच बरी झाली होती. –शिवाय, कांहीं सांगणं न सांगणं हा तिचा प्रश्न होता....तसा तिजवर जोरा करणं ही मला अरेरावी वाटली —

मी उठलों...तीहि उठली...

तिनें खेळकरपणा दाखवीत, पटकन् माझा हात आपल्या हातीं धरला–पण त्यांत कसलाहि रसरशितपणा नव्हता–माझा मात्र आंतल्या आंत उलट भयंकर कोंडमाराच होत होता—

तेवढ्यांत, योगायोगानेंच, त्या प्रसंग–परंपरेला अनपेक्षित कलाटणी मिळाली–आमच्या नोकरानें दारांतच तिला एक तार आणून दिली —

भयभीत चेहऱ्यानें तिनें ती फोडली; तेव्हां आम्हीं दोघांनीं तिथं लिहिलेलं वाचलं “ मामांचे अखेरचे क्षण-तत्काळ निघा-”

तिनें घाबरून–गोंधळून माझ्या खांद्यावर मान झुकवली —

पंधरा मिनिटांतच, एका लहानशा बॅगेसह, बाबांबरोबर ती गाडीनें जायलाहि निघाली— ”

....१५८

ननी बाबांबरोबर जायला गेली आहे. मी आतां एकटाच घरीं आहे. काल रात्रीं मी अतिशय बेचैनपणें तळमळत होतों... अंगावरील नाइटसूटसह मी तसाच हळूच लायब्ररीत गेलों;..तिथले दिवे लावले; नि संध्याकाळीं ननी बसली होती–रडत होती, त्या टेबलापाशीं गेलों...

अजून तीं पुस्तकं तशींच अस्ताव्यस्त पडलीं होतीं; टेबल-लँप



लावून, मी तीं सारीं वरखालीं केलीं...सारीं पुन: पुन्हां चाळली, शेवटीं ‘ द वूमन दाउ गेव्हेस्टमी’ मधली घडी मला सांपडली—

थरथरल्या हातानें, उत्सुकतेनें मी ती उघडली,—ननीनेंच लिहिलं होतं—

“ प्रियतम नरुभय्या—

आपल्या लहानपणीं आपल्याला आपलीं मनं नीट समजलीं नव्हतीं. पण आतां तरी समजलीं आहेत ना ?...परवां आपण इतकं दिलसाफ बोललों; –सारे ठरवलं !...मग आतां कां उशीर ?

ठरल्याप्रमाणें, तुम्हींच नको का उघड करून, मामांना सांगून टाकायला ?...मी रोजच बोलण्याचा प्रयत्न करतें; ...पण ऐनवेळीं, माझी जीभच अडखळते...घुटमळते मी अगतिक होतें—

मामा तुम्हाला थट्टेनें, देशभक्त फकीर म्हणतात! ...त्यांना आपल्या या गोड गुप्त भावनांचा मागमूसहि नसेल; ...कळल्यावर, प्रथम कदाचित् ते रागावतीलहि,...पण आतां मात्र त्यांना, हें कळलं हें पाहिजेच !—अगदीं आतांच ! ...क्षणाचाहि विलंब नको !—

माझ्या सुखासाठींच मामांच्या एकएक धडपडी–खटपटी चालल्या आहेत—कालच, कुठल्या बडोद्याच्या डॉक्टरबद्दल ते मला सांगत होते...पण वेळवर, माझी पुन्हां दांतखिळी बसलीच... सारे शब्द मी पोटांत गिळले—

तेव्हां कृपा करा...असाल तसे धावत या ! –जमेल तसें मामांना सांगा !...पण—याचक्षणीं–पटकन्...हं ! ...नाहीं तर—

पण सारं सुरळीत घडून येईल अशी प्रबळ इच्छा करणारी—

सर्वस्वी–एकट्या तुमचीच—ननी.

वाचतां वाचतां माझ्या डोळ्यावर दगड पडल्यासारखं झालं !

....१५९

“ आमच्या लग्नाची छापील निमंत्रणपत्रिकाहि त्याच घडींत होती—मागील कोऱ्या जागीं ननीचें घाई घाईनें लिहिलेलं कापरं हस्ताक्षर होतं— ”

'मामा दोन दिवसांसाठी तार वाचून बडोद्याला गेले... आले; आतां सारं ठरलं ! ...येतांना हीं कार्डं छापून घेऊनच आले आहेत ! नकों तें सारें आपल्या डोळ्यादेखत घडून आलंय् ? आतां वज्रलेपहि होणार आहे.

आपलं मौन अखेर इतकं भयंकर, घातुक, हृदयविदारक ठरलं ना ? ...काय भयंकर योगायोग ? ...आपल्या हातून सहज होऊं शकणार होतं तेंच कायमचं निसटलं आतां—

पण—झालं तें झालं ! ...आतां ठरलं तें ठरलं—

मामांनीं माझ्या बऱ्यासाठींच तें उतावीळपणें ठरवलंय् ! ...पण मग, आतां हा माझा प्रश्न नव्हे–माझ्या कुळाचा प्रश्न ! ..दोन कुळांच्या प्रतिष्ठेचा ! ! ...आतां वर्तमान व भविष्य यांच्यासाठीं सर्वांच्या सुखासमाधानासाठीं – भूतकाळच्या त्या व्यक्तिगत प्रमार्थी भावनाहि दडपल्याच पाहिजेत ! तीं सुखस्वप्नं स्वतःच्या हातानें कायमचीं पुसटून टाकलीं पाहिजेत— ! मीच नव्हे—तुम्ही ही !

दुसरा मार्ग नाहीं—

लग्नाला मात्र जरूर हजर रहा ! हो, नाहींतर,..मामांना उगीच वाईट वाटेल—लहानपणापासून आईविना तुमचा त्यांनीच प्रतिपाळ केला—तुम्हांला कृतघ्न म्हणतील सारे ! ... म्हणून सुचातें–

आणि याल ते मनावर पुरा संयम ठेवून–तीच आपली या भावोदधीतली चुटपुटती अखेरची भेट—

आठवड्यापूर्वीचें तें पत्र ! आतांच माझं हें न्यार आमंत्रण !.. या अखेरच्या कटु गोड स्मृती ! !... तें सारं सारं नाहींसं करा, !

कराल ना तेवढं माझ्यासाठीं ?—

आपलीं जगं आतां निराळीं !...मी दुसऱ्या जगांत जाणार;... दुसऱ्याची गृहिणी होणार ! !

या अनपेक्षित दैवदुर्विलासानें; क्षणभर कुंठितमति झालेली–वण तरीहि, नवं आयुष्य धीरानें जगायचा आतां निर्धार केलेली– तुमची आतां केवळ बाल मैत्रीणच उरलेली.— — ननी —



....१६०

" हें सारं वाचून तर माझ्या जिवाचा कोंडमाराच झाला आहे. न फाडतां, जपून ठेवून, जातां जातां, नरुभय्यानें ननीच्या हातीं दिलीं, तीं हींच पत्रं !—तींच मीं लायब्ररींत शिरण्यापूर्वी वाचून, ननी काल ओक्सा बोक्सी रडत होती—

आणि त्यानंतरहि, तो किती प्रेमाचा आविर्भाव आणून, माझ्याशीं ननी वागत होती ?—

मला तिची कींव आली;...बाबा—मामा या जुन्या आंधळ्या पिढीचा भयंकर संताप आला;...लग्नासारख्या बाबतींतील माझ्या अंधश्रद्धेबद्दल माझीहि मला घृणा वाटली !–

कुळाची प्रतिष्ठा व पितृप्रेम दाखवून,..मन मारणाऱ्या,–जन्मभर नाटक करूं पाहणाऱ्या, ननीच्या त्या निर्धाराचा मला अगदीं तिटकारा आला !

आणि रागारागानें मी एकटाच स्वतःशीं ओरडलोंहि—" जा, जा –मूर्ख पोरी–समजलों आतां मी सारं ?–तशीच त्याच्याकडे निघून जा !...असला तुझा जन्मभरचा फसवा त्याग मला नको ! पुरे ते प्रतिष्ठेचे नि कुलशीलाचे पारंपारिक पोरखेळ !...माझं सुख मी पाहीन . तूं आपली सुखी हो— "

....१६१

"पण मग मला वाटलं—" आमच्या सुखाच्या हेतूनेंच, वडील मंडळींनी आमच्या सुखाची अशी होळी केली !–आपला हिंदु समाज–त्याची संस्कृति–त्याची नीति बंधनें !–पांढरपेशी प्रतिष्ठा ! ...एकमेकांना कायम पडणाऱ्या त्या विवाहशृंखला !

पण सारंच आतां दोघांच्याहि आटोक्याबाहरचं आहे ! केवळ सदिच्छेनें नि पैशानें विवाह-सुख विकत घेतां येत नाहीं–टिकवतां येत नाहीं ! हेंच खरं...

आमचे केवळ चारच महिने,..असे चार युगासारखे गेले !— तर मग अजून पुढें तर सारं आयुष्य जायचंय् !...छे छे –तें तर

दोघांचं जिवंत मरणच होईल !...तो एक अखंड व्यभिचार होईल ! ...ती दोघांची...तिघांची आत्महत्या होईल ! ! स्वतःला नरक यातनांना; ननीला क्षणोक्षणच्या दुःखाच्या खायी !...आणि आपलीं भावी मुलं...? हरे राम ! ”

त्या कल्पनेने तर माझ्या डोक्याला भयंकरच आग लागली ! रात्रभर लायब्ररींतंच बेहोषपणें मी येरझारा घातल्या. त्या साऱ्या कल्पनाहि मला असह्य होत होत्या—

अविनाशने तीं सारींच पानें झरझर टरकावलीं व त्याच्या चिंधड्या करून त्याहि खिडकीबाहेरील वाऱ्यावर भिरकावून दिल्या—

....१६२

पुढल्या पानावर लिहिलं होतं—

“ जीव कोंदला; भीषण भेसुर,–हुरहुर सारी व्यापें अंतर—

—ठरलंच माझं !...मी एकट्यानें आत्महत्त्या केली, तरच ही तिघांच्या आत्महत्त्येची समस्या सुटेल आतां !—तिघांपैकीं निदान दोन जीव तरी, केव्हां ना केव्हां सुखानें नांदू शकतील !—

अखेर, मामा हृदयाक्रिया बंद पडून, तडखाफडकी गेल्याची आतां नुकतीच तार आली आहे. ननीच्या समाचाराला तिकडे तसं निघून जाणं मला शक्य नाहीं....दोन दिवसांत बाबा परततील-पंधरा दिवसांनीं ननीलाहि परत इकडे येणं भाग होईल !

...आणि मग ? ...आणि मग ? ?

नाहीं.. तें आतां मुळींच शक्य नाहीं ! ...तत्पूर्वीच सर्व उरकलं पाहिजे – दूरदूरच्या ..अज्ञात प्रवासाला, ...आजच. या क्षणींच, मला निघालं पाहिजे—

हो ! कालच, लंडनचा डॉ. सुलिव्हन कलकत्त्याला चारसहा दिवसांच्या मुक्कामासाठीं आला आहे. तोच माझा गुरु ! इंग्लंडला परतण्यापूर्वी, त्याला भेटायच्या निमित्तानें, आजच निघतों मी...

गाडींत मी एकटाच असणार; माझी यशस्वी सिरिंजहि माझ्या



जवळ असेल;...केवळ एका स्ट्राँग डोसमध्यें,.. सारा जीवनाचा खेळ हां हां म्हणतां संपून जाईल !

हो, तेंच आपल्याला सुखाचं !...त्याहि दोघांना सुखाचं !... आंधळ्या समाजाच्या, अभावित–नकळत पापाचं, आजच्या नीति-बंधनांच्या प्राप्त परिस्थितीत विचारी माणसानं असंच परिमार्जन नाही करायचं, तर मग कसं ?...

त्यानें बाबा दुःखी होतील; तेहि कदाचित्, मामांपाठोपाठ निघून जातील ! पण त्याला मी तरी काय करूं ?—

ननीला थोडा संशय येईल; दुःख होईल;–स्वतः तिला कदाचित् उगीच अपराधीहि वाटेल !...पण मग, माझा तरी काय इलाज ?—

अखेर तरी, तिला माझ्या या हालचालींनी सर्वांगीण सुखच लाभेल ना !...

माझं वैभव...माझे विमे...माझी जगांतली अनुपस्थिती... अंतीं ...सारं तिच्या सुखासाठींच...सारं सुखाचंच ठरेल... ”

अविनाशनें तेंहि पान टरकावलं... व वाऱ्यावर भिरकावलं—

....१६३

अविनाशनें वही बाजूला ठेवली; आणि आजवर हजारोंना जीवदान देत आलेली, आपली ती यशस्वी सिरिंज-बॉक्स बॅगमधून बाहेर काढली.

केसासारखी बारीक सुई सिरिंजला लावली. आंतली एक ट्यूब घेऊन, कानशीनें तिची मान मोडली;... सिरिंज पुरी भरून घेऊन, ती ट्यूब भिरकावून दिली; नी नेहमींच्या संवयीप्रमाणें, एकदोन थेंब सुईबाहेर दाबून, सिरिंजबॉक्स वगैरे सगळंच त्यानें फेंकून दिलं; अंतर्मुख होऊन, आतां येणाऱ्या अंतक्षणाबद्दल तो अखेरचा विचार करीत बसला—

त्याची गाडी त्याच्या मनांतील विचारांप्रमाणेंच वेगानें धावत होती; आंत बाहेर काळोख पडला होता—

बसल्या बसल्या त्यानें दिवा लावला; डब्यांत चटकन् प्रकाश झाला—

तेवढ्यांतच त्याच्या मनांत पुन्हां एक नवीनच विचार आला—

ती भरलेली सिरिंज त्यानें आपल्या डाव्या हातांत घेतली; ...उजव्या हातानें कोटाच्या वरच्या खिशाचं पेन पुन्हां काढलं; व मधांपासून, एकामागून एक पानं फाडून, अखेर कोऱ्या उरलेल्या त्या वहीचं नवं पान उघडून, तो त्यांत लिहूं लागला—

" नलिनी, घरून निघतांना, कां कोण जाणें, ...आज मन सारखं हुरहुरतंय्-परत येईनसं वाटतच नाहीं. — पुन्हां भेट झाली नाहीं-तर माझ्या मनची या क्षणची तीव्र इच्छा मात्र लक्षांत ठेव;—हृदयांत ती सदैव बाळग -मी मनानें तुझाच आहे !

मी असतांना किंवा नसतानांहि, तूं खरीखुरी सुखी असावंस,..तुझ्या मनचीं सारींसारीं प्रकट-अप्रकट सुखंस्वप्नं संपूर्ण साकार व्हावींत-तुझं आयुष्य नैसर्गिक सुखा-समाधानानें सदैव तुडुंब भरलेलं असावं-हीच माझ्या रसरसत्या मनाची धगधगती आशा-आकांक्षा आहे !...

या एका सुकाणूंला धरूनच, तुझी जीवन-नौका तूं दैनंदिन हाकार-देव तुला व मला यशच देईल ! ...नितांत व निर्मळ प्रेमानें भरलेला व आकंठ भारावलेला— —अविनाश "

तें लिहून त्यानें पेन खिशांत टाकलं; ...वही बॅगमध्यें टाकली-बॅग आपल्या बसल्या ठिकाणीं नीट ठेवली व ती भरलेली सिरिंज उजव्या हातांत घेऊन तो जागचा उठला व डब्याच्या दाराजवळ आला—

....१६४

अखेर, ती भरलेली सिरिंज उजव्या हातांत घेऊन, आपल्या डाव्या दंडावरचा शर्ट त्यानें वर केला—

भोंवतीं गाडीबाहेर काळोख दाटला होता,...तें भोंवतालचं काळोखी जग ! मोठ्या वेगानें तें मागें मागें धांवत जात होतं;..तिकडे पाहून, स्वतःशीं स्मित करीत, तो पुन्हां गादीच्या बर्थकडे वळला—

आपल्या भोवतालचा डब्यांतला प्रकाश व बाहेरचा तो काळोख ! त्यांच्याकडे तसा अखेरचा दृष्टिक्षेप टाकून, त्यानें सिरिंज उजव्या हातांत बळकट धरली-आणि तो आतां ती डाव्या हातांत खुपसणार-



...१६५

इतक्यांत, गाडीला ब्रेक लागल्यासारखा, भयाण करकर आवाज झाला !-सारखी कर्कश धावती शिटी फुंकीत इंजन चाललं होतं—

त्यामुळें, त्याच्या मनांत अकस्मात् नवीनच उत्सुकता उसळली; तो लगबगीनें पुन्हां त्या दाराशीं गेला व डब्याच्या दांड्याला धरून, तो बाहेर डोकावून पाहूं लागला—

ज्या जगाशीं असलेला संबंध सोडून, तो क्षणापूर्वीच दूर दूर निघून जाऊं पाहात होता,...त्याच जगाकडे काळोखांत मान वाकवून, तो तसं पुन्हां अखेरचं पाहूं लागला—

पण त्याचक्षणीं...रुळाचे मोठे खडखडाट झाले; एकदम ब्रेक लागल्याचे धरणीकंपासारखे गचके बसले—

आणि...आणि.. काय होत आहे हें समजण्यापूर्वींच-त्या डब्याच्या दारांतून अविनाश एकदम बाहेर फेकला गेला !—

त्याच्या हातांतली सिरिंज तर कुठल्या कुठें उडाली ! क्षणार्धांत, बघतां बघतां,..तो स्वतःच मुळीं खूप उंचीवरून बाहेर काळोखांत भिरकावला गेला होता ! खालीं-खालीं पडूं लागला होता—

अखेर, तो जमिनीवर पडला, तेव्हां त्याला असह्य वेदना होत होत्या—

तरी पण, पडतां क्षणींच, तिथल्या उतरंडीवरून तो कोलांट्या उड्या खात, पुन्हां आणखी खालीं खालीं घरंगळत जाऊं लागला होता—

त्याच्या कानांवर, पडतां पडतां, एकमेकांवर प्रचंड आघात करून कांहीं आपटल्याचा, मोडल्याचा आवाज पडला !...मग किंकाळ्या !...आरडाओरडीचा भेसुर भयंकर मिश्र आवाज ऐकूं आला !

डोळ्यांत उजेडाचे मोठमोठे भयाण लोळ शिरले !—

आणि तशाच अर्धवट शुद्धीबेशुद्धींतील संवेदनाच्या गोंधळांतच, अखेर... पडल्या ठिकाणींच, तो बेशुद्ध होऊन पडला—

....१६६

पुन्हां तो शुद्धीवर आला, तेव्हां त्याला खूप दूर आणि उंचीवर उजेड दिसत होता; त्या अंधुक अंधुक प्रकाशांतच,...तो चांचपडत वर चढला; त्याला

खूप खरचटलं होतं;-कांहीं जखमाहि झाल्या होत्या;—तरी पण तो बराच शाबूत होता एकूण—

अखेर, तसं प्रयासानें वर चढून आल्यावर, त्याच्या कांनीं अधून मधून कण्हणं—ओरडणं ऐकूं येऊं लागलं! डोळ्यांसमोर त्याला-त्याच्या मेल गाडीच्या कित्येक डब्यांचा चक्काचूर झालेला दिसला; कांहीं छिन्न विच्छिन्न प्रेतें, बेशुद्ध माणसें पडलीं होतीं.

क्षणभरच आपल्या डॉक्टरी पेशाप्रमाणें, आपल्यानें तिथलं होईल तेवढं करावंसं वाटलं. पण शस्त्रं नाहींत, औषधं नाहीं;-अंगांत शक्तिहि फारशी नाहीं!—अखेर, दमला भागला होऊन, तो एका दगडावर गप्प बसला...

हळूहळू भान येत, त्याला त्या साऱ्या प्रसंगाची पुरी यथार्थ जाणीव झाली...

त्यानें ठरवलेली आत्महत्त्या तर निमालीच होती; त्या ऐवजीं, भयंकर अपघात मात्र त्याच्या पुढें आला होता; त्यांत तो सामील होता;...तरी पण, त्यांतूनहि,...तो स्वतः मात्र शीरसलागत वांचला होता—

इच्छा नसलेले तिथले कित्येक,...क्षणार्धांत,..त्या अपघातांत मृत झाले होते. मरणाची तीव्र इच्छा व खात्री असलेला स्वतः हा मात्र, ऐन वेळींच तो अपघात झाल्यामुळेंच त्यांतून वाचला होता!...

त्या चमत्कारिक योगायोगानें, अगम्य नियतीचं,...त्याक्षणीं,...त्या बधिर मनः स्थितींतहि त्याला भयंकर आश्चर्य वाटलं.

आणि त्याचक्षणीं, एक प्रचंड विचार त्याच्या डोक्यांत तरळून गेला—

"मी...अविनाश—मुद्दाम मरणार होतों! तसं कशाला?—खरं म्हणजे, मी मेलोंच होतों!—पण हा असा क्षणाच्या, योगायोगानें जगलोंय! तर मग, आतां मी जगणारच!...पण मी तो नव्हे! हो—मी...अविनाश नव्हे!... अविनाश मघांच मेला!!— "

....१६७

भोंवतीं किर्र रान होतं; नुकतं कुठं फटफटत होतं..आणि बघावं तिकडे,..मुडद्यांवर मुडदे पडले होते;...कोणी जिवंत माणूस फिरतांना दिसत नव्हतं.



चौफेर भिरभिरी पहात,...स्वतः बसला होता तो डबा,...अविनाश आधीं शोधूं लागला—

अखेर, त्याला तो सांपडला! तो मोडला होता; त्याचा चक्काचूर झाला होता—इकडे तिकडे विखुरलेल्या सामानांत त्याची बॅग फाटून तुटून पडली होती.

तिच्याजवळच,..शेजारच्या डब्यांतील एकदोघांचे,...न ओळखण्याइतके विछिन्न मुडदे पडले होते-त्यांतील एक तरुण होता. त्याची अंगयष्टी अविनाश-सारखीच उंचपुरी व धडधाकट होती. आणि त्याच्या अंगावरहि त्याच्यासारखाच सर्जचा काळा सूट दिसत होता—

एकदम एक कल्पना मनांत चमकून अविनाश, त्याच्याजवळ गेला—

त्या शरीराच्या चेहऱ्याचा चक्काचूर झाला होता. तो प्रयासानेंहि ओळखणं अगदीं अशक्य होतं.—

अविनाशनें तें पाहिलं मात्र; क्षणार्धांत, मनांत सारं निश्चित झालं!—

....१६८

आपली हातांतली पुष्कराची आंगठी काढून, त्यानें ती त्याच्या बोटांत घातली. आपलं फुटलेलं डॉक्टरी पॉकेटवॉच काढून, तें त्याच्या खिशांत कोंबलं;—आपल्या खिशांतील आपलं पाकीट उघडून, त्यांत पांचपन्नास रुपये व आपलं तिकीट तेवढं ठेऊन, बाकी साऱ्या वस्तू काढून घेतल्या, व त्याने मग; तें पाकीटहि प्रेताच्या आंतल्या खिशांत कोंबलं.... आणि त्याचक्षणीं, त्या साऱ्या प्रेताच्या खिशांतील मूळच्या वस्तू काढून घेतल्या.

थोड्याच अंतरावर, एक साधू मरून पडला होता. त्याच्या बोचक्यांतील धोतर-कफनी घेऊन, अविनाशनें जरा बाजूस जाऊन, ती आपल्या अंगावर चढवली—

तिसऱ्या एकाच्या अंगावरची जुनाट शालहि त्यानें जातां जातां पांघरली;—आपल्याकडील इतर सारें दुसऱ्याचं गोळा केलेलं सामान, आपले कपडे,..सारं कांहीं—एक डबा जळत होता, त्याच्या आगींत त्यानें भिरकावलं!...जवळ एक नाला वाहात होता, तिथें तोंड वगैरे धुवून, तो तत्काळ तेथून दूरदूर झपझप चालत निघालाहि!

बघतां बघतां, तो हाहाःकार तसाच मागें टाकून, अवि नाहींसा झाला—

....१६९

" अशी माझी ती आत्महत्त्या झाली, प्रकाश !—असा तो माझ्या आयुष्यांतील भयंकर अपघात झाला !-असा मी त्यांत मेलों -! हो त्या क्षणच्या, क्षणाच्या निर्धारामुळेंच, भावनाप्रधान अविनाश कायमचा मेला ! त्यांनंतर स्वैरपणें, अगदीं स्वतंत्र अनिर्बंध वृत्तीनें, सारं हिंदुस्थान भटकत फिरणारा हा विवेक तेवढा मागें राहिला—" विवेक खिन्नपणें हसत प्रकाशकडे पाहून म्हणाला—

प्रकाशहि स्तिमित नजरेनें विवेककडे नुसता पाहातच राहिला होता.

" प्रकाश ! मानवी सुखदुःखं अशी सापेक्षच असतात !-" विवेक क्षणभरानें पुन्हा धीरगंभीरपणें हसला, तेव्हां त्याची दाढी हलली, चेहरा व डोळे चमकले; ते अगदीं प्रशांत झाले— " तुझ्या आयुष्यांतील एका दुःखी योगायोगानें तूं इतका गांगरेतोस;.. त्याचा तुझ्या प्रकृतीवर एवढा परिणाम करून घेतोस !...तर मग, या माझ्या योगायोगांना,...या प्रसंगाना तूं काय म्हणशील ?-अशा स्थितींत, मनःस्थितींत, तूं काय काय केलें असतंस ? "

" पण मग पुढें त्या दोघांचं "-प्रकाश पुढें बोलतां बोलतां चाचरला—

" तें समजून आतां तुला-मला काय करायचंय् "-मी स्वतः तरी समाधानांत आहे, एवढं खरं !-" विवेक स्मित करून म्हणाला-" अपघातानंतर पहिले चार सहा दिवस, मी सारीं वर्तमानपत्रं कुतूहलानें पाहिलीं !—माझी खात्री झाली-मी जगाला मेलों !...त्यामुळेंच, मी स्वतंत्र झालों !-निदान माझ्यामुळें समाजबंधनाच्या जाळ्यांत गुरफटले जखडले गेलेले दोन जीव तरी मुक्त झाले !—पंधरवड्यांत, दारुण दुःखानें माझे बाबा गेले, अशी बातमी वाचली मी ! पण आतां माझा सर्वस्वीं निरुपाय होता--मी केव्हांच मेलों होतों !--त्यानंतर, मी हा असाच पृथ्वीच्या पाठीवर एकाकी स्वैरपणें फिरतोंय् !—योगायोगानेंच, आतां तुमच्या या मंगलग्रामांत, तुम्हां सार्‍यांच्या सहकार्यांत, सुखसमाधानांत आहे ! तो भावनाप्रधान अविनाश नव्हे ! -आयुष्यांतले योगायोग समाधानानें जगायचं मनाला शिकवणारा, हा विवेकच तुमच्यांत आहे ! —"



# छाया-प्रकाश

....१७०

प्रकाशला पुरा आराम पडून, तो आतां पुन्हां हिंडू फिरूं लागला होता-

तो व विवेक, मंगलग्रामाच्या शेतांतून आज पाहणी करीत फिरत होते—

चालतां चालतां, प्रकाश गंभीरपणें म्हणाला—" कधीं कधीं सामान्य माणसाचं मन अगदीं सांचलेल्या डबक्यासारखं होतं !...त्यावेळीं, भोंवतालचें विस्तृत जग, त्यांतलीं इतरांचीं दारुण दुःखं-संकटं, यांचा साफ विसर पडून,-तें आपल्याच वैयक्तिक दुःख-संकटांचा चिखल कालवीत बसतं !...इतक्या लोकांचं भवितव्य या भूमीत समोर इथं प्रत्यक्ष कोमेजून पडलेलं दिसत असतांना...मी आपला माझ्याच मनाच्या नि रुंद खांचेंत रुतून बसलों होतों !...मला माझ्या इथल्या खर्‍या जबाबदारीची विस्मृति झाल्यासारखंच झालं होतं !—पण तुमच्याकडूनच आतां मला नव्या विचारांचा, नव्या श्रद्धेचा, आत्मविश्वासाचा निर्झर मिळाला, विवेक ! —"

" नाहीं, प्रकाश- प्रत्येकाचं मन म्हणजे स्वतःच हेलावणारा एक अफाट दर्या असतो ! ..कधीं कधीं, आपल्या आपणच त्याचा नेहमीचा किनारा सोडून अथांग तळ गांठूं शकतो—आणि मग, त्या नव्या अनुभवामुळें आपले, आपणच चकित होतों-ती आपल्याच मनाची अज्ञात प्रचंड शक्ति ! आपली आपल्यालाच ती नवखी वाटते—नि म्हणूनच, गोंधळून, त्या परिवर्तनाचा संबंध आपण उगीचच कुणातरी दुसर्‍याशीं लादून मोकळे होतों !—तसं झालंय् हो तुझं !—मी केवळ निमित्तमात्र ?— "

" तरी पण हें सारं पाहून, खरं म्हणजे, मला अगदीं निराश्रित, असहाय्य वाटूं लागलंय्—विवेक !-" प्रकाश एक प्रदीर्घ निश्वास टाकून म्हणाला—" काय, होणार काय आहे आतां आपल्या मंगलग्रामचं पुढें ?..."

" वेडा आहेस—होईल तें सारं मंगलच होईल !...यांतूनहि सर्वांना वाट

दिसेल "—विवेक हसून म्हणाला—"तुझ्याच मनांत ईश्वर उभा राहील !- मला माझ्या मनाचा तरी पुरा विश्वास आहे— आणि म्हणूनच...त्याचा थांग लावा यला, मी आतां चार दिवस तुम्हाला सोडून जाणार आहे--शांत बसून, कुठें तरी एकांतांत मनन करणार आहे !"

....१७१

सभोंवारच्या त्या भकास, निर्जल, निर्जीव दृश्यांकडे पाहून, खिन्न मनानें विचार करीत आपल्या झोंपडीच्या दारांत जीवन बसला होता.

जवळच त्यांचीं मुलें कांहींतरी खेळ खेळत होतीं.

पलीकडे, गोठ्यांत बांधलेल्या तांबूच्या पाठीवर तिमिरला बसवून, त्याच्या-जवळ गंगा उभी होती. तोंडानें बालिश स्वरांत ती म्हणत होती- "घोडा ऽ घोडा ...ऽ हॅट् हॅट्..."

तिमिरच्या बालिश हास्याचे व त्या मागूनचे आलेले गंगाचेहि लडिवाळ वत्सल हास्याचे ध्वनि जीवनच्या कानावर पडले; तिकडे त्याचें लक्ष गेलें. आणि आतांपर्यंतच्या त्याच्या खिन्न चेहऱ्यावर हळूच एक स्मित-रेषा चमकली.

मग तिकडे टक लावून पाहात तो स्वतःशींच हसला व जागचा उठला—

"अर् अर् अर्...यकदम भरधांव फेकूं नको ! ...पडाला व्हईल !" तिमिरजवळ कौतुकानें जाऊन जीवन म्हणाला आणि त्यानें दोन्हीं हातांनीं त्याला धरून लडिवाळपणें वर खालीं केलें.

तो मनमुराद हसला; गंगाहि हंसली...जीवननेंहि मग हसत हसत तिमिरच्या बदललेल्या इच्छेप्रमाणें त्याला खालीं उतरवलें.

...तिमिर झोपडीच्या बाजूला वळूं लागला, तशी गंगा म्हणाली..."जा, खेळा जा ..आतां त्या पोरांमंदी ! .. बरं का...माज्या राजा ऽ —"

हसत हसत मागें पाहात, तो तसा दूर निघून जात होता; तिकडे पाहातांना, जीवनचा हसरा चेहरा पुन्हां पटकन् उतरला; आपल्याशींच; पण गंगेलाहि उद्देशून तो म्हणाला—"मायेवीन पोर बापडं !...भेंकरावानी फिरतया—! ...हं...देवाचीच अघटित करनी ! ! —"

गंगाहि तिकडे पाहात म्हणाली-"मी बी इक्तं मन लावत्यें...पन् मंग, येकेकदा तो हटान् रडत त् रडतच बसतोया, बगा ! आयेची सय येते का काय



कोन जाने ! —बापूस कसा बी झाला तरी बाप्या मानीस ! ...काय करील अशा वख्ताला ?"

"अग देवच कोपला त् कुनाकड् म्हून दावा करायचा ?—" जीवन एक सुस्कारा टाकून म्हणाला—

"तो आतांशात् समद्यांवरच कोपलाय्, जनूं—" गंगा खिन्नतेनें म्हणाली "पान्याचा टिपुस बी नाय्; -दानागोटा संपला; -समद्या संसारांना आग लागल्यात् जनूं ! ...बायाबाप्यांचे चेरेम्होरे बी पार काळवंडले ! ..पर त्या देवाला हाय् का दया ?—तो खेळतोय् खेळ ! ..असा कसा मेला देव तरी, बाई ?"

"काय व्हनार हाय पुडं,. समजत बी नाय् !-इक्ती वर्सं वोस पडलेलं ह्ये आमच्या बापजाद्यांचं श्येत ! ...समद्यांच्या पुन्याईन् आन् भाई, इवेक-दादांसारक्या म्होरक्यांच्या धीरन् आन् प्रेमान्, कसं बगबगतां तरारून आलं व्हतं ग ऽ, गंगे !" जीवन आपल्याच विचारांच्या तंद्रीत बोलत होता—

"पन कुन्या पाप्याची नंदर लागली...कोन जानं ?" ...गंगी अर्धवट रागारागानें म्हणाली— "आमची शालीन्बाय् तडकाफडकी ग्येली ! तो घाव बसला व्हता; ...त्यांत आतां ह्यी पाऊसपान्याची खपामर्जी !...भाई-दादांना काय व्हत असल ? ...आजारी नाय पडते तरच आसचर्य ! —"

"मोठ्या आशेन् हितं त्यांच्या भवतीं जमलेलें हे समदे गडी ! मनान् आतां त्ये आर्दम्येले झाले हाइत ! घुबडावानी तोंड खुपसून बसल्यात कुटं कुटं !-" जीवन हळहळला, नी पुटपुटला—"त्येत् आतां म्हनत्यात्, हौशीच्या भुताचाच श्याप हाय् हा ! ...भैऱ्याचा नादान जीव घुटमलतोय् पिकांभवती !... त्यीं दोघीं फिरून या श्येताला वसच पाडणार, जनूं ! साऱ्यांच्या तोंडांत माती कालवनारे त्ये !—"

"हंऽ .." एक सुस्कारा टाकून, आपल्या झोपडीत शिरत गंगा म्हणाली— "काय काय व्हईल त्ये पायचं ! आखीर आली त् देवालाच दया !...त्याचीच मरजी ! !आमाला जगवील, ...नाय् त् मारील—"

....१७२

"पांग्याऽ-लेकाऽ-फिर आदी मागें !—चाललास कुटं ?-" जीवन अधि

कारवाणीनें ओरडला; त्याबरोबर, पांग्या जागच्या जागीं थबकला—गपचूप उभा राहिलाः—अस्वस्थपणें चुळबुळला.

एका काठीवर त्यानें आपली घोंगडी-वळकटी अडकवली होती व तिन्हीं-सांजेच्या वेळीं मंगलग्रामाच्या कचेरीकडील मोठ्या दरवाजानें, दबकत दबकत तो दूर दूर चालला होता.

" आपलं श्येत जळलं !-आपन आतां ठार बुडालों !...मला हितं आतां नाय न्हावतत, जीवनदादा—" अडखळत अडखळत, भावनावेगानें पांगा बोलत होता—" मंगलदादा गेल्यापून आपल्या गांवाची समदी सोबाच गेली; पुन्याईच संपली ! -फिरून ही अवकळा आली हितं नांदायला, ..आतां आपन कदी बी नाय तरनार, जीवनदा !—तवा मी जातों कसा कुठं तरी निघून माज्या जिवाला हितं नाय् आतां करमत— "

" ते सुभान, सामजी आन् बिजे कोन कोन आपापलीं बारदानं घेऊन काल गेले !...तूं इक्ता श्यानासुर्ता !-आतां त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून तूं बी-" जीवन बंगलीच्या पायऱ्यांजवळ बसला होता. बोलतां बोलतां, त्यानें अगदीं हाताशपणें आपल्या कपाळावर हात टेकला—

" हितं मरेमरेतों खपून काम क्येलं !...अजून बी येतकाम, बांबूकाम टकली...ज्याला जें जमल तें, जो तो करतोय् !...पन् मंग...त्यातनं काय पोट जलनार् ?...आपला गावचा धान्याचा शिदा-साटा संपत चालल; पाऊस-पान्याचा तर पत्त्याबी नाय् दिसत;.. आतां किती दीस ह्ये असे जायचे, जीवनदा? —मंग त्यापक्षीं आजच कुटं तरी दुसरीकड् आपला रोजचा शेर- "तरी पांग्या तळमळीनें बोलतच होता—

" असं तुमाला आपलं चटकन् बोलतां येतं रे-! पन् मला ?-" जीवन, थोड्या रागारागानें, पण हतबलपणेंच बोलत होता—" मी बी तसं बोलून् तुझ्या संगतच हितून उटन !-कोन आडवल मला ?...पन्, येड्या ऽ !-मंग आपले परकासभाई, आपले इवेकदादा ? त्ये बी तुमचींच चिंता करता हाईंत ना, रातदीस ?—त्यांनीं मंग कोनाच्या तोंडाकडे पाह्याचं ?—चुटकीसरसे—तुमी अस समदे उठून जात्याल !...आन् मंग...त्यांनीं रे कोनाच्या जीवावर ह्यें श्येत पुडं धरून न्हायचं; फुलवायचं ?—"



" पन् आमचा आनी त्यांत भार नको त्यांना !-" पांगा थोड्या कळवळ्यानें म्हणाला-" धान्य आदी थोडं...आन् आमी त्यांत खायला काळ, भुईला भार !...म्हनून... जीवनदादा—"

" अर त्ये काय-त्यांच्या, का आपल्या, हातचं हाय् ?" पांगाला जीवन समजावत होता—' आबाळाची कुऱ्हाड डोईवर पडनार म्हनली—आन् पाया-खालची धरनी येकदम दुभंगली तर मंग त्यावर कोनाचा काय इलाज ?-अरेऽ समद्यांचं जें व्हईल त्येच आपलं येकेकाचं ! हिंमत मर्दा तो मदत खुदा !.! "

पांगा क्षणभर कांहींच बोलला नाहीं. त्यानेंहि, बोलतां बोलतां, जीवनजवळ बसकण घेतली होती-

जरा पलीकडे भैरवाडीबाजूची नदी संथ वहात होती. तिच्याकडे बोट दाखवून, पांगा एखाद्या पिसाटासारखा मोठ्यामोठ्यानें एकदम ओरडला—" ह्ये ह्ये...इक्तं-पानी बगा भरभरून व्हावून चालया खालीं ! पर आपल्या वाडलेल्या रोपांना येक टिपूस बी न्हाई !...तीं झालीं बगबगतां जमीनदोस्त—त्यांतून फिरतात आतां भैऱ्या-हौशीचीं भुतं—"

" ऐक ! बडबडतोय उगीच रागांत तूं ! काय लई उशीर नाय् झालाय अजून, पांग्या !-" जीवन चिकाटी न सोडतां त्याला दुबळा धीर देत म्हणाला—" अर् कुनी सांगावं ?...अजून बी चारदोन रोजांत आबाळ फिरून भरून येईल !-पाऊस पडून...समदीं श्येतं पुना तरारून येतील ; ह्ये बी दीस जातील ! रोपं जगाय् हवींत -आपन् बीं जगाया हवं !-येड्या—देव तारी त्याला कोन मारी ?? मंगलदा गेला; शालिनीबाय गेली . त्यांचे बी जीव घुटमलताहेत ना,... याच भुत्याच्या शेताभोंवतीं ?... मंग ? सांग ? त्ये मोटे कीं भैऱ्या-हौशीचीं भुतं मोटीं ?? टाक त्ये येडे इच्यार उरातन-पांग्या ?-चल जा ! फिर आदीं मागं !...आन् जा सांग समद्यां संवगड्यांना, म्हनावं--आतां आखीर-परयंत हितच न्हावूं समद्ये ! काय काय व्हईल त्ये निमूट बगूं ! अरेऽ...जगूं त् समद्यें, मंगलगावातच !!...नाय् त् परकासभाई , इवेकदादाबरोबर समदेच मरूं--हितंच !!"

अखेर पांग्यानें आपली भारावलेली मान खालीं घातली; मन आवरलं आणि तो उठून आपल्या झोपडीच्या बाजूला सामानासह परतून चालूं लागला—

तसं परतून, तो दूर निघून गेलेला पाहून, जीवननें एक दीर्घ निश्वास टाकला व सभोंवार पसरलेल्या लांबच लांब वाळल्या सुकलेल्या, आडव्या पडलेल्या शेतांवरून एक खिन्न दृष्टिक्षेप टाकला—

....१७३

तरुणींच्या हसण्या-खिदळण्याच्या स्वैर लहरी हवेंत तरंगत होत्या—

एक छोटी स्टेशन वॅगन रस्त्यानें हळूहळू चालली होती. तिच्या व्हीलजवळ एक ठाकठीक चेहऱ्या पोषाखाची तरुणीच बसली होती—

तें सारं स्त्रियांचं साम्राज्यच होतं—

मागें वळून ती म्हणाली—" आतां आमच्या आजीबाईंना म्हणूं द्या ना एक गाणं—कधीं नाहींत त्या आज निघाल्याहेत आपल्याबरोबर पिकनिकला नवसासायासानें —"

" खरंच...खरंच ! म्हणऽग...म्हणऽग-तरुण आजीबाई !-" सगळ्यानी, मागल्या बाजूला एका कडेच्या सीटवर गपचूप बसलेल्या, सोज्वळ चेहऱ्याच्या, कांहींशा लाजाळू तरुणींभोंवतीं,,.एकच गिल्ला केला—

ती तोंडांतल्या तोंडांत हसत होती—तिचा चेहरा गोड, सोज्वळ, शांत दिसत होता. त्यांच्या थट्टेनें ती चिडत नव्हती; पण गाणेंहि म्हणत नव्हती—-

" अशी मुलखाची हट्टी आहे अगदीं !...नाहींतर, वर्गांतल्या शेंबड्या पोरीबाळींसमोर मात्र, हिला कोकिळेचा कंठ फुटतो ! " एक तिला डिवचून हसत म्हणाली—

" अगदींच मास्तरीणकाकू झाल्या आहेत ग त्या- नाहींतरी, आतांशा दोन-तीन वर्षं !...कोणाशीं जास्त बोलायला नको;...कुठें मिसळायला नको !... पुस्तकं घेऊन, एकलकोंडी, घुमी...आपल्याशींच आपली घुमणार !.. नाहींतर, पोरींशी पोरकट गोष्टी तरी बोलत बसणार ! आजच कुठें...आपल्याबरोबर चार भिंतीतून बाहेर पडलीय् ! हाच मुळीं, कधीं-नव्हे तो कपिलाषृष्ठीचा योगायोग-' दुसरीनेंहि हास्याची लकेर फेंकली—

"कां ग पण असं ?..." तिसरीनें, हसत हसत, औत्सुक्य खोडकर साळसूदपणा दाखवला—



" कां म्हणून ग काय विचारतेस ? " व्हीलजवळची ती पहिली तरुणी हसून मागें वळत म्हणाली-" अगऽ आज दिसतेय् अशी एकलकोंडी ती !...पण, कॉलेजांत कशी अगदीं फटाकडी होती हो !—सगळीकडे चमकत फिरायची !... त्यावेळींच-त्याच गडबडींत, तिची एक दिवस एक बहुमोल वस्तू हरवलीय् , कायमची !! पुढें पोर पदवीधर झाली; आणखीहि परीक्षा पास झाली; इतकीं वर्षं मास्तरीणहि आहे !.. पण अजून आपली शोध-शोध शोधतेय्; जें गेलंय् त्यावेळीं, तें सांपडतच नाहीं—"

" होऽग ? खरंच ? काय हरवलंय ग तुझं ? कुठें ?—" दुसरीनें तिला हलवून विचारलें—

" वा ऽ ग वाऽ ! तुज गुपीत सांगूं मी काय ?...कसें ? अगऽ-मम मन गेलें तें नच गवसें !..." व्हिलजवळून, त्या तरुणीचेच पुन्हां हसरे उद्गार आले.

सगळीकडे एकदम जनानी खसखस पिकला !

कोणी म्हणाल्या-" सांग ग सांग ! गुपित सांग !! "

...१७४

मग मोटर चालवतां चालवतां, ती खोडकर तरुणी खेळकरपणें गुणगुणूं लागली—

" तुज गुपित सांगुं मी काय ?...कसें ??-मम मन गेलें तें नच गवसे !ध्रु०
दो नवथर हृदयें थरथरलीं- मंड मखमल हिरवळ अवतरली !-
दव-बिंदू-मौक्तिक नयन-तलीं- नव दुनिया भवतालीं भरली !- ध्रु० १
अति नाजुक नव नव भावांची- मग एकच गर्दी हो साची !-
त्या प्रबळ जीवनाच्या वीची- उघडतीं कवाडें नयनांचीं !- ध्रु० २
हळुवार भावना-लहरींत- फेसाळुन हृद्-सागर गात !
नव-तेज भरे जें हृदयांत- ती साक्ष झळाळे नयनांत ! ध्रु० ३
निश्वास बोलके हुरहुरले !- श्रवणांचें ठाणें तगमगलें-
रोमांच देहुलीवर सजले !- अन् गुलाब बघबघतां रुजले !- ध्रु० ४
निमिषांत हरपलें भान कसें ?- पण मन गेलें-तें नच गवसे !-
अन् उरांत उरले घोर पिसें !- हो जीवन दारुण मरु-रणसें ! ध्रु० ५
मम गुपित असें !...अन् असे पिसें !.. शोधतें परी मज नच गवसे !-"

अधून मधून, सगळ्याच त्या गाण्यांत भाग घेत होत्या. शेवटीं, त्या साऱ्याजणी खदखद हसल्या.

ती बिचारी लाजेनें अर्धमेली झाली होती.–

अखेर अगतिक होऊन, तीच फुगटून पण हसत म्हणाली—" मुलखाच्या नष्ट आहांत अगदीं ! दुसरं कोण तोंडी लावायला मिळालं नाहीं आज, म्हणून माझ्यावर तुटून पडलांहां कट करून सगळ्या जणीं !...बरंऽ...बाई...होऊं दे तुमच्या मनासारखं !— तुमची इच्छा ! "

" अगऽ आमचीच तर इच्छा आहे...केव्हां ना केव्हां...एकदा होऊं दे तुझ्या मनासारखं —" ती व्हील जवळची खुसखुसत तिलाच उलट म्हणाली.

तिच्या पाठोपाठ साऱ्याच खुसखुसल्या —

....१७५

थट्टामस्करी विनोद करीत, त्या अशा चालल्या असतांना एकदम एक आवाज झाला—सगळ्याजणीं एकदम गोंधळून ओरडल्या—'ईऽ' 'अगऽबाई'

मागला टायर फुटल्याचा तो आवाज होता. चाकाचा खडखडाट होऊं लागतांच, ब्रेक दाबून तिनें मोटार थांबवली––

ती व तिच्यामागून सगळ्याच भरभर खालीं उतरल्या व चारी चाकांची पाहणी करूं लागल्या.—

दोघी-तिघींनी वरून नवा टायर काढला; हत्यारांची पेटी बाहेर आली–– इतकावेळ हसत-खेळत मोटार चालवीत असलेल्या त्या तरुणीनें जमिनीवर गोणपाट टाकून थपकल मारली–व फुटलेल्या टायरच्या चाकाचे नट, रोजचा सराव असल्यासारखी ती भराभर सोडवूं लागली––

सर्व तिच्याभोंवतीं जमून तिला मदत करीत, बोलत उभ्या बसल्या होत्या–

त्यांच्यांतल्या तिघी-चौघी रस्त्याच्या कडेला जाऊन एक दगड, पाहून बसल्या होत्या;–त्यांतच, जिची मघा थट्टा चालली होती, ती तरुणीहि होती.

बसल्याबसल्या, तिचें लक्ष, जवळच कलती होऊन पडलेल्या, एका तिरक्या पाटीकडे गेलें. त्यावरचीं तीं चित्रविचित्र चित्रें आतां पुसट झालेलीं, 'आम्हांला जगायचं आहे–' हीं अक्षरें पाहतां-वाचतांना, तिचें कुतूहल एकदम जागृत झालें.



'अय्याऽ...' असें आपल्याशींच पुटपुटत, ती जागची उठली व त्या पाटीसमोर जाऊन उभी राहिली—

तिनें मागें दृष्टिक्षेप टाकला. मोटारीजवळ सर्वांचा अजून रिपेर करण्यांत गर्क होऊन खटाटोप चालला होता. तिनें त्या पाटीवर एक पुन्हां सस्मित कटाक्ष टाकला व ती त्या हाताच्या बाजूनें आंत शिरणाऱ्या पायरस्त्याला लागली—

" काय ग एऽ बया ?...आतां कसलं चाललंय् संशोधन आणखी, बाईसाहेबांचं ? " त्या दोघीतिघी तिला येऊन मिळत म्हणाल्या—

" चला...बसून काय करायचं इथं ?–त्यांचं तें चाललंय् तंवर पाय तरी मोकळे करून येऊं या ! हें पाहिलंत ?—हसत-खेळत त्या सगळ्याच तिकडे निघाल्या —

....१७६

गंगा तिमिरला खेळवत होती. तेवढ्यांतच, त्या तीन-चार मैत्रिणी तिथें येऊन पोहोंचल्या होत्या—

तीन-साडेतीन वर्षांचा तिमिर हाफ्शर्ट–हाफ्पँटमध्यें दुडदुडत होता— त्यांना जवळ येतांना पाहातांच तो धावत त्यांच्याजवळ गेला व मोठ्या कुतूहलानें त्यानें त्या लाजऱ्या तरुणीसमोर उभे राहून, डोळे वर करून पाहात विचारलें—

" कोण तुमी ? ...काय पायजे ? —"

" तूं रे कोण, चिमुरड्या ? " ...तिनें हसून विचारलें—

" मी ? ...मी तिमिर ! " ...तो म्हणाला आणि विचारलेन् " तुम्ही ?

लांबूनच त्याच्याकडे व त्यांच्याकडे कौतुकानें पाहात, गंगा जागच्याजागीं उभी राहून हसत होती.

तिमिरचा तो चौकस ऐटबाज अभिनिवेश व बालिश धीटपणा पाहून, त्या मैत्रीणींनाहि खूप गंमत वाटली. त्याला पटकन् वर उचलून घेत ती म्हणाली, ' मी होय ? मी तुझी मावशी ! –तुला मोटारींतून भुर्रर्र न्यायला आलेंय् — "

" मोटारींतून ? ...भुर्रर्र ? –" तिमिर क्षणभर तिच्या चेहऱ्याकडे निरखून पाहात, तिच्या हातावर बसल्या बसल्या म्हणाला— " पण मी नाहीं येणार बुवा— "

" का रे ऽ ? -तुला खाऊ देऊं कीं आम्हीं ! ...आपण खूप खूप मजा करूं—" त्याचा गाल कुस्करून ती वात्सल्यानें म्हणाली.

" सांगूं का ? .. आमच्या भाईनाच विचारूं आधीं आपन— " तिमिर जरा गंभीर चेहरा करून, विचार केल्यासारखें करीत म्हणाला—" खाऊ नको मला ! पण आईकडे न्याल मला मोटारींतून, मावशी ? ...तर येईन मी तुमच्याबरोबर— "

ती हसून सहज म्हणाली- " हो हो —कुठें गेलीय् तुझी आई ? —"

" देवाकडे... " तिमिरनें निष्पापपणें सांगितलें-

तें ऐकून केवढ्यानें तरी दचकली ती ! त्या मैत्रिणींनीहि एकमेकांकडे निमूटपणें कटाक्ष टाकले.

त्यावर त्याला काय सांगायचें तें न समजून त्या त्याच्याकडे पाहात होत्या. एवढ्यांत तिमिर म्हणाला- " ती गेली तेव्हां मी झोंपलों होतों- गंगाबाय म्हणते भाई पण म्हणतात रोज, येणार येणार म्हणून ! — पण येतच नाहीं हो ऽ ती—"

नकळतच गंगेचे डोळे पाण्यानें डबडबले होते. कांहींशा संमिश्र चेहऱ्यानेंच, ती त्यांच्याजवळ गेली.

....१७७

' मावशी ' च्या हातावर नव्यानेंच बसल्या बसल्या, तिमिर गंगाकडे साभिमान, सस्मित पाहात होता.

तिनेंहि कौतुकानें त्याचा गाल हळूच कुस्करून म्हटलें—हीं तुला नवी मावशी मिळाली व्हय् रे ? आतां इसरला जनूं गंगाबायला ! ...अं ऽ ? "

आणि—त्या साऱ्या मैत्रिणी आपल्याकडेच प्रश्नार्थक चेहऱ्यानें पाहात आहेत, हें ध्यानीं येऊन, गंगा त्यांना म्हणाली- " चला कीं बाय्, ...तिकडे बंगलीकडे-पावण्यांच्या हॉलमदी ! —कुठून आला हाय्सा ? —"

गंगाच्या त्या हळबळित नी रांगड्या शब्दांतील आतिथ्य जाणवून, सस्मित चेहऱ्यानें, त्या साऱ्याजणीच तिच्याबरोबर चालूं लागल्या.

" ...अग बघ-मोटार मोडलीय् तिकडे आमची, रस्त्यांत ! —दहाबारा जणी आहों आम्हीं ! तुम्हाला कशाला नसता त्रास आणखी ? " एक हळूच म्हणाली.



" मानसांनीं मानसांना वळकलं, कीं समदं काय् व्हतंय्, बगा —" गंगा हसून म्हणाली.

" मोडली मोटार ? अर्रर ! मग हो, मावशी ? आतां काय हो करायचं आपण ?" सचिंत चेहऱ्यानें तिमिर पटकन् म्हणाला—

त्याच्या त्या अकस्मात उद्गारांनीं सर्वांनाच हसूं लोटलें.

त्याचे एकदम गाल कुस्करून, त्याची ती मावशी कौतुकानें म्हणाली- " पण तुला रे काय करायचंय् ? ...तूं तर येणारच नव्हतास ना ?"

आपल्याला यांनीं शब्दांत पकडलंय्, याची जाणीव त्याचा चेहरा दाखवीत होता; क्षणभरच, त्यानें तिच्याकडे गोंधळून पाहिलें. तेवढ्यांत—सगळ्याच जणी खुद्कन् हसल्या. तेव्हां मग, त्यांच्याबरोबर तिमिरहि मनमुराद हसला—

त्यांच्यातली एक लटक्या दमांत म्हणाली—" आपण याच्याकडे आतां जेवायलाच राहूं या ग !—याचं जेवणच संपवून टाकूं या सगळं—"

" खरंच-खरंच !—याच्याचकडे आतां खूप-खूप दिवस राहायचं !—राहूं ना रे आम्ही, तिमीर ?—" ती हसून म्हणाली—

चालत चालत, तोंवर त्या सगळ्या बंगलीजवळ आल्या होत्या—

इतक्यांत,—त्यांना खिडकींतून शब्द ऐकूं आले—" हो...होऽ ! हवे तितके दिवस रहा, म्हणावं !...सांग रे तिमीर-" सगळ्या दचकल्या. त्यांनी तिकडे पाहिलें. प्रकाशचे ते शब्द ऐकून, चटकन् उडी मारून तिमीर, खालीं उतरला, त्याच्याकडे दुडदुड धावत जात म्हणाला—" भाई, भाई...मावशी आल्या आहेत—"

....१७८

पायऱ्या उतरून प्रकाश खालीं येत होता—तिमिरला वर उचलून घेतां घेतां, त्याने त्या तरुणीकडे पाहिलें...तिमिरने दाखवलेल्या मावशीकडे त्याची दृष्टि जातांच, तो एकदम दचकला—आणि त्याच्या तोंडून अस्पष्ट शब्द बाहेर पडले— " कोण ?-म्हणजेऽ ? ?—"

त्यावेळीं, छायाची एक अनपेक्षित गोंधळी हालचाल झाली; ती ध्यानीं येऊन, तिच्या मैत्रिणी हळूच कुजबुजल्या—" काय गऽ ? कोण गऽ, छाया ? "

"छे:...कुठं काय? उगीच आपला भास! हो ना हो?" छायानें स्वत:ला चटकन् सावरलें; व जसें कांहीं, कांहीं झालेंच नाहीं अशा पद्धतीनें, तिमिरकडे कौतुकानें हसून पहात, ती पुढें म्हणाली—"हेंच होय रे तुझे भाई, तिमिर? आतां पळालास, गुलामा, त्यांच्याकडे;—विसरलास लागलीच आम्हां मावश्यांना!—बरें...पण मग कुठं राहायचं आम्हीं? कुठं जेवायचं? सांग ना?..."

एकदम प्रकाशच्या अंगावरून तिमिरने अधिरपणें खालीं उडी मारली. तो छायाकडे धांवला व तिचा हात हातांत धरून म्हणाला—"चला-चला—मावशी!...तुम्हाला जागा दाखवतों हं मी—"

इतक्यांत,-लांबून मोटारचा भोंगा वाजला—

छायाच्या बरोबरच्या मैत्रिणी तिकडे दबदबा धावत गेल्या; छायाला सोडून तिमिरहि त्यांच्यांत सामील झाला.

त्यांच्याच मागोमाग छाया व तिच्यामागून प्रकाशहि तिकडे जात होता—

"किती किती वर्षांनी भेटतांहां, प्रकाश, असे?" आपल्या मैत्रिणीपैकीं कुणी जवळ नाहींसें पाहून, चालतां चालतां, छाया हळूच प्रकाशकडे ओझरतें वळली व तोंडांतल्या तोंडांत म्हणाली...

"खरंच! आश्चर्यच!!—पण मग...तूं आज एकाएकीं इथं कशी?..." तोहि गोंधळून तिच्याकडे पाहात होता—

तोंवर, ती मोटर थांबली; हसत-खिदळत, साऱ्याजणी त्यांच्याच बाजूस येऊं लागल्या.

तें पाहून छाया गडबडीनें म्हणाली—"आतां याक्षणीं त्यांतलं कांहीं एक बोलायचं नाहीं हं अगदीं! आपली कसली ओळखच नाहीं;...समजलं? नाहीं तर बघा, या साऱ्या बया पराचा कावळा करतील-नि मला अगदीं फाडफाडून खातील—"

त्यावर प्रकाश कांहीं बोलण्यापूर्वींच, छाया लगबगीनें तिकडे आपल्या मैत्रिणींकडे धावत गेली.

....१७९

"व्हा ऽ की-बाय आनखी दीस दोन दीस!-पोराला इवता तुमचा समद्यांचा जीव लागलाय् त्?-" सामानसुमान बांधून, तें मोटारीकडे नेतां नेतां, कांहीं मैत्रिणींच्या गराड्यांत बसलेल्या छायाकडे पाहून, गंगा आग्रही स्वरांत बोलत होती—"इक्ता जीव टाकत्ये ऽ मी, पर् भेकरावानी धाय दिशा बगतो! ...आन् ग्येल्ये दोन दीस बगा कसा हरनावानी टुणटुण उड्या मारतोया. तुमा समद्यांमंदी!! ...आन् ह्या येका मावशीला त् अगदींच घट्ट केलींया त्यांनं—"



"बघ ग ऽ बाई, छाया,...ठेव हो तुझं तूं!...राहातेस तर राहा आपली! ...आम्ही नको मध्यें आणखी!—मला मात्र, ...या बाकीच्यांना तरी मोटरींत भरून नेलंच पाहिजे, ठरल्याप्रमाणें—" कुसुमनें हसून सर्वांकडे एकदां पाहिलें; त्यांच्याबरोबर खुसखुसत, मग ती गंगाकडे वळून म्हणाली—"हिला खुशाल ठेवून घे ग तूं, गंगाबाय्! अगदीं कायमची ठेऊन घेतुलीस इथं तिला, तरी आमची कुणाचीं ना नाहीं हो ऽ—"

"चल ग चावटे ऽ! ...पुरे झाला कीं तुझा अचरटपणा—" छाया एकदम लाजली- गंगा हळूच हसली—साऱ्याच मग खदखदून हसल्या.

तेवढ्यांत, तिमिर धावत धावत तिथें आला व छायाचा हात धरून तिला ओढत तो म्हणाला-"ए मावशीऽ ..ए मावशी ऽ—त्या बघ सगळ्या बसल्या कीं मोटारींत; ...चालल्या घेऊन आपली मोटर! ...आतां ग ऽ? ...तूं पण जाणार??—"

"होऽ..." त्याला जवळ ओढींत, छाया सस्मितपणें म्हणाली.

"अं ऽ—" तिमिरनें नापसंती दर्शविली; नी तो तिच्या अधिकच कुशींत शिरला. व म्हणाला-"आमी नाय् जाऽ-"

"मोठा लाघवीच पोर आहे, अगदीं-" एकदम वात्सल्यानें त्याला आपल्याकडे ओढून घेऊन, कुसुम त्याचा पापा घेत म्हणाली—"अगदीं गळ्यांतच पडतोयस कीं रे तिच्या! ...नाहीं ठेवणार जा तिला आम्ही! ...हवं तर तूंच चल आमच्याबरोबर;...तिथें आमच्या शाळेंत ना, खूपखूप मुलंमुली आहेत, तुला खेळायला! चल येतोस?"

"मी येऊं?" तिमिर गोंधळला; गंगा-छायाकडे पाहूं लागला.

"आतां कांऽहीं बोलायचं नाहीं! गपचूप माझ्या शेजारीं मोटार चालवायला बसायचं-" कुसुम तिमिरसह चालू लागली. गंगा गोंधळली...पण हसली.

प्रकाश तें बावरल्या दृष्टीनें दूरून पहात होता.

तेवढ्यांत, आपला चिमुकला हात वर करून, तिमिरहि–म्हणाला " टाऽ टांऽ भाई– "...

....१८०

या मधल्या आठ दहा दिवसांतहि आकाशांतील कृपेचा एखादा सुद्धां थेंब मंगलग्रामात गळला नव्हता—

साऱ्यांचीं तोंडं चिमणासारखीं झालीं होतीं. जो तो, एकटा दुकटा, इकडे तिकडे,...झाडाखालीं, बांधावर, झोपडींत बसे नी क्षणामागून क्षण पुढें ढकली

सारेच हवालदील, खिन्न, निराश झाले होते—

विवेक तर त्या सातआठ दिवसांत गुप्तच झालेला होता. त्या साऱ्या प्रकारानें अधिकच हताश, किंकर्तव्यमूढ होऊन, साऱ्या मंगलग्रामाच्या कोना-कोनातून, प्रकाश अकारणच सैरावैरा फिरत होता—

भोंवतालचीं वाळलेलीं नि जमिनीवर जवळ जवळ निष्प्राण होऊन लोळत पडलेलीं तीं शेतें ! तीं पाहून, त्याच्या जिवाची आंतल्या आंत तगमग होत होती, मनांत आजवर फुललेल्या फुलवलेल्या, साऱ्या सुख-स्वप्नांचं अगदीं निर्माल्य झालं होतं, त्याच्या डोळ्यादेखत ! —

क्षणोक्षण त्याला वाटूं लागलं होतं–" आपल्या हातालाच यश नाहीं !... आपल्यावर विसंबून, आपल्यामागें असलेल्या इतक्या जीवांच्या तोंडांत, आपल्या-मुळेंच माती पडण्याची ही वेळ आली आहे !–आपणच अपराधी;—आपणच या साऱ्यांच्या दुःखाच्या मुळाशीं आहों—"

आणि असल्या एकांतिक, एकवळी विचारांच्या एकाकी भ्रमणांत, त्याच्या मनाला दुसराहि एक नवीनच वणवा लागल्यासारखं झालें होतं ! –

...हो ती छायाची पुनर्भेट !––

ती तशी इतक्या वर्षांनी येते काय; तिमीरची तिची गट्टी जमते काय, अखेर, साऱ्याच मास्तरणी त्याला बरोबर घेऊन जातात काय;...आणि तोहि गुलाम, हौसेनें त्यांच्याबरोबर निघून जातो काय !— त्याला त्या प्रसंगपरंपरेची गंमत वाटत होती व हुरहुरहि वाटत होती––



शालिनी एकाएकी निघून गेल्यानंतर, प्रथमच आईवेगळ्या तिमिरला तसं सुखी, खेळकर पाहून, त्याला गंमत वाटली होती––

—पण त्याबरोबरच, शालिनीच्या अकस्मात वियोगाची, त्यापूर्वीच्या साध्यासुध्या सुखी संसाराची, तिच्या प्रेमळ भाबड्या सहवासाची स्निग्ध आठवण होऊन, त्याला रुखरूख-हुरहुरहि वाटत होती.

अशा चमत्कारिक, चौफेर गोंधळी मनःस्थितींतच, आजपर्यंतचे हे प्रकाशचे मधले दिवस गेले होते.—

लांबून वाजलेला मोटारचा अस्पष्ट भोंगा त्याच्या कानावर पडला. तसं चमकून तो बांधावरून उठला...

तिमिरला शेजारीं बसवून, छाया स्वतःच आपली मोटार हळूहळू मंगल-ग्रामांत आणत होती.

प्रकाशला पाहतांच, तिनें स्मित केलें; सीटवर उभें राहून, टाळ्या वाजवत, तिमिरनें गोडगोड ओरड केली—" भाईऽ भाई—मी आऽलोंऽऽ "

....१८१

" आश्चर्य नाहीं वाटत तुम्हाला या साऱ्या घटनांचं...प्रकाश ? " प्रकाशच्या शेजारीं, झाडाखालीं बसलेली छाया म्हणाली.

प्रकाशनें हळूच एक ओझरता क्षुब्ध दृष्टिक्षेप तेवढा तिच्याकडे टाकला.

तेवढ्यांत, छायाच पुन्हां म्हणाली—" तुमची ती त्यावेळची इच्छा–ती आशा–मला पटत नसूनहि, आजपर्यंत मी अक्षरशः पाळली, प्रकाश ! पण, योगायोग तरी किती विचित्र ? ...पुन्हां अजाणतां भेटलोंच आपण असे ! गंमत आहे नाही ? ...त्यांत पुन्हां तुमचा तिमिर ! त्यानें तर मला एकदांच मिठी मारून घट्ट केलंय् ! —केवळ त्याच्यासाठींच, मला आज इथें फिरून यावं लागलं, असं —चुकलं माझं ? "

" छे छे ! उलट आभारी आहे मी तुझा— " प्रकाश गद्गदपणें म्हणाला–

" तसंऽ नाहीं हं ! तिमिर आल्यापासून उलट मलाहि विरंगुळाच वाटतोय्—नाहीं तरी, ...अख्खं घर मला एकटीला खायला उठायचं ! —आंत वावरतांना नुसत्या दुबळ्या भावनांनीं तुडुंब भरलेलं माझं मनच मला कुरतडायचं

सदानकदा, रात्रंदिवस ! —गंभीर, एकलकोंडं बसून, मी आपली सारखी वाचत असायचें ! —" छाया हसली; प्रकाशकडे निश्चल नजरेने पाहात राहिली

" हल्लीं करत काय असतेस ?-नि केलंस काय तूं ?"–

" पहिली रुळावर होती ती गाडी...टर्मिनसपर्यंत एम्. ए. नि बी. टी. पर्यंत, पोंचवली !—आतां शिक्षकिणीच्या रुळावर आहे उभी ! अहोरात्र नर्स काम करून, माझ्या आईनें हाडांची काडं केलीं !...तिचं कर्तव्य तिनें केलं; ...मला एवढं शिकवलं ! माझ्या दृष्टीनें, माझं कर्तव्य मीहि करीत राहिलें ! पण तिचं सुख मला नि माझं सुख तिला कांहीं अखेरपर्यंत लाभलं नाहीं ! . गेल्यावर्षी गेली बिचारी !—सुखसोयींनीं भरून माझ्यासाठीं तिनें ठेवलेलं घर ! तेव्हांपासून तें कसं रितं रितं वाटतं !—जीवन नुसतं कर्तव्यांनीं भरलंय् !—एकलकोंडं, एकमार्गी झालंय् !...स्वतःच्या कसल्या विशिष्ट कांक्षा नाहींत; कुठला निश्चित प्लॅन नाहीं " ! बोलतां बोलतां, छायानें एक दीर्घ निश्वास टाकून पुढें म्हटलें— " आणखी काय नि कसं सांगू, प्रकाश ? "

" हं ! म्हणूनच त्या तुझ्या मैत्रिणी तुला आजीबाई म्हणत होत्या वाटतं ? "

" सत्प्रवृत्त स्त्री वेळेवर पत्नी होऊं शकली नाहीं, कीं तिला एकदम आजीबाई' म्हणून हिणवणारच, तिच्या सगळ्या मैत्रिणी–तरुणपणींहि" छाया वरवर हळूच हसली; पण तिच्या स्वरांत खिन्नताच ओतप्रत भरली होती.

## ....१८२

प्रकाश किंचित चपापल्यासारखा झाला, त्या जाणीवेमुळें...

तेवढ्यांत – छायाच त्याला हळूच म्हणाली—" आठ दिवसांत, तुमच्या तिमिरनें मात्र अद्भुत किमया केलीय् !...मला आईचं हृदय दिलं !—मला न कळत, माझ्या जीवनाला एक आकार आणलाय् – आधार दिलाय् "—

" खरंच ? " प्रकाशनें उत्सुकतेनें विचारलें.

" खरंच !...माझ्या जीवनांत दुरून कां होईना, पुन्हां प्रकाश यायला'... तुम्हीहि यायला, तोंच कारण झालाय !–पण मग तो हक्क स्वतः कांहींच का नव्हत



मला, --प्रकाश ? त्यावेळीं तुम्हींच आडकाठी केलीत ! तुम्हींच तसे गुप्त झालांत–" छायानें एक दीर्घ निश्वास टाकला.

" चुकतेस, छाया ! ..तें तुझं सुखस्वप्न माझ्या आटोक्याबाहेरचंच वाटें मला ! –तुझं एक निराळं,...नवं जग व्हावं, म्हणूनच माझा तो प्रांजळ प्रयत्न होता. " बोलतां बोलतां प्रकाशनें एक दीर्घ निश्वास टाकला; क्षणभरानें, तो पुढें म्हणाला–" त्या नंतरचं माझं तें गरीबीचं व्यक्तीगत सुखस्वप्न मी कल्पिलं; पण मग, तेंहि तसं अखेर अनपेक्षितपणेंच विरलं... —"

## ....१८३

" ऐकलं मी ! पण सगळंच कांहीं विरलेलं नाहीं, प्रकाश !–तिमिर आहे कीं तुमचा–" सहानुभूतीनें, हळुवार शब्दांत छाया त्याला म्हणाली—

" तरी-पण त्या लुटुलुटु चालणाऱ्या बाळाइतकाच त्याचा हा बापदेखील --एकाकी, लटपटतीं पावलंच टाकतोय् जीवनांतलीं, याक्षणीं--" प्रकाश गोंधळल्या वृत्तीनें उत्तरला –

" मलाहि जगावं... चांगलं जीवन जगावं असं फार फार वाटतं !...पण, कोण जाणें, कसं तें ? "—छायानें उसासा टाकला–क्षणभर ती स्तब्ध राहिली; आणि मग, हळूच अधिर स्वरांत तिनें प्रकाशला अडखळत विचारलें–" तुम्ही तरी सांगाल कां हो मला, प्रकाश ? यापुढलं जीवन मी कसं जगावं तें ? ?—"

प्रकाश, चमकला; पण मग खिन्न हसून म्हणाला, " वेडीऽ ! माझा मीच मुळीं गोंधळलों आहे ! लंगड्यानें ग पांगळ्याला जगायचा मार्ग कसा दाखवायचा ?–"

" अस्संऽ तर मग "...छाया हसून म्हणाली–" त्या छोट्या पांगळ्यालाच मी आतां माझा गुरु करीन !...त्यालाच घट्ट करीन !... नि त्याच्याकडूनच जगण्याची कला नव्यानें शिकेन ! "—

" मावशीऽ, मावशीऽ ! ..भाई ! "—तेवढ्यांत–तिमिर तिथें हांका मारीत धावत आला होता—

त्याला चटकन् वर उचलून घेऊन, त्याचा मटकन् एक मुका घेत, छाया म्हणाली-"चला-बाळ गुरुजी !-इथून आपल्याला आपलं निघालं पाहिजे आतां! येतों म्हणून सांग, तुझ्या भाईना ! ...चार दिवसांनीं, नारळी-पौर्णिमेला येऊं म्हणावं पुन्हां—

प्रकाशभाईनें पुढें केलेला हात आपल्या चिमकुल्या हातांत धरून, हसत-हसत तोहि म्हणाला--"होऽ, ग होऽ मावशी ! मग आपण मोटारींतून भूरभूर जाऊं अंऽ भाई ?...होना ग, मावशी ?ऽ—"

"हं..." छायाचा कंठ जड झाला होता—

त्याक्षणीं, प्रकाशच्याहि डोळ्यांत पाणी डबडबलें होतें—

[ -१७- ]

# आकांत

....१८४

"आज धापंद्रा दीस इवेकदादा हितं न्हाइत ! -तुमी बी तिमिर गेलाय् तवांपासन् येकले न्हाता ! ..वरुनदेवान् त् तसा पुरा पुरा कोप क्येलाय्; जेमतेम धुगधुगी अंगांत ठ्येवून, श्येतं मातींत लोळतायंत् !— आजची ही नारली-पौर्निमा !-पर येकान् बी-कसला गोडधोड त् नाय्च, पन् सादासुदाबी घांस तोंडात घातला नाय् !... समदे गडी, परकासभाई, मेल्यागत निपचित झाले हाईत !— आतां किती दीस, ...आन् कसा वो दम काडायचा ?"

प्रकाशची वाट पहात, भैरवाडीच्या नदीकांठीं, जीवन दिवसभर बसला होता. अखेर, तिन्हींसांजेच्या सुमारास, प्रकाश समोरून कुठून तरी येतांना पाहातांच, जीवन लगबगीनें त्याच्यापाशीं गेला होता.

"विवेकदादांनाच शोधायला गेलों होतों रेऽ जीवन, मी..." प्रकाश त्याच्या खांद्यावर हात टाकून स्नेहानें म्हणाला—"पण तो निस्संग, लहरी, स्वैर योगी ! कुठं ध्यानधरणा करीत गुप्त झाला असेल, पत्ताच लागत नाहीं ? -मला समजत का नाहीं, तूं काय म्हणतोयस् तें ? -मी देखील आतां अगदीं पुरा पुराच हतबुद्ध झालों आहे—"

"पन् कोनाला म्हनून आन् कसं म्हनून, आतां थोपवून धरायचं ? काय नी कसं करा, म्हनून सांगायचं, परकासभाई ?" जीवन एक मोठा दीर्घ उसासा सोडून म्हणाला- "साऱ्यांचाच आतां धीर तुटलाय्—"

"तें मलाहि समजत नाहीं कां, जीवन ? या इथंच, एकदां मोठ्या विश्वासानें,... अभिमानानें, ...म्हणालों होतों, आपण —'आम्हांला जगायचंय् !' -पण मग आज, या क्षणीं तर वाटतंय्...'नको हें जीवन !... नको या खोट्या आशा उरांशीं बाळगणं !... नि नको तसल्या वेड्या आशा इतरांनाहि लावण्याचा तो खटाटोप ! !" प्रकाश वैतागल्या स्वरांत म्हणाला.

....१८५

तसं बोलत बोलतच, बंगलीच्या बाजूनें, ते दोघे मंगलग्रामांत शिरले.

सांजा आतां साफ काळवंडल्या होत्या. अधून मधून, एखाददुसऱ्या झोंपडींत दिवाहि मिणमिणत होता; पण हालचाल,...बोलणें चालणें, कुठेंहि कांहीं ऐकूं येत नव्हतें. तं सारेंच वातावरण अगदीं उदास भकास वाटत होतें.

प्रकाशच्या झोपडीच्या दरांत मात्र कंदील दिसत होता. तें पाहून तो चमकला.–'अरेऽ! आज नारळी पौर्णिमा–' मनांत त्याला एकदम आठवण झाली–'छाया आली असेल ?...तिमिर आला असेल !!'

त्याचा तो तर्क बरोबर होता–झोपडीजवळच झाडापलीकडे मोटर उभी केलेली दिसत होती—

प्रकाश दारांत आला; तरी कोणाची कसली चाहूल दिसेना; म्हणून तो पुढें गेला...आंतल्या देवाच्या तजबिरीजवळ एक पणती लावून, तिच्यासमोर छाया व तिमिर दोघें पाठमोरीं बसलीं होतीं.

छाया शिकवीत होती; हात जोडून, क्वचित् बोबड्या शब्दांत, तिमिर तें बोलत होता—"शुभं कुरु त्वं, कल्याणम्, आरोग्यम् , धनसंपदाम् ! शत्रुबुद्धि विनाशाय दीपज्योति नमोऽस्तु ते! आतां विश्वात्मकें देवें, येणें वाग्यज्ञें तोषावें—

काले वर्षंतु पर्जन्यः पृथिवी सस्यशालिनी ।<br>
देशोऽयं क्षोभरहितो, ब्राह्मणाः सन्तु निर्भयाः ॥<br>
अपुत्राः पुत्रिणः सन्तु, पुत्रिणः सन्तु पौत्रिणः ।<br>
अधनाः सधनाः सन्तु, जीवन्तु शरदां शतम् ॥<br>
सर्वेऽत्र सुखिनः संतु, सर्वे संतु निरामयाः<br>
सर्वे भद्राणि पश्यन्तु, मा कश्चिद्दुःखमाप्नुयात् । '

समोरचें तें गोड वत्सल दृश्य पाहून, प्रकाशचेंहि हृदय भरून आलें...

इतका वेळ, तें पाहत, तो तसाच दारांत निश्चल उभा राहिला होता;...तो थोडा पुढें झाला. दाराजवळ टांगलेल्या दिव्यामुळें, त्यांची लांब मोठी सावली आंतल्या खोलींत पडली नि एकदम हलली. त्यामुळें चमकून, छाया भानावर आली; तिनें मागें पाहिलें... तिच्याबरोबरच, तिमिरनेंहि मागें वळून पाहिलें—



दारांत प्रकाश दिसतांच, तिमिर आनंदानें जागचा उठला; धावत जाऊन प्रकाशला मिठी मारीत तो म्हणाला–" कुठे गेलां होतां, भाई ?"

....१८६

"केव्हांची वाट पहात होता तो तुमची—" छाया जागची उठून, पुढें होत म्हणाली—

"आणि नाऽ–तुमाला मोटारींतून भूर भूर नेणार होतों, आमी ! होऽ नाऽ गऽ मावशी ?" उत्साहानें डोळे विस्फारित, तिमिरनें प्रकाशकडे पाहिलें व मग छायाला विचारलें...

छाया नुसती हसली—तिमिरच्या त्या उत्साहाचा भंग होऊं नये, म्हणून प्रकाश त्याला हसत म्हणाला— "अस्सं ऽ?—"

"चलाऽ चलाऽ ...अजून चला ! आतां ' तिमिरनें त्याला प्रथम एकदां हाताला धरून ओढलें; पण मग स्वतःच धावत पुढें होऊन तो म्हणाला " काळोखांत पहायला ना –मावशीच्या मोटारीला दोन मोठे मोठे डोळे आहेत ! —दाखवूं .. !! या .. इकडे या ! —भाईऽ लौकर या इकडे—"

नी दोघांनाहि कसली कल्पना येण्यापूर्वींच, उड्या मारत मारत, तिमिर मोटारीकडे सटकलाहि होता–

....१८७

"तिमिर, थांब—" असें म्हणत, लगबगीनें, छाया त्याच्या मागें जात आहे, तेवढ्यांत,–तो मोटरजवळ जाऊन पोचलाहि होता. त्यानें दोन्हीं बाजूंचीं दारें उघडलीं होतीं–व फ्रंट-सीटवर बसून पटकन् मोटारीचे बाहेरचे फ्लडलाईटहि, एखाद्या माहीतगारासारखीं बटनें दाबून, त्यानें पेटवले होते —

त्याची ती उत्साही गडबड पाहून, छाया तोंडभर हसली; एकदां तिनें हळूच कौतुकानें प्रकाशकडेहि वळून पाहिलें; आणि तिमिरची समजूत करण्याकरितां ती मोटारीजवळ पुढें झाली—

तेवढ्यांत—होता तिथेंच घुटमळत उभा असलेल्या प्रकाशच्या कानांवर, तिमिरचे दूरचे आग्रही गोड शब्द पडले— "भाईऽ यानाऽ होऽ —असं काय ? या !—मोटारींत याऽ"

नाइलाज होऊन, अखेर, गोंधळल्या चेहऱ्यानें प्रकाश पुढें झाला—

तो जवळ येतांच, त्याचें मनगट धरून, तिमिरनें त्याला आपल्याजवळ ओढून बसवलें; आणि दुसऱ्या बाजूस उभ्या असलेल्या छायेलाहि तो आग्रही स्वरांत म्हणाला—" ये ना ग, मावशी ऽ!...तूं या बाजूला बस इथें... '

भांबावल्या मनानें, त्याच्या दुसऱ्या बाजूला, छायाहि जाऊन बसली—

मग दोघांकडे आळीपाळीनें हसून पहात, तिमिर एकदम म्हणाला-" हं, आतां चालवा आपली मोटार—"

....१८८

पण मोटारचें व्हील प्रकाशच्या समोरच होतें. छाया दुसऱ्या बाजूला बसली होती —

ती मुद्दामच म्हणाली-" कोण, चालवणार कोण रे मोटार, आतां, तिमिर? मी तर या बाजूला आहे!—किल्ली, चाक, ब्रेक, तिकडे त्या बाजूला आहे,... भाईंसमोर!— "

प्रथम क्षणभरच, तिमिर घुटमळला; पण मग, एकदम नव्या विचारानें व न्याऱ्या उत्साहानें तो म्हणाला—" येतांना नव्हतीस वाटतं,...तूंच सांगत, मावशी? भाईंना मोटार चावलतां येते म्हणून होऽ ना हो भाईऽ?... मागें कधीं तरी चालवली होतीत, तेव्हां शेजारीं मावशी बसली होती! हो?-"

प्रकाशनें गोंधळल्या नजरेनें त्याच्याकडे नि छायेकडे पाहिलें.

तेवढ्यांत, तिमिर पुन्हां आग्रहानें प्रकाशला म्हणाला—" चालवा ना? भाईऽ?"-

त्रस्त स्मित करीत प्रकाश छायेला म्हणाला—" त्या कॉलेजमधल्या तुझ्या आईच्या वेळच्या जुन्या गोष्टी! आतां या बछड्यालाहि झाल्या आहेत का माहित? कमाल आहे!-बरं तर—चल तिमिर! बघ हं—चालली बघ आपली मोटार— "

....१८९

असें म्हणून, प्रकाशनें त्या फोर्ड मोटारीचें उजवें दार बंद केलें; क्लच दाबला; ब्रेक सोडले! सुरवातीच्या क्षणिक धडधडीपाठोपाठ, मोटारीला गति मिळाली.



छोटीशी तिपट टाकून, त्या तिघांची ती मोटार धावूं लागली; तेव्हां मागें धुरळा उडला; मोठ्या खुषींत येऊन, तिमिर त्यावेळीं टाळ्या वाजवीत ओरडला, —" ओऽ ओऽ- आमी चाललों-आमी चाललों-"

मंगलग्रामामधल्या त्या अनपेक्षित प्रसंगपरंपरेनें व तिन्हीसांजेवेळच्या त्या अकस्मात् गडबडीनें, भोंवताच्या पांचसहा झोंपड्यांचे दरवाजे कुतूहलानें एकदम उघडले गेल होते.

पण पांगा, जीवन, गंगा वगैरे स्त्रीपुरुष, आश्चर्यानें त्या धावत्या मोटारी कडे आणि आंत बसलेल्या त्या तिघांकडे, टकमकां पहात आहेत, तेवढ्यांत, त्यांच्याच दारावरून, ती फोर्ड गाडी छोट्या रस्याला लागली होती; वेगानें पुढेंहि निघून चालली होती.

एका-दोघां शेतकऱ्यांसह, पांगा परत झोपडींत शिरतां शिरतां, पुटपुटत म्हणाला देखील—" शालिनीबाय ग्येली?-मंगलदादा गेले!... इवेकदादांचा पत्त्या नाय्!- आतां ह्यी आवा आमच्या परकासभाईना बी घेऊन चालली!!- आतां समदीं आग लागली मंगलगांवाला! सत्यनाश झाला!—हौशी-भैऱ्या बसलीं र बसलीं मानगुटीला..."

...१९०

प्रकाश बऱ्याच वर्षांनी फोर्ड चालवीत होता तशी!

त्याक्षणीं, त्या साऱ्याच अनपेक्षितपणामुळें, त्याच्या मनांतहि एक भयंकर तुंबळ माजलें होतें; त्याला कल्पनाहि नसतांना, ॲक्सलरेटर दाबला जाऊन, गाडीचा वेग भरभर वाढत होता—

तिमिर मात्र बेफाम खूष झाला होता. ' बघ, येते कीं नाहीं माझ्या भाईंना मोटर चालवतां, मावशी?" अशा विजयी चेहऱ्यानें तो छायेकडे पाहात होता--

त्याच्याकडे पाहिल्या न पाहिल्यासारखें करून, त्याच्यापलीकडे व्हीलजवळ बसलेल्या प्रकाशकडेच पाहात, किंचित् भेदरल्या नजरेनें छाया अधूनमधून चौफेर पाहात होती—

इतक्यांत,—त्यांची फोर्ड मोठ्या रस्त्याला लागला—

आपल्याच तंद्रींत, रस्त्याचें उजव्या बाजूचें वळण मंदगतीनें घेऊन, प्रकाशनें वेग पुन्हां वाढवला व आपल्या उजव्या हाताला पाहिलें...

दूरवर खालीं मंगलग्रामचे चार दोन तुरळक दिवे, चांदण्या रात्रीं लुकलुकतांना दिसत होते—तिकडे पाहून, त्यानें आपल्याशीच एक सुस्कारा टाकला.

समोरच्या वर्तुळअंतर्गोल आरशांत, आपलें तोंड अस्पष्टपणें दिसत असल्याचा त्याला भास झाला; तिथें बघतां बघतां, तो चेहराच आपल्याला सांगत असल्यासारखें त्याला वाटलें—" दुबळ्या जीवा !...तुला नाहीं जमणार तो मोठा प्रयोग !...तें मोठं जग तुझं नव्हेच !...आतां नुकतंच सुरू झालंय्, तें ...छोटं...नवं...छाया-प्रकाशतिमिरांचं-हेंच तुझं नैसर्गिक जग !...चल-हो-दूर ! ...दूर...दूर !!...येथून,.. या मंगलग्रामापासून, कुठेतरी.. दूऽर-दूऽर-"

त्याला नकळतच, वेग आणखी वाढला होता; रस्त्यानें पुन्हां डावें वळण घेतलें होतें;...चढणहि सुरू झाली होती—

तेवढ्यांत, छाया भेदरून हळूच पुटपुटली—" प्रकाश, प्रकाश !-असं काय ? सावकाऽश नाऽ ! नाहींतर थांबा !-मीच बसतें आपली व्हीलजवळ-"

पण त्याचें तिकडें लक्षहि नव्हतं; तो आपल्याच मनांत गर्क होता-जोरानें चालणाऱ्या मशीनचा व वाऱ्यावर पेंगुळलेल्या तिमिरला जवळ घेतलेल्या छायेच्या हृदयाचा,...सारखाच धडधडत चालू होता-

तेवढ्यांतच, चढणीच्या अगदीं वर मोटर येते न येते, तोंच, प्रकाशनें एकदम कर्रर्र करून ब्रेक दाबले—

....१९१

वर चढलेली मोटर, पुन्हां पुढल्या उतरणीला लागण्यापूर्वींच, जागच्या जागीं एकदम थांबली होती—

एकदम काय झालं, तें छायाला समजलें नव्हतें ती गोंधळली होती.

पण आकाशांत दूरवर झोत टाकणाऱ्या फ्लडलाइटच्या प्रकाशझोतात, टवकारून, गोंधळल्या नजरेनें, प्रकाश पाहात होता—

तेथें-त्या आकाश-पटलाच्या प्रकाशित पार्श्वभूमीवर त्याला एक खूप मोठी पसरलेली आकृती-उभी असलेली दिसूं लागली होती—

तो चेहरा-तो देह-त्याला पुरा परिचित होता--



ताडमाड उंच असा मंगलच रस्त्यांत मध्यभागीं उभा होता ! ओठ हलत असलेला, त्याचा तो भला मोठा चेहरा....व्यथित, .. खिन्न दिसत होता—.

प्रकाशला त्याचे थरथरते भावगद्गद शब्दहि स्पष्ट ऐकूं येऊं लागले होते-" परकाशभाई ऽ ! असाच का आमचा तुमी उद्धार करनार ?- आमी ठेलों,... ते आमचे भावबंद जगावत म्हनूनच ! -तुमी आमच्या मंदी ऱ्हावेत, म्हनूनच ! ...मंग आतां हे असे मदीच पळून कस जातां ? —थांबा ! ...थांबा ! जावू नका-फिरा मागें ! —शप्पत हाय् तुमाला माजी !—या मंगळ्याची-आमच्यां शालिनीबायचीं ! —"

....१९२

आणि म्हणूनच, त्यानें ते एकदम ब्रेक लावले होते-

त्याच आपल्या चमत्कारिक तंद्रींत, प्रकाशनें मोटर एकदम उलट बाजूला फिरवली होती ! पुन्हां, चढून आलेल्या उतरणीलाहि ती लावली होती ! —पुन्हां एकदां ब्रेक लावले होते—

मग, दरवाजा खाडकन् उघडून, त्यानें बाहेर उडी मारली होती—

त्याला ती मंगलची मूर्ती अजूनहि हातानें खुणवीत, पुढें जातांना दिसत होती. तिच्यामागून जातां जातां, प्रकाश तोंडानें म्हणत होता- " आलों रेऽ आलों, मंगल ! हा बघ —"

तें सारेंच वायुवेगानें, अनपेक्षित घडत असलेलें पाहून, छाया अतिशय भेदरली होती. तिमिर गोंधळून, अर्धवट झोपेंतच तिला बिलगला होता—

तिच्या मनांत येत होतें- " प्रकाश आपल्या जिवाचं बरंवाईट करायलाच तर निघाला नसेल ना तसा धांवत ? --"

....१९३

त्या आवेशाच्या भरांत, प्रकाश तसाच बेभानपणें पुढें पुढें धावत गेला होता; पण बघतां बघतां, मंगलची ती मूर्ती मात्र अदृश्य झाली होती !

आणि मग ?-चौफेर शांत ! किर्रकिर्र !...

त्यानें सभोंवतीं गोंधळून पाहिलें; कांन टवकारून साद-कानोसा घेतला.

त्या उतरणीच्या खालच्या अंगालाच मंगलग्राम होतें; दुसरा कसला

आवाज-बिवाज येत नव्हता; पण त्या बाजूनेंच, जरा अंतरावरून, पाण्याचा खळखळ खळखळ ध्वनि तेवढा कानीं पडत होता.

दुसरी कशाचीच चाहूल नव्हती ! सारं अगदीं सामसूम ! !—

क्षणभर प्रकाशचा अधिकच गोंधळ उडाला —

धांवत धांवतच, तो त्या बाजूनें पुढें गेला;—पाण्याच्या खळखळण्याचा तो आवाज क्षणाक्षणाला मोठा होत होता—

शेवटीं, थोड्याच अंतरावर, अगदीं समोरच, उंचावरून खालीं उडी घेणारा, एक छोटा धबधबा त्याला दिसला...

प्रथम क्षणभर प्रकाश तिकडे विस्मित नजरेनें पाहातच राहिला; निरर्थ खालीं वाहून जात असलेलें तें महामूर पाणी समोर प्रत्यक्ष दिसतांच, त्याच्या चेहऱ्यावर, आश्चर्याबरोबरच एक नवखी स्मितरेषाहि उमटली..

नव्या उत्साहानें त्या प्रवाहाचें पाणी त्यानें वेड्यासारखें आपल्या सर्वांगावर शिंपडलें. चारदोन ढेंगा टाकून, वेगानें त्याच्या बाजूनें उतरत, अखेर, त्या उतरत्या नाल्याच्या उजव्या वळणापर्यंत तो पोहोंचला !—

आणि मग—समोर दूर अंतरावर त्यानें पाहिलें; तो काय ?—

केवळ दोन हाकांच्या अंतरावरच, तेंच त्याचें परिचित मंगलग्राम, त्याला समोर पसरलेलें दिसूं लागलें; तेथील चारदोन मिणमिणते दिवेहि चमकत असलेले दिसले !—

केवढा आनंद झाला प्रकाशच्या मनाला ! क्षणार्धांत्, तो दुसरें सारें भान विसरला; ...आणि त्याच आडरस्त्यानें तो निघाला; अनेक उतरंडींवरून धाड धाड उड्या टाकीत, त्याजवळच्या रस्त्यानें, तो पुन्हां मंगलग्राम गांठूं लागला—

....१९४

तशीच खाचीखुचींतून धडपड करीत, अखेर त्यानें गांव गाठलें- तेव्हां, चौफेर सगळी चिपाचीप होती.

साऱ्यांचा उरलासुरला उत्साह-विश्वास, मघां वेगानें निघून गेलेल्या त्यांच्या मोटारीबरोबरच, वाऱ्यावर उधळून गेला होता.

कोणी जागें आहे का, हें पाहण्यासाठीं-प्रकाश, ...क्षणकाळ, भुतासारखं



इकडे तिकडे एकसारखा फिरला; व अखेर, जीवनच्या झोपडीजवळ जाऊन, तिथें टांगलेला चपटा तास काठीनें बडवीत, त्यानें मोठमोठ्यानें सर्वांना हांका मारायला सुरवात केली.

" जीवन ...ए ऽ जीवनदा ! —गंगाबाय ! ...पांगा ऽ ! उठा— उठा आधीं...मी आलोंय् ! —"

....१९५

दोघे लगबगीनें बाहेर आलीं; त्या अनपेक्षित घणघणाटानें, आणखी चारदोन झोपड्यांचींहि दारें उघडलीं गेलीं; दुसरे कांहीं शेतकरीहि बाहेर आले; सारे प्रकाशच्या आजूबाजूला जमूं लागले—

घंटा बडवण्याचे थांबवून, अखेर, प्रकाश सर्वांना उद्देशून म्हणाला—

" चला...उठा !— आपलीं झाडून सारीं माणसं आतांच्या आतां निघा ! कुदळीं, फावडीं, खोरीं भरभर...हातांत घ्या ! ...मशाली पेटवा ! ! ..उठा ! —असाल तसे चला—आधीं माझ्यामागून ! —आपल्या सर्वांच्या जीवन—मरणाचाच प्रश्न आहे हा ! —क्षणाचाहि विलंब नाहीं चालणार, आतां ! अहो-रात्र धडपडूं या— चला— ! पाण्यासाठीं आकाशाकडे डोळे लावून वाट पहाणं, आतां पुरे झालं ! .. दोन दिवसांत; ...चार दिवसांत,.. मनगटाच्या जोरावर—आपल्या एकीच्या बळावरं—या या आपल्याच हातांनीं,... आपण सारं पाणी ओढीत इथं आणूं ! —आपल्या या शेतांना पोटभर पाजूं ! —चला माझ्याकडे—टकमकां बघतां काय ? —असाल तसे उठा–नि निघा म्हणतों ना माझ्यामागून? "

त्याच्या त्या अनपेक्षित पुनरागमनानें व त्याच्या तसल्या अकस्मात् तऱ्हेवाईक आवेगाच्या बोलण्यानें, क्षणभर स्तंभित होऊनच, सारे त्याच्याकडे पाहात राहिले होते—

....१९६

कांहींना वाटत होतें...' हा वेडा बिडा तर झालेला नाहींना ? '

कांहींनीं तर हताश अगतिकपणें उभ्या जागींच बसकण घेतली. ते जरा देखील हालचाल न करतां, त्याच्याकडे नुसतें निर्विकारपणें पाहात राहिले.

पांग्या, जीवन, गंगा वगैरे मंडळीहि जागच्याजागीं गोंधळून चुळबुळत होती—

तें पाहून मात्र प्रकाश एकदम चिडला व पुन्हां मोठमोठ्यानें ओरडून म्हणाला—" उठा—म्हणतों ना ?—माझा तुम्हाला हुकुम आहे !—आपल्या मंगलचा मला—तुम्हांला साऱ्यांनाच हुकुम आहे ! तुम्ही कोणी माझ्याबरोबर आला नाहीं, तर हा मी एकटा चाललों !...रक्ताचा अखेरचा थेंब माझ्या अंगांत असेल,...तोंवर मी कुदळ—खोरं-फावडं-चालवीन !-निदान मी तरी मंगलचा हुकुम पाळीन ! !—झालं तर-आतां तसंच आपल्या गांवाचं मंगल होईल !-"

असें म्हणून, प्रकाशनें आपल्या झोपडीतून कुदळपावडें घेतलें; लगबगीनें मशाल पेटवली व तो नुकताच आला होता त्या रस्त्यानें चालूहि लागला—

तेव्हां मात्र, सारे गोंधळल्या नजरेनें तिकडे पाहूं लागले...

इतक्यांत, जीवन ओरडला—"परकासभाई-थांबा-!"

तो झटकन् आंत गेला; त्यानेंहि एक मशाल पेटवली; फावडें, खोरें, घमेलें खांद्यावर टाकलें; आणि प्रकाशकडे धावतां धावतां तो बायकोला म्हणाला—" गंगे ! चल बिगी बिगी–"

त्यांच्या पाठोपाठ पांग्या तसाच निघाला–

आणि दोनतीन मशाली दिसतांच, सारेच नव्या उत्साहानें ओरडले " थांबा जीवनदादा-आपन समदेच जाऊं या-"

हां हां म्हणतां, एकमेकांवर पेटत गेलेल्या मशालींची एक रांग झाली—-प्रकाश, जीवन, पांगा, यांच्या मागून, साऱ्या स्त्री-पुरुषांची ती फैर धबधब्या कडील वाटचाल करूं लागली.

[ -१८- ]

# जीवन-निर्झर

....१९७

बराच वेळ झाला, तरी उडी मारून काळोखांत शिरलेला प्रकाश अजून परतला नव्हता; छाया अगदीं हतबुद्धच झाली होती.

त्या निर्जन भागांत, त्या लहानग्याला घेऊन, ती एकटीच पडली होती; मनांत फार भेदरली होती. त्यांतच, तिमिर पेंगुळलेला नी अखेर तिला बिलगून झोपीहि गेलला.

मोटरचे दिवे तेवढे तसेच पेटले होते– व त्या झोतांच्या सोबतीनेंच काय तो, तिच्या मनाला धीर वाटत होता —

अशा भयानक मनःस्थितींत, ती भीतीनें अंग चोरून बसली होती तेवढ्यांत, त्याचवेळीं, कित्येक दिवस गुप्त झालेला विवेक मंगलग्रामाकडे कुठूनतरी परतून येत होता. ...त्याची ती एकदम मागच्या बाजूनें काळोखांतून प्रकट झालेली दाढीधारी, अपरिचित मूर्ती दिसतांच, प्रथम छाया अतिशय दचकली.

पण तो जवळ आल्यावर, त्याचा आस्थेवाईक सोज्वळ चेहरा पाहून, तिला अखेर थोडा धीरही आला—

तेवढ्यांत, विवेकनें तिला विचारलें— " कोण तुम्ही ? अशा इथें कशा ? ...नि एकट्याच ?—अरे पण हा तिमिर कसा इथें तुमच्यापाशीं ? "

" मी छाया !–या तिमिरला घेऊन आम्हीं मोटारींतून जात होतो...पण एकाएकीं उडी मारून इथेच कुठे तरी प्रकाश गुप्त झाले ! कुठे हो गेले असतील ? काय बरं वाईट झालं नसेल ना ?—"

" घाबरूं नका, छायाताई !—मी चांगला ओळखतो त्या प्रकाशला आपल्या तिमिरला सोडून, तो जगांत किंवा जगातून कुठेहि दूर जाऊं शकणार नाहीं !–धीर धरा–" तसें बोलतां बोलतां, विवेकनें तिमिरला उचलून घेतलें होतें.

" परत घरींच गेले का हो ते ? " तरी छायानें पुन्हां अधीरतेनें विचारलें–

"तेंच पाहूं या हं, आतां! चला—" विवेक बोलतां बोलतां व्हीलजवळ बसला-त्याच्याजवळ तिमिरला घेऊन छायाहि बसली; तेव्हां विवेक म्हणाला—"आधीं याला घरीं नेऊन झोंपवूं...नि मग पुढले सारे विचार—"

विवेकनें ब्रेक सोडले; मोटार आपोआप मंगलग्रामकडील उतरण पुन्हां उतरूं लागली--

दूरवरपर्यंत, तिच्या फ्लडलाईटचे प्रकाश झोत पसरले होते—

## ....१९८

त्या प्रकाशाच्या झोतांमध्येंच, थोडें पुढें गेल्यावर, दूर अंतरावर एक अनपेक्षित दृश्य....छाया विवेकांना समोर दिसूं लागलें

प्रकाश, त्याच्यामागें जीवन, मग-पांगा-सुभान्या, इतर कामकरी, तसेंच, गंगा वगैरे बायका...अशी शंभर सव्वाशें माणसें हातांत मशाली-कुदळीं-खोरी-फावडीं-घमेली घेऊन, एका रांगेनें त्यांच्याच बाजूस चढण चढून येत होतीं—

तोंडानें त्यांच्या विविध ललकाऱ्या जोरजोरांत चालल्या होत्या--"देव आमुच्या शिरीं!...पर मनगट समदे करी!--" 'पाउल उचला पुढें, मंग पानी देतिल कडे!'--'अमुचा मंगलग्राम!...अम्हाला देईल अमुचा राम!' 'ढाळूं अमुचा घाम, गड्यांनो, मंगल हा संग्राम!'

विवेक-छायांची ती मोटार हळूहळू त्यांच्या जवळजवळ जात होती. तेव्हां, ते रस्ता सोडून बाजूच्या आडवळणावर वळत होते--

समोर, फ्लड लाइटचा तो उजेड पाहून प्रकाश गोंधळला; इतक्या वेळानें भानावर आला; तो व जीवन झटकन् मोटारीकडे वळले--

त्या साऱ्यांना समोर पाहून--कितीतरी वेळानें, पुन्हां छायाच्या जिवांत जीव आला--ती टुणकन् उडी मारून खालीं उतरली--

आतां ती कांहीं बोलणार, इतक्यांत, प्रकाशच तिला गडबडीनें म्हणाला—"छाया! तिमिरला घेऊन आधीं घरीं जा-त्याला निजव-तूं विश्रांती घे! जा, ही गंगा येईल तुझ्याबरोबर--"

तेवढ्यांत, त्याचें लक्ष व्हीलपाशीं बसलेल्या विवेककडे गेलें-तोंच, जीवन साश्चर्य म्हणाला-"अरेऽ इवेकदादा बी आले!--"



त्या शब्दांचा प्रतिध्वनि दूर सर्वांपर्यंत पसरला-'विवेकदा-विवेकदा'

प्रकाशहि आनंदानें म्हणाला-"अगदीं वेळेवर आलांत! झटकन् खालीं उतरा, विवेकदादा!...तुमचीच तहान लागली होती आम्हां साऱ्यांना-कातळ-दऱ्याला खिंड पाडायचीय्--प्रत्येक मनगटाची आज जरूरी आहे!-वैऱ्याची रात्र आहे ही! या काळ रात्रीं प्रत्येक मनगट हललं पाहिजे-कपाळाच्या घामाचा अर्घ्य पडला पाहिजे जमिनीला!!—"

## ...१९९

आणि मग, ती कातळदऱ्याजवळची अपूर्व प्रसंगपरंपरा जमिनीला दृश्य-परंपरा!—

तिथल्या त्या धबधब्याची मशालींच्या उजेडांत प्रथम पाहणी करून साऱ्या गड्यांनी नारळ फोडला; खोदकामाला सुरवात केली!—कुदळी खोऱ्यांची अगदीं दमछाट चालली होती—

कोंबडा आरवला; तरी तें खोदकाम अविरत चाललें होतें—सूर्य डोक्यावर तळपला तरी घामाच्या धारा निथळतच होत्या. दुसरी रात्र आली;...पण-काम अखंड चाललेलेंच!—पुन्हां कोंबडा आरवला--सूर्य डोक्यावर आला—सूर्य बुडला-रात्र दाटली—

उतरणी मागून उतरणी उतरत, पाण्यासाठीं खोदलेला तो खडकाळ बोडका रस्ता,...नागमोडी वळणें घेत घेत पुढारत होता; बघबघतां, मंगलग्रामाच्या परिसरापर्यंत तो येऊन पोहोंचला होता—

अखेर, एके दिवशीं, सूर्योदयाच्यावेळीं, सारे कातळदऱ्याजवळ जमले होते-पाणी नेण्यासाठीं खोदलेल्या रस्त्याच्या बाजूकडे तोंड फोडायला, मधल्या एका मोठ्या कातळाला, त्यांनीं पहारईनें सुरुंग खोदला होता-भराला होता-त्याला बत्ती देऊन, सगळे दूर पळाले होते—

आणि-मग—

'धडड् धुम्!' सुरुंग उडाला! धबधब्याच्या दुसऱ्या बाजूला खिंड पडली!-

बघतां बघतां, धो धो वाहून, खोदलेल्या कालव्याच्या रस्त्यानें उड्या मारीत, पाणी मंगलग्रामकडे धावूं लागलें-पाणी पुढें कीं माणसें पुढें, अशी

[illegible]-शर्यत लागली !–तोंडानें, ' देव आमुच्या शिरीं–पर मनगट समर्दै करी !–' इ. घोषणा चालल्या होत्या त्यांच्या—

....२०० 

मग, हां हां म्हणतां, आतांपर्यंत कोमेजून जमिनींत–मातींत अर्धमेलीं लोळणारीं तीं शेतें पाण्यानें तुडुंब भरलीं.

समोरचें तें अनुभवरम्य, अभिनव दृश्य पाहून, कित्येक शेतकऱ्यांचे डोळे देखील पाण्यानें डबडबले—कित्येक तर आनंदोन्मादानें त्या पाण्यांत, त्या ओल्या भूमींत, गडबडां लोळूं लागले—

मग, पाहतां पाहतां, तीं शेतें पाणी पिऊन तरारलीं–टवटवलीं; त्यांत पुन्हां आकाशींचा पाऊसहि पडतांना दिसला—

मग तिथलीं तीं कणसाळलेलीं पिवळसर शेतें—

पुढें कापणीची गडबड;—भरलेलीं पोतीं; सुगीचीं गाणीं–

भरलेल्या गाड्यांची एक रांग त्याच पहिल्या रस्त्यानें चाललेली दिसत होती. बैलांच्या गळ्यांत घंटा घणघणत होत्या—

तालावर गाडीवान् गाणीं म्हणत होते—

" चाल राजा—चाल सर्जा—

बिगि बिगि चला र, राजानों—" चाल राजा !—चाल राजा सर्जा —"

गाणें म्हणत, ती रांग अखेर मोठ्या रस्त्याला लागली; तेव्हां, कडेला पूर्वीच्याच ठिकाणीं, एक नवी रंगवलेली पाटी दिसत होती—

**कसणाऱ्या किसानांचें माहेर घर ☞ मंगल-ग्राम —**

नव्या मनूच्या शिलेदारांनो !–या—
या ! या भूयज्ञात श्रमदान करा !–
नमलेल्या माना उन्नत करा !–
तुमच्या भूमीचे तुम्ही दास आहां !-
तुम्हीच मालकहि आहां !

येथें तुम्हांला, तुम्ही म्हणालां तरी,
आळशी, उपाशी अधाशी
चपराशी, बेवारशी, विघ्नसंतोषी
कोणी औषधाला आढळणार नाहीं !

[ –१९– ]

## → दुवे ←

....२०१

पुढल्या वर्षी, प्रकाशनें आपलें सारें शेतकी ज्ञान वापरलें होतें; मंगल ग्रामांत नवीन पद्धतीच्या शेतकीचे प्रयोग केले होते; ते सारे अतिशय यशस्वी होऊन, अमाप पीक आलें होतें.

गांवाच्या नांवाचा चोहूंकडे गवगवा झाला होता. कुतूहलानें अनेक लोक त्याला भेट देऊन गेले होते...

आणि आज, या वर्षी तर, साऱ्या मुंबई राज्यांत, मंगलग्राम अगदीं पहिल्या प्रतीचें खेडें ठरलें होतें; मुख्य मंत्री नरेंद्र यांच्या अध्यक्षतेखालचा मंगलग्रामचा तो गौरवसमारंभहि नुकताच पार पडला होता.

....२०२

मधल्या दोन अडीच वर्षांच्या काळांत, प्रकाशच्या व्यक्तिगत आयुष्यांत मात्र कसलाच फरक पडला नव्हता.

तिमिर छायेकडेच शिकायला होता; त्यामुळें, प्रकाशला संसाराचे कसले प्रत्यक्ष बंधच उरले नव्हते. त्यामुळेंच तर तो मंगलग्रामाच्या सुधारणेंत अधिकाधिकच गर्क होत गेला होता

बापलेक दोघांशींहि छाया अत्यंत प्रेमानें वागे.

प्रकाशालाहि तिच्याबद्दल अनेकदां प्रबळ आपुलकी वाटे...त्याला तिच्या मनच्या प्रभावी सुप्त इच्छाहि पुरेपूर माहित होत्या. त्यामुळें, त्याच्या मनांत, कित्येकदां एकच एक तीव्र झगडाहि होई !

पण शालिनीच्या अकस्मात वियोगाची व तिच्या प्रेमळ सहवासाची त्याच्या मनची ती उबदार स्मृति अजून बुझूं शकली नव्हती. त्यामुळें, आपल्या आयुष्यांत कसला बदल करायला त्याचें मन घेत नसे.

विवेकचें धीरोदात्त आयुष्य–तो प्रत्यक्ष आदर्श–त्याच्यासमोर त्याला दिसे–त्याची धीरगंभीर वागणूक, दिनचर्या, संपूर्ण निस्वार्थी जीवन ! अनेकदां

प्रकाशचें हृदय त्याच्याबद्दल आदरानें भरून येई. म्हणूनच, संसाराचे नवे पाश आतां आपल्या जीवनांत फिरून नकोत, असेंच प्रकाशाला सारखें वाटे.

मात्र, ज्यांच्या सुखाच्या आशेनें, विवेकनें ऐन तारुण्यांत व वैभवांत, आपल्या वज्रलेप निर्णयानें, आपल्या साऱ्याच आयुष्याला आमूलाग्र कलाटणी देऊन, स्वतः फकीरी पत्करली होती—ते दोन जीव तरी कोण ? याचें कोडें मात्र प्रकाशला आजपर्यंत कांहीं केल्या कधींच सुटलें नव्हतें ! ...पण—

....२०३

स्त्री-पुरुष प्रेमाचें प्रबळ आकर्षण ? ...त्याची तर प्रकाशच्या मनाला अनुभवी जाणीव होती.

पाशवी बळ, राक्षसी संताप, यांच्या क्षणिक संचारानें—भैरवाचा खून करणारा, हौशीला धिक्कारणारा, पण निसर्गतः प्रेमळ, मोहोळ-मनाचा, रांगडा, अशिक्षित, मंगल ! तो त्यानें प्रत्यक्ष पाहिला होता.

—तसाच—आपल्या पत्नीच्या खऱ्या सुखासाठीं, आत्म-बलिदान—एक न्यारी ' आत्महत्या ' करणारा विवेक ! तो अविनाशी विवेकहि त्यानें पाहिला होता.

त्या जीवांचीं, त्या क्षणानंतरचीं आयुष्यें, त्यांचीं जगें—निरनिराळीं, विभिन्न, दोन ग्रहांइतकीं दूर दूर फेकलीं गेलीं होतीं.

आणि त्या पार्श्वभूमीवरच, त्याला स्वतःबद्दल वाटे— " छाया व आपण ! ...आपलीं दोघांचीं जगेंहि मागें तारुण्यांत विभिन्न झालेलीं आहेत ! .. तरी दोघेंहि जिवंत आहों !-हो, जिवंतपणानें कांहीं ना कांहीं आपापलें स्वतंत्र समाजोपयोगी कार्य आपण करीत आहों. तिमिरमुळें म्हणा, योगायोगाच्या प्रभावामुळें म्हणा—आपण वारंवार एकमेकांच्या सहवासांत इल्लीं येऊंन जाऊं शकतों !- त्यांतील निर्लेप समाधान मिळवूं शकतों. दोन्ही प्रेमळ जीवांची त्यांत कमीजास्त गुप्त हुरहुर-तळमळ अव्याहत चालू असली, तरी त्यांत सापेक्ष आनंद, निर्मळ सहवास-सुख लाभत आहे ! "

मंगल-विवेकांसारखा त्यांत रांगडा, पिसाटपणा अगर एकतर्फी त्यागाचा कडेलोट नव्हता !—त्यामुळेंच तर त्याला हुरहुरीबरोबरच एक अज्ञात समाधानहि लाभे...



आजहि तिमिरला घेऊन, छाया वेळेवर समारंभासाठीं आली होती. पण, समारंभ संपतांच, निरोप घेऊन, तिने पुन्हां आपल्या घराकडे संयमानें प्रयाण केलें होतें.

आजच्या त्या विशेष आनंदी समाधानी मनःस्थितींत, तिच्याबरोबर दिलखुलास बोलावें, तिनें आजचा दिवस इथें रहावें, असें प्रकाशाला फार वाटलें होतें. पण तो उघड उघड बोलला नव्हता.

आणि तिनें नेहमीप्रमाणेंच, अखेर दाखवलेला तो आपल्या मनाचा समतोलपणा ! त्याला विशेष प्रिय वाटला होता, दिव्य वाटला होता !...त्यामुळेंच, त्याला तिच्याबद्दल उलट अधिकच रसरशित आपुलकी वाटूं लागली होती—

पण त्याच समारंभाच्या गडबडींत, अखेरपर्यंत तन्मयतेनें वावरणारा विवेक ! अगदीं ऐनवेळींच, तो अनपेक्षितपणें एकदम गुप्त झाला होता. त्यामुळें, प्रकाशच्या मनाला लागलेली प्रचंड हुरहुर मात्र कांहीं केल्या कमी झाली नव्हती. ' विवेक असा एकाएकीं गेला कुठें ? -कां गेला ? ' हें एक मोठेंच कोडें त्याला वाटत होतें —

आणि त्या प्रसंगामुळेंच, त्याच्या मनांत एक प्रचंड खळबळ माजली होती. त्यामुळेंच, त्या समारंभानंतर, निर्मनुष्य झालेल्या त्या स्टेजवर, जाजमांच्या चळतीला टेकून पडल्या पडल्या...असा तंद्री लागून, प्रकाश अंतर्मुख होऊन पडला होता.

त्याच्या व साऱ्यांच्याच आयुष्याचें तें प्रचंड जीवनचित्र ! धावत्या वेगानें त्याच्या अंतःचक्षूंसमोर तें सारेंच्या सारें चमकून-तरळून गेलें होतें—

....२०४

हो, आज प्रकाश तसाच आपल्याच सिंहावलोकनांत सायंकाळभर गर्क होता.

तेवढ्यांत, त्याच्या कानावर मोटारीच्या परिचित हॉर्नचा आवाज पडला व तो दचकून भानावर आला.

त्याच्या झोपडीजवळ मोटर उभी राहिली. त्यांतून छाया-तिमिर व विवेक उतरले.

' छाया परत आली ?...विवेक आला ? ' त्याला आंतल्या आंत अगदीं आनंदच वाटत होता.

पण तसल्या गोंधळल्या मनःस्थितींत, उठून पुढें जाण्याचें मात्र त्याच्या जिवावरचें आलें होतें. जागच्या जागीं पडल्या पडल्याच, दूरची त्यांची ती हालचाल तो गपचूप पाहत होता.

तोंवर, छाया-तिमिर झोपडीत शिरलीं; विवेक चौकस दृष्टीनें इकडे तिकडे पाहात, अखेर प्रकाशच्या बाजूस वळला—

प्रकाशला हायसें वाटलें—विवेकला भेटण्याची, विचारण्याची, मनातल्या मनांत, त्याक्षणीं, त्याला जास्तींत जास्त तीव्र इच्छा होत होती—

तेव्हां, विवेक जवळ पोहोंचतांच, प्रकाश अधिरतेनें म्हणाला—"विवेक-विवेक! तुम्ही आलांत?—"

"हो-मी आलों! ..नि परत जाणारी छाया वाटेंत दिसली,...तिलाहि फिरवून बरोबर आणलं!—" विवेक गंभीर पण सस्मित मुद्रेनें प्रकाशकडे पाहात पुढें म्हणाला—"तिला तुला भेटायचं आहे...तुझ्याशीं बोलायचं आहे, प्रकाश! केवळ संकोचानें तशीच परतत होती ती—"

त्यावर प्रकाश कांहींच न बोलतां क्षणभर गप्प राहिला. पण पुन्हां क्षणभरानें अधिरपणें त्यानें विवेकला विचारलें—"पण मग,...मघां तुम्ही एकाएकीं कुठं गुप्त झाला होता, विवेक?—"

एक निश्वास टाकून, विवेक त्याला गंभीरपणें म्हणाला—"मला वाटत होतं, प्रकाश, मी मोठा संयमी आहे!—पण मी साफ दुबळाच आहे! क्षणार्धांत् गोंधळलों; संमोहित झालों!"

....२०५

गोंधळून, त्याच्याकडे पाहातच राहिलेल्या प्रकाशला, क्षणभरानें विवेक हळूच पुढे म्हणाला—

"मघां भूतकाळानें माझ्या मनाचा एकदमच ताबा घेतला!—अजाणतां, मी एका जगातून दुसऱ्यांत काया-प्रवेश केला!...क्षणकाळ, माझ्या दडपलेल्या प्रखर अविनाशी भावना उफाळल्या;—मला वाटलं,...माझ्या मनाचे बांध, चुकून एकदम फुटतील नि सभोंवार एक नको तो हाःहाःकार उडेल!...म्हणून, माझ्या दुबळ्या मनाला वेळींच दडपण्यासाठीं, मी तसा एकदम पळालों!...अखेर,



माझ्यातल्या विवेकानें दुबळेपणाला पुन्हां जिंकलं!—म्हणूनच, मी असा परतूं शकतोंय्—"

त्याच्याकडे सहानुभूतीनें पाहात, प्रकाशानें साश्चर्य कुतूहलानें विचारलें—"पण आजच हें कां घडलं असं?—"

"आज?"-विवेक गंभीर स्मित करून म्हणाला—"इतक्या वर्षांनंतरचं,...मला झालेलं नलिनी-नरेंद्रांचं प्रत्यक्ष दर्शन!-त्यांची समारंभावेळची ती प्रत्यक्ष भेट!-दुसरं काय?"

"म्हणजे??-" प्रकाश दचकला व आश्चर्यानें चमकून, त्यानें विवेकला विचारलें—"ननी आणि नरुभाऊ म्हणजेच नलिनी-नरेन्द्र-??"

विवेकनें कांहीं न बोलतांच, गंभीरपणें त्याच्याकडे पाहात, होकारार्थी मान हालवली.

"बापरेऽ! किती भयंकर रस्सीखेंच झाली असेल ती मनाची?-" प्रकाश पटकन म्हणाला-"माझ्यासारख्याच्या दुबळ्या हृदयानें तर क्षणार्धांत सारा घात केला असता! तिथें एकच एक प्रलय उडाला असता!-स्वतः निर्मिलेल्या दुसऱ्यांच्या सुखस्वर्गाची,...स्वतःच्या अविरत त्यागाची, स्वतःच्या हातानेंच,...क्षणार्धांत,...माती होण्याची पाळी आली असती—"

"होय, प्रकाश!—जें घडलं,...घडत आहे...तें सुखदुःख,...सारं...अतर्क्य असतं!-त्यांतलं अर्धं मानवनिर्मित, तर अर्धं ईश्वरनिर्मित,...नियत!-तरी त्या दोघांचं सुख-माझं दुःख...आतां मला नैसर्गिकच वाटतंय्!!...म्हणूनच, मी त्यांच्या प्रत्यक्ष जगाच्या प्रतिपाळासाठीं दूरदूर पळालों! त्यांचं सुख मी प्रत्यक्ष पाहिलं! नि म्हणूनच, माझ्या व्यक्तिगत जगाचं, त्या जगाला,...नकळत, अकारण,...ग्रहण लागूं दिलं नाहीं!—मी पळालों"—विवेक गंभीरपणें म्हणाला—

....२०६

"आणि माझ्या व्यक्तिगत दानाचं चीज झालेलं आज मी प्रत्यक्ष पाहिलं! मला आनंदाचा प्रत्यय आला! सर्वांना साक्षात्कार झाला! असंच अद्भुत,...दिव्य असतं मानवी जीवन, बरं, प्रकाश!!" क्षणकाळ स्तब्ध राहून, विवेक उत्साही

स्वरांत पुन्हां म्हणाला—" आणि आपल्या या मंगलग्रामाचंहि सारं मंगल झाल्याचं मी माझ्या या डोळ्यांनीं आज प्रत्यक्ष पाहिलं !...माझ्या इथल्या तुमच्यातल्या वास्तव्याचंहि चीज झालंय् असं !—डोळ्यांचं पुरं पारणं फिटलं आज !...आतां मात्र, मी इथून जाणार;...मला एखादं नवं जग हवंय् !-निरोप दे मला—"

" जाणार ?.. कुठें ? ? आतां ? " प्रकाशनें गोंधळून विचारलें.

" हो ! आतांच ! जगाच्या पाठीवर !-भारताच्या एखाद्या कोनाकोपऱ्यांत ! ...कुठंहि...दुसऱ्या एखाद्या खेड्यांत,-त्यांचंहि मंगलग्राम व्हावं,...याच इच्छेनें मनापासून धडपडण्यासाठीं !- असली साधीसुधी...पण खरीखुरी...सामाजिक तपश्चर्या करण्यासाठीं !-" विवेक सोज्वळ हसला व प्रकाशकडे पाहात गंभीरपणें म्हणाला.

" विवेक...विवेक !-अविनाश...अविनाश !-" कंठ अगदीं जड होऊन प्रकाश अडखळत म्हणाला, " खरंच ! ...भाग्य माझं, कीं, माझ्या आयुष्यांत तुमचा क्षणिक तरी सहवास मला लाभला !!— "

त्याचा हात हातांत घट्ट धरून, विवेकहि स्नेहप्रेमानें कंपित स्वरांत म्हणाला- " अरे, मीहि भाग्यवान्च !—मलाहि तुम्ही सारीं लाभलां !...पण प्रकाश,— जाण्यापूर्वी तुला एक सांगावसं वाटतंय् ; नि म्हणूनच परतलोंय् ! "

प्रकाश गोंधळूनच त्याच्याकडे पहात होता; तेवढ्यांत विवेक पुढें म्हणाला- " मघां परत येतांना, छायानें मला सारं सांगितलं !—सांगूं ? चुकतंय् तुझं, प्रकाश !—"

" काय ?—" भांबावल्या नजरेनें प्रकाशनें प्रश्न केला—

" प्रकाश,-शालिनी अकस्मात् गेली !-छाया अनपेक्षितपणें फिरून आली !- समोर दिसतहि आहे—त्यामुळें संमिश्र भावनांनी क्षणिक हलकल्लोळ केला असेल तुझ्या मनांत ! तरी पण, त्यांची निरर्थक गल्लत मात्र करूं नकोस !-नरेन्द्र-नलिनींनाही सुखी जीवनाचा हक्क लाभला !- तुझीं दुःखें...छायाची हुरहुर...ही तर केवळ नियत...योगायोगाची !- मानवनिर्मित नव्हेत ! पुन्हां सुखी होण्याचा...पुन्हां



नव्यानें जगण्याचा,...तुम्हां दोघांनाहि हक्क आहे !—छायाला तर तुझ्यापासून सुख मिळवण्याचा एकमेव हक्क आहेच आहे !—तेवढा अविरत त्याग तिनं खासच केला आहे !—मात्र, आतां असा गोंधळू नकोस, प्रकाश ! तुझ्या आयुष्यांत तिमिर आला आहे,...तशीच, तितक्याच नैसर्गीकपणें, छायाहि यायलाच हवी आतां !... तिला-तुला-तुम्हाला साऱ्यांनाच-यापेक्षां सुखाने, हक्काने,...जगायलाच हवं !-"

....२०७

बराच वेळ झाला, तरी प्रकाश-विवेकांचा पत्ता नाहीं, म्हणून अखेर, तिमिर-बरोबर खेळत खेळत,...छाया तिथें येऊन पोहोंचली—

त्या दोघांना तिथें तसें बोलण्यांत गर्क असलेले पाहून, ती हळूच हसत विवेकला म्हणाली— " कसला एवढा नवीन गहन विचार चाललाय् ? आहे का आम्हांला यायला परवानगी ? —"

विवेक वत्सल गंभीर स्मित करून म्हणाला, " हो हो ! ये; मावशी, तुझीच वाट पहात होतों मी ! अग -आमच्या तिमिरला आई हवीय् ! नि प्रकाशला छाया हवीय् ! —त्याचाच विचार चालला होता आमचा-तूं यायलाच हवीस ! "

" इश्श ऽ — " छाया त्याच्या त्या अनपेक्षित पृच्छेने लाजून उद्गारली-

" म्हणजेच-' होय !'-हो ना ? " विवेक दिलखुलास हसला-

प्रकाशनें हळूच छायाकडे एक कटाक्ष टाकला - तिचा चेहरा प्रफुल्ल झाला होता. ती खालीं पाहात होती.

तोंच, विवेक स्वतः जागचा उठला, हसला नि म्हणाला— " चला- मंगलग्रामच्या गोड बाळांनों ! ...उठा - पुढें व्हा ! —जा, प्रकाश ! —छाया-तिमिरांना सोबत घेऊन जा ! — मीहि निघतों आतां, मघां ठरल्याप्रमाणें— "

" पण, ...विवेक— " प्रकाश-छाया दोघेंहि एकदम उद्गारलीं—

" अं ऽ हक्क् ! आतां उच्चार नाहीं, विचार नाहीं...प्रत्यक्ष आचार ! या विवेकाचा तुम्हांला मनापासून आशीर्वाद आहे ! —" विवेक दोघांकडे प्रेमानें पाहात म्हणाला—

...हानें गपचूप तिमिरचा चिमुकला हात एका हातांत व छायाचा दुसऱ्या हातांत घेतला. आणि पाठमोरीं वळून तीं तिघेंहि चालूं लागलीं.

मागें वळून, तिमिर विवेकला ' टा ऽ टा ऽ ' करीत होता–

दूरदूर जाणाऱ्या, हातांत हात घातलेल्या, त्या तीन पाठमोऱ्या आकृतींकडे विवेक प्रेमभरित व अश्रुभरित नेत्रांनीं कितीतरी वेळ पाहात होता.

....२०८

कांहीं वेळानें ,विवेक स्वतःहि मंगलग्रामातून संथ पावलें टाकीत दूरदूर जातांना दिसत होता.

हातांत त्याची ती लहानशी बॅग, काठी...अंगांत लांब अंगरखा, जॅकेट;... तशा वेषांत त्याची ती दाढीधारी सोज्वळ चेहऱ्याची धीरगंभीर मूर्ती जात होती.

ती पाहातांना, मनांत अगम्य,उदात्त विचार–भावना निर्माण होत होत्या–

विवेक स्वतःहि एक संथ–गंभीर गाणें म्हणत चालला होता—

" सारे आम्ही जीव–प्रवासी ! —क्षणभर जगावयाचे—
असूं तोंवरी सदैव अमुच्या हृदयीं ईश्वर नाचे ! ध्रु०
अम्ही धरेचा स्वर्ग करूं !...अन् परस्परांचें सुख साधूं !
द्वेष–मत्सरांना ना जागा—प्रेम–जीवनाचा सिंधू !–ध्रु० १
जिवंत हृदयें जगवुन जगतीं आम्हां जगावयाचें ! —
हृदयीं ईश्वर भरुनी नाचे ! —मंगल जग व्हायाचें !—ध्रु० २
भाव–विवेकावर हें अमुचें मंगल जग व्हायाचें—!
प्रेम त्याग यावरी उद्यांचें मंगल जग व्हायाचें ! ' —ध्रु० ३

....२०९

त्या आपल्याच भव्य–उदात्त विचारांच्या तंद्रीत गुंग होऊन, संथ पावलें टाकत जातां जातां, अखेर, मंगलग्रामाच्या त्या रस्त्यांतील पाटीला डावलून, विवेक दूरदूर निघून गेला—

त्याच्या डोक्यावरील चौफेर परसलेलें निरभ्र अनंत आकाशच तेवढें, अखेर



दिसत होतें ! तरी, त्याचे दूरदूर जाणारे ते अस्पष्ट पण मधुर गंभीर स्वर! अजून वातावरणांत ते दुमदुमत होते–'हृदयीं ईश्वर नाचे, अमुच्या हृदयीं ईश्वर नाचे !...

अखेर, अनादि–अनंत आकाश, क्षितिजापर्यंत खालीं येऊन, अनंत अफाट दर्याविस्ताराला चिकटलेलें दिसलें !—तो हेलावत होता—लाटा वर–खालीं होऊन खळाळत फुटत होत्या ! !...ते उघडे-बोडके कातळ, त्यांत अखंड स्नान करीत, तसेच निश्चल पडले होते.

फेसाळत्या आर्द्र प्रकाशाचे शुभ्र तुषार फिरून चौफेर उसळत होते—

....२१०

पुढे, मागें,...चौफेर प्रकाश...प्रकाश पसरला होता !—

त्यांतच, मधला तो काळोखाचा पडदा नाहींसा झाला होता !

कानांवर उत्साही शब्द तेवढे पडत होते—" जिवंत हृदयें जगवुनि जगतीं – आम्हां जगावयाचें !—"

## — सं.पू र्ण —

–पुढील शब्दपट–

# " भेटेन पुन्हां !-"

–मागें पहा–

— आ गा मी —

## सामंत वाङ्मय

१ " भेटेन पुन्हां ! " [ स्वतंत्र सामाजिक कादंबरी ]
( पृष्ठें–३६० मूल्य रु. ५ )

[ तीन पिढ्यांतील सत्प्रवृत्तींच्या झगड्याचें शब्दचित्र ]
( १९५५ मध्यें प्रसिद्ध होईल. )

२ दिलजमाई [ नवे स्निग्ध लघुनिबंध ] पृष्ठें–१४४; मूल्य–रु. २।)

३ सारे न्यारे प्राणी ! [ कांहीं नवीं स्वभाव–चित्रें ]
( पृष्ठें–१४४; मूल्य–रु. २। )

४ देवांची दिवाळी [ कांहीं भावपूर्ण कथा ]
(पृष्ठें–१४४; मूल्य–रु. २। )

५ गगन–भराऱ्या [ कांहीं आकाश–नाटिका ]
( पृष्ठें–१४४; मूल्य–रु. २। )

६ साध्यासुध्यांचे संदेश [ कांहीं स्निग्ध लघुनिबंध ]
( पृष्ठें–१४४; मूल्य–रु. २। )

७ चिमणे जीव [ कांहीं भावपूर्ण कथा ] (पृष्ठें–१४४; मूल्य–रु. २।)

८ चिमण्या जगाचे नेते ! [ शालेय सहजीवनावरील स्वतंत्र कादंबरी ] (पृष्ठें–२२०; मूल्य–रु. ३॥)

९ पाप्यांचीं पितरं ! [ स्त्री जीवनावरील हृद्य, रसाळ अशी स्वतंत्र कहाणी ] (पृष्ठें– २२०; मूल्य रु. ३॥)

[हीं बहुतेक पुस्तकें लिहून तयार असून, अनुकूल प्रकाशन संधीची वाट पहात आहेत]

**चौकशीचा पत्ता**

सौ. स्नेहल र. सामंत, बी. ए.; 'अमर ज्योति वाङ्मय'
१४ बी, हरजीवनदास एस्टेट; १५९–६० व्हिन्सेन्ट रोड;
दादर–मुंबई १४.

# आपल्या वाढत्या बाळांच्या हातीं

सोज्वल, कलात्मक

अमर ज्योति वाङ्मय

**विश्वासानें अवश्य द्या.**

त्यांच्या अभिरुचीला हितावह वळण लागेल.

* पहिल्या ९ पुष्पांची द्वितीयावृत्ति

**केमकर आणि मंडळी, मुंबई ४.**

क्रमानें प्रकाशित करीत आहेत.

* **भावजीवन** (१५ आणे), **शहरचे भाई** (१५ आणे) **मायेची किमया** (रु. १), **माणसाचें शेपूट** (१२ आणे), **पहिले सात** (१५ आणे), **दुसरे सात** (१५ आणे), **आम्ही खेडवळ माणसं** (रु. २।).

ही पुढील अमर ज्योति वाङ्मय पुष्पें बक्षिस द्या.

इतर पारितोषिकार्ह विविध लहानमोठीं पुस्तकें

**—: आमच्याकडे हमखास मिळतात :—**

**के म क र आ णि मं ड ळी**

शिक्कानगर समोर, वि. पटेल रोड, मुंबई ४.

## आम्ही खेडवळ माणसं

" श्री. सामंतांच्या वाङ्मयांत विचारशीलता, त्रुटित पण भेदक वर्णनशैली, मनुष्य स्वभावाचें मार्मिक चित्रण आणि कथावस्तूची परिणामकारक मांडणी करण्यावरच सारें केंद्रित [illegible] लक्ष, हे मुख्य गुण आढळतात. 'आम्ही खेडवळ माणसं' मध्यें या गुणांचा आढळ होतो. त्यांत मूठभर पुढारलेले लोक व [illegible] पिळवणुकीच्या पकडीतून सुटण्या साठीं—धडपडणारी खेडवळ माणसें यांचा सनातन झगडा विदारक स्वरूपांत मांडला आहे... कादंबरी विचार प्रक्षोभक आहे...विचारप्रवण व संयमशील वाचकांना हीं ' खेडवळ माणसं " आवडण्यासारखीं आहेत."